UNIVERSAL LIBRARY
OU_192028
UNIVERSAL LIBRARY

॥ श्री ॥

# पहिलें महायुद्ध

१९१४-१८

( भाग दुसरा )

लेखक

श्री. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

मुद्रक व प्रकाशक

श्री. यशवंत कृष्ण खाडिलकर

श्रीदत्तात्रय प्रिंटिंग प्रेस, १३ शेणवीवाडी मुंबई नं. ४

( आवृत्ति पहिली )

सन १९४०

किंमत १॥ रुपया

# प्रस्तावना

ती. काकासाहेब खाडिलकर यांनीं गेल्या महायुद्धाच्या वेळीं १९१५-१६ सालीं महायुद्धाच्या दुसऱ्या वर्षात चित्रमय जगत् मासिकांत महिनेवारीनें लिहिलेले लेख ह्या भागात जसेच्यातसें घेतलेले असून, लेख सुबोध व्हावेत म्हणून पहिल्या भागाप्रमाणेंच ह्या भागांतहि दोन प्रसंगोचित नकाशे घातले आहेत. पहिला भाग प्रसिद्ध झाल्यावर सुमारे तीन महिन्यांनीं हा दुसरा भाग प्रसिद्ध होत असून ह्या पुढील उरलेले तीन भाग ह्यापेक्षा जलद निघावेत अशी व्यवस्था केलेली आहे.

॥ श्री ॥

# पहिलें महायुद्ध

[ भाग २ रा ]

## महायुद्धाचा दुसऱ्या वर्षाचा आगस्ट–सप्टेंबर महिना

महायुद्धाच्या दुसऱ्या वर्षाच्या आगस्ट महिन्यांत लढाईचा भर रशियाचेच वाजूला होता. जुल महिन्याच्या अखेरीस रशियाच्या रणक्षेत्रांत पांच विभागांत लढाई सुरू होती. लुबलीन–खोल्म हा आगगाडीचा फांटा कबजात घेऊन उत्तरेस ब्रेसलिटॉस्कच्या रोखानें जाण्याचा प्रयत्न सेनापति मॅकेन्सन करीत होते. इव्हन-गोराड व वार्सा या दोन किल्ल्याच्या पश्चिमेस दोन जर्मन सेना उभ्या होत्या. नॅरू नदीवर स्वतः हिंडेनबुर्ग सैन्याच्या हालचाली करीत होते व त्यांचा हेतु असा होता की नॅरू नदी ओलांडून नॅरू व बग यांमधील प्रदेश कबजांत येऊन इव्हन-गोराड व वार्सा या टापूंतील रशियन सैन्य व्हिश्चुला नदी सोडून बग नदी गाठण्याच्या आंत ब्रेसलीटॉस्कला आपण जाऊन पोचावयाचें. नॅरू नदीवर उत्तरेकडून रशियन सैन्यास कुमक येऊन पोचली आहे म्हणून नीमेन नदीवर व कोव्हनोच्या किल्ल्यावर चवथें जर्मन लष्कर चाल करून जात होतें. या चवथ्या जर्मन लष्कराचा मार्ग सुलभ व्हावा आणि जर्मन लोकांचा खरा होरा कोठे आहे याचा कांहीच थांग न लागून रशियन मुत्सद्यांत धादल उडावी आणि रशियन लष्करांत गोंधळ माजावा म्हणून पांचवें मोठें लष्कर रिगाच्या प्रांतांत धामधूम करीत होतें. सेनापति हिंडेन-बुर्ग यांच्या ह्या पांच मजली अक्राळविक्राळ लष्करी धोरणाच्या देखाव्यानें रशियन सेनापति ग्रॅंड ड्यूक निकोलस बिलकूल गांगरून गेले नाहींत. वार्सा व इव्हनगोराड येथील सैन्य मागें घेऊन बग नदीच्याहि पूर्वेस सुखरूप जागा पाहून तेथें उभें रहाण्याचा रशियन सैन्याचा बेत त्यानीं आगस्टच्या पहिल्या तारखेस रशियाच्या

पार्लमेंट सभेंत शांतपणें जाहीर केला. या पिछेहाटीची बातमी ऐकून रशियन राष्ट्राच्या शांत वृत्तींत बिलकूल फेरबदल दिसला नाहीं. इतकेंच नव्हे तर जर्मनीच्या होत चाललेल्या या विजयाचा रशियावर असा काहीं परिणाम झाला कीं हे पराजयच रशियास अखेरीस सुखकारक होणारे असून जर्मनीच्या शेवटच्या नाशास रशियाची ही पिच्छेहाट कारणीभूत झाल्यावांचून रहाणार नाहीं अशी सर्वांची खात्री झाली, आणि बादशहापासून लगोट्यापर्यंत सर्वांनीं जर्मनीचा पक्का सूड उगावण्याचा दृढ निश्चय केला! आगस्टच्या दुसऱ्या तिसऱ्या तारखेस लुबलीन–खोल्म आगगाडी सेनापति मॅकेन्सन यांच्या ताब्यांत जाऊन इव्हनगोराडचा किल्ला अर्धामुर्धा ऑस्ट्रियानें घेतला; आणि इव्हनगोराड व वार्सा या दोन टाण्यामध्यें व्हिश्चुला नदी ओलांडून जर्मन सेना पूर्वेस पुढे पाऊल टाकू लागली. लोझ, आस्ट्रोल्का व पुलटास्क या तीन किल्ल्याच्या टापूत नॅरू नदी ओलांडून उत्तरेकडून आस्ट्रोलेंकाच्या आसपास बग नदी जवळ जर्मन सैन्य येऊन पोंचलें तेव्हां पांच ऑगस्ट रोजीं वार्सा व इव्हनगोराड हीं दोन्ही शहरें सोडून व्हिश्चुला नदीवरचें सर्व रशियन सैन्य सर्व सामानसुमानासह आणि महत्त्वाच्या चीजवस्तूसह ब्रेसलीटॉस्कच्या रोखानें पूर्वेस मागे हटत चाललें. दक्षिणेकडून व उत्तरेकडून जर्मन अगोदर ब्रेसलिटॉस्कला पोंचतात का व्हिश्चुलावरचें रशियन सैन्य ब्रेसलिटॉस्कला अगोदर पोंचतें अशी शर्यत सुरू झाली! लोडावा येथे दक्षिणेकडील जर्मनांना काहीं काल हट्टानें रशियनांनीं थोपवून धरलें आणि बिस्कच्या पूर्वेस नूरझेक नदीवरहि निकराच्या लढाया लढून उत्तरेकडील जर्मन सैन्याला रशियानें थोपवून धरलें. वीस तारखेच्या सुमारास ब्रेसलिस्टॉकला सर्व रशियन सेना सुरक्षितपणें पोंचली; आणि पूर्व पोलडांत रशियाला फोडण्याचा सेनापति हिंडेनबर्ग याचा डाव फोल झाला! पूर्व पोलंडातील रशियाची ही पिछेहाट रशियाच्या लष्करी इतिहासात अपूर्व स्वरूपाची असून आपला सेनाशकट मोडूं न देण्याची खबरदारी घेण्यांत ग्रँड ड्यूक निकोलस यांनीं जे विलक्षण कौशल्य दाखविलें त्याबद्दल त्यांची तारीफ करावी तितकी थोडीच आहे. मे महिन्याच्या प्रारंभापासून ही पिछेहाटीची सक्रांत रशियाच्या मागे लागली असून चार महिने पुरे झाले तरी या सक्रातीचें बल बिलकुल कमी झालेलें नाहीं. सप्टेंबर ऑक्टोबर महिन्यांतहि आणखी बऱ्याच ठिकाणीं पिछेहाट करावी लागेल असा अंदाज आहे. लष्करांची खराबी होऊं न देतां व्यवस्थित-

घणें पिछेहाट करणें आणि विजयी शत्रूंच्या हातावर किल्ल्यांची व शहरांची नुसती फोलपटें ठेऊन त्याला आपलें तोंड हिरमुसलें करावयास भाग पाडणें ही गोष्ट कांहीं लहानसान नव्हे. सेनापति हिंडेनबुर्ग यांच्या हालचाली डोळ्यांना दिपवून सोडतात ही गोष्ट खरी आहे; पण ग्रॅंड ड्यूक निकोलस यांची संकटसमयीची पिछेहाटीची कर्तबगारी, सतत टिकणारा पूज्यभाव इंग्लंडच्या मनांत उत्पन्न करीत आहे. असो. वीस आगस्टच्या सुमारास रशियन सेना ब्रेसलिटॉस्क येथे जाऊन पोचल्याबरोबर खुद्द ब्रेसलिटॉस्क किल्ल्याला चारी बाजूंनीं वेढण्याचा जर्मनांनीं प्रयत्न चालविला. नूरझॅक नदी उतरून बिस्क शहर घेऊन ब्रेसलीटॉस्कच्या उत्तरेकडील बिलोविसच्या जंगलाच्या पश्चिम भागाजवळ जर्मन सैन्य जाऊन थडकलें आणि दक्षिणेकडून बग नदीच्या पूर्वेस जाऊन ब्रेसलिटॉस्क व रोव्हनो यांमधील आगगाडीचा फाटा जर्मनीनें ताब्यांत घेतला. चारहि बाजूंनीं वेढलें जाऊं नये म्हणून आगस्ट महिन्याच्या चवथ्या आठवड्यांत ब्रसलिस्टॉस्कचा किल्ला सोडून ब्रेसलिटॉस्क–मास्को रेल्वेनें रशियन सैन्य पूर्वेस मागे हटत चाललें. आगस्ट अखेरीला व सप्टेंबर प्रारंभाला ह्या रेल्वेच्या रोखानें चाळीस पन्नास मैल जर्मन पुढे गेले, व त्यांनीं कोब्रीन आपल्या ताब्यांत घेतलें. सप्टेंबर प्रारभाला ब्रेसलिटॉस्क व कोब्रीन यांच्या उत्तरेकडील बिलोव्हिस्कचें जंगल ओलांडून प्रुशानीसच्या जवळ जर्मन सेना गेली होती. बिस्क व बिलास्टॉक हीं आगगाडीचीं नाकी ताब्यांत घेऊन व्हालकोव्हिस्कच्या जंक्शनकडे जाण्याकरितां चाल करून जाणाऱ्या जर्मन सेनेस निम्म्या रस्त्यावर म्हणजे गोराडोक येथे रशियनानीं थोपवून धरिलें होतें. नीमेन नदीच्या कांठीं एकोणीस आगस्टच्या सुमारास कोव्हनोचा किल्ला जर्मनीनें घेतला आणि आगस्ट अखेरीस व सप्टेंबरच्या प्रारभाला ओलिटा, ऑरानी व ग्रोडनो हीं तीनहि ठाणीं जर्मनीच्या ताब्यांत जाऊन व्हिलनाच्या मुख्य ठाण्यास पश्चिमेप्रमाणें दक्षिणेकडूनहि जर्मनीनें शह दिला. उत्तरेस रिगाच्या प्रांतांत रिगा व डुनाबर्ग ही आगगाडी ओलांडून वर जाण्याचा जर्मनी आटोकाट प्रयत्न करीत आहे. ही आगगाडी ओलांडून वर जाणें म्हणजे फिनलंडचें आखात व रशियाची राजधानी जें पेट्रोग्राड शहर ह्याच्या रोखानें नव्या स्वारीस सुरवात करण्यासारखें आहे. डुना नदी व रिगा ह्या आगगाडीपासून उत्तरेस पेट्रोग्राड शहर तीनशें साडेतीनशें मैलांवर आहे आणि रशियाला सप्टेंबर–आक्टोबर या दोन महिन्यांनंतर म्हणजे नोव्हेंबर महिन्यांत

केव्हां तरी जर जर्मन सैन्य रशियाच्या राजधानींत शिरलें तर ती गोष्ट ओघाओघानेच घडून आली, असें म्हणावें लागेल. सेनापति हिंडेनबुर्ग यांच्या हालचालीचा उत्तरेकडील हा गुप्त ओघ रशियाच्या ध्यानांत आला असून पेट्रोग्राड टापूचें संरक्षण करण्याकरितां आणि हा नवा ओघ मुळातच आटवून टाकण्याकरितां रशियानें आगस्ट अखेरीस बंदोबस्त केला आहे. रिगा–डुना–हा आगगाडीचा फाटा सुसंरक्षित केला असून व्हिलनाच्या उत्तरेकडून जर्मन सैन्याच्या पूर्व बगलेवर आपणहून हल्ले चढविण्यास रशियानें सुरवात केली आहे. पेट्रोग्राडवर चाल करून जाणें आपणास सुलभ पडावे म्हणून रिगाचें आखात व फिनलडचें आखात येथे जर्मन आरमारानें आगस्टच्या दहा तारखेपासून वीस तारखेपर्यंत बरीच गडबड केली, पण वीस आगस्टच्या सुमारास आठ दहा धाकटी जहाजें, दोन क्रुझरें, व एक मोठे बेडर जहाज, येवढे मोठे आरमार बाल्टिक समुद्रात व रिगाच्या आखातात रशियन आरमाराशी लढताना बुडाल्यामुळे म्हणा किंवा निकामी झाल्यामुळे म्हणा, जर्मनांची आरमारी गडबड आगस्ट अखेर बद पडली. व्हिलना, डुना व रिगा ही ठाणीं सप्टेंबरमध्ये जर्मन लोकाना जर लवकर घेता आली आणि रिगाचे आखातात व फिनलडचे आखातात जर जर्मन आरमाराला आपले वर्चस्व स्थापिता आले तरच पेट्रोग्राडवरील स्वारीस हिवाळयाच्या अगोदर काही तरी रगरूप येण्याचा सभव आहे. तेव्हा रिगाचें आखात आणि व्हिलना, डुना व रिगा ही आगगाडी यावर सप्टेंबर महिन्यात वाचकानी लक्ष पुरविणें जरूर आहे.

## मागें लागत जर्मनी कोठपर्यंत जाणार ?

ग्रोडनो, कोव्हनो पडल्यानतर लिडा जक्शनच्या दिशेनें जर्मनीनें रशियाच्या मागे लागत जावें हें पेट्रोग्राडच्या मोहिमेच्या दृष्टीनें यथायोग्य आहे. कारण लिडा जक्शन घेऊन व्हिलनाला दक्षिणेकडून वळसा घालून मिन्स्क प्रातातील दलदलींत रशियाच्या सैन्याचें त्या बाजूचें केंद्रस्थान नेऊन टाकल्याशिवाय, व्हिस्क ऊर्फ डुनाबर्ग व रिगा हा पाया कल्पून पेट्रोग्राडवर करावयाची मोहीम केव्हांहि पायाशुद्ध होणार नाहीं. कारण व्हिलना ते डुनाबर्ग ही आगगाडी जर रशियाच्या ताब्यांत राहिली तर तेथून जर्मन सैन्यावर हल्ला करून एखादेवेळेला रशियाला पेट्रोग्राडवरील मोहिमेच्या पायाच्या पिछाडीस येतां येण्यासारखें आहे, व तसें झाल्यास पायासकट सर्व मोहीम ढासळून पडण्याचा संभव आहे. डुनाबर्ग–रिगा हा पाया

पूर्णपणें कबजांत घेऊन आणि व्हिलना घेऊन व्हिलनाच्या पूर्वेस मिन्स्क प्रांताच्या दलदलींत रशियन सैन्याला रेटून तो पायाशुद्ध करून घेणें हें काम सप्टेंबर प्रारभापासून सर्वांत उत्तरेकडील जर्मन लष्करानें आरभिलें आहे. हा पायाहि जर्मनीच्या ताब्यांत पक्का जाऊं नये आणि ताब्यांत गेला तरी उजव्या बगलेवरील भीतीमुळें तो नेहमीं अशुद्धच रहावा अशी रशियानें सप्टेंबरच्या प्रारभापासून अटोकाट खटपट चालविली आहे. या खटपटींत रशियास यश येईल अशीं सांप्रत चिन्हें दिसत आहेत. या ठिकाणीं असा प्रश्न उद्भवतो कीं, जर्मनीला रशियाच्या राजधानीचें पेट्रोग्राड शहर तरी घेऊन काय करावयाचें आहे ? समजा, जर्मनी एक दोन महिन्यात पेट्रोग्राडच्या जवळ गेला आणि आपल्या राजधानीचें शहर सोडून रशियानें दक्षिणेस मॉस्को शहरांत आपली राजधानी नेली, तर जर्मनीला कोणचा फायदा झाला ? महायुद्धाच्या प्रारंभीं पारिस शहराजवळ जर्मन सेना गेली, त्यावेळीं फ्रेंचांनीं आपली राजधानी खालीं दक्षिणेस नेली नव्हती काय ? पेट्रोग्राड येथून राजधानी मास्को शहरात गेल्यानें महायुद्ध थोडेच थांबणार आहे ? पूर्वी नेपोलियननें मास्को शहर घेतले तरीहि राशियानें तह केला नाहीं, उलट रशियाच्या बर्फाला सर्व सैन्य अर्पण करून हात हालवत नेपोलियनला फ्रान्सकडे पळून जावें लागले. शभर वर्षांपूर्वी व्हिलनाच्या प्रातातून नेपोलियननें मास्कोवर जुलै महिन्यांत मोहीम करण्यास सुरवात केली होती. आज सप्टेंबरच्या प्रारंभाला रिगा–डुनाबर्गच्या पायाजवळ जर्मनी उभा असून पेट्रोग्राडवर मोहीम करू पहात आहे. व्हिलनाच्या पायावर उभा राहून मास्कोच्या मोहिमेला नेपोलियननें जेव्हां आरंभ केला तेव्हां हिवाळ्यांतील बर्फ पडण्यास चार पाच महिन्याचा अवकाश होता. आज डुना नदीच्या पायावर जर्मनसेना उभी असतांना बर्फ पडण्यास अवघा एक दोन महिन्याचा अवधि उरला आहे. ऋतुमानाचा विचार करतां नेपोलियनच्या मागे मोहिमेच्या दृष्टीनें सेनापति हिंडेनबर्ग दोन अडीच महिन्यांनीं मागासलेले आहेत; पण एक गोष्ट जर्मनांना अनुकूल आहे. ती ही कीं, व्हिलनापासून मास्कोचें जितकें अतर आहे त्याच्या दोन तृतियांश किंवा निम्याइतके अंतर डुना नदीपासून पेट्रोग्राडचें आहे. दुप्पट अंतराला दुप्पट दिवस, निंपट अन्तराला निंपट दिवस हा हिशोब गैरवाजवी नाहीं. शिवाय रिगाच्या आखातांत व फिनलंडच्या आखातांत जर जर्मन आरमाराला आपलें वर्चस्व स्थापितां आलें–आणि आगस्ट महिन्यांतील रिगाच्या

आखातांतील पराभवानंतरहि तसें वर्चस्व स्थापतां येणें जर्मन आरमाराच्या शक्ति-बाहेरचें नाहीं–तर सेनापति हिंडेनबर्ग यांना पायापासून तीनशें साडेतीनशें मैल पेट्रोग्राडच्या मोहिमेंत चालून जावयाचें आहे असें म्हणण्यापेक्षां १५०–२०० मैलच्च चालून जावयाचें आहे असें म्हणावें लागेल. बरें, ऋतुमानानें सेनापति हिंडेनबुर्ग नेपोलियनच्या मागें नाहींत असें ठरलें तरी मास्को शहर जाळून आश्रयाशिवाय व अन्नपाण्याशिवाय रहावें लागल्यामुळें हिंवाळ्याच्या बर्फांत नेपोलियनचें सैन्य जसें गारठून गेलें, तसें जर्मनीचें सैन्य पेट्रोग्राड येथें कशावरून मरणार नाहीं? शंभर वर्षांपूर्वींचा नेपोलियनचा काळ आगगाड्याचा व मोटार गाड्यांचा नव्हता. आज शत्रूच्या मुलखांत लष्कर पुढें चाललें म्हणजे मागे आगगाड्या व इतर रस्ते दुरुस्त करण्याचें काम इतक्या झपाट्यानें चाललेलें असतें कीं ज्या ठिकाणीं आगगाडी किंवा मोटारगाडी जाऊन पोंचली नाहीं अशा ठिकाणापासून एकदोन मजला म्हणजे २०, २५ मैलच्च लढणारे लोक पुढे गेलेले असतात. अर्थात् मोहिमेचा पाया पक्का व व शुद्ध करून घेतल्यानतर खायला प्यायला नाहीं म्हणून कोणतेंहि लष्कर नेपो-लियनच्या लष्कराप्रमाणें मरून जाणें शक्य नाहीं. शिवाय पेट्रोग्राड शहर वीस पंचवीस लाख वस्तीचें; आणि पेट्रोग्राडच्या आसपासचा चाळीस पन्नास मैल घेराचा टापू निरनिराळ्या प्रकारच्या कारखान्यांनीं गजबजलेला; असलें शहर व असला टापू आज जाळण्यास रशिया कसा तयार होईल? लष्करी धोरणाच्या दृष्टीनें रशियन सरकार तयार झालें आणि रशियन लष्करानें हातांत आगपेट्या घेतल्या, तरी उद्योगधंद्यावर उपजीविका करणारे त्या टापूंतील लाखो मजूर व कारागीर त्यांच्या कारखान्यांस आग लावणाऱ्या सैनिकांचे हात धरल्यावांचून कसे रहातील? घरें जाळलीं तर दहापंधरा दिवसांत झोपड्या बांधून त्यांत मनुष्य निर्वाह करूं शकतो; उभीं शेतें जाळलीं तर त्या जाळलेल्या व पडलेल्या जमिनीत पुढील सालच्या हंगामांत दुप्पट पीक काढतां येतें; पण मोटमोठे कारखाने जर जमीनदोस्त झाले तर तीन, पांच किंवा दहा पंधरा वर्षेपर्यंत पोटावर बिब्बा घालावा लागतो! अर्थात् शंभर वर्षांपूर्वीं मास्को येथें जें संकट नेपोलियनवर गुदरलें तें संकट पेट्रोग्राड येथे येत्या नोव्हेंबर डिसेंबर महिन्यांत सेनापति हिन्डेनबुर्ग यांजवरहि गुदरेल, असें म्हणणें युक्तिजुक्तीस धरून होणार नाहीं. नेपोलियनला पाहिजे तितका रशियननें आंत घुसूं दिला आणि बर्फाच्या राशींत पुरून टाकलें, तशा प्रकारचे शंभर

वर्षापूर्वीचे डावपेंच रशियाला आज बिलकूल उपयोगी पडावयाचे नाहींत. डुना नदीवर रशियानें जर्मनीला अडवलेंच पाहिजे आणि डुना नदीपासून पेट्रोग्राडपर्यंत एकसारखें लढत राहिलें पाहिजे. पेट्रोग्राडच्या मोहिमेंत नुसती व्यवस्थित पिछेहाट करून लढाई देण्याचें नाकारून चालवयाचें नाहीं कां चालावयचें नाहीं? पेट्रोग्राटची राजधानी मास्कोला जाईल आणि तीन चार वर्षांच्या युद्धाच्या अखेरीस जर्मनी दमांत उखडला जाईल; मग लढाई न देण्यानें आज कां भागणार नाहीं! पेट्रोग्राडची राजधानी मास्कोला जाईल खरी; म्हणजे बादशाहा, मंत्रिमण्डळ, सरकारी कागदपत्र व निजोरींतील सोनें या सर्वांसह लष्कर मास्कोला जाईल हें खरें; पण पेट्रोग्राड शहरातील व पेट्रोग्राडच्या टापूंतील कारखाने थोडेच मास्कोला जाणार आहेत? हल्लीचें युद्ध तरवारीचेंहि नाहीं व भाल्याचेंहि नाहीं. मशिनगन्स, तोफा, व दारूगोळा यांचें हें युद्ध आहे. मोटमोठया कारखान्यांच्या पाठिंब्याशिवाय जगी सेना म्हणजे शुष्क पाचोळा. रशियाचे असले कारखाने उत्तरेस पेट्रोग्राड, मध्यावर मास्को, व दक्षिणेस कीव्ह या तीन शहरांत व तीन टापूंत आहेत. त्यापैकी पेट्रोग्राडचे कारखाने सर्वांत मोठे व अधिक महत्त्वाचे. पेट्रोग्राड जर जर्मनीच्या ताब्यांत जाईल तर रशियाच्या लष्करांतील एक तृतीयांशाहून अधिक रुधिराभिसरण बंद पडून रशियाला एकदम अर्धांगवायू होईल. आणि मग? अर्धांगवायूचें शरीर मागें तरी हलणार कसचें आणि पुढें तरी जाणार कसचें? एवंच पेट्रोग्राडच्या मोहिमेच्या पायाजवळ म्हणजे व्हिलना व डुना नदीच्या टापूंत सप्टेंबर महिन्यांत भयंकर लढाया झाल्या पाहिजेत. आगस्ट महिन्यांतील पिछेहाट रशियानें ह्या लढायांची पूर्ण तयारी करण्याकरितांच केली असून या लढायांत यश संपादन करण्यास रशिया आगस्ट अखरीस सर्वतोपरी लायक व सज्ज झाला आहे.

## दक्षिण रशिया व डार्डानेलिस

रशियाला अर्धांगवायु व्हावा म्हणून जर्मनीच्या दृष्टीनें पेट्रोग्राडवरची मोहीम जरूर आहे, आणि या मोहिमेच्या दृष्टीनें व्हिलना, कोव्हनो व ग्रोडनो या टापूंतून मिन्स्कच्या दलदलीच्या प्रांतांत रशियन सैन्याला नेऊन सोडणें इष्ट आहे. हें जरी सिद्ध झालें तरी ब्रेसलिटॉस्कच्या पूर्वेस मास्कोच्या रोखानें रशियाला जर्मन लोक कां रेटीत आहेत? ब्रेसलिटॉस्क सोडून पूर्वेकडे सप्टेंबर प्रारंभाला साठ सत्तर मैल

जर्मन कां गेले ? ब्रेसलिटॉस्कपासून मास्को शहर सहा सातशें मैल आहे, आणि या सहा सातशें मैलापैकीं पहिले दोन अडीचशें मैल प्रिपेट नदीच्या दलदलीच्या रानांतून आगगाडी जाते. अशा स्थितींत मास्कोवर चाल करून जाणें १९१५ सालीं तरी जर्मनांना शक्य नाहीं. मग ब्रेसलिटॉस्क सोडून पूर्वेकडे हे कोठें चालले आहेत ? अहेतुक म्हणजे मूर्खपणाची ही चाल आहे काय ? जर्मन सैन्याच्या हालचालींतील सुसंबद्धता लक्षांत यावी म्हणून पूर्व ग्यालिशिया, दक्षिण रशिया, प्रिपेट नदी, नीस्टर नदी, कीव्हप्रांत आणि काळ्या समुद्रावरील ओईसाचें बंदर यांच्या नकाशाकडे वाचकांनीं लक्ष द्यावें. जुलै महिन्याच्या अखेरीस पूर्व ग्यालिशियांत लेंबर्ग घेतल्यानतर जनरल मॅकेन्सेन हे उत्तरेस ब्रेसेलिटॉस्ककडे वळले. वार्सा घेण्याकरितां आणि पेट्रोग्राडच्या मोहिमेची पूर्व तयारी करण्याकरितां ब्रेसलिटॉस्ककडे वळणें जरूर होतें. पण आपण अशी कल्पना करूं कीं, पेट्रोग्राड घेऊन रशियाला अर्धागवायूनें सतावण्याचा हेतु जर्मनीच्या मनांत कधींच शिरला नाहीं, आणि दक्षिण रशियांतील कीव्हप्रांत घेऊन एक तृतियांश किंवा एक चतुर्थांश रशियाचा भाग तेवढा वातबद्ध करण्याचा जर्मनीचा बेत होता. पेट्रोग्राड घेणें ही मोठी महत्वाकांक्षा आहे. कीव्ह घेणें ही त्याहून धाकटी महत्वाकांक्षा आहे. लेंबर्ग घेतल्यानतर धाकट्या महत्वाकांक्षेचाच पिच्छा जरी जर्मनाना पुरवावयाचा असता तरी देखील ब्रेसलिटॉस्कपर्यंत जर्मनांना उत्तरेस जाणें भाग पडतें. दक्षिणेकडील रशियनाची सेना रशियाच्या उत्तर सेनेशीं व दक्षिण सेनेशीं तीन मार्गांनी साधली गेली आहे. पहिला मार्ग—ब्रेसलिटॉस्क, नोव्हेल व रोव्हनो हा आगगाडीचा फाटा, दुसरा—रोव्हनो, सार्नी व मिन्स्क या आगगाडीच्या फाट्यानें प्रिपेट नदीचें दलदलीचें रान ओलांडून उत्तरेस मिन्स्क प्रांताकडे जातो, आणि तिसरा मार्ग म्हणजे पेट्रोग्राड—मास्कोवरून दक्षिणेस कीव्हकडे उतरणारा आगगाडीचा रस्ता होय. हे तीन्ही मार्ग ध्यानांत धरून कीव्हकडे जाणाऱ्या जर्मन सेनेस वाटेत कोणकोणते अडथळे आहेत याचा आपण विचार करूं. लेंबर्गपासून कीव्हपर्यंत जर नाकासमोर चाललें तर दोन अडीचशे मैलात वीस पचवीस लहान मोठ्या नद्या ओलांडाव्या लागतात. नीस्टर नदी, बगनदी, नीपर नदी इत्यादि मोठ्या नद्या असून शिवाय या नद्याना मिळणाऱ्या उत्तरेकडून दक्षिणेकडे वहाणाऱ्या नद्या किती तरी आहेत ! हें नद्यांचें जाळें रशियाच्या पिछेहाटीस अनुकूल आणि

जर्मनांच्या चढाईस प्रतिकूल आहे. हें नद्यांचें जाळें मोकळें कसें करावयाचें? एक नदी ओलांडून दुसऱ्या नदीवर सन्मुख हल्ला करीत असतांना दक्षिणेकडून रशियन सैन्यास वळसा द्यावा तर तें सोपें काम नाहीं. प्रुथ नदी, सीरेत नदी, नीस्टर नदी आणि बग नदी यांचीं पात्रें दक्षिणेकडे फारच मोठीं होतात. तेव्हा दक्षिणेकडून वळसा देण्याचें काम सन्मुख हल्ल्याच्या इतकेंच कठीण, अर्थात् दक्षिणेकडील वळसा व सन्मुख हल्ला यांना उत्तरेकडील वळशाची भरपूर मदत पाहिजे. हा उत्तरेकडील वळशाचा हल्ला कोणच्या प्रांतातून करावयाचा? या पांच पंचवीस नद्यांचें जाळें ज्या उंचवट्याच्या भागांत उगम पावतें तो भागच या उत्तरेकडील वळशाचा टापू होय. तो भाग म्हणजे ब्रेसलिटॉस्क येथून निघून नोव्होल-रोव्हनोवरून कीव्हकडे जाणारी आगगाडी होय. अर्थात् कीव्हकडे जर जावयाचें असेल तर जर्मन सैन्यानें लेंबर्गप्रमाणें रोव्हनो येथेंहि आपल्या कीव्हच्या मोहिमेचें केंद्रस्थान बनविलें पाहिजे; आणि नंतर रोव्हनो, लेंबर्ग, व बुकोव्हिना या तिन्ही बाजूंनीं म्हणजे उत्तरेची बगल, मध्य व दक्षिणेची बगल या तिन्ही दिशांनी रशियास मागें रेटलें पाहिजे. जुलैच्या प्रारंभाला लेंबर्ग प्रांत व बुकोव्हिना प्रांत हे मजबूतपणें जर्मनीनें पकडले होते, व ते दोन्ही पाय शुद्धहि झालेले होते. रोव्हनो मात्र जर्मनीच्या ताब्यांत गेलेलें नव्हतें. रोव्हनो ताब्यांत कसें घ्यावयाचें व रोव्हनोचा पाया शुद्ध करून कसा घ्यावयाचा? लेंबर्ग पडण्याबरोबर लेंबर्ग येथून रोव्हनोकडे जर्मनीनें हल्ला केला असता तर रोव्हनो घेतां आलें असतें खरें; पण तेवढ्यानें रोव्हनोचें ठिकाण कधींच पायाशुद्ध झालें नसतें. कारण पिछाडीस पूर्व पोलंडमधील रशियन सेनेनें बाधा केली असती; वायव्येकडून ब्रेसलिटॉस्क येथील रशियन सेनेनें त्रास दिला असता; आणि प्रिपेट नदीच्या दलदलींतून खालीं उतरणाऱ्या रेल्वेनें उत्तरेकडून रोव्हनोला दाबलें असतें. रोव्हनोचा पाया शुद्ध होण्याकरितां पूर्व पोलंडातील लुबलीन–खोल्म रेल्वे व ब्रेसलिटॉस्कचा किल्ला आपल्या हातांत घेणें भाग होतें. हीं घेतल्यानें कोव्हनोची पिछाडी व वायव्य बगल यांचें ग्रहण सुटलें. कोव्हनोचें उत्तरेचें ग्रहण सुटविण्याकरितां कोव्हनोहून उत्तरेकडे जाणारी आगगाडी प्रिपेट नदीची दलदल ओलांडून ब्रेसलिटॉस्क–मास्को रेल्वेला ज्या ठिकाणीं जाऊन मिळते तो मिन्स्कचा प्रांत जर्मनीला आपल्या ताब्यांत घेणें जरूर आहे. ब्रेसलिटॉस्क येथून निघून पूर्वेकडे जाऊन मिन्स्क प्रांत जर्मनीनें आपल्या ताब्यांत जर घेतला

तर रोव्हनोची उत्तरेकडची बाधा नष्ट होईल. इतकेंच नव्हे, तर रोव्हनोपासून कीव्हपर्यंत जाणाऱ्या जर्मन सेनेला दक्षिण रशियावरील मोहिमेंत उत्तरेकडून कोठेंच बाधा होणार नाहीं. ब्रेसलिटॉस्कचा किल्ला आगस्टच्या तिसऱ्या आठवड्यांत पडण्याबरोबर जर्मनांनीं पूर्वेस जो झपाट्यानें पाठलाग सुरू केला, त्याचें कारण रोव्हनोच्या प्रांताचें उत्तरेकडील ग्रहण सुटविणें कीव्हवरील मोहिमेस इष्ट आहे हें होय. रोव्हनो प्रांताचें उत्तरेकडील ग्रहण सोडविण्याच्या उद्योगाबरोबरच रोव्हनो ताब्यांत घेणें आणि पूर्व ग्यालिशियांतील रशियन सैन्य मागें हटविणें हीं कामें आस्ट्रो जर्मन सैन्यानें २६ आगस्टपासून सुरू केलीं. लस्क, डुबनो आणि रोव्हनो या तीन किल्ल्यांच्या त्रिकोणापैकीं पश्चिमेकडील लस्क किल्ला जर्मनांनीं घेतला असून लस्क येथून रोव्हनोवर सप्टेंबर प्रारंभाला ते चाल करून जाऊं लागले; त्याप्रमाणें लेंबर्गच्या ईशान्येकडील ब्रोडी गांव घेऊन डुबनोला त्यांनीं शह दिला आणि त्यामुळें सप्टेंबर प्रारंभाला पूर्व ग्यालिशियांतील रशियन सैन्य टार्नोपोल गांव व सीरेत नदी यांच्या पलीकडे म्हणजे ३०–४० मैल मागें हटलें. आगस्ट अखेरीस व सप्टेंबर प्रारंभाला दक्षिणेकडेहि अशी व्यवस्थेशीर व पायाशुद्ध हालचाल जर्मन सैन्यानें सुरू केल्यामुळें शंका उत्पन्न होते कीं, सप्टेंबर आक्टोबर महिन्यांत जर्मनी पेट्रोग्राडवर चाल करून जाणार का कीव्हवर चाल करून जाणार ? मध्यावरील सैन्यास फारसें काम आतां उरलें नसल्यामुळें मिन्स्क व प्रिपेट नदीच्या दलदलीच्या रानांतील बरेंचसें जर्मन सैन्य उत्तरेकडे व दक्षिणेकडे वाटून देण्यास आतां हरकत नाहीं. मध्यावरील सैन्यानें स्वस्थपणें नीमेन नदी गांठून १७७० सालांतील जुन्या पोलंडची पूर्व सरहद्द साधल्यास पहावी एवढेंच मध्यावरील सैन्याकडे काम आहे. कीव्ह व पेट्रोग्राड यांवरील मोहिमेकरितां मध्यावरील सैन्यानें जी कामगिरी बजावावयास पाहिजे ती कामगिरी आगस्ट अखेरीस बऱ्याच अंशीं बजाविली आहे. तेव्हां उत्तरेकडची व दक्षिणेकडची अशा दोनहि मोहिमा नेटानें चालू ठेवण्यास आस्ट्रिया-जर्मनीस हरकत नाहीं. पेट्रोग्राडवरील मोहीम रशियास लुळा करण्याच्या दृष्टीनें अधिक महत्त्वाची असली तरी तुर्कस्थानास मदत पोंचविण्याच्या दृष्टीनें दक्षिण रशियन मोहीम विशेष तातडीच्या स्वरूपाची आहे. आगस्ट महिन्यांत इटलीनें तुर्कस्थानशीं लढाई जाहीर केली असून सॅरॉसच्या उपसागरांत इंग्रजांनीं नवीन सेना उतरविली असून डार्डानेलसच्या जिभेवर सुलवरनु, सारीबेअर व आकीबाबा या तीन ठिकाणींहि इंग्रजांना कुमक पोंचून इंग्रजांचें पाऊल पुढें पडूं लागलें आहे. सप्टेंबर महिन्यांत

डार्डानेलिसची सामुद्रधुनी इंग्लंड, फ्रान्स व इटली यांच्या ताब्यांत जाणें असंभवनीय नाहीं. फ्रान्समध्यें फ्रेंच लोक नुसत्या तोफांचा भडिमार करून उगीच बसले आहेत. जर्मन सैन्य फ्रान्सकडे वेधून धरण्याचा हा खटाटोप दिसतो. इंग्लंड, फ्रान्स व इटली यांचे खरे हल्ले डार्डानेलिसच्या बाजूला होणार असें स्पष्ट दिसूं लागलें आहे. डार्डानेलिसवरील तुर्कांची ठाणीं जर डळमळूं लागली तर तुर्कांच्या मदतीला जर्मनीनें धावून जाणें जरूर नाहीं काय? डार्डानेलिस जर डळमळली आणि मार्मोराच्या समुद्रात जर इंग्रज, फ्रेंच व इटालियन घुसले तर रोमानिया व ग्रीस इंग्रजांना सामील होण्याचा संभव आहे. आणि कॉन्स्टॉटिनोपल येथें इंग्रज जाऊन खात्रीनें पोंचणार व काळ्या समुद्रामार्फत रशियाशीं संलग्न होणार, अशीं चिन्हें दिसूं लागताच आज जर्मनीला अनुकूल असलेला बल्गेरियाहि सर्व्हियाकडून मासिडोनिया प्रांत घेववून इंग्रजांना मिळण्याचा संभव आहे. डार्डानेलिसवरील हल्ल्यांत पूर्ण यश संपादन केलें असता सर्व बाल्कन राष्ट्रें हीं जर्मनीच्या विरुद्ध उठून गेल्या चार महिन्यांत जर्मनीनें रशियन युद्धांत मिळविलेल्या विजयावर एकदम विरजण घालता येण्यासारखें आहे. अर्थात सप्टेंबर–आक्टोबर महिन्यांत डार्डानेलिसच्या लढाया फ्रान्समधील लढायांहून अधिक किंमतीच्या व पेट्रोग्राड-वरील मोहिमेस तोडीस तोड देणाऱ्या समजल्या जातील यांत शंका नाहीं. डार्डानेलिस डळमळीत होण्यापूर्वी ऑस्ट्रिया–जर्मनीचें सूत तुर्कस्थानच्या सुतांत जुळलें पाहिजे. सर्व्हियावर हल्ला करून बल्गेरियाच्या मार्फत हें सूत जुळवावें तर एखाद वेळेस रुमानिया व ग्रीस यांच्या मधाच्या पोळ्याला चुकून धक्का लागून सर्व बाल्कन मधमाशा जर्मनीस चावत सुटावयाच्या! रशिया अर्धांगवायूनें किंवा तृतियांश वायूनें लुला होईतों बाल्कन प्रदेशांतील राजण्यांचें पोळें डवचणें जर्मनीच्या लष्करी धोरणाच्या विरुद्ध आहे. तेव्हां तुर्कस्थानला जर तातडीनें मदत पोंचवावयाची असेल तर कीव्हवरील मोहीम खूप जोरानें सुरू करून दोन तीन आठवड्यांत कीव्हच्या अर्ध्या वाटेपर्यंत रशियाला मागें हटवून नीस्टर व प्रूथ ह्या नद्यांमधून बेसारेबिया प्रांताच्या मार्गानें काळासमुद्र गाठल्याशिवाय आस्ट्रो–जर्मन सैन्याला गत्यंतर नाहीं. पेट्रोग्राडवरील मोहीम महत्त्वाची तर खरीच पण दक्षिण रशियावरील मोहीम अधिक तातडीची! आणि या दोन्ही मोहिमांवर वरचढ करणारी मोहीम डार्डानेलिसवरची! सप्टेंबर महिन्यांत वाचकांनीं या तीनहि मोहिमांकडे विशेष लक्ष पोंचवावें हें सांगणें नकोच.

# महायुद्धाचा दुसऱ्या वर्षाचा सप्टेंबर-आक्टोबर महिना

आगस्ट महिन्याप्रमाणें सप्टेंबर महिन्यातहि रशियावरील जर्मनीची मोहीम दक्षिण भाग शिवाय करून मध्यभाग व उत्तर भाग या ठिकाणीं नेटानें पुढे ढकलण्यात येत होती; आणि रशिया मागे हटत असताना जर्मनीच्या लष्कराची मोठी खराबी करीत होता. आगस्ट महिन्यात जर्मनीचें पाऊल फार झपाट्यानें पुढे पडले; पण सप्टेंबर महिन्यात जर्मनी बराच मंदगति झाला. आपल्या आगगाड्याच्या जाळ्यापासून जर्मनी फार पुढे सरसावल्यामुळे सैन्याची कुमक वेळेवर लढणाराना पोंचेनाशी झाली; शिवाय रशियाच्या ज्या मुलखात जर्मनी आता घुसला आहे त्या मुलखात मोटारगाड्याना उपयोगी पडणारे रस्ते बहुतेक नसल्यामुळे आणि बराच प्रदेश दलदलींनी व्यापलेला असल्यामुळे थकले भागलेलें जर्मन सैन्य बरेंच मेटा-कुटीस आलें आहे. पीछेहाट करण्याचा सरसिम हुकूम रशियन सैन्यास सोडलेला नसून झारसाहेबांनी निकरानें लढण्याची आज्ञा चोहोंकडे जाहीर केली आहे. मनगटाला मनगट भिडवून जिवावर उदार होऊन निकरानें लढण्याचें शौर्य दाखविण्याच्या कामात रशियन शिपाई जर्मनाहून अधिक श्रेष्ठ आहे. यामुळे जस-जसें आपण पुढे जाऊ त्या त्या प्रमाणें कोपरानें खणण्याइतकी मऊ जागा आपणास सांप-डेल अशी जी अटकळ आगस्ट महिन्यात जर्मनांनी बांधली होती ती अटकळ सप्टेंबर महिन्यात वाया गेली. ता. २ मे रोजीं गॅलिशियन प्रांतात डुनाजी नदीवरील लढाईत जर्मनांनी रशियाची फळी फोडल्यापासून आगस्टअखेर चार महिने रशियाची एक-सारखी पीछेहाट होत होती. या चार महिन्यात डुनाजीची लढाई, प्रेजमिसलची लढाई, सॅन नदीवरील लढाई, ल्युबलीन खोल्मची लढाई, विस्कची लढाई, ब्रेस-लिटॉस्क, कोव्हनो व नोव्होजार्जीव्हिस्क या किल्ल्याचे वेढे, इतक्या महत्त्वाच्या लढाया झाल्या. पण डुनाजीच्या लढाईनंतर रशियन सेनेचा सामान्य कल पीछेहाटीकडे असल्यामुळे कोणत्याच ठिकाणीं बरेच दिवस चालणारें हातघाईचें तुंबळ युद्ध झालें नाहीं. सप्टेंबर महिन्यात मात्र वीस दिवस एकसारखें हातघाईचें तुम्बळ युद्ध झालें व अखेरीस रशियास पुन्हा पीछेहाटीचा क्रम स्वीकारावा लागला. ह्या तुंबळ युद्धात रशियन सैन्यांनी चांगला नावलौकिक मिळविला; रशियाच्या कर्तृत्वाविषयीं

इंग्लड व फ्रान्स या देशांत नवा विश्वास उत्पन्न झाला, आणि आक्टोबर महिन्यांत जर्मनीची चाल जर रशियानें अधिक मंदगति केली तर नोव्हेंबर डिसेंबरांत हिंवाळा सुरू होण्यापूर्वी रशियास उलथा पालथा करण्याचे जर्मनीचे उद्योग फोल होतील यासंबंधानें संदेह उरला नाहीं. रशियास हिंवाळ्यांत तीन चार महिने विश्राति पाहिजे आहे. या विश्रांतीच्या काळीं नवीन पंचवीस तीस लाख सैन्य रशिया गोळा करणार आहे. हिंवाळ्यापासून किंवा आक्टोबरपासून रशियास जर चार सहा महिने पूर्ण विश्रांति मिळाली तर पुढील मार्च महिन्यांत बर्फ वितळून गेल्यानंतर जर्मनीस उलट टांग मारल्यावांचून रशिया राहाणार नाहीं हे उघड आहे. सप्टेंबर महिन्या-प्रमाणें आक्टोबर–नोव्हेंबर महिन्यात निकरानें लढून जर्मनीस जेरीस आणून स्वतःच्या बाहुबलानें रशिया ही विश्रांति संपादन करील हे खरें आहे; तथापि या कामीं रशियास योग्यवेळीं मदत मिळावी म्हणून आणि जर्मनीची रशियावरील चढाई ढिली पडावी म्हणून बॉल्कन प्रदेशांत व पश्चिम रणभूमींत विलक्षण हालचाली व भयंकर लढाया सुरू करण्यांत आल्या आहेत. तेव्हां सप्टेंबर महिन्यांतील रशियाच्या तुंबळ युद्धाचें निरीक्षण करण्यापूर्वी बाल्कन प्रातांतील नवीन चळवळ आणि पश्चिम रणभूमींतील फ्रेंचांची चढाई ह्याकडे प्रथम लक्ष देणें जरूर आहे.

## रशियाला विश्रांति कशी मिळणार ?

उत्तरेच्या बाजूला म्हणजे पेट्रोग्राडवरील जर्मनीची मोहीम थोपविण्याकरितां रशियानें आगस्ट महिन्यांतच चांगली तयारी केली, व सप्टेंबर महिन्यांत या तयारीची योग्य फळेहि रशियाच्या पदरी पडलीं; तथापि रशियाच्या अंगांत नवें रक्त खेळूं लागल्यास आणि त्या योगानें जर्मनीवर रशियाची वरचढ होण्यास पांच–सहा महिन्याची विश्राति रशियास मिळणें जरूर आहे. या विश्रातीच्याहि काळीं दक्षिणेच्या बाजूला म्हणजे प्रिपेट नदीच्या दक्षिणेस सार्नीरोव्हनो प्रांतात व गॅलिशियाच्या पूर्व सरहद्दीवर जर्मनीशीं जोराचे दोन हात करण्याची पूर्ण ताकद रशियाच्या अगात आहे. या ताकदीचा अनुकूल प्रभाव दृष्टीस पडण्यास मध्यावर व उत्तरेस रशियास विश्राति मिळाली पाहिजे. ही विश्राति कशी मिळणार ? मध्यावर व उत्तरेस जर्मनीचें हल्लीं जे सैन्य आहे त्यापैकी एक तृतियांश किंवा निम्मे सैन्य दुसरीकडे कोठे तरी नेणें जर्मनीला भाग पडलें पाहिजे. असल्या पायबंदाशिवाय जर्मनी उत्तरेस व मध्यावर चर खणून बसणार नाहीं आणि चढाई करण्याचें सोडून

चर ह्मणून जर्मनीनें तोंड लपविल्याशिवाय रशियाला विश्रांति मिळणार नाहीं. जर्मनीला पायबंद कोठून द्यावयाचा? आहे या स्थितींत तीन ठिकाणीं पायबंद देतां येतो. बेल्जम व फ्रान्स येथील इंग्रजांनीं व फ्रेंचांनीं जोराची लगट करून जर्मनांची फळी फोडली तर रशियावरील दाब एकदम हलका होईल. हा पहिला प्रकार झाला. इटलीनें जर ऑस्ट्रियाची फळी फोडली तर जर्मनीला उत्तर सोडून दक्षिणेकडे ऑस्ट्रियाच्या मदतीला एकदम धावून यावें लागेल. हा दुसरा प्रकार झाला. इंग्रजांनीं व फ्रेंचांनीं जर डार्डानेलिसची सामुद्रधुनी कबजांत घेऊन कान्स्टांटिनोपल शहरावर हल्ला चढविला तर उत्तरेकडचें सर्व सैन्य मागें घेऊन दक्षिणेस सर्व्हियावर सर्व वजन टाकणें जर्मनीला भाग पडेल. हा तिसरा प्रकार. हे तिन्ही प्रकार जून, जुलई, ऑगस्ट व सप्टेंबर या चार महिन्यांत कमी जास्ती प्रमाणानें अमलांत आणण्यांत आले. यांपैकीं पहिल्या प्रकारांत म्हणजे फ्रान्सकडील लढाईस चांगलें यश आलें. सप्टेंबर प्रारंभापासून सप्टेंबरच्या पंचवीस तारखेपर्यंत इंग्रजांचा व फ्रेंचांचा तोफखाना बऱ्याच जोरानें जर्मनांच्या चरावर एकसारखा भडिमार करीत होता. ह्या वीस दिवसांत इंग्रजी नवें लष्कर फ्रान्समध्यें उतरविण्यांत आलें; आणि इंग्रजी लष्कराची संख्या १० लाखांवर गेली. अर्थात् हें एवढें मोठें लष्कर बेल्जममध्यें न मावून त्याखालीं दक्षिणेस फ्रान्समध्यें पसरावें लागलें. आरासच्या उत्तरेस असलेल्या लेन्स गावापर्यंत फ्रेंच सैन्याच्या जागा इंग्रज सैन्याच्या हवालीं करण्यांत येऊन मोकळे झालेल्या पांच सात लाख फ्रेंच सैन्याचा एक गट्ठा करून तारीख २५ सप्टेंबरच्या सुमारास फ्रेंच सेनापति जनरल जॉफ्रे यांनीं आईन नदीच्या काठच्या चांमपेन प्रांतांतील जर्मन फळीवर तो गोळा फेकला. 'मारा किंवा मरा' अशी सक्तीची आज्ञा यावेळीं सोडण्यांत आली, आणि शेवटचा निकाल लागेपर्यंत एकसारखें लढावें लागेल, क्षणाच्याहि विश्रांतीची अपेक्षा करतां कामा नये असें फर्मावण्यांत आलें. ठाणेवर असलेला घोडा रथाला जोडण्याबरोबर जसा हरणासारखा वायुगतीनें धांव मारण्यास फुरफुरूं लागतो त्याप्रमाणेंच इंग्रज व फ्रेंच सैन्यांची स्थिति सदर आज्ञा ऐकतांच झाली. चरांना रामराम ठोकून बाहेर पडण्यास ते उत्सुक झाले होते. शत्रूच्या अंगावर आम्हांस सोडा, घाणेरड्या चरांत आमचा कोंडमारा कशाला करतां अशी टुरटुर यांनीं अधिकाऱ्यांपाशीं चालविली होती. शत्रूच्या अंगावर तुटून पडण्यास उत्सुक झालेल्या फ्रेंचांना व इंग्रजांना जनरल जॉफ्रे यांनीं लढाईचा हुकूम

करतांच "नमयतीव गतिर्धरित्रीं" अशा धीर गंभीर चालीनें जर्मन चरांवर इंग्रजाचें व फ्रेंचांचें सैन्य चाल करून गेलें. ह्यापूर्वी ७५ तास एकसारखा भडिमार करून जर्मन चराचे सहस्रशः तुकडे तोफखान्यानें केले होते. तोफांचा असला भडिमार आणि सैनिकांची असली चाल, मग २५–२६ सप्टेंबर रोजीं सावसेजच्या बाजूला आणि आईन नदीवरील चामपेन प्रांतात जर्मन सैन्याचा पराभव झाला हे सांगणें नलगे! सावसेजचें स्मशानभूमीसकट सर्व खेडे व त्याच्या आसपासच्या कांहीं टेकड्या इंग्रज–फ्रेंचांनीं घेऊन जर्मन फळीच्या पिछाडीच्या आगगाडीवर तोफांचे गोळे पडतील अशाहि मोक्याच्या जागा इंग्रज–फ्रेंचांनीं कबजात घेतल्या आहेत. आईन नदीवरील चामपेन प्रांतातील अशाच मोक्याच्या जागा फ्रेंचांच्या हातीं लागल्या आहेत. सप्टेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यातील इंग्रज फ्रेंचांच्या या पहिल्या धडकांमुळे जर्मनांचा पराभव झाला खरा, पण जर्मनांची फळी फुटण्याइतका तो मोठा पराभव नाहीं. ऑक्टोबर महिन्यांतहि फ्रेंचांची चढाई अशी जोरानें चालू राहील. तरी पण पूर्वेकडील रणभूमीतून कुमक पश्चिमेकडील रणभूमीवर जर्मनीस मिळू लागल्यामुळे फ्रेंच जर्मनीस आस्ते आस्ते मागे रेटतील, पण फळी फोडू शकणार नाहींत असा आक्टोबर प्रारंभाचा अदाज आहे. फ्रेंच व इंग्रज स्वस्त न बसता जरी नुसते जर्मनीस मागे रेटीत राहिले तरी देखील रशियाकडील जर्मनीचा जोर थोड्याबहुत प्रमाणानें कमी झाल्यावाचून रहाणार नाहीं. पण १९१६ सालच्या वसंतकाळानंतर रशिया पुन्हा ताजातवाना होऊन चारी बाजूंनी जर्मनीवर एकदम निकराचे हल्ले चढवून जो निकालाचा विजय इंग्रज, फ्रान्स व रशिया यांना मिळवावयाचा आहे त्या विजयाच्या दृष्टीनें विचार करता रशियास उत्तरेस व मध्यावर थोडाबहुत नुसता हलकेपणा वाटून सोय नाहीं. रशियास त्या बाजूला पूर्ण विश्रांति मिळाली पाहिजे, तरच अंतिम विजयाच्या रचनेची योग्य मांडणावळ करता येते. ही विश्रांति मिळवून देण्यास पश्चिम रणभूमींतील निकराचें युद्ध जर पुरेसे पडत नाहीं तर त्याला इतर ठिकाणची मदत दिली पाहिजे. ही मदत कोठून आणावयाची? इटली गेले पांच महिने आपल्याकडून शिकस्त करीत आहे. पण आस्ट्रियाची फळी फुटत नाहीं. ऑस्ट्रियाची फळी फोडण्याच्या नादाला लागून आपल्या सैन्याची यापुढे खराबी करून घेणें म्हणजे स्वतःचें व दोस्तांचें नाहक नुकसान करणें होय. तेव्हां इटलीनें ऑस्ट्रियावर जोराची चढाई न करतां ऑस्ट्रियाच्या सरहद्दीवर एक

तऱ्हेची विश्रांति घेऊन उरलेलें आपलें सैन्य अधिक फायदेशीर जागीं पाठविणें जरूर आहे. अर्थात् ऑस्ट्रिया–जर्मनीला तबी देण्याचा दुसरा प्रकार म्हणजे इटलीची चढाई हाहि रशियाला विश्रांति देण्याच्या कामी फारसा उपयोगी पडणारा नाहीं. स्वतःच्या सरहद्दीवर इटलीनें विश्रांति घेतली तर इटलीचें फालतुक सैन्य कोठें न्यावयाचें ? तुर्की साम्राज्याच्या सीरिया किंवा तांबडा समुद्र वगैरे लगतच्या प्रदेशावर हल्ला करून इटलीनें टर्कीचा लचका घेतला तर दूर अन्तरावरचें हें नुकसान झालें म्हणून जर्मनी उत्तरेकडून थोडाच खाली धावत येणार आहे ? डार्डानेलिसवर किंवा बाल्कन प्रदेशात जर मोठी धामधूम होईल, तरच जर्मनी रशियास मोकळा सोडील. तीन चार महिने डार्डानेलिसवर बरीच धामधूम झाली; पण तुर्कांचा व्हावा तसा पराभव झाला नाहीं. तेव्हा डार्डानेलिसचा नाद न सोडता म्हणजे तेथील लढाई पूर्वीप्रमाणेच कायम ठेवून बाल्कन प्रदेश युद्धात सामील करून घेण्याचा प्रयत्न सप्टेंबरपासून जोरानें करण्यात आला आणि आक्टोबर प्रारंभाला सर्व बाल्कन प्रदेश युद्धात सामील झाल्यासारखाच झाला.

## वेताळ पूर्वस्थळाला आला !

साप्रतचें युरोपातील महायुद्ध हें तरुण तुर्कांनीं केलेल्या तुर्कस्थानातील राज्यक्रांतीतूनच बाहेर पडलेलें आहे. ह्या राज्यक्रांतीमुळे तरुण तुर्कांचे पुढारी एनवर पाशा व जर्मनी ह्यांची दोस्ती दृढ झाली. ह्या राज्यक्रांतीमुळे बोसनिया व हर्गोनिया हे तुर्की प्रांत आस्ट्रियाला कायमचच मिळून सर्व्हियाचा कोंडमारा झाला. ह्या राज्यक्रांतीमुळे इटली व तुर्कस्थान ह्यांच्यामध्ये युद्ध होऊन तुर्कांचा त्रिपोली प्रांत इटलीला मिळाला, ह्या राज्यक्रांतीमुळे दोन वर्षांपूर्वीच बाल्कन युद्ध झालें. सदर बाल्कन युद्धात बल्गेरियानें तुर्कांचा पराभव केला खरा, पण रुमानिया सर्व्हिया व ग्रीस ह्या स्लाव्ह स्वभावाच्या किंवा सर्वियन प्रवृत्तीच्या देशांची एक गट्टी होऊन बल्गेरियाच्या पदरातील विजयाची फळे स्लाव्ह लोकांच्या तोंडांत पडली; अर्थात तेव्हांपासून ग्रीस, सर्व्हिया व रुमानिया ह्या स्लाव्ह त्रिकुटीच्या विरुद्ध बल्गेरिया जळफळत आहे. ह्या जळफळाटात बाल्कन युद्ध संपताच बल्गेरियाची व तुर्कांची दोस्ती आस्ते आस्ते जुळली. बाल्कन युद्धाच्यावेळी बाल्कन राष्ट्रांना रशियाचा पाठिंबा, तर तुर्कांना जर्मनीचा पाठिंबा, अशी स्थिति होती. बाल्कन युद्ध संपण्याबरोबर व बल्गेरिया व तुर्कस्थान ह्यांची दोस्ती जुळताच बल्गेरिया व तुर्कस्थान

ह्यांचा कल जर्मनीकडे तर ग्रीस, सर्व्हिया व रुमानिया ह्यांचा कल रशियाकडे अशी साहजिक स्थिति झाली. बाल्कन प्रदेशात वाढत चाललेलें हे रशियाचें वजन जर्मनीला पहावेना; व त्या चुरशीमुळे सांप्रतच्या महायुद्धाच्या आगीचा भडका सर्व युरोपभर पेटला. त्या आगीच्या भडक्यात सर्व्हिया व तुर्कस्थान येवढे दोनच देश सापडावेत आणि ग्रीस, रुमानिया व बल्गेरिया ह्या बाल्कन देशांनी आगीपासून अलिप्त रहावें, हे महायुद्धाच्या पहिल्या वर्षात मोठें आश्चर्य घडून आलें; पण दुसऱ्या वर्षाच्या प्रारंभापासून म्हणजे आगस्टपासून हीं बाल्कन राष्ट्रे होमकुंडांत येऊन पडणार अशीं स्पष्ट चिन्हें दिसू लागलीं, आणि सप्टेंबर अखेरीस आणि आक्टोबरच्या प्रारंभाला तर सर्व बाल्कन प्रदेश पेटल्यावाचून राहत नाहीं, असें निर्विवाद ठरलें. रुमानिया व ग्रीस प्रारंभापासूनच सर्व्हियाच्या मदतीस का धावले नाहींत ? ग्रीस व रुमानिया येथील राजघराणीं आस्ट्रो–जर्मन कुळांतील असून प्रजाजनाच्या सहज प्रवृत्तीला आवरून धरण्याचें काम हीं राजघराणीं आज चौदा महिने करीत आहेत. गेला मे महिना संपेपर्यंत ग्रीस व रोमानिया यांच्या मदतीची अपेक्षा रशिया करीत नव्हता. हंगेरियांत शिरून मे–जून महिन्यात आपण महायुद्धाची परिस्थिति आपल्यातर्फे करून घेऊ अशी उमेद एप्रिल महिन्यात व मे प्रारंभीं रशियाला वाटत होती. रुमानिया व ग्रीस लढाईत पडले तरी वाहवा, न पडले तरी फिकीर नाहीं, अशी रशियाच्या मनाची स्थिति मे महिन्यात असल्यामुळे रुमानिया व ग्रीस याना लढाईत पडण्याचा आग्रहहि कोणी केला नाहीं किंवा मदत द्या म्हणून त्यांची आर्जवेंहि कोणी केलीं नाहींत. जून महिन्यास गॅलि-शियन पीछेहाटीच्यावेळीं रशियाच्या मनाची स्थिति बदलली; पण मे अखेरीस नुकताच इटली लढाईत सामील झाल्या असल्यामुळे आणि इटली-कडून आस्ट्रियाची चांगली खोड मोडण्यात येईल अशी अटकळ बांधण्यात आलेली असल्यामुळे जून, जुलई महिने बाल्कन राष्ट्राकडे अर्धवट लक्ष व अर्धवट दुर्लक्ष करण्यात गेले. आगस्ट महिन्यात पोलंडातून जेव्हा पीछेहाट सुरू झाली तेव्हां रशियाला नव्या मदतीची जरुरी फार वाटू लागली. अर्थात् आगस्ट व सप्टेंबर हे दोन महिने बाल्कन राष्ट्रातून पांच दहा लक्ष नवीन सैन्याची मदत मिळते किंवा कसें याची खटपट जारीनें सुरू झाली. याच वेळीं ग्रीसचे मुख्य प्रधान एम. व्हेनिजुलास हेहि पुन्हां अधिकारारूढ झाल्यामुळे ग्रीसच्या मदतीची शंका राहिली नाहीं. ग्रीस, रोमानिया व बल्गेरिया या तिन्ही देशाच्या दरबारात

जर्मनी तर्फेच्या व रशियातर्फेच्या कारस्थानी पुरुषाचा सुळसुळाट आगस्ट महिन्यांत सुरू झाला. एका पक्षानें म्हणावें इतक्या गुणांनीं व एवढ्या ऐश्वर्यानें संपन्न असा मी वरपुरुष असून तुझें मी इतकें कल्याण करीन व एवढें सुख तुला देईन; तर दुसऱ्या पक्षानें म्हणावें तुझ्या आमच्या अंत:करणाचा कित्येक पिढ्याचा मिलाफ असून प्रतिपक्षाहून अधिक श्रेष्ठ मी आहें; तेव्हा माझ्याच गळ्यात माळ घालण्यांत तुझा संसार सुखमय होणार आहे. आगस्ट महिन्यात ग्रीस व रोमानिया यानीं आपला कल रशियाच्या बाजूचा आहे असें स्पष्टपणें जरी नाहीं,तरी पर्यायानें जाहीर केले; आणि बल्गेरियानें तुर्कांबरोबरच जर्मनीचा हात धरण्याचा उपक्रम आरंभिला. ग्रीस व रोमानिया एका बाजूला होणार व बल्गेरिया विरुद्ध बाजूला जाणार असे दिसू लागताच बल्गेरियाचा रुसवा घालविण्याचा उद्योग आगस्टमध्ये करण्यात आला. बाल्कन युद्धाच्या अखेरीस जे जे बल्गेरियाचें नुकसान झालें ते ते भरून देऊ इतकेंच नव्हे, तर बल्गेरियाच्या भावी महत्त्वाकांक्षेस आपण पूर्ण उत्तेजन देऊ; असेंहि आश्वासन इंग्लंड, फ्रान्स व रशिया यांच्या तर्फेनें देण्यात आलें. जर्मनीनें बल्गेरियाला वचन दिलें कीं, रशिया जें कांहीं तुला देऊं शकेल त्याहून अधिक मी देईन. बल्गेरियाच्या मदतीच्या किंमतीचा लिलाव अशा रीतीनें आगस्ट महिन्यात एकसारखा वाढत चालला. प्रत्यक्ष किंमत कोणीच देणार नव्हता. दोन्ही पक्ष आकडे बोलत होते, आणि लढाई संपल्यानंतर पदरांत माप पडावयाचें होतें. आपल्या मदतीनें महायुद्धाची समाप्ति कोणाच्या बाजूची होईल याचा अंदाज मनाशीं बांधून त्या बाजूचा सवाल कबूल करणें हें व्यवहारदक्ष व बल्गेरियास उचित होतें. आपण लढाईंत पडल्यानें अखेरचा जय जर्मनीचा होईल का रशियाचा होईल ? याचा विचार आगस्ट अखेरीस व सप्टेंबर प्रारंभीं बल्गेरिया करूं लागला. जर्मनीच्या स्तुतिपाठानें आणि अवाच्या सवा वाचिक देणग्यांनीं बल्गेरियाच्या तोंडास पाणी सुटून फाजील महत्वाकांक्षेनें बल्गेरियाचें डोकें भणभणून गेलें; विचारशक्ति अशारीतीनें स्थानभ्रष्ट झाल्यावर बल्गेरियाला जवळचें तेवढें दिसू लागलें; आणि दूरवरचें दिसेनासें झालें. ज्याना दूरदृष्टि आहे त्याना १९१६ सालच्या वसंत कालानंतरचा रशियाचा विजय दिसू शकतो, इतराना कसचा दिसणार ? तुर्कांच्या व जर्मनाच्या मोहजाळ्यात सापडून बल्गेरियानें दूरदृष्टि गमावली; तेव्हा त्याला आगस्ट–सप्टेंबर महिन्यातील जर्मनांचे मूर्तिमंत विजय तेवढे दिसावे आणि १९१६ सालच्या वसंतकाळातील

रशियाचा अमूर्त विजय दिसूं नये, हें त्याच्या बुद्धिभ्रंशाला आलेलें यथायोग्य फळ होय. झालें; सप्टेंबरच्या दुसऱ्या आठवड्यांत बल्गेरिया जर्मनीच्या पुऱ्या पंजांत सांपडला; आणि आस्ट्रिया, जर्मनी, तुर्कस्थान व बल्गेरिया यांच्यामधील गुप्त तहनामा मुक्रर ठरला. लगेच बल्गेरियानें सैन्याची जुळवाजुळव करण्यास सुरवात केली. ग्रीस–रोमानिया यांनींहि सप्टेंबरच्या तिसऱ्या चौथ्या आठवड्यात आपलें सैन्य जुळविण्याचा उद्योग आरंभिला. बल्गेरियाचें सैन्य सर्व्हियाच्या सरहद्दीवर गोळा होऊं लागलें; जर्मनीचे पैसे बल्गेरियांत येऊन पोचले; आणि जर्मनीचे लष्करी सेनापति बल्गेरियाच्या लष्कराची व्यवस्था पाहूं लागले; इतकेच नव्हे, तर जर्मनीच्या क्रप कारखान्यांतील इंजिनीयरांनीं व कारागिरांनीं बल्गेरियांतील दारू-गोळ्यांचे व शस्त्रास्त्राचे कारखाने व्यापून टाकले! ही स्थिति रशियास सहन होणें शक्य नव्हतें. सप्टेंबर अखेरीस रशियानें बल्गेरियास असें स्पष्ट कळविलें की, २४ तासाचे आंत जर्मन कामगारांना रजा द्या नाहीं तर तुमचा आमचा संबंध तुटला. बुद्धिभ्रंश झाल्यानंतर शाब्दिक अंजनानें कोण ताळ्यावर येणार? बुद्धिभ्रंशावर सोटा हा एवढा एकच उपाय मानवी जातीला माहीत आहे. रशियाचें म्हणणें बल्गेरियानें न जुमानल्यामुळें बल्गेरिया युद्धांत पडून बाल्कन प्रदेशांतच तीन वर्षां-पूर्वी गर्भावस्थेंत असलेलें सांप्रतचें महायुद्ध आक्टोबर प्रारंभीं पुन्हां बाल्कन प्रदेशांत आलें. वेताळ पूर्व स्थितीला आला, तेव्हां आतां नव्या कोणच्या गोष्टीला प्रारंभ होणार–इटली, ग्रीस, इंग्रज व फ्रेंच या चौघांचें मिळून पांच सात लाख सैन्य सर्व्हियामधून बल्गेरियावर हल्ला करील; व या हल्ल्यापुढें बल्गेरियाचा टिकाव लागणार नाहीं असा अंदाज आहे. डार्डानेलिस येथील युद्ध सभाळून तुर्कांची विशेषशी मदत बल्गेरियास होणें शक्य नाहीं. जर मदत झाली तर, ती लाख दीड लाख बिनहत्यारी जवानांची होऊं शकेल. अर्थात् एकट्या बल्गेरियाला पहिल्या धडकीमरसें चुरडून टाकण्यास इटालियन, फ्रेंच, इंग्रज व ग्रीशन सैन्य समर्थ आहे हें सांगणें नकोच. ऑस्ट्रो–जर्मनी बल्गेरियाच्या मदतीला धावून आले तर किती सैन्य आणूं शकतील? उत्तरेस व मध्यावर रशियाला विश्रांति न देतां लढत रहावयाचें असें जर जर्मनीनें मनांत आणलें तर सर्व्हियाकडे जर्मनीला बिलकूल सैन्य पाठवितां येणार नाहीं. अर्थात् बल्गेरियाला मदत करण्याकरितां उत्तरेकडची व मध्यावरची मोहीम बंद

ठेवावी लागेल, आणि रशियाला जरूर ती विश्रांति मिळेल. उत्तरेकडची व मध्यावरची मोहीम बंद ठेवली तर किती सैन्य वरून खालीं येईल? फार झालें तर दहा लाख सैन्य मोकळें होईल. या दहा लाखांपैकीं २।३ लाख सैन्य फ्रेंचांच्या चढाईतून बचावण्याकरितां फ्रान्सकडे पाठविणें भाग पडेल. बाकी राहिलें पांच सहा लाख सैन्य. हें पांच सहा लाख सैन्य व आगस्ट महिन्यांत सर्व्हिया रुमानियाच्या सरहद्दीवर जर्मनी व आस्ट्रियानें आणून ठेवलेलें चार पांच लाख सैन्य मिळून दहा बारा लाख सैन्य सर्व्हिया–रुमानियावर चाल करून जाईल. सर्व्हियापाशीं तीन चार लाख सैन्य आहे आणि रुमानियापाशीं सहा सात लाख सैन्य आहे. तेव्हां सर्व्हिया व रुमानिया या दोघांजवळ असलेलें दहा लाख सैन्य आस्ट्रिया-जर्मनीच्या दहा बारा लाख सैन्यास सरहद्दीवर नुसतें थोपवून धरील, इतकेंच नाहीं तर रुमानियांतून बल्गेरियावर स्वारी करण्याकरितां दीड दोन लाख सैन्य बाल्कन पर्वताकडे पाठवूं हि शकेल. म्हणजे बाल्कन राष्ट्रें महायुद्धांत सामील झाल्यामुळे रशियास विश्रांति मिळून अदूरदर्शी बल्गेरियाचा मधला कांटा उपटला जाऊन हिवाळ्याच्या प्रारंभीं इंग्लंड, फ्रान्स, इटली व रशिया हीं मग्न होतील आणि नंतर हिवाळ्याच्या अखेरीस तुर्कस्थानास बुडवून १९१६ सालच्या वसंत काळांत जर्मनीचा समाचार घेतील. या बाल्कन युद्धांत जर ग्रीस व रुमानिया पडली नाहींत, किंवा जर्मनी, आस्ट्रिया, बल्गेरिया आणि टर्की हीं राष्ट्रें मग्न झालीं तर १९१६ साल सोडून १९१७ सालचा किंवा १९१८ सालचा वसंत काळ येईपर्यंत रशियाच्या अंतिम विजयाला तपश्चर्या करीत बसावें लागेल.

## रूस व जर्मनी यांची कुस्ती

पश्चिम रणक्षेत्रांतील फ्रेंचांची यशस्वी चढाई आणि बाल्कन प्रदेशांतील बल्गेरियासंबंधाची नवी धामधूम या जोडगोळीमुळें जर्मन व रूस यांची कुस्ती उत्तरेस व मध्यावर उभ्यानें चालणार नाहीं, तर दोन्ही पहिलवान चर खणून मातींत आक्टोबर नोव्हेंबरपासून लोळत रहातील व त्या योगानें रशियास जरूर ती विश्रांति मिळेल असा रंग आक्टोबर प्रारंभीं दिसत आहे. मे महिन्याच्या प्रारंभीं या कुस्तीस प्रारंभ झाला. दोनहि पहिलवान उभ्यानें तडकाफडकी लढले. आक्टोबर महिन्यांत ही कुस्ती अर्धवट उभ्यानें व अर्धवट बसून चालेल; आणि नोव्हेंबरपासून उत्तरेस व मध्यावर दोन्ही पहिलवान मातींत बसतील. चार पांच महिन्यांच्या कुस्तींत रशिया

बराच मागे हटला, पण त्याचा एकहि मुद्दा चीत झालेला नाहीं. चारी मुंढे चीत रशियाला पाडण्याचा जर्मनीचा बेत पूर्णपणें फसला असून हिंवाळ्यानतर हा बेत सिद्धीस जाणें मुळींच शक्य नाहीं. या गोष्टीचें स्वरूप व डावपेच ध्यानांत येण्यासाठीं रशियाच्या आगगाड्या ध्यानीं ध्यावा. उत्तरेकडून दक्षिणेकडे येणाऱ्या आगगाड्या एकंदर चार आहेत. त्यापैकीं पहिली आगगाडी जर्मनीच्या बाल्टिक समुद्रावरील कॉनिस्कबर्ग बदरांत उगम पावून बिलिस्टाक, ब्रेसलिटास्क, रोव्हनो, टॅसोटीन या जक्शनवरून खालीं काळ्या समुद्रास ओडेसाला मिळते. या आगगाडीच्या फांट्यावर ब्रेसलिटास्क यथून लेंबर्गपर्यंत व रोव्हनो येथून लेंबर्गपर्यंत येणारे दोन आगगाडीचे रस्ते आहेत. या मुख्य रस्त्यांपैकीं कॉनिस्कबर्ग, बिलिस्टॉक ब्रेसलिटॉस्क व तेथून रोव्हनोच्या जवळ जवळ बराच भाग आगस्ट अखेरीला व सप्टेंबर प्रारभाला जर्मनीच्या ताब्यांत गेला होता. हा येवढा आगगाडीचा भाग जर्मन सैन्याचा सप्टेंबर प्रारंभीं पाया होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. सप्टेंबर आरभापासून आक्टोबर प्रारभापर्यंत या पायाच्या आगगाडीच्या रेषेला सामान्यतः समातर असलेली दुसरी उत्तर दक्षिण आगगाडी कबजांत घेऊन तो आपला पाया करण्याची खटपट सप्टेंबर महिन्यांत जर्मनीनें केली. या खटपटीस आक्टोबर प्रारभीं अर्धवट यश आलें व अर्धवट अपयश आलें. ही दुसरी आगगाडी पूर्णपणें ताब्यांत घेण्याचा उद्योग आक्टोबर नोव्हेंबर महिन्यात उत्तर व मध्यभागावर जर्मनी करील व हिंवाळ्यांत या दुसऱ्या आगगाडीच्या पूर्वेस जमिनीत तोड खुपसून जर्मनी दडून राहील असा सांप्रत अदाज आहे. ही दुसरी आगगाडी बाल्टिक समुद्रांत लिबा बदरांत उगम पावून व्हिलना जक्शनला येते. लिबा येथे या आगगाडीचा उगम झाला असें न मानता रिगाचे आखातांत रिगा बदरांत या आगगाडीचा उगम होऊन पेट्रिकस्टॅड, जॅकोबस्टॅड वीडवक्स या जक्शनवरून व्हिलना येथें येते असें म्हटलें तरी चालेल. रिगा, ड्विक्स, व्हिलना, लिडा, बर्नोव्हिटस्की, पिंक्स जक्शन व रोव्हनो जक्शन अशा मार्गानें ही आगगाडी वरून खालीं येत असून रोव्हनोवरून शभर मैल पूर्वेस वळून नतर खालीं दक्षिणेस ओडेसाकडे जाते. ही आगगाडी लष्करी धोरणाच्या दृष्टीनें फार महत्त्वाची आहे. जर्मनीशीं लढण्याचा प्रसंग आल्यास ती आगगाडी आपला पाया करावयाचा व पश्चिमेस नीमेन नदी, नॅरू नदी व बग नदी या नद्याच्या आश्रयानें जर्मनीशी लढत रहावयाचें असा क्रम रशियाच्या सेनापतींनी कितीएक वर्षांपूर्वीच आंखून ठेवलेला आहे. रिगा ड्विक्स, व्हिलना लिडा, बर्नो

व्हिटस्की, पिंक्स, सार्नी, रोव्हनो या आगगाडीच्या रेघेवर दृष्टि स्थिर करून त्या रेघेच्या पूर्वेस पहावें म्हणजे पूर्वेच्या टापूंपेक्षां पश्चिमेच्या टापूमध्यें—जर्मनीच्या अंगाला—या आगगाडीच्या मूळ खेडयांतून पुष्कळ शाखा गेल्या आहेत असें दृष्टीस पडेल. या आगगाडयांची रचनाच एका विशिष्ट धोरणानें केलेली आहे. जर्मनीशीं लढावयाचें तें या आगगागीच्या मुख्य खोडाच्या पश्चिमेस म्हणजे बग, नॅरू, नीमेन या नद्यांवर लढावयाचें, मुख्य खोड जर्मनीच्या ताब्यांत जाऊन त्या खोडाच्या पूर्वेस लढण्याचा प्रसंगच येऊं द्यावयाचा नाहीं अशा धोरणानेच या आगगाडयांची रचना रशियानें केलेली आहे. नीमेन, नॅरू व बग नदी व आगगाडीचा हा मुख्य स्तंभ यांमध्ये आगगाडयांच्या लहान लहान फाटयांचें एक जाळेच्या जाळेच पसरलेलें दृष्टीस पडतें. उत्तरेस रिगापासून दक्षिणेस रोव्हनोपर्यंत, मुख्य आगगाडीच्या स्तंभाच्या पश्चिमेस असलेलें आगगाडीचें हे जाळे म्हणजे रशियानें कितीएक वर्षे खस्त खावून मोठया धोरणानें स्वतःस अनुकूल असा बनविलेला कुस्तीचा आखाडा होय. या आखाडयातच आगस्टअखेर कुस्ती येऊन पडली. या आखाडयाच्या पुढें वार्साची खिनी फाजील गेलेली असल्यामुळें ती खिनी आखाडयात मागे खेचून घेण्याचा उद्योग ऑगस्ट प्रारंभापासून करण्यांत येऊन पाच आगस्टला वार्सा सोडलें तर १९ आगस्टला उत्तर भागांतून कोव्हनोचा किल्ला व मध्यभागांत ब्रेसलिटास्कचा किल्ला जाऊन मुख्य आखाडयांत खिनीची सेना फार तारांबळीनें परतली आणि त्याचा परिणाम असा झाला कीं, जर्मनीची पाठलाग करणारी सेना आखाडयाच्या बाहेर थोपवून धरतां न येऊन जर्मनी आखाडयामध्यें जोरानें घुसला. रशियन सैन्याचे मुख्य सेनापति ग्रँड डयूक निकोलस यांनीं मोठया धीमेपणानें, शांत चित्तानें व दूर दृष्टीनें वार्साची खिनी सैन्याची खराबी होऊं न देतां मागे खेंचली खरी, पण तसें करतांना मुख्य आखाडयाबाहेर जर्मनीला थोपवून धरण्याचें त्यांना साधलें नाहीं. मुख्य आखाडयांतच जर जर्मनीला आंत फार घुसूं दिलें तर कितीएक वर्षांची तयारी वाया गेली, व लष्करी हालचालींच्या दृष्टीनें माऱ्याच्या जागा शत्रूच्या हातीं जाऊ देण्याचा अपजय झाला. ब्रेसलिटास्क पडण्याबरोबर बिस्कचेंहि जक्शन पडलें; बिलास्टाकचेंहि जक्शन पडलें; ग्रोडनो, सुवालकी व कोव्हनो हे आगगाडीचे धनुष्य जर्मनीच्या ताब्यांत जाऊन ग्रोडनोचा किल्लाहि जर्मनीनें सप्टेंबरच्या पहिल्या आठवडयात घेतला. ग्रोडनोचा किल्ला घेतांच ग्रोडनो व कोव्हनो या दोन किल्लयामधील नीमेन

नदी जर्मनीच्या ताब्यांत जाऊन आलिटोच्या किल्ल्यावरून जर्मन सेना व्हिलना व लिडा या आगगाडीच्या फाट्याकडे वळली. व ग्रोडनोच्या किल्ल्यावरून खालीं व्हालकोव्हिस्क जंक्शनकडे जर्मनीनें हल्ला केला. सप्टेंबरच्या पहिल्या पंधरवड्यांत ग्रोडनो, लिडा, व व्हालकोव्हिस्क या त्रिकोणांत एकसारखी हातघाईची लढाई झाली, व अखेरीस रशियाला नीडा व व्हिलकोव्हिश हीं जंक्शनचीं स्टेशनें जर्मनीच्या हवालीं करून मिन्स्क प्रांतांत मागे परतावें लागलें. ग्रोडनोच्या या पधरा दिवसांच्या लढाया जशा महत्त्वाच्या झाल्या त्याप्रमाणें त्याच पंधरवड्यांत व्हिलोव्हिस्कच्या दक्षिणेस प्रुशानी प्रांतांतहि रशियन लोक फार हट्टानें लढले. प्रुशानी प्रात फार जंगलांचा व दलदलीचा असल्यामुळे जर्मन सैन्याची या प्रांतांत फार खराबी झाली. तथापि सप्टेंबरच्या पहिल्या पंधरवड्यांत प्रुशानी प्रांत जर्मनीच्या ताब्यात जाऊन रशियाला पूर्वेस प्रुशानीच्या म्हणजे स्लोनीमच्या शार्नी नदीच्या पूर्वेस मिन्स्क, बर्नोविटस्कीच्या फाट्याकडे मागें हटावें लागलें. मिन्स्क, बर्नोविटस्की व व्हिलना येवढ्या टापूला म्हणजे प्रिपेट नदी व उत्तर नीपर नदी यामधील टापूला रशियन रणभूमीचा मध्य म्हणतात. व्हिलना, डिंवक्स व रिगा या टापूला म्हणजे व्हिलना नदी व ड्विना नदी या टापूला उत्तर रणक्षेत्र म्हणतात व प्रिपेट नदीच्या दक्षिणेकडील टापूला ह्मणजे सार्नी, रोव्हनो, टार्नपूल व ओडेसाच्या पट्ट्याला दक्षिण रणक्षेत्र म्हणतात. सप्टेंबरच्या पहिल्या पंधरवड्यात मध्यरणक्षेत्रातील आखाड्याच्या जागा जर्मनीच्या ताब्यांत गेल्या. ग्रोडनो व प्रुशानी या टापूंत तुंबळ युद्ध चाललें असतां व्हिलनाच्या प्रातात फारच मोठ्या प्रमाणावर जंगी लढाया चालू होत्या. व्हिलनाच्या लढायांना सप्टेंबरच्या पहिल्या तारखेस आरंभ होऊन आक्टोबर प्रारंभापर्यंत व्हिलनाचे आसपास दोन्ही पक्ष अत्यंत निकरानें लढले. सर्व सप्टेंबर महिन्यांत व्हिलनाचे आसपास जेवढे मोठे तुंबळ युद्ध झालें तेवढे मोठें तुंबळ युद्ध गेल्या १४ महिन्यांत कोठेही झालें नाहीं. व्हिलनाचे आसपास ७-८ लाख सैन्य रशियानें गोळा केलें होतें. शिवाय, डिंवक्स, रिगा प्रांतांतहि पांच सात लाख रशियन सैन्य गोळा झालें होतें. मध्यावरील आखाड्यांत जर्मनीनें घुसूं नये म्हणून व्हिलना, व डिंवक्स येथून रशियानें जर्मनीवर हल्ले करण्यास सुरुवात केली. पहिला आठवडा रशिया जर्मनीवर जोराचे हल्ले करीत होता. दुसऱ्या आठवड्यात जर्मनीनें उलट हल्ले सुरू केले. यावेळीं जर्मनीनें इतके निकराचे हल्ले केले कीं व्हिलना व डिंवक्स यामधील आगगाडी दोन चार ठिकाणीं तोडून जर्मनी पूर्वेच्या

मुलखात एकदम घुसला. उत्तरेस ड्विन्स्क, जाकोबस्टॅड, पेड्रिकस्ट्रेड व रिगा या ठिकाणींहि त्याचवेळीं जोराचे हल्ले करून उत्तरेचें सैन्य व्हिलनाच्या मदतीस न येईल असा बदोबस्त जर्मनीनें केला. व्हिलनाच्या उत्तरेस ३०–४० मैलांवर आगगाडी मोडून ज्याप्रमाणें जर्मन पूर्वेस घुसले त्याप्रमाणें व्हिलनाच्या दक्षिणेसहि आगगाडी मोडून जर्मन घोडेस्वार पूर्वेस घुसले; व सप्टेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात व्हिलना व मिन्स्क हा आगगाडीचा पूर्वेकडील फांटा व्हिलनाच्या पूर्वेस चाळीस पन्नास मैलांवर जर्मन घोडेस्वारांनीं फोडून व्हिलनाच्या टापूंतील चार पाच लाख रशियन सेनेस सुमारें पन्नास साठ मैल व्यासाच्या दीडशे मैल परिघाच्या वर्तुळात जर्मनीनें वेढलें. या वेढयाचा पूर्वेकडील व ईशान्येकडील भाग घोडेस्वारांच्या टोळीच्या दुबळ्या दुव्यानीं साधलेला असल्यामुळे वेढ्यात सापडलेली रशियन सेना शौर्यानें व निकरानें लढत लढत जर्मन सैन्याची खराबी करीत पूर्वेकडील व ईशान्येकडील जर्मन साखळी तोडून सप्टेंबर अखेरीस जर्मन सापळयातून सुरक्षितपणें व्हिलनाच्या पूर्वेस चाळीस पन्नास मैलावर पार निसटून गेली. व्हिलनाच्या सभोंवार जर्मनांनी टाकलेला फास सप्टेंबर अखेरीस पोकळ झाला. सप्टेंबरच्या दुसऱ्या पंधरवड्यात हा गळफास आखडत चाललेला पाहून व सध्यावरचा मुख्य आखाडा जर्मनांनीं आक्रमिलेला पाहून रशियाचे बादशहा झारसाहेब यानीं सर्व सैन्याचें आधिपत्य ग्रॅंड ड्यूक निकोलस याचेकडून काढून स्वतःच्या हातात घेतलें. ग्रॅंड ड्यूक निकोलस याना काकेशस पर्वताकडे तुर्की युद्धावर पाठविण्यात आलें व झारसाहेब स्वतः मुख्य सेनापति झाले. त्यावेळीं सर्व रशियन सैन्यात नवा दम उत्पन्न होऊन व्हिलनाचा गळफास तोडण्याकरिता रशियन सैनिकानीं अश्रुतपूर्व मर्दुमकी गाजविली; आणि महासंकटातून पार पाडून नेण्याचें यश झारसाहेबानीं संपादन केलें. आक्टोबर प्रारंभाला रिगाच्या दक्षिणेस, ड्विन्स्कच्या पश्चिमेस व पूर्वेस आणि व्हिलनाच्या पूर्वेस, चाळीस मैलावर रशियन सैन्यानें जर्मनीला थोपवून धरलें आहे. ड्विन्स्कचें जंक्शन ताब्यांत घेण्याचा व त्याचप्रमाणें रिगा बंदराला पूर्वेकडून वळसा घालून रिगा घेण्याचा उद्योग जर्मनी आक्टोबर महिन्यात करील असा अंदाज आहे. रिगा, ड्विना, व्हिलना ही आगगाडी पाया कल्पून तेथून पेट्रोग्राडवर हिंवाळ्यांतहि स्वारी करण्याइतकी ताकद जर्मनींत उरलेली दिसत नाहीं. व्हिलनाच्या प्रचंड लढाईंत रशिया जरी मागें हटला तरी रशियन सैन्याच्या अलौकिक शौर्यानें जर्मनीची बरीच रग जिरविली आहे. रशियाला जशी विश्रांति पाहिजे आहे

त्याप्रमाणें विसावा घेतल्याशिवाय जर्मनीचेंहि आतां चालणार नाहीं. आक्टोबर प्रारंभापासून थकव्याची मदता उत्तर रणभूमीवर पसरून राहिली आहे. मध्यावर आक्टोबर प्रारंभाला व्हिलना, लिडा, बर्नोविटस्की हा आगगाडीचा फांटा जर्मनांनीं घेतला असून पिंक्स हें जंक्शन घेण्यापलीकडे आक्टोबर महिन्यांत जर्मनीची विशेष हालचाल होईल असें दिसत नाहीं. सप्टेंबर महिन्यांत सार्नी व रोव्हनो हीं जंक्शन स्टेशनें घेण्याचा जर्मनांनीं बराच प्रयत्न केला, पण सार्नी, कोव्हेल व रोव्हनो या त्रिकोणाच्या मध्यावरील कोलकी प्रांतांत जर्मनांचा मोठा पराजय झाल्यामुळें सप्टेंबर अखेरपर्यंत जर्मनीचें पाऊल पुढें पडलें नाहीं. त्याच सुमारास टार्नोपोलच्या बाजूला पूर्व ग्यालिशियांतहि रशियाला मोठा जय मिळून शेपन्नास तोफा व पंचवीस तीस हजार कैदी रशियास मिळाले. सप्टेंबर महिन्याच्या दुसऱ्या तिसऱ्या आठवड्यात प्रिपेट नदीच्या दक्षिणेकडील रणक्षेत्र जर्मनीच्या आगलटच आलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. सप्टेंबर अखेरीस व आक्टोबर प्रारभाला या रणक्षेत्रांत जर्मनीनें पुन्हां उचल केली आहे. सार्नी व रोव्हनो हीं जंक्शन स्टेशनें ताब्यांत घेण्याकरिता जर्मनी पुन्हां सार्नी–रोव्हनो आगगाडी जवळ गेला आहे. शिवाय टार्नोपोलच्या उत्तरेसहि जर्मनीची नवी हालचाल सुरू झाली आहे. आक्टोबर–नोव्हेंबर महिन्यांत बाल्कन युद्ध संभाळून सार्नी रोव्हनो व टार्नोपोल या टापूंतून कीव्ह–ओडेसाकडे जर्मनीची मोठी स्वारी सुरू होईल असा अदाज आहे. दक्षिण रणक्षेत्रांत मध्यावरून व उत्तरेकडून सैन्याची कुमक पाठविणारी मुख्य आगगाडी म्हणजे व्हिलना, पिन्स्का रोव्हनो ही आगगाडी पुष्कळ अंशीं जर्मनीच्या ताब्यांत गेली असल्यामुळें रशियाला पेट्रोग्राडवरून व मास्कोवरून थेट कीव्हकडे येणाऱ्या आगगाड्यांवरच म्हणजे एकप्रकारच्या द्राविडी प्राणायामावरच दक्षिण रणक्षेत्रात अवलबून रहावें लागणार ! किंबहुना उत्तर मध्य व दक्षिण या तिन्ही ठिकाणच्या रशियन सेना एकमेकापासून आता अलग झाल्या आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. उत्तरेकडच्या व मध्यावरच्या रशियन सेना आतां थकल्या आहेत; पण दक्षिणेकडील सेनेला गेले दोन महिने विश्रांति मिळाली असून जर्मनीच्या अगावर चालून जाण्यास सैनिक फुरफुरत आहेत. ही सेना जरी मध्यापासून अलग झाल्यासारखी असली तरी कीव्ह व ओडेसा प्रातांतील आगगाडीच्या जाळ्यांचा पाठिंबा तिला असल्यामुळें दक्षिण रणक्षेत्रातहि जर्मनीला नकोनकोसें होऊन जाईल यांत सशय नाहीं.

---

# दुसऱ्या वर्षाचा आक्टोबर-नोव्हेंबर महिना

सप्टेंबर महिन्याच्या अखेरीस महायुद्धाचें केंद्रस्थान रशियाची व फ्रान्सची रणभूमि सोडून बाल्कन प्रदेशांत सर्व्हियाच्या सरहद्दीवर येऊन पडलें होतें. आक्टोबर महिन्यांत सर्व सर्व्हिया लढाईनें व्यापला गेला आहे. नोव्हेंबर महिन्यांत सर्व्हियांतील लढाई समाप्त होऊन आणि नोव्हेंबरच्या अखेरीस किंवा डिसेंबरच्या प्रारंभाला महायुद्धाचें केंद्रस्थान युरोप खंडांतून बाहेर पडून, आशिया खंड व आफ्रिका खंड ह्यांच्या जोडाचे ठिकाणीं म्हणजे सुवेज कालव्याच्या सभोवतीं महायुद्धाचा वेताळ धिंगाणा घालीत राहील असा अंदाज होता. युरोपखंडाच्या दृष्टीनें महायुद्धाकडे पाहिलें तर आक्टोबर महिना एक तऱ्हेनें महायुद्धास क्रांतिकारक गेला; स्थित्यंतरावर स्थित्यंतरें या महिन्यांत दृष्टीस पडलीं; जुने डाव संपून नव्या डावास प्रारंभ झाला; जुन्या रणभूमींना वृद्धावस्था प्राप्त होऊन नव्या रणभूमींचें जन्म या महिन्यांत झालें. जर्मन सेनापति हिंडेनबर्ग यांच्या चलाखीच्या हालचालीनीं गेल्या चौदा महिन्यांत बरेचवेळां रणभूमीत आश्चर्यकारक स्थित्यंतरें दृष्टीस पडलीं; पण आक्टोबर अखेरीस जन्मास येऊं लागलेलें स्थित्यंतर पूर्वीच्या स्थित्यंतरांहून निराळ्या स्वरूपाचें आहे. तें स्थित्यंतर सैनिकानीं लढून संपादिलेलें नव्हे; सैनिकाचे बाहुबल, सेनाधिपतीची बुद्धि व युद्धसामग्रीची विपुलता, ही त्रयी या स्थित्यंतरास मदत करणारी आहे; पण हें स्थित्यंतर घडवून आणण्याची प्रत्यक्ष क्रिया या त्रयीनें केलेली नाहीं; या स्थित्यंतरास राजकारणी पुरुषानीं जन्म दिला आहे; या स्थित्यंतराचा बोजा राजकार्यधुरंधर पुरुषानीं आपल्या मानेवर घेतला आहे; व या स्थित्यंतराचे भावी परिणाम मुत्सद्याच्या दक्षतेवर अवलंबून आहेत. जर्मन बादशहा केसर यांनीं फाजील आत्मप्रौढीच्या लहरींत असे उद्गार काढले होते कीं, हिंवाळ्याच्या पूर्वी म्हणजे आक्टोबर महिन्यांत जर्मन सेना महायुद्धाची परिसमाप्ति करील. फाजील आत्मप्रशंसेचे हे उद्गार रशियाच्या व फ्रान्सच्या रणभूमींत सपशेल खोटे ठरले आहेत; पण सर्व्हियांतून फळी फोडून बल्गेरियाच्या मदतीनें कान्स्टांटिनोपल दाखवून तुर्कस्थानच्या खिंडारांतून लढाईच्या प्लेग-जंतूचें गाठोडें आशिया आणि आफ्रिका

खंडांत युरोपखंडांतून बाहेर फेंकून देण्याच्या जर्मनीच्या कारस्थानाकडे पाहिलें म्हणजे केसरचे उद्‌गार एका अशीं खरें ठरूं पाहातात, असें वाटतें. जर्मन तरवारींना जें काम करतां आलें नाहीं तें काम जर्मन फसवेगिरीनें केलें आहे; जर्मन बदुकांना जो नेम मारतां आला नाहीं तो नेम जर्मन वाग्जालानें अचूक धरला आहे: जर्मन तोफांना जे बोल बोलतां आले नाहींत ते बोल जर्मन–जिभा तुर्कस्थानामार्फत बोलू लागल्या आहेत. आक्टोबर महिन्यांत युरोपांतील रणभूमि म्हातारी ठरली असून, ही म्हातारीबाई आपल्या कर्तेपणाच्या किल्ल्या तुर्की सुनेच्या हवालीं करून हिंवाळ्यांत खंदकांत नुसती लोळत राहून बडबड करीत राहणार अशीं चिन्हें दिसत आहेत. हें स्थित्यंतर कसें घडून आलें याचा ऊहापोह करण्यापूर्वी जुन्या पुराण्या ठरू पाहणाऱ्या रणभूमीकडे थोडेसें लक्ष देऊं या. रशियाच्या रणभूमींत आक्टोबर प्रारंभाला जी स्थिति होती तीच स्थिति नोव्हेंबर प्रारंभाला कायम राहिली. रिगा व डिव्हस्क हीं दोन शहरें कबजांत घेण्याकरितां जर्मनीनें आक्टोबर महिन्यांत आटोकाट प्रयत्न केले, पण ते सर्व निष्फळ झाले. नोव्हेंबर प्रारंभाला ह्या दोन शहरांजवळ आठ दहा मैलांवर जर्मनी पोंचला असून नोव्हेंबरांत हीं शहरें कदाचित् जर्मनीच्या हातीं पडण्याचा संभव आहे. युरोपांत लढाई यापुढे जोरानें लढावयाची नाहीं, चरांत दडून राहून स्वसरक्षण मात्र करावयाचें असें जर जर्मनीचें लष्करी धोरण मुक्रर ठरलें असेल तर रिगा व डिव्हस्क या शहरांची मातबरी लष्करी धोरणाच्या दृष्टीनें जर्मनीला विशेष नाहीं. पेट्रोग्राडवर स्वारी करून रशियाच्या राजधानीच्या आसपास रशियाच्या सैन्याचा चुराडा करून रशियास तह करावयास भाग पाडणें असल्या धोरणानें जर्मनी सांप्रत वागत आहे काय ? हें धोरण जर पुढे टेवलें तर रिगा व डिव्हस्क हीं शहरें घेण्याकरितां जर्मनीनें हजारों सैनिकाचे बळी देणें इष्ट आहे. गेल्या मे महिन्याच्या प्रारंभापासून आक्टोबर प्रारभापर्यंत रशियावर जर्मनीनें एकसारखे विजय मिळविले व रशियाची पिछेहाट झाली; पण रशियाच्या सेनेचा नायनाट झाला नाहीं. इतकेच नव्हे तर रशियाच्या सेनेचा नायनाट करण्याचें हें काम जर्मनीच्या शक्ति बाहेरचें आहे, असें गेल्या चार पांच महिन्यांत सिद्ध झालें. रशियाच्या मनुष्यबलाला मर्यादा नाहीं. जर्मनीच्या मनुष्यबलाला मर्यादा असून या मर्यादेचें जर्मनीनें उल्लंघनहि केलें आहे. अर्थात् १९१६ सालीं जर्मन सेना १९१५ सालच्या जर्मन सेनेहून

अधिक वाढणें शक्य नाहीं. म्हातारे कोतारे व लहान मुलें यांची भरती केली तरी १९१५ सालाहून अधिक लोक जर्मनीच्या सेनेंत १९१६ सालीं दृष्टीस पडणार नाहींत. १९१६ सालीं रशिया १९१५ सालची नुकसानी भरून काढून पांच दहा लाख तरी अधिक लोक रणांगणावर आणील. मग रशियन सेनेची कंबर जर्मनी कशी मोडणार ? रशियाच्या रणभूमीवर महायुद्धाची परिसमाप्ति कसची होणार ? सप्टेंबर महिन्यांत जर रशियन सेनेचा चुराडा झाला असता आणि आक्टोबर महिन्यांत जर जर्मनीनें पेट्रोग्राड शहर घेतलें असतें तर रशियाच्या बाजूला एक तऱ्हेची परिसमाप्ति करतां आली असती, पण तो डाव फसला; १९१६ सालच्या वसंत काळांत रशिया जर्मनीवर उलट मोठी स्वारी करणार व या स्वारीपासून थकल्या भागलेल्या सैनिकांचें सरक्षण करण्याकरितां जर्मनीला चरांचा आश्रय करावा लागणार यांत संशय नाहीं. रशियापाशीं मनुष्यबल जसें अमर्यादित आहे तसें द्रव्यबल नाहीं; पण रशियाचा कगालपणा झाकून टाकण्यास इंग्लंड पूर्ण समर्थ आहे. रशियात दुसरा एक दोष आहे. रशियाचें राष्ट्र मागासलेलें असल्यामुळे रशियांत कारखाने बेताचेच आहेत. बंदुका व दारूगोळा व तोफा या प्रकारची युद्धसामग्री रशियाच्या कारखान्यात तयार होऊ शकते, पण ती फार अपुरी पडते. जपान व अमेरिका येथून युद्धसामग्री आणावी लागते. इतक्या लांबून युद्धसामग्री आणून त्या सामग्रीच्या जोगवर रशियानें जर्मनीवर उलट हल्ले करावयाचे म्हणजे एक तऱ्हेचें दुर्घटच काम आहे. हें दुर्घट काम करण्यास रशियानें सांप्रत कंबर कसली आहे, पण या दुर्घट कामीं रशियाचा दम किती टिकणार ? फार झालें तर १९१६ किंवा १९१७ साल अखेर टिकेल. जर्मनीनें रशियाचा सांप्रत सर्व पोलड घेतला असून जर्मनीवर हल्ला करण्याकरितां किंवा जर्मनीपासून स्वतःचें संरक्षण करण्याकरितां रशियानें जे आगगाडीचें जाळे निर्माण केलें होते तें सर्व जाळेहि जर्मनीच्या हातीं लागलें आहे. अशा स्थितींत १९१६ सालीं रशियानें जरी मोठी तयारी केली तरी आणि जर्मनीनें रशियन सरहद्दीवरील एक तृतीयांश सैन्य काढून घेतलें तरी रशियाचा दम संपण्याच्या आंत म्हणजे १९१७ साल सपण्याच्या आंत रशियानें जर्मन सरहद्द पुन्हां पाहणें शक्य नाहीं. जर्मनीला रशियाला चोप देतां येत नाहीं आणि रशियाचें मनुष्यबल अमर्यादित असलें तरी युद्धसामग्रीच्या दृष्टीनें रशियाच्या दमाला मर्यादा आहे, तेव्हां रशियावर मोठीशी चाल करण्याच्या भानगडींत

न पडतां रशियाचा दम निघून जाईपर्यंत जर्मनी चरांचा आश्रय करून स्वस्थ बसणार, असें अनुमान निघतें. मग रिगा व ड्विन्स्क हीं शहरें घेण्याचा उपद्व्याप कां ? रशियांत थंडी अतिशय कडक, तेव्हां चरांतील लोकांना पांच दहा दिवसांनीं बदलून घरांच्या उबेंत कोठें तरी ठेवतां यावें म्हणून ड्विन्स्क व रिगा हीं शहरें लष्करी धोरणापेक्षां घरांच्या सोईसाठीं जर्मनीस पाहिजे आहेत. पण सांप्रत रशिया त्या बाजला सबळ असल्यामुळें उबाऱ्याच्या घरांत सैनिकांना विसावा देण्याची जर्मनीची इच्छा तृप्त होण्याचा रंग दिसत नाहीं. शिवाय रिगा व ड्विन्स्क हीं शहरें जर्मनीच्या हातीं गेलींच तर उबाऱ्याच्या घरांतून जर्मन सेनेस रहावयास न मिळतां रशियानें स्वतःच्या हातानें पाडलेल्या किंवा जाळलेल्या वाड्यांच्या बखळींतून जर्मनांना थंडींत कुडकुडत मरावें लागेल हें उघड आहे.

आक्टोबर महिन्यांत रशियाच्या बाजूला जरी म्हणण्यासारख्या लढाया झाल्या नाहींत तरी फ्रान्समध्यें फारच निकराच्या लढाया झाल्या. फ्रान्स व इंग्लंड यांजपाशीं आतां दारूगोळयाचा सांठा भरपूर झाला असून जर्मनीप्रमाणें मोठया तोफाहि विपुल झाल्या आहेत. सप्टेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवडयांतच फ्रान्समधील लढायांना ऊत येऊन सबंध आक्टोबर महिनाभरहि या लढाया तशाच जोरानें चालू होत्या. इंग्रजांनीं लूस गांव घेऊन जर्मनांच्या पिछाडीला बराच त्रास दिला आहे. चांपेन प्रांतांत फ्रेंचांची बरीच प्रगति झाली असून टाइरच्या टेकडी सभोंवतीं रीम्हच्या उत्तर पूर्वेला आक्टोबर महिन्यांत हातघाईचें युद्ध झालें. टाहूरची टेंकडी फ्रेंचांनीं एक दोनदां घेतली, पण आक्टोबर अखेरीस जर्मनांनीं ती परत घेतली. आक्टोबरच्या दुसऱ्या तिसऱ्या आठवडयांत रशियाच्या रणक्षेत्रातील जर्मनीचें सैन्य फ्रान्सकडे आणण्यांत आल्यामुळें फ्रेंच सेनेवर व इंग्रजी सेनेवर जर्मन सेना उलट हल्ले करूं लागली आहे. त्या उलट हल्ल्यात क्वचित् स्थळीं क्षुल्लक यश जर्मनीस येत असून फ्रेंचांचें पाऊल मात्र धिमेपणानें एकसारखें पुढे पडत आहे. फ्रेंचांच्या चांपेन प्रांतांतील प्रगतीच्या सीमेच्या उत्तरेला पूर्वेकडून पश्चिमेकडे जाणारी एक आगगाडी आहे. ह्या आगगाडीचा कांहीं भाग फ्रेंचांच्या लांब पल्ल्याच्या तोफांच्या माऱ्यांत आला असून ही आगगाडी हस्तगत करून घेण्याचा फ्रेंचांचा हेतु आहे. ही आगगाडी फ्रेंचाच्या ताब्यांत गेल्यास उत्तर फ्रान्समधील जर्मनीचा तळ सरहद्दीपलीकडे फेकून देणें फारसें कठीण नसून बेल्जममधील जर्मनांच्या पिछाडीलाहि शह दिल्यासारखें

होणार आहे. हिंवाळयाचा कडक अंमल सुरू होण्यापूर्वी जर्मनीला फ्रान्सांतून बाहेर पिटाळण्याचा फ्रेंचांचा हेतु सध्यां सफल होईल असें दिसत नाहीं. कारण जर्मनीला आतां कुमक येऊन पोंचली असून थंडीच्या कडक अंमलास विशेष अवधी राहिला नाहीं, तथापि पुढील वसंत काळांत फ्रान्समध्यें व बेल्जममध्यें जर्मन सेना दृष्टीस पडणार नाहीं, असा अंदाज आहे. मोठया तोफांच्या सहाय्यानें जर्मन चरांचे चक्रव्यूह झाडून काढावयाचे, नतर शूर शिपायांनीं शत्रूवर निकराचा हल्ला करून शत्रूला मार्गे लोटावयाचें, ही जर्मनांची युद्धकला फ्रेंचांचे व इंग्रजांचे आंगवळणी आतां बरीच पडली आहे. अमल्या युद्धकलेला फ्रान्स व इंग्लंड इतक्या दिवस अनभ्यस्त होते, मोठया तोफा त्याच्यापाशीं नव्हत्या व दारुगोळाहि भरपूर नव्हता, पण तो मनु आतां पालटला आहे. फ्रेंचांच्या मोठया तोफा सवाई जर्मन आहेत; दारूगोळा पुरून उरेलसा आहे. आणि एका नव्या जर्मन शिपायाच्या पुढें दहा नवे इंग्रज उभे करण्याचें सामर्थ्य इंग्रजी साम्राज्यांत निःसशय आहे. १९१६ सालच्या किंवा १९१७ सालच्या वसंत काळांत आपल्या चरांच्या चक्रव्यूहापुढें रशियाला जर्मनी थोपवून धरील व रशियाचा दम संपण्याची वाट पहात स्वस्थ बसूं शकेल, पण फ्रेंच रणभूमीसंबंधानें तशी स्थिति नाहीं. युद्धसामग्रीच्या पुरवठयाचा विचार करतांना रशियाची बाजू सदोष दिसते. फ्रान्सचा विचार करतांना जर्मनीप्रमाणें फ्रान्सनेंहि आपले सर्व जवान पुढें आणले असले पाहिजेत असें म्हणावें लागतें; व त्यामुळे पुढील दोन तीन वर्षांच्या युद्धस्थितीचा अंदाज करतांना सैन्याच्या नवीन भरतीसंबंधानें जर्मनी व फ्रान्स दोघेहि सारखे सदोष दिसतात. रशिया सदोष आहे, जर्मनी सदोष आहे फ्रान्स सदोष आहे, इंग्लंड मात्र सदोष दिसत नाहीं. इंग्लण्डचें नवें सैन्य दर महिन्यास जोरजोरानें वाढत आहे आणि इंग्लंडनें सक्तीच्या लष्करी नोकरीचा कायदा फ्रान्स जर्मनी–रशियाप्रमाणें अमलांत आणल्यास इंग्लडच्या भावी अफाट सैन्याचा नूतन चंद्रोदय आक्टोबर नोव्हेंबरांतच झाला, असें म्हणावें लागेल, आणि मग पुढील पंधरा महिन्यानंतर चंद्रकलेप्रमाणें इंग्रजी सैन्याचा पूर्णेंदु होईल. १९१७ सालच्या वसंत काळांत ह्या पूर्णेंदूचें दर्शन व्हावयाचें आहे. त्यावेळीं रशिया जरी दमांत हटला आणि जर्मनीला फ्रान्समधून पिटाळून दिल्यानंतर फ्रान्स जरी थकला तरी इंग्लंड बर्लिनवर स्वारी करून जाण्यास किमपीहि कच खाणार

नाहीं. इंग्लंडच्या या नव्या सामर्थ्यापासून जर्मनी स्वतःचा बचाव करून कसा घेणार ? १९१६–१७ सालच्या इंग्रजी सेनेच्या वाढीवर जर्मनीपाशीं कोणचा उतारा आहे ? हें भावी संकट जर्मनीला दिसत असून त्या संकटाचें निवारण करण्याकरतांच जर्मनीनें बाल्कन प्रकरण उपस्थित केलें आहे. बाल्कन प्रदेशांतील सर्व्हियन युद्धाची हकीकत पाहिली असतां सुवेज कॅनालावर इंग्रजी साम्राज्याला नवा शह देऊन इंग्रजी सेनेची नवी वाढ परस्पर तुर्कांकडून खाऊन टाकण्याची युक्ति जर्मनीनें कशी योजिली आहे, हे ध्यानांत येतें.

## सर्विया आणि इजिप्त

इंग्रजांच्या वाढत्या सेनेला नवें काम देऊन युरोपपासून लांब दूरवर कोठेंतरी गुन्तवून ठेवण्याच्या इराद्यानें गेल्या सप्टेंबरांत जर्मनीनें बल्गेरियाशीं नवें बोलणें सुरू केलें. बल्गेरियांत कारस्थान रचून इंग्रजी सेनेला नवी कामगिरी कशी मिळणार ? युरोप खडाबाहेर दूरवर इंग्रजी सेना गुन्तवावयाची म्हणजे तुर्कस्थाननेंच ती गुन्तविली पाहिजे. तुर्क लोक इंग्रजांशीं कसे लढणार ? आज लढत नाहींत काय ? तुर्कांना महायुद्धांत सामील होऊन एक वर्ष झालें. या वर्षांत जर त्यांना इंग्रजी सेनेची वाढ खुन्टवितां आली नाहीं तर चालू हिवाळ्यांत आणखी कोणचा पराक्रम करून दाखविणार ? गेल्या वर्षांत इराणी आखातांत उतरून इंग्रजी सेनेनें तुर्कांना युफ्रेटिस व तैग्रीस नदीच्या काठीं बगदादपर्यंत मागें रेटलें. हिंदुस्थानचें मोठें सैन्य बगदाद प्रांतांत अशा रीतीनें गुन्तलें असलें तरी युरोपखण्डांत इंग्रजी सेनेची वाढ कोठें खुन्टली ? सात आठ महिन्यांपूर्वी तुर्कांनीं एकदां सुवेजवर हल्ला केला आणि तेव्हांपासून सुवेज कालव्याच्या व इजिप्तच्या संरक्षणाकरितां एक मोठें इंग्रजी सैन्य तेथें अडकून पडलें आहे, पण त्यामुळें फ्रान्सच्या रणभूमीवरील इंग्रजी सेनेची वाढ कोठें खुन्टली ? गेल्या मार्च महिन्यापासून डार्डानेलिसच्या सामुद्रधुनीवर इंग्रजांचे एकसारखे हल्ल्यावर हल्ले चालू आहेत. एवढें मोठें भयंकर काम शिरावर घेऊन विलक्षण इर्षेनें व नेटानें डार्डानेलिसमध्यें लढत असतांनाहि बेल्जममधील इंग्रजांचें सैन्य एकसारखें वाढतच गेलें. इंग्रजांच्या साम्राज्यसत्तेचा विस्तार अफाट, त्यांची सामुग्री कधींहि न सम्पणारी; आणि रामाचा भाता ज्याप्रमाणें नेहमीं बाणानें गच्च भरलेला असे त्याप्रमाणें इंग्रजी सेनासागराला नवा नवा जनसमूह रोज मिळत असल्यामुळें त्या समुद्राला सर्व काळीं व सर्व स्थितींत नेहमीं

भरतीच यावयाची. इंग्रजांच्या ठिकाणीं ओहोटीची कल्पनाच संभवत नाहीं मग जर्मनी इंग्रजी सेनेला मर्यादित कसा करणार ? या सेनेला ओहोटी कशी लवणार? जर्मनांचें या प्रश्नांना उत्तर असें दिसतें कीं, इंग्रजांच्या पुढें युरोपखण्डांत आम्ही एक तऱ्हेनें हात टेकले आहेत; त्यांच्या वाढीस युरोपांत आम्हांस आळा घालतां येत नाहीं; ही वाढ अशीच फोफावत जाणार असें आम्हांस स्पष्ट दिसतें आहे; आणि तिच्या लाटेखालीं वर्षानन्तर म्हणा, दोन वर्षानन्तर म्हणा, किंवा निदान पांच वर्षानन्तर तरी मस्तक नमविणें आम्हांस भाग आहे; या सर्व गोष्टी खऱ्या असल्या तरी ज्या शेळीनें आपले कान आमच्या हातांत दिले आहेत, त्या शेळीच्या मार्फत—आमच्या चेल्याच्या मार्फत म्हणजे तुर्कांच्या मार्फत—आम्ही इंग्रजी वाढीस आळा घालू शकू असें आम्हास वाटतें. जे काम खुद्द जर्मनांना साधलें नाहीं तें काम तुर्क कसें करणार ? गुरु जेथें थकला तेथें चेला किती उड्या मारणार ? तुर्कांवर एवढी भिस्त का ? भिस्त ठेवण्याचें कारण असें आहे कीं, दहा बारा लाख जवान जमा करण्याचें सामर्थ्य तुर्कांच्या अंगीं आहे. तुर्कांना लढाईत पडून एक वर्ष झालें, मग येवढ्या अवधींत हे दहा बारा लाख जवान तुर्कांनीं कां गोळा केले नाहींत ? तुर्कांनीं गोळा केले नाहींत असें नाहीं. हे जवान तुर्कांनी गोळा केले आहेत. रोज त्यांना कवाईत शिकविण्यांत येत आहे. किंबहुना तुर्कस्थानांतील सर्व महत्त्वाच्या गांवांना व मैदानांना लष्करी शाळांचें रूप प्राप्त झालें आहे. मग हे दहा बारा लाख जवान आतां लढत कां नाहींत ? रोज कवाईत शिकण्याचा धडा कां गिरवीत बसले आहेत ? तुर्कांचें हें नवीन सैन्य लढत नाहीं याचें कारण असें आहे कीं, ह्या सैन्यापाशीं बंदुका नाहींत, तोफा नाहींत व दारूगोळाहि नाहीं. तुर्की साम्राज्याचें सामर्थ्य दहा पंधरा लाख जवान गोळा करून त्यांना जेवण घालण्यापुरतेंच आहे. तुर्की साम्राज्यानें अगदीं शिकस्त केली तरी तीन चार लाख लोकांना बंदुका तुर्कांना देतां येतात. तोफखाना जवळ जवळ नसल्या सारखाच, आणि या तीन चार लाख बंदुकांना एक दिवसाच्या लढाईलाहि पुरतील इतकी काडतुसें सबंध महिन्यांत तुर्की साम्राज्यांत तयार होऊं शकत नाहींत. तुर्की लोक गेले बारा महिने बगदादच्या बाजूला, काकेशियस प्रांतांत व दार्दानेलीसच्या सामुद्रधुनीवर लढले ते पूर्वीचा दारूगोळ्याचा सांठा अत्यंत काटकसरीनें खर्च करून लढले.


आजमितीस दारूगोळ्यासंबंधानें तुर्कांचें जवळ जवळ दिवाळे निघाल्यासारखेंच आहे. विमानांच्या मार्फत थोडाबहुत दारूगोळा जर्मनींतून तुर्कांना मिळतो व त्यामुळेच ते जीव धरून आहेत. थोडक्यात बोलावयाचें म्हणजे तीन चार लाख बंदुका जरी तुर्कांच्या पाशीं असल्या तरी आज दारूगोळ्याच्या अभावीं तुर्कांचे सर्व दहा बारा लाख जवान नुसते भोजनभाऊ बनले आहेत. सकाळ संध्याकाळ लष्करी तालीम करावयाची आणि सरकारी जेवणें झोडावयाचीं, यापलीकडे त्याना दुसरा उद्योग नाहीं. या दहा बारा लाख भोजनभाऊंना जर सशस्त्र करता आले आणि अन्नाच्या ढिगाबरोबर दारूगोळ्याचे ढीग जर त्याच्यापुढे मांडतां आले तर इंग्रजाना गुंतवून ठेवण्यास ठीक पडेल अशी जर्मनीची समजूत आहे. तुर्कांना हत्यारें व दारूगोळा कसा पोचवावयाचा? ऑस्ट्रिया–जर्मनीतून निघणाऱ्या आगगाडया सर्व्हिया व रुमानिया या दोन देशात जाऊन बल्गेरियांत उतरतात; व तेथून थेट तुर्कांची राजधानी जे कॉन्स्टांटीनोपल शहर त्या शहरात पोचतात. या आगगाडया जर जर्मनीच्या ताब्यात गेल्या तर तुर्क जिवत, सबळ व शूर होऊं शकतील. या आगगाडया कशा ताब्यांत घ्यावयाच्या? सप्टेंबरमध्यें बल्गेरियाशीं खलबत करून बल्गेरियाला जर्मनीनें आपल्या बाजूनें करून घेतलें; चारपांच महिने रशियाची एकसारखी पिछेहाट झाल्यामुळे जर्मनीशी संगनमत करण्यांत आपलें हित आहे असें बल्गेरियास वाटलें; आणि आक्टोबर प्रारंभापासून आपल्या सैन्याची जमवाजमव करून उदारपणें जर्मनीशीं सामील होण्याचा उद्योग बल्गेरियानें आरंभिला. जर्मनीनें रशियावर मिळविलेल्या विजयामुळे चोहोकडे त्याचा जो बोलबाला झाला त्या बोलबालाच्या धाकानें रुमानिया रशियास मिळाला नाहीं; व रुमानियानें पक्की तटस्थ वृत्ति स्वीकारली. सर्व्हियाच्या मदतीस ग्रीस खात्रीनें येणार असें वाटून ग्रीसला व सर्व्हियाला मदत करण्याकरितां इंग्रज व फ्रेंच ग्रीसच्या सॅलोनिका बंदरांत सहा आक्टोबरला उतरले. ग्रीसचें तीन लाख सैन्य आपणाला उपयोगीं पडेल असें त्यावेळीं वाटलें. ग्रीसचे मुख्य प्रधान एम. व्हेनिजिलॉस यांनीं तसें आश्वासन दिलें, पार्लमेंटमध्ये तसें बोलून दाखविलें, आणि आपल्या सैन्याची जमवाजमव करून तशा कृतीस आरंभहि केला. पण, दुर्दैवानें सात आक्टोबर रोजीं म्हणजे अवघ्या चोवीस तासांतच ग्रीसच्या 'मदतीसंबंधानें पूर्ण निराशा झाली. ग्रीसचा राजा आडवा पडला; इंग्रजांना मदत देत नाहीं म्हणून

साफ बोलला; आणि मुख्य प्रधान एम. व्हेनिजिलॉस यांचा राजीनामा घेऊन त्यानें स्वमताचे नवे प्रधान नेमले. एम. व्हेनिजिलॉस यांजवर सर्व ग्रीस देशाचा पूर्ण भरंवसा; एम. व्हेनिजिलॉस जसें सांगतील त्याप्रमाणें हरएक ग्रीशन वागावयाला तयार. पूर्वी एकदां डार्डानेलिसच्या पहिल्या स्वारीच्या वेळीं याच मुख्य प्रधानानें इग्रजाना सैन्याची मदत देऊ केली होती. पण आयत्यावेळीं राजानें खो घातल्या-मुळे डार्डानेलिसची पहिली मोहीम इंग्रजांच्या आंगलट आली. एम. व्हेनिजिलॉस याच्या नादीं लागून एकदा इग्रज तोंडघशी पडले असतां पुन्हां इग्रज त्यांच्याच नादीं लागून कसे फसले ? त्यावेळीं एम. व्हेनिजिलॉस यांनीं आपल्या जागेचा राजीनामा दिला; ग्रीसच्या राष्ट्रापुढे इग्रजांना मदत करण्यासंबधीचीं आपली मतें त्यांनीं स्पष्टपणें मांडलीं, राजा आडकाठी कशी करतो हें लोकांना नीट समजून सागितलें आणि अशा रीतीनें समजून, उमजून, तावून सुलाखून ग्रीसच्या पार्लमेंटची नवी निवडणूक चालली असतां एम. व्हेनिजिलॉस यांच्या पक्षासच निवडून देऊन ग्रीशन लोकांनीं एम. व्हेनिजिलॉस यांसच पुन्हां मुख्य प्रधान नेमावयास राजास भाग पाडलें. अशा स्थितींत एम. व्हेनिजिलॉस यांच्या विरुद्ध ग्रीसचा राजा जाण्याची बिशाद काय असें इग्रजांना वाटलें तर त्यांत नवल काय ? मग राजानें हें धाडस कसें केलें ? ग्रीसच्या राजाला जर्मन बादशहाची बहीण दिली असून तो बाइलवेडा आहे असें म्हणतात. बायकोच्या मुठींत असेल, पण लोकमताविरुद्ध कसा गेला ? ग्रीशन लोक चवताळून जाऊन त्यानीं जर्मन बादशहाच्या त्या मेहुण्याला पदच्युत कसें केलें नाहीं ? ग्रीशन सेनेच्या अधिकाऱ्यांनीं या स्त्रीलपटाचे हुकूम अमान्य कां केले नाहींत ? रशियाच्या पिछेहाटीच्या दुर्दैवानें याठिकाणीहि इग्रजाना गांठलें. रशियाचे पराभव रशियालाच ग्रासून राहिले नाहींत, तर रशियाच्या दोस्तांनाहि पावलों पावलीं नडवीत आहेत. ग्रीशन सेनेनें पोक्त विचार केला कीं, येवढया मोठया रशियाला जर्मनीनें जेरीस आणलें तेथें ग्रीससारख्या चिमकुल्याचा काय पाड ? एम्. व्हेनिजिलॉस मोटमोठीं भाषणें करतील, पण लढून मरावें लागणार आपणास. तेव्हां राजाच्या कच्छपी रहाण्यास करारी शौर्य जरी नसलें तरी शहाणपणा अगीं पाहिजे. ग्रीशन सैन्याचा असा कल असल्यामुळे एम्. व्हेनिजिलॉस यांना गप्प बसावें लागलें, आणि जर्मन बादशहाच्या मेहुण्याची फत्ते होऊन ग्रीसच्या सत्त्वास कायमचा कलंक लागला. ग्रीस व रोमानिया हीं पक्कीं तटस्थ राहून तारीख १०

ऑक्टोबरच्या सुमारास उत्तर-पश्चिमेकडून आस्ट्रो-जर्मन सैन्य सर्व्हियावर चालून गेलें व पूर्वेकडून सर्व्हियाच्या पाठींत बल्गेरियानें खंजीर खुपसला. सर्व्हियाच्या नकाशाकडे जर पाहिलें तर असें दिसून येईल कीं, सर्व प्रदेश लहान मोठ्या टेकड्यांनीं व डोंगरांनीं व्यापलेला असून चांगले व मोठे रस्ते कोठेंच नाहींत. अवजड तोफा घेऊन येणाऱ्या शत्रूला तर हा प्रदेश फारच वाईट. आग-गाडीचे रस्ते काय किंवा इतर रस्ते काय ह्या डोंगराळ प्रदेशांतून वहाणाऱ्या नद्यांच्या खोऱ्याला धरूनच आहेत आणि ह्या नद्यांच्या खोऱ्याला जर्मन, ऑस्ट्रियन, बल्गेरियन, सर्व्हियन व फ्रेंच सैन्याच्या हालचाली सांप्रत चालू आहेत. सर्व्हियांत मुख्य नद्या दोन; एक मोरावा व दुसरी वर्दार. मोरावा नदीचे तीन भाग करतां येतात. उत्तर मोरावा, दक्षिण मोरावा व पूर्वपश्चिम मोरावा. सर्व्हियाच्या दक्षिण भागांत उस्कपच्या उत्तरेस या मोरावा नदीचा उगम होऊन ती ग्रॅविनिया, लेस्कोव्हॅश व नीश या जिल्ह्यांतून वहात जाते; या एवढ्या भागास दक्षिण मोरावा असें म्हणतात. नीशच्या उत्तरेस पंचवीस तीस मैलांवर तिला पश्चिमपूर्व मोरावा येऊन मिळते. पश्चिमपूर्व मोरावा नदीचा उगम पश्चिमेकडील ऑस्ट्रियाच्या बोसनिया प्रांताच्या सरहद्दीवरील व्हिशिग्राड गांवापासून पधरा वीस मैलावर झाला असून ओसेगा, चॅकवॉक व क्रूचेव्हॅस्क गांवावरून पूर्वेकडून वहात जाऊन दक्षिण मोराव्यास मिळते व तेथून हे दोन्ही ओघ उत्तरेकडे वहात जाऊन सीमेंड्रिक्स शहराजवळ सर्व्हियाच्या उत्तर सरहद्दीवर डान्यूब नदीला मिळतात. मोरावाच्या दक्षिण, पश्चिम व उत्तर तिन्ही खोऱ्यांत मोरावा नदीला धरून सर्व्हियाची आगगाडी असून सीमेंड्रिक्स शहराच्या दक्षिणेकडून एक फाटा बेलग्रेडकडे गेला आहे. बेलग्रेडवरून नीशकडे येणारी आगगाडी नीशच्या पूर्वेस पिरॉट किल्ल्याकडे वळते व तेथून बल्गेरियात शिरून बल्गेरियाची राजधानी जें सोफिया शहर त्यावरून जाऊन ॲड्रियानोपलवरून थेट तुर्की राजधानीला म्हणजे कान्स्टांटिनोपलला जाऊन पोंचते. बेलग्रेडवरून नीशकडे येणारा आगगाडीचा फांटा कबजांत घेण्याकरितां तारीख १० ऑक्टोबरपासून जर्मनीचे जोराचे प्रयत्न सुरू झाले. उत्तरेकडून जर्मन व पूर्वेकडून बल्गेरियन यांनीं एकदम स्वारी करण्यास आरंभ केला. जर्मनीनें बेलग्रेड व सीमेंड्रिक्स हीं शहरें घेऊन मोरावाच्या खोऱ्यांतून दक्षिणेकडे उतरण्यास आरंभ केला. बेलग्रेड-पासून चाळीस-पन्नास मैल जर्मनी उतरला असून नोव्हेंबर प्रारंभाला नीशच्या

उत्तरेस तीस–चाळीस मैलांवर जर्मन सेना येऊन पोंचली आहे. वायव्येकडून व पश्चिमेकडून ऑस्ट्रियन सेना सर्व्हियांत घुसली असून व्हिशीग्रॅड येथून निघून पश्चिमपूर्व मोरावाच्या उगमाजवळचें खोरें ऑस्ट्रियानें गाठलें आहे. सर्व्हियाचा वायव्य कोपरा ऑस्ट्रियानें व्यापला असून व्हॅलजावो गांव मागे टाकून क्रॅगोव्हॅट शहरापुढें आस्ट्रो–जर्मन सैन्य नोव्हेंबर प्रारंभाला येऊन पोहोंचलें आहे. क्रॅगोव्हॅटस शहरांत सर्व्हियाचा दारूगोळयाचा कारखाना असून तेथे निकराची लढाई नोव्हेंबर प्रारभाला होऊन तें शहर जर्मनीनें घेतलें. उत्तर मोरावा व पूर्व पश्चिम मोरावा हीं दोनहि खोरीं ऑस्ट्रो–जर्मनाच्या ताब्यांत जाऊन नोव्हेंबरच्या पहिल्या आठवडयात नीशच्या उत्तरेस वीस पचवीस मैलांवर ऑस्ट्रो–जर्मन तोफा येऊन ठेपतील, असा अदाज आहे. सर्व्हियाचा ईशान्य कोपराहि जर्मनीनें घेतला असून त्या कोपऱ्यांत बल्गेरियन व जर्मन सैन्य एकमेकांशीं सांधलें गेलें आहे. ह्या ईशान्य कोपऱ्याच्या उत्तरेस डान्यूब नदीवर आर्सोवापर्यंत ऑस्ट्रियाची आगगाडी आली आहे. येथें डान्यूब नदीमध्यें वाफेनें चालणारीं लहान जहाजें सहज फिरू शकतात. आर्सोवा येथे हत्यारें, दारूगोळा व तोफा या जहाजांतून भरून खालीं चाळीस पन्नास मैलांवर असलेल्या व्हिदीन गांवापर्यंत हीं जहाजे जातात. व्हिदीन गांव बल्गेरियाचें असून बल्गेरियाच्या सोफियाच्या आगगाडीचा फाटा व्हिदीनपर्यंत गेला आहे. डान्यूब नदीतील जहाजांच्या मार्फत ऑस्ट्रियाच्या व बल्गेरियाच्या आगगाडया आक्टोबरच्या चवथ्या आठवडयांत संलग्न झाल्या असून जर्मनीचीं हत्यारें व दारूगोळा तुर्कांना सर्रास पोहोंचण्यास आतां अडचण उरली नाहीं. तथापि बेलग्रेड–नीश आगगाडी जर्मनीच्या ताब्यांत गेल्याशिवाय तुर्क व जर्मन सर्वतोपरी सलग्न झाले असें म्हणतां यावयाचें नाही. नोव्हेंबर प्रारभाला पूर्वेकडून व ईशान्येकडून बल्गेरियन सैन्य नीशच्या जवळ पचवीस तीस मैलांवर पोंचलें आहे व पिरोटचा किल्ला बल्गेरियानें घेतला आहे. म्हणजे नोव्हेंबर प्रारंभाला उत्तरेकडून, ईशान्येकडून, पूर्वेकडून व दक्षिणेकडून नीशचा डोंगराळ टापू वेढला गेला असून, पश्चिम काय ती मोकळी आहे. पूर्वेस नीश, उत्तरेस क्रूचर्नेव्हॅश, पश्चिमेस नोव्हेवजार व दक्षिणेस मित्रोव्हिट्स एवढा हा लहानसा चौकोन सर्व्हियाच्या ताब्यांत बिनधोक राहिलेला आहे. सर्व्हियन सेनेला दक्षिणेकडून मदत करण्याकरितां सॅलनोका बंदरांत उतरलेल्या फ्रेंच सैन्यास

# सर्व्हियाचें रणक्षेत्र



दक्षिणेसच अडकवून ठेवण्याकरितां बल्गेरियानें दक्षिण सर्व्हियावर म्हणजे मॅसीडोनियावर प्रारंभीच हल्ला करून यिस्टिप गांव घेऊन वर्दार नदीचें खोरें गांठून क्रुगोली गांव घेऊन क्रुपोलीच्या उत्तरेकडील युस्कुब जंक्शनहि बल्गेरियानें घेतलें आहे व तेथून मिट्रोव्हिट्सच्या रोखानें नोव्हेंबर प्रारंभाला बल्गेरिया उत्तरेस चढला आहे. दक्षिणेकडून बल्गेरियन्स व उत्तरेकडून ऑस्ट्रियन्स मिट्रोव्हिट्स व नोव्हेबजार या टापूंत येऊन नोव्हेबरच्या दुसऱ्या आठवड्यात संलग्न होतील व नीशच्या टापूला पुरा वेढा पडेल असा अदाज आहे. नीश येथून सर्व्हियानें आपली राजधानी हालविली असून प्रथम सरकारी कागदपत्र दक्षिणेस ग्रीसच्या सरहद्दी· जवळ मोनॅस्ट्रिक गावीं ठेवण्यांत आले होते. पण ग्रीस केव्हां बेइमानी करील याचा नियम नाहीं अशी सर्व्हियास भीति वाटल्यामुळें राजधानी पश्चिमेस मॉटनी-ग्रोच्या लगत्याला नेण्यांत आली आहे. नीशचा टापू शिवाय करून बहुतेक सर्व सर्व्हिया व मासीडोनिया शत्रूकडून नोव्हेंबरांत व्यापला जाईल असा सांप्रतचा अदाज आहे. नीशचा टापू मात्र महिना, दोन महिने, तीन महिने, शक्य तितक्या दिवस सर्व्हियानें लढवावा व फ्रेंचांनीं नीशचा टापू पडण्यास उशीर लावण्याकरितां दक्षिणेस बल्गेरियास त्रास देत राहावें, असें इंग्रज फ्रेंचाचें लष्करी धोरण ठरलेलें दिसतें. सर्व्हियाचा बचाव होणें शक्य नाहीं, असें ठरविण्यांत आलें असावें. सर्व्हियाची नोव्हेंबरमध्ये जरी बेल्जमसारखी स्थिति झाली तरी अखेरीस बेल्जम प्रमाणें सर्व्हियालाहि स्वातंत्र्य मिळाल्याशिवाय इग्रज, फ्रान्स व रशिया जर्मनीशीं तह करणार नाहींत असें आश्वासन सर्व्हियास देण्यांत आलें आहे. सर्व्हियाच्या मोहिमेचें असें अखेर पर्यवसान जर आज आंखून ठेवल्यासारखें आहे तर लष्करी धोरणाच्या दृष्टीनें सर्व्हियानें तरी नीश येथें निकरानें कां लढावें व बल्गेरियास फ्रेंचांनीं दक्षिणेकडून त्रास तरी कां द्यावा ? या प्रश्नास उत्तर असें आहे की, युद्धाचें केंद्रस्थान नोव्हेंबरपासून सर्व्हियांतून बाहेर पडून शेंकडों मैल दक्षिणेस सुवेज कॅनॉलकडे व इजिप्तकडे जात चाललें आहे. डिसेंबर–जानेवारींत युद्धाचें केंद्रस्थान सुवेज कॅनॉल होऊन बसणार आहे. या नव्या केंद्रस्थानाला जर्मनीची मदत सांप्रत सर्व्हियाच्या ईशान्य कोपऱ्यांतून डान्यूब नदीच्या मार्फत होत आहे. ती मदत तेथून न होतां जर बेलग्रेड–नीश–सोफिया–कॉन्स्टांटिनोपल या मार्गानें होऊं लागली तर जर्मनांचें व तुर्कांचें काम अधिक सुकर होईल. बेलग्रेड–नीश हा

आगगाडीचा फांटा जर्मनीच्या ताब्यांत जाऊन तीन चार आठवडे झाले म्हणजे आगगाडीची दुरुस्ती होईल व बर्लिन येथून निघालेलें इंजीन थेट कॉन्स्टांटिनोपलला पोचेल. तुर्कांचें व जर्मनीचें असें दळणवण सुरू झाल्यावर बल्गेरियाच्या दक्षिणेला किंवा डार्डानेलिस येथेंहि इंग्रजी किंवा फ्रेंच सैन्य ठेवण्यांत कांहीं हांशील नाहीं. कॉन्स्टांटिनोपलच्या बास्फरसच्या सामुद्रधुनींतून तुर्कांची आगगाडी निघून ती एशियामायनरमधून सीरिया प्रांतांत सुवेज कॅनॉलजवळ शंभर मैलांवर जाते; व तेथून तांबडया समुद्राच्या किनाऱ्यावर मक्का मदिनाकडे वळते. म्हणजे बेलग्रेड–नीश हा फांटा जर्मनांच्या ताब्यांत गेल्यावर बर्लिनपासून सुवेज कॅनॉलपर्यंत किंबहुना पुढें मक्का–मदिनापर्यंत तुर्की जर्मन सूत्र नीट सांगडलें जाईल यांत संशय नाहीं. अर्थात् सर्व्हिया नंतरचें महायुद्धाचें केंद्रस्थान सुवेज कॅनॉल व इजिप्त हा टापू होणार असून तांबडया समुद्रकांठचा मक्का–मदिना टापू हा त्याची एक बगल, पालेस्टाईनचा सीरिया प्रांत हा त्याची दुसरी बगल होणार आहे. या नव्या केंद्र-स्थानांत जर्मनांनी एक मनुष्य तुर्कांच्या मदतीला आणला तर समुद्रावरील वर्चस्वामुळे इंग्रज दहा जवान त्यांच्या पुढें उभे करतील. अर्थात् डार्डानेलिस येथें तुर्कांची जी अब्रु बचावली, ती इजिप्तच्या मोहिमेंत तुर्कांना गमवावी लागेल यांत संशय नाहीं; पण चेल्याला मरावयाला पुढें करून त्याच्या देशांतील गहूं, कापूस व तांबें या जिनसांवर आपला गुजराणा कांहीं दिवस कढण्याचा जर्मनीचा उद्देश असल्यामुळें तुर्की लष्कराचें कबरडें सुवेज कॅनॉलवर मोडणें इंग्रजांना भाग आहे. चेला मरेतों कांहीं दिवस गुरु जिवंत राहिला एवढेंच काय तें बल्गेरियाच्या कारस्थानानें आणि सर्व्हियावरील मोहिमेनें सांप्रत जर्मनीनें संपादिलेलें आहे.

# दुसऱ्या वर्षाचा नोव्हेंबर-डिसेंबर महिना

आक्टोबर महिन्याच्या १० तारखेस सुरू झालेलें सर्व्हियन युद्ध नोव्हेंबर अखेरीस जर्मनीला पूर्ण जय मिळून समाप्त झालें. नकाशावर दोन चार बोटें लांब व बोट दीड बोटें रुंद दिसणारा सर्व्हिया देश आक्रमण करण्यास जर्मनीला दीड दोन महिने लागले! बल्गेरिया, ऑस्ट्रिया व जर्मनी या तिघानीं मिळून चारहि बाजूनीं चिमुकल्या सर्व्हियावर एकदम स्वारी केली होती; तेव्हां सर्व सर्व्हिया शत्रूनीं व्यापला, ही आश्चर्याची गोष्ट नसून दीड दोन महिने सर्व्हियानें जर्मनीशीं टक्कर दिली हीच आश्चर्याची गोष्ट होय. महायुद्धाच्या गेल्या सोळा महिन्यांचा जर इतिहास पाहिला तर लढण्याच्या कामीं सर्व्हियानें जसा हट्ट दाखविला तसा हट्ट दुसऱ्या कोणत्याहि लोकांनीं दाखविला नाहीं, असें म्हणावें लागतें. हे लढवय्ये लोक स्वदेशास मुकले; त्यांच्या राजास व अवशिष्ट सेनेस परदेशांत आश्रयास जावें लागलें; आणि सर्व्हिया बेल्जमच्या पङ्क्तीस बसून चिमुकल्या राष्ट्रांच्या कैवाऱ्यांचे दिवस अद्याप आले नाहींत असे दुःखोद्गार सर्व सज्जनांच्या तोंडून निघाले! आक्टोबर अखेरीस जर्मनीची उत्तरेकडची स्वारी मोरावा नदीच्या काठानें सर्व्हियाच्या क्रूशेव्हॅट शहरापर्यंत आली होती, वायव्येकडून ऑस्ट्रिया बराच आंत घुसला होता, आणि दक्षिणेस बल्गेरियानें युस्कुप घेऊन पूर्वेकडे वळून आल्बेनियाची सरहद्द गांठण्याचा उद्योग आरंभिला होता. वायव्येकडून खालीं उतरणारे ऑस्ट्रियन व युस्कुपपासून वायव्येकडे जाणारे बल्गेरियन यांची गांठ पडून सर्व्हियन सेना पुरी कोंडली जाते कीं काय अशी भीति नोव्हेंबर प्रारंभाला वाटत होती. नोव्हेंबर प्रारंभाला दक्षिणेस फ्रेंच सैन्यानें बल्गेरियाची फळी फोडण्याची शिकस्त केली; पण सर्व्हियाच्या दुर्दैवानें त्यांत फ्रेंच सेनेस यश आलें नाहीं. आक्टोबर अखेरीस क्रूशेव्हॅट पडलें व नोव्हेंबर पांच तारखेला बेल्ग्रेड नतरची सर्व्हियाची नवी राजधानी जे नीश शहर तेंहि बल्गेरियानें हस्तगत केलें. नीश शहर पडल्यापासून पाच सात दिवसांत म्हणजे नोव्हेंबरच्या १०-१२ तारखेच्या सुमारास बेल्ग्रेड-नीश ही आगगाडी जर्मनीच्या ताब्यांत गेली. लष्करी धोरणाच्या दृष्टीनें विचार केला असता जर्मन सैन्याचें सर्व्हियाच्या युद्धातील काम, नोव्हेंबरच्या १०-१२ तारखेसच संपलें

असें म्हणावें लागतें. बर्लिन येथून निघणारी आगगाडी आस्ट्रियाच्या दक्षिण सरहद्दीवर येऊन बेल्ग्रेड, नीश, सोफिया या मार्गानें कॉन्स्टांटिनोपलला म्हणजे तुर्की राजधानीला जाऊन पोंचते. महायुद्धाच्या जर्मन चक्रांतील तुर्की दांत डळमळीत झाले होते. हे तुर्की दांत घट्ट बसविण्याकरितां जर्मनांना कान्स्टांटिनोपल गांठणें जरूर होतें. पण बर्लिनपासून कान्स्टांटिनोपलपर्यंतच्या आगगाडीच्या हमरस्त्यापैकीं बल्ग्रेड–नीश भाग सर्व्हियाच्या ताब्यांत होता. तो भाग स्वतःच्या ताब्यांत घेण्याकरितां दहा आक्टोबरला जर्मन तोफांनीं बेल्ग्रेडवर गोळे टाकण्यास सुरुवात केली व दहा नोव्हेंबरला सर्व आगगाडी जर्मनीच्या ताब्यांत जाऊन जर्मनी तुर्कस्थानशीं सलग्न झाला. इंग्रजी तोफानीं पाडलेले तुर्कांचे दांत डिसेंबर महिन्यांत नीट बसविण्यांत येतील आणि तुर्कांच्या एका दाढेला इजिप्त फोडण्याचें व दुसऱ्या दाढेला इराण चघळण्याचें काम सांगण्यात येईल. तुर्कांच्या दातांनीं चावावें, तुकडे पाडावे, आणि मग जर्मन जिभेनें आपले घास मिटक्या मारीत घशाखालीं ढकलावे, असल्या भिजासी स्वप्नांच्या मागे लागून जर्मन सेना सर्व्हियावर चाल करून आली. या स्वप्नापैकीं पहिला भाग म्हणजे तुर्कांशीं सलग्न होण्याचा भाग नोव्हेंबर महिन्यांत सिद्ध झाला आहे. तुर्कांचे दात घट्ट बसविण्याची क्रिया सुरू झाली आहे. बसलेले दांत इंग्रज फ्रेंच तोफांचे गोळे कडाकड फोडतात, कां दांत पडून तुर्क आपल्या धन्यासकट तोंडघशी पडतात हें जानेवारी फेब्रुवारीमध्यें समजून येणारें आहे. बेलग्रेड–नीश आगगाडीची नासधूस ठिकठिकाणीं सर्व्हियानें केलेली आहे. ती दुरुस्त होण्यास एक महिना लागेल म्हणतात, म्हणजे डिसेंबरचे दुसऱ्या आठवड्यांत बर्लिन येथून निघालेले एंजीन थेट कान्स्टान्टिनोपला जाऊन पोचेल. तारीख १० नोव्हेंबरच्या सुमारास आगगाडी सोडल्यानंतर सर्व्हियन लोक निकरानें लढले नाहींत. पूर्वेकडे आस्ते आस्ते निघून जाऊन नोव्हेंबरच्या अखेरीस सर्व्हियाचें मुख्य सैन्य मांटिनिग्रोची सरहद्द ओलांडून पलीकडे गेलें, आणि दक्षिणेस बल्गेरियन लोकांनीं मोनास्ट्रीर गांव व मोनास्ट्रीर जिल्हाहि व्यापला. मॅसिडोनियाच्या आग्नेयकोपऱ्यांत जो लहानसा टापू फ्रेंच सैन्यानें व्यापला आहे तेवढा टापू शिवाय करून बाकी सर्व मॅसिडोनिया व सर्व्हिया डिसेंबर प्रारंभाला आस्ट्रो–जर्मनांनीं व बल्गेरियनांनीं आपल्या कबजांत घेतला. नोव्हेंबर महिना आस्ट्रो–जर्मनांस व बल्गेरियनांना सर्व्हियन युद्धापुरता

विजयाचा गेला. बल्गेरियाला मॅसिडोनिया घेऊन बाल्कन युद्धांतील अप्रतिष्ठा धुवून टाकावयाची होती; नोव्हेंबरांत मॅसिडोनिया बल्गेरियाला मिळाला. ऑस्ट्रियन ग्रॅन्ड ड्यूकच्या खुनाबद्दलचा सूड आस्ट्रियाला उगवावयाचा होता; रशियन फ्रेंच व इंग्रज सेना सर्व्हियाच्या मदतीस धावून येण्याची तयारी करीत असतांना व आली असतांना ' नदाः पशवइव हताः पश्यतो राक्षसस्य ' चाणक्याच्या ह्या दर्पोक्तीप्रमाणें ऑस्ट्रियानें सर्व सर्व्हियनांना देशभ्रष्ट करून नोव्हेंबर महिन्यांत आपला सूड उगवून घेतला. संयुक्त दोस्त राष्ट्राची पूर्वेस रशिया तर पश्चिमेस फ्रान्स व इग्लंड अशीं दोन शकलें झालीं आहेत; हीं शकलें एकमेकांपासून अलग असून तुर्की राष्ट्रामार्फतच सांधलीं जाणारीं होतीं; हीं शकलें सांधली जाऊं नयेत म्हणून जर्मनी सर्व्हियावर चढाई करून गेला; नोव्हेंबर महिन्यात जर्मनी तुर्काशीं संलग्न झाला आणि फ्रान्स रशियाशीं सलग्न होण्याची आशा रसातळाला गेली. तुर्क व जर्मन अशीं दोन शकलें प्रारंभापासून होतीं. हीं शकलें नोव्हेंबरांत एकरूप झालीं. आणि फ्रान्स, बेल्जम, रिगा, डिव्न्स, गॅलिशिया, काकेशियस पर्वत, इराणची सरहद्द, बगदाद, तांबडा समुद्र, सुवेजचा कालवा, एशियामायनर, दार्दानेलिस, सॅलोनिका, मांटिनिग्रो, इटलीची सरहद्द, वगैरे सर्व लहान मोठ्या ठिकाणच्या लढायांचीं सूत्रे बर्लिन येथें केंद्रीभूत झालीं. एकरूपतेचा फायदा यापुढे जर्मनीस विशेष मिळणारा असून दोस्त सरकारातील विस्कळितपणा ह्यापुढे रशियनांना व इग्रजांना अधिक जाचक होणार आहे.

## स्थानभ्रष्ट सर्व्हिया व राजकीय परिस्थिति

सर्व्हिया स्थानभ्रष्ट झाला ही महायुद्धाच्या इतिहासांत एक महत्त्वाची गोष्ट घडून आली. राजकीय दृष्टीनें व लष्करी दृष्टीनें त्याचे परिणाम युद्धामध्यें गुन्तलेल्या सर्व राष्ट्रावर नोव्हेंबर महिन्यांत घडून आले आहेत. इग्लंड व फ्रान्स येथील प्रधानमंडळांत महत्त्वाचे फेरफार झाले. ज्या नेटानें व एकसूत्रीपणानें युद्धाचा कारभार हाकला जावा त्या नेटानें व एका धोरणानें कारभार हाकला जात नाहीं असें निदर्शनास आलें. बावीस इसमांच्या प्रधानमंडळाकडून एकसूत्रीपणानें कारभार चालविला जाणें शक्य नाहीं; तेव्हां बावीसाच्या ऐवजीं चार पांच प्रधानांचेंच लहानसें व आटपशीर युद्धमंडळ स्थापण्यांत येऊन ह्या मंडळात आतां सर्व सत्ता एकवटली आहे. फ्रान्समध्येंहि अशाच प्रकारचें छोटे युद्धमंडळ स्थापण्यांत

आलें आहे. बारभाईंचा कारभार सांगोपांग विचार करून सावकाशपणें राष्ट्राचीं धोरणें आंखण्याच्या वेळीं उपयोगी पडतो; पण जेथें शत्रूच्या रोजच्या नव्या नव्या हालचालीमुळें सावकाशीच्या चर्चेला फुरसत मिळत नाहीं तेथें थोडया लोकांच्या हातांतच सत्ता जाणें श्रेयस्कर असतें. लोकसत्तात्मक राजनीतीच्या दृष्टीनें असले फेरफार लोकांच्या राजकीय हक्कांच्या विरुद्ध कितीहि असले तरी प्राणावर आलेलें संकट निवारण्याच्या दृष्टीनें ते अत्यत जरूर असतात. प्राणावर बेतलें आहे, हें इंग्लडनें आतां पूर्ण ओळखलें आहे. ' शीर सलामत, तर पगडी पचास ' हा न्याय इंग्लडच्या हृदयास पटला आहे. व्यक्तिस्वातंत्र्याविषयींच्या व राजकीय स्वातंत्र्यविषयींच्या आपल्या कल्पना कांहीं काळ एका बाजूस ठेवून दोन तीन व्यक्तींच्या अमलाच्या जुवाखालीं स्वातंत्र्यप्रिय इंग्लंडनें आपली मान संतोषानें दिली आहे. इतकेंच नव्हे तर ज्या सक्तीच्या लष्करी नोकरीला इंग्लडकडून इतक्या दिवस नांवें ठेवण्यात येत होती ती सक्तीच्या लष्कराची पद्धत इंग्लंडनें संप्रत अर्धवट अगीकारली असून त्या पद्धतीचा पूर्ण अंमल जानेवारी फेब्रुवारी महिन्यांत इंग्लंडांत सुरू होईल असा रंग दिसत आहे. राजकीय स्वातंत्र्याच्या तत्त्वाच्या दृष्टीनें इग्लंडची व त्याबरोबर सर्व मानवजातीची ही एक मोटी हानि झाली असें म्हणावें लागतें. पण महायुद्धांत अखेर जय मिळविण्याच्या दृष्टीनें ह्या फेरफारानें इग्रजी साम्राज्यावर मोठे उपकारच झाले असें म्हणणें भाग आहे. सर्व्हिया बुडाला, पण इग्रजी साम्राज्य तरतें; सर्व्हिया स्थानभ्रष्ट झाला, पण इग्रजी सत्ता स्थानापन्न झाली; सर्व्हियाचा पराजय झाला, पण इग्रजांच्या अखेरच्या विजयाचा विमा उतरण्यात आला. इग्लण्ड स्वस्थानीं बसलेलें असल्यावर बेल्जम, पोलण्ड व सर्व्हिया येथील परदेशच्या धुळींत पडलेले हिरे स्वदेशाच्या सुवर्ण कोंदणांत जाऊन बसण्यास कितीसा वेळ लागणार ? इंग्लड तरतें राहिल्यावर आज बुडालेलीं राहुद्याच, पण कालाच्या ओघात पूर्वीहि बुडालेली राष्ट्रें पुन्हां वर आल्यावांचून कशी राहतील ? इग्लडचा अखेर विजय झाल्यानन्तर सर्व्हियन लोकाचें विजयी निशाण बेलग्रेडवर पुन्हां फडकण्यास कोणती हरकत ? सर्व्हियाच्या नाशानें सर्व इग्लण्डास जागे केलें आहे; फ्रान्सची शक्ति वाढली आहे; रशियाचा निश्चय दुणावला आहे; आणि इटलीच्या डोळयांत अजन घातलें जाऊन स्वतःच्या घरापुरतें बघण्याची इटलीची आकुंचित दृष्टि फैलावली असून इंग्लण्डला सोडून

एकट्यानें तह करावयाचा नाहीं असा प्रतिज्ञालेख इटालीने लिहून दिला आहे. वाईटांतून चांगलें निघतें; त्याप्रमाणें सर्व्हियाच्या अशुभ वार्तेनें सर्व दोस्त सरकाराचें शुभच केलें आहे. दोस्त सरकाराची ही बाजू झाली. उलटपक्षी सर्व्हियावर मिळविलेल्या विजयामुळें जर्मनी, ऑस्ट्रिया, बल्गेरिया, व टर्की ह्यांचा उत्साह साहजिकपणें वाढत आहे. बाल्कन प्रदेशांत कोळशाच्या व ताम्याच्या खाणी बऱ्याच असून फाल्तुक धान्यहि विपुल आहे. शिवाय, तुर्कस्थानाशीं संलग्न झाल्यानें तुर्की माणसांच्याच नव्हे तर आस्ते आस्ते सर्व मुस्लीम जगांतील मुसलमानी लढवय्यांच्या खाणी जर्मनीच्या हातांत जाणाऱ्या आहेत. आणि त्यामुळे १९१६ सालीं तांबे कोळसे, धान्य व माणसें ह्यांचा नवा पुरवठा जर्मनीच्या हातांत पडणार आहे. अर्थात १९१५ सालापेक्षा १९१६ सालच्या प्रारभीं जर्मनीची राजकीय स्थिति अधिक सुधारलेली दिसणार त्यांत सशय नाहीं. सर्व्हिया पडण्याच्या पूर्वी दोन्ही पक्षांच्या राजकीय स्थितीकडे पाहून असा अन्दाज करण्यांत आला होता कीं, १९१६ सालच्या वसत काळांत जर्मनीच्या पराजयास प्रारभ होऊन १९१७ साली दातीं तृण धरून जर्मनीस तह करावा लागेल. सर्व्हियाच्या स्थान-भ्रष्टतेमुळे हा अन्दाज एक वर्षानें चुकीचा ठरला आहे. १९१६ सालच्या वसत काळांत जर्मनीच्या विजयाची मति कुण्टित होईल, व १९१७ सालीं जर्मनीच्या पराजयास प्रारभ होईल असें नवें भाकीत आता वर्तविणें भाग झाले आहे.

## सर्व्हियानतरची रणभूमि

सर्व्हियन लोकांना त्यांच्या देशांतून बाहेर हांकण्यांत आलें. आतां पुढे आस्ट्रो जर्मन सैन्य कोणीकडे वळणार ? माटिनिग्रोत शिरलेल्या सर्व्हियन लोकांचा पाटलाग डिसेंबर प्रारंभापासून आस्ट्रो–जर्मन सैन्यानें चालविला आहे. येत्या नाताळचे आंत मांटिनिग्रोच्या व आल्बेनियाच्या किनाऱ्यावर आस्ट्रो–जर्मन सत्ता प्रस्थापित होईल असा रंग आहे. सर्व्हियांतील पर्वत ओलांडून जर्मनीच्या तोफा सर्व्हियाचा सर्व डोंगराळ प्रदेश फिरल्या; तेव्हां माटिनिग्रोचे किंवा आल्बेनियाचे डोगर त्यांना कुंठित करू शकतील अशांतला भाग नाहीं. ह्या कामाला सर्व्हियांतील आस्ट्रो–जर्मन सैन्यापैकीं अर्धापाव भाग पुरेसा आहे. तेव्हां बाकीचें आस्ट्रोजर्मन सैन्य व बल्गेरियन सैन्य पुढे काय करणार हा प्रश्न येथे साहजिकपणें उद्भवतो. सर्व्हिया संपला, आतां पुढची रणभूमि कोणची ? महायुद्धाच्या डावातील हुकूम गेल्या मे

महिन्यापासून जर्मनीच्या हातांत आहे. हा हुकूम पुढील वसंतकाळापर्यंत जर्मनीच्याच हातांत रहावयाचा असल्यामुळें जर्मन सूत्रधार ज्या भूमीवर आपलें सैन्य पाठवितील तीच भूमि महायुद्धाची मुख्य रणभूमि ठरेल हें उघड आहे. दोस्त सरकारांचें सांप्रत एवढेच काम आहे कीं, ज्या प्रदेशांतील दगडांना जर्मन शेंदूर फांसतील त्या प्रदेशांत आपलें सैन्य नेऊन जर्मनांच्या रक्तानें त्या रणदेवतांना स्नान घालून अधिक आरक्त करावयाचें आणि जर्मनांचा असा रक्तस्राव होऊन जर्मन निःसत्त्व होत असतांना स्वतःच्या घरांत बभ्रा न करतां धिम्मेपणानें नवें सैन्य, नव्या तोफा, नवा दारूगोळा उत्पन्न करून वसंतकाळांत हुकूम आपल्या हातांत घ्यावयाचा. नवीन शक्ति निर्माण करणाऱ्या तपश्चर्येचें हे काम इंग्रजी साम्राज्यांत व रशियांत अहोरात्र चाललें आहे. इंग्लंडपाशीं पैसा विपुल आहे आणि एका वर्षांत दहा वीस लाख नवीन सैन्य उत्पन्न करण्याइतकें इंग्रजांचें मनुष्यबळ अद्यापि कोरेंच्या कोरें आहे. रशियापाशीं मनुष्यबल अमर्यादित आहे; आणि रशियास दारूगोळा पुरविण्याकरितां जपानांतील प्रत्येक यंत्र अष्टौप्रहर जोरजोरानें फिरत आहे. जर्मनांच्या एकास दोन गोळे अशाप्रमाणानें सांप्रत दारूगोळा विण्याचें काम इंग्रजी भूमि करीत आहे. इंग्रजांची, रशियाची व फ्रान्सची जर एवढी तपश्चर्या चालली आहे तर आपल्या हातांत हुकूम आहे तों त्या तपश्चर्येचा विध्वंस करण्याचा उद्योग जर्मननें कां करूं नये? सर्बिया संपला; तुर्कांशीं जर्मन संलग्न झाले; आतां रशियावर तुटून पडून रशियाच्या मोठ्या लष्कराचा नायनाट जर्मनीनें कां करूं नये? मोठ्या लष्कराचा नायनाट नाहीं करतां आला तर निदान पेट्रोग्राड किंवा कीव्ह घेऊन रशियाची जीवनशक्ति संपुष्टांत कां आणूं नये? हिंवाळ्यांत यापैकीं जर्मनीच्या हातून कांहीं होईलसें दिसत नाहीं. कारण नोव्हेंबरपासूनच रशिया पुन्हा वर डोकें करूं लागला आहे. शिवाय, गेल्या सहा महिन्यांच्या एकसारख्या चढाईमुळें जर्मन सेना अत्यंत थकली असून हिंवाळ्याच्या बर्फांत नेटानें लढण्याचें त्राण ह्या सेनेंत राहिलेलें नाहीं. बरें, रशिया उलट जर्मनीवर चढाई करील काय? तसेंहि होणार नाहीं. हिंवाळ्याचे चार महिने रशियास तपश्चर्येकरितां पाहिजेत. जोरानें लढण्याची यावेळीं सोय नाहीं. गेल्या हिंवाळ्यांत हंगेरियन पर्वताच्या रोखानें रशियानें अत्यन्त निकराची चढाई केली; त्या चढाईंत दम संपून गेल्यामुळे गेल्या मे महिन्यापासून रशियास एकसारखी माघार खावी लागली.

पूर्वीची चक रशिया करणार नाहीं. बाल्कन प्रदेशांत जर्मनीला शह बसावा म्हणून रुमानियाच्या उत्तर सरहद्दीवर व पूर्व सरहद्दीवर रशियानें दोन चार लाख सैन्य गोळा केलें आहे. डान्यूब नदीच्या मुखाजवळील लहानसा भाग ओलांडून बल्गेरियावर स्वारी करण्याचा रशियाचा हेतु आहे असें म्हणतात. पण लष्करी धोरणाच्या दृष्टीनें यांत विशेष तथ्य दिसत नाहीं. आस्ट्रियाच्या आगगाड्या बल्गेरियाच्या आगगाड्यांशीं आतां संलग्न झालेल्या आहेत, तेव्हां आस्ट्रो-जर्मन सैन्याशीं बुकोव्हिना किंवा ग्यालिशिया या प्रांतांत लढलें काय, आणि बल्गेरियांत उतरून लढलें काय, फळ सारखेंच; मग डान्यूब नदीचा अडथळा तरी पाठीशीं कां घ्यावा? बल्गेरियांत रशियन लोक स्वतः उतरल्यानें रशियाचे पूर्वीचे उपकार स्मरून बल्गेरियन लोक राजाविरुद्ध बंड करतील, असें म्हणावें तर त्यांतहि हशील नाहीं. कारण, बल्गेरियन लोकांना मॅसिडोनिया मनापासून हवा होता; आणि सर्व्हियन युद्धात मॅसिडोनियाचा प्रांत बल्गेरियन सेनेस व्यापतां आल्यामुळे बल्गेरियन प्रजाजन नाराज रहाणें शक्य नाहीं. असल्या कांहीं तरी विलक्षण कृतीनें रुमानिया रशियास मिळेल असें म्हणावें तर तेंहि जुळणार नाहीं. सर्व्हिया जिवत असतांना जो रुमानिया तटस्थ राहिला आणि सर्व्हियाच्या अंतकालच्या वेदनांकडे ज्या रुमानियानें डोळेझांक केली तो रुमानिया सर्व्हियाच्या मृत्यूनंतर हातांत शस्त्र कसें धरणार? रशियन सैन्यानें ग्यालिशियाच्या बाजूला किंवा फ्रेंच सैन्यानें सॅलोनिकोच्या बाजूला जर एखादा प्रचंड जय मिळविला, आणि सर्व्हिया हिवाळयात पुन्हां जिवंत झाल्यावांचून रहात नाहीं असें रुमानियाला जर प्रत्यक्ष दिसू लागलें, तरचं मात्र रुमानिया रशियास मिळेल. पण हिवाळयांत तसा विजय मिळणें शक्य नाहीं. मग रशियाच्या या नव्या सैन्याची तयारी कां? रुमानियाच्या अंतःकरणाचा ओढा रशियाच्या बाजूचा आहे खरा, पण अंतःकरणाच्या ओढयाला धरून बाल्कन प्रदेशांतील राजनीति चाललेली नाहीं. बल्गेरियन लोक कोठें रशियाला पूज्य मानीत नाहींत? पण नफ्यातोटयाचा हिशेब करून ते जर्मनीला मिळाले ना? मग ह्याच हिशेबानें रुमानियाचें तोंड जर्मनीकडे कां फिरणार नाहीं? तुर्कस्थानची स्थिरस्थावर करून तुर्की लोक इजिप्तवर स्वारी करीत असतांना जर जर्मनीनें ग्यालिशियाची मोहीम पुन्हां सुरू केली आणि रशियास पुन्हां माघार खावी लागली, तर रुमानिया काय करील? अशा स्थितींत काळया समुद्रावरील बेसारेबिया नांवाच्या रशियन प्रांताच्या लोभानें रुमानिया जर्मनीस कशावरून मिळणार नाहीं? आणि तो जर

तसा मिळाला तर कीव्ह प्रांत जर्मनीच्या ताब्यांत जाऊन काळया समुद्राचा उत्तर किनाराहि आस्ट्रो जर्मनांच्या हातीं पडण्याचा संभव आहे. जर्मन सेना थकली भागलेली आहे ही गोष्ट खरी; ग्यालिशियावर पूर्वीप्रमाणें जोराची मोहीम करण्याचें त्राण जर्मनींत उरलें नाहीं हेंहि खरें; पण एकदोन वर्षांनंतचें मरण टाळण्याकरितां जर्मन लोक आजच जर जिवावर उदार झाले आणि ग्यालिशियांत म्हणजे रुमानियन उत्तर सरहद्दीजवळ रुमानियाच्या डोळ्या देखत जर रशियाला कर्म-धर्मसंयोगानें माघार खावी लागली तर कसें ? रुमानियाच्या ताज्या दमाचें नवे रक्त जर्मनांत शिरून काळा समुद्र रशियाच्या हातचा जाईल. हा प्रसंग टाळण्या-करितां रशियानें दूरदृष्टीनें एव्हांपासून तयारी चालविली आहे. रशियाच्या या तयारीकडे पाहिलें असतां ग्यालिशियन मोहिमेच्या भानगडींत जर्मनी आपण होऊन पडेल असें वाटत नाहीं, फ्रान्सच्या बाजूचें व उत्तर रशियाच्या बाजूचें बरेंच सैन्य जर जर्मनीनें गॅलिशियांत आणलें तरच या मोहिमेला सुरुवात होईल. बल्गेरिया-प्रमाणें रुमानियाच्या म्हशीलाहि पान्हा फुटावा म्हणून सर्व्हियन मोहिमेप्रमाणें ग्यालिशियन मोहिमेचें आंबोण रुमानियापुढें ठेवण्यांत येण्याचा संभव आहे. ह्या प्रकरणाचा उलगडा डिसेंबरमध्ये आपोआप होईलच. फ्रान्सच्या बाजूलाहि हिवाळयांत मोठेसें युद्ध होईल असें वाटत नाहीं. त्या बाजूला हुकूम जर्मनीच्या हातांत नाहीं. जर्मन सैन्याहून फ्रेंचांचें व इंग्रजांचें सैन्य पांच दहा लाखांनीं अधिक असल्यामुळें फ्रान्समधील हुकूम गेल्या सप्टेंबरपासूनच सेनापति जॉफ्रे यांच्या हातीं गेला आहे. सप्टेंबर व आक्टोबर या दोन महिन्यांत फ्रेंच सैन्य अत्यंत निकरानें जर्मनांवर तुटून पडलें. नोव्हेंबर महिन्यांत बाल्कन प्रकरणास भलतेंच स्वरूप प्राप्त होऊन इंग्रज व फ्रेंच यांचें मन दुसरीकडे वेधल्यामुळें फ्रेंचांची चढाई ढिली झाली. बाल्कन प्रदेश व इजिप्त येथील रणभूमीकरितां हिंवाळ्यांत पांच सात लाख सैन्य फ्रान्समधून काढून घेण्यांत येईल; पण इतके सैन्य कमी झालें तरी फ्रान्सच्या बाजूला जर्मनीच्या हातांत हुकूम जाणें शक्य नाहीं. कारण, फ्रेंच सेना कांहीं झालें तरी तेथें संख्येनें अधिकबल, निदान समबल ठेवण्यांत येईलच येईल. अशा स्थितींत जर्मनी त्या बाजूला हिंवाळयांत भलतीच हाव धरील हें संभवत नाहीं. इतकेंच नव्हे, तर फ्रान्सच्या बाजूची रणभूमि हिंवाळयाच्या बर्फांत गारठलेली राहाणार अशी मनाशीं गांठ बांधून रुमानियाला पान्हा फुटावा म्हणून फ्रान्सकडील बरेंच सैन्य जर्मनी ग्यालिशियन रणभूमींत उतरविण्यास उद्युक्त होईल, असा अन्दाज आहे.

## इजिप्त व इराण

हिवाळ्यामध्यें दोस्त सरकारांच्या हातांत हुकूम जरी नसला तरी तुर्काशीं संलग्न झाल्यानें जर्मनीला जे फायदे मिळावयाचे ते फायदे त्यांच्या पदरांत न पडतील अशी खटपट करणें इंग्रजांना भाग आहे व तसें करण्यास लागणारें भरपूर सामर्थ्यहि दोस्त सरकारांच्या अंगीं पूर्णपणें आहे. तुर्कांशीं संलग्न झाल्यानें जर्मनीला कोणचे फायदे मिळणार ? पहिला फायदा म्हणजे तुर्की सैन्याला लागणारा दारूगोळा व तोफखाना पुरवून तुर्की सैन्य सजीव करणें होय. तुर्कांत जीव घालण्याची ही क्रिया हिंवाळ्यांत बंद पाडतां येईल काय ? नाहीं. हिंवाळा संपेपर्यंत, पुढील एप्रिल-मे महिन्यापर्यंत हें पुनरुज्जीवनाचें कार्य बंद पाडतां येणें शक्य नाहीं. आक्टोबर अखेरीपासूनच डान्यूब नदीच्यामार्फत तुर्कांना दारूगोळा पोचूं लागला आहे; आणि डिसेंबरांतच केव्हां तरी बेलग्रेड-नीश-सोफिया-कॉन्स्टांटिनोपल ही आगगाडी सुरू होऊन आस्ट्रियन सरहद्दीवरील सर्व सामानसुमान साडे सहाशें मैल दूरवर तुर्की राजधानींत ३०-४० तासांत पडूं लागण्यास प्रारंभ होईल. संलग्न स्थितीचा दुसरा फायदा म्हणजे बाल्कन प्रदेश व तुर्की साम्राज्य येथील फालतुक धान्य, तांबे व कापूस यांचा पुरवठा जर्मनीस होणें हा होय. आगगाडीचे जे डबे दारूगोळा वाहून नेतील तेच डबे धान्यांनीं, कच्च्या मालानें भरून परत येतील हे सांगणें नकोच. तेव्हां संलग्न स्थितीचा दुसरा फायदाहि हिंवाळ्यामध्यें जर्मनीपासून हिसकावून घेणें शक्य नाहीं. आतां राहिला तिसरा फायदा. लष्करी धोरणाच्या दृष्टीनें हा तिसरा फायदा फार महत्त्वाचा आहे आणि तो जर्मनीच्या घशांत उतरू न देण्याकरितां दोस्त सरकार आटोकाट प्रयत्न करतील यांत संशय नाहीं. हा तिसरा घास जर जर्मनीस हिंवाळ्यांत गिळतां आला नाहीं तर महायुद्धांत दोस्त सरकार अखेर मारतील ह्याविषयींच्या सर्व शंकांचें निरसन एकदम होईल. हा तिसरा घास कोणचा ? द्रव्यबल व मनुष्यबल ह्या दोन्ही दृष्टीनें जर्मनी खालावत चालला आहे. उगाळून उगाळून झिजवून झिजवून जर्मनीला आपोआप नष्ट करण्याची सांप्रतची क्रिया अशीच जर दोन वर्षे पुढें चालू राहिली तर कोणी मारल्याशिवाय जर्मनी आपोआप मरेल. रोजची झीज कशी भरून काढावयाची हें मोठें संकट जर्मनीपुढे दत्त म्हणून उभें राहिलें आहे. महायुद्धांत जर्मनीस क्षयरोग झाला आहे आणि ताजे मनुष्यबल सजीव केल्यानें जर्मनी ताजातवाना होईल काय ? आज वर्षभर तुर्की सेना लढत आहे आणि वर्षाच्या अखेरीस तुर्कांची कोणची स्थिति

आहे ? काकेशियस पर्वताच्या बाजूला रशियाचें रोज पाऊल पुढें पडत असून तुर्कांना माघार घ्यावी लागली आहे. इराणी आखाताच्या डोक्यावर युफ्रेटीस व तैग्रीस नदीच्या कांठीं खुद्द बगदाद शहराला हिंदी लष्करानें शह दिला. ७–८ महिन्या· पूर्वीच्या इजिप्तच्या मोहिमेंत तुर्कांचें हंसेंच झालें. गेल्या मार्च महिन्यापासून डार्डानेलिस सांभाळतां सांभाळतां तुर्कांची पुरेवाट झाली. डार्डानेलिसच्या मोहिमेंत इंग्रजांना अपयश आलें हें खरें; पण तुर्क इतके रगडले गेले कीं जर्मनांशीं संलग्न झाल्यानें तुर्कांचें घर सांवरलें एवढेंच काय तें ! तुर्क जिवंत होणें ही कांहीं लहान सहान गोष्ट नव्हे. पण तुर्क जिवंत होण्यानें जर्मनांचा क्षयरोग कसा हटणार ? नवें मनुष्यबल मिळाल्यासारखा फायदा जर्मनांना कसा मिळणार ? महायुद्धांत तुर्क ज्यावेळीं प्रथम पडले त्यावेळीं त्यांच्यापाशीं दारूगोळ्याचा सांठा होता, व डार्डानेलिसवरहि इंग्रजांची स्वारी झालेली नव्हती. त्यावेळीं त्यांच्या हातून इजिप्त घेववला काय ? त्यावेळीं बसऱ्याचा बचाव तुर्कांनीं केला काय ? त्यावेळीं काकेशियस प्रांतांत रूसला तुर्कांनीं मागें रेटलें काय ? ताजा दम, ताजें रक्त, ताजी उमेद अशा स्थितींत तुर्कांना जर मोठा विजय मिळवतां आला नाहीं, तर आतां मरतां मरतां वाचलेले तुर्क कोणचा नवा दिग्विजय करणार ? तुर्कांनीं स्वतःचेंच घर बचावून भागत नाहीं, तर नवा फायदा एवढा मिळविला पाहिजे कीं, त्या फायद्यांतून जर्मनीच्या झिजेची तूट भरून काढतां येईल. तुर्कांना एवढा मोठा विजय मिळाला पाहिजे की तो विजय जर्मनीच्या क्षयावर रामबाण औषध होईल; असा विजय जिवंत झालेले तुर्क मिळवितील अशी जर्मनीस आशा वाटत आहे, आणि या आशेच्या मागें लागून सर्व्हियाला जिंकून बल्गेरियाला खाकेत मारून जर्मनी तुर्कांशीं संलग्न झाला आहे. या आशेस आधार काय ? सात आठ महिन्यांपूर्वी जें साधलें नाहीं तें आतां साधेल असें जर्मनीस कां वाटतें ? त्यावेळीं तुर्कांच्यापाशीं जर्मन नव्या तोफा नव्हत्या, नवा दारूगोळाहि नव्हता, व नवी यंत्रसामग्रीहि नव्हती. ज्या नव्या तोफानीं बेल्जममध्ये, फ्रान्समध्यें, रशियामध्यें, व सर्व्हियामध्यें जय मिळविला त्याच नव्या तोफा सुवेज कॅनॉलवर अपयशी कशा ठरतील ? जर्मनांनीं स्वतःच्या नव्या तोफांवर, नव्या यंत्रसामग्रीवर व नव्या युद्धकलेवर विश्वास ठेवून इजिप्तच्या स्वारीसारख्या साहसास प्रवृत्त व्हावें ही गोष्ट युक्तिजुक्तीस सुटून नव्हे. यश येणार नाहीं असे तरी कां म्हणावें ?

जसें मागें झालें तसें पुढेंहि कशावरून होणार नाहीं ? मागच्या गोष्टींत आणि पुढच्या गोष्टींत असा कोणचा मोठा फरक आहे कीं अपयशाचें अनुमान खात्रीनें काढतां येईल ? सैन्याच्या संख्येवरून व तोफांच्या संख्येवरून काढलेलीं पूर्वीची अनुमानें महायुद्धांत खोटीं ठरलीं नाहींत काय ? आगगाडी जर्मनीची यत्रसामुग्रीहि वाहून नेईल. ह्या तोफा युरोपांत जशा उडत होत्या तशा सुवेज कॅनॉलवर उडतील. हे गोळे युरोपांत जसे फुटत होते तसेच आशिया युरोप व आफ्रिका यांच्या सांध्यावरहि फुटतील. मग तुर्कांना मोठा विजय कां मिळू नये ? युरोपांतील विजय नुसत्या तोफांचें किंवा नुसत्या यत्रसामग्रीचें फल नव्हे; जर्मन सैनिकांची व जर्मन सेनापतींची युद्धकला यांजकडे या यशाचा अर्धा वांटा दिला पाहिजे. सैन्यांची संख्या व तोफाची सख्या एवढ्यावरूनच कदाचित् यश मिळणार नाही व कदाचित् यश मिळेलहि. असलें दोहोंपक्षी जर समबल अनुमान निघालें तर ठाम निश्चय ठरविण्यास जर्मन सैनिक व जर्मन सेनापति इजिप्तच्या मोहिमेत किती आहेत यांच्या विचाराला एकदम प्राधान्य प्राप्त होतें. एका तुर्काच्या ऐवजीं दोन इंग्रज सुवेज कॅनॉलच्या सरक्षणासाठीं उभे करण्याची ताकद इंग्रजांच्या अंगीं आहे आणि समुद्रावरीलसत्तेमुळे तशा रीतीनें सैन्याच्या हालचाली करणें इंग्रजांना अत्यत सुलभ आहे. इंग्रजाचें हें वर्चस्व एका बाजूस ठेवून संख्येच्या मानानें दोन्ही पक्ष समबल आहेत असें मानलें तर महायुद्धाचा आतांपर्यंतचा इतिहास असें स्पष्ट सांगतो कीं, जर्मन सैनिक व जर्मन सेनापति स्वतः आल्याशिवाय तुर्कांच्या कपाळाचें अपयश टळणें शक्य नाही.. मग दोन तीन लाख जर्मन सेना सुवेजच्या बाजूला कां येत नाहीं ? जर्मन सैन्याचा एखादा लाख तुर्कांबरोबर इराणांत घुसण्यास कां पाठवीत नाहीत ? इराणच्या बाजूला एक लाख जर्मन जर आले तर युफ्रेटीस व तैग्रीस नद्याच्या पाण्याबरोबर हिंदी सैन्यास इराणी आखात पाहावें लागणार नाहीं काय ? ह्या हिवाळ्यापुरता कां होईना, पण सांप्रत जर्मनांच्या हातांत हुकूम आहे. अशा चलतीच्या वेळीं तीन लाख सुवेजला, एक लाख बगदादला व एक लाख इराणाला असें पांच लाख ऑस्ट्रो–जर्मन सैन्य तुर्कांच्या मदतीला पाठवून इजिप्तमध्यें तुर्कांना मोठेमोठे जय सपादन करून देऊन ह्या फाजील विजयाच्या फायद्यांतून स्वतःची झीज भरून काढून क्षयरोगाचें बिऱ्हाड स्वतःच्या शरिराबाहेर फेकून देण्यास जर्मन कां प्रवृत्त होत नाहींत ? प्रवृत्त होतील, नाहीं असें नाहीं; त्यांची इच्छाहि आहे. पण नुसती

इच्छा असून काय करावयाची ? पांच लाख लोक कोठून आणावयाचे ? सर्व्हियावरील स्वारीकरितां पांच लाख आस्ट्रो–जर्मन सैन्य मोठ्या मिनतवारीनें आणतां आलें. या पांच लाखांपैकीं दोन तीन लाख आतां शिल्लक राहिले असतील; हे दोन तीन लाखच काय ती जर्मनीची सांप्रतची शिल्लक. फ्रान्स सॅलोनिकेच्या बाजूला गुंतला आहे असें पाहून जर्मनी आणखी एक दोन लाख सैन्य बाल्कन प्रदेशांत आणूं शकेल. युरोपांतील इतर ठिकाणचा सर्व कारभार जशाचा तसा चालवून बाल्कन प्रदेशांत चार पांच लाख सैन्य जर्मनीस गोळा करतां आलें म्हणजे जर्मनीच्या डोक्यावरून पाणी गेलें. हे चार पांच लाख तुर्कांच्या मदतीस पाठवितांच येऊं नये म्हणून इटली मॉंटिनिग्रोमध्ये सर्व्हियन लष्कराच्या मदतीस जात आहे. ग्यालिशियामध्यें जर्मनांनी आपण होऊन चढाई न केली तर ब्युकोव्हिनावर चाल करून जाण्यास व प्रसंग विशेषीं रुमानियांतील डान्यूबचें तोंड ओलांडून बल्गेरियांत उतरण्यास तीन लाख नवें रशियन सैन्य तयार झालें आहे; आणि सॅलोनिका बंदरांत उतरून मॅसिडोनियांत घुसलेल्या फ्रेंच सैन्यास रोज नवी कुमक पोचत असून कॉन्स्टांटिनोपलकडे पळणाऱ्या जर्मनांना पायबंद देण्याचा फ्रेंचांचा हेतु आहे. एवच, सर्व्हिया स्थानभ्रष्ट झाला तरी जर्मनीला बरेंच मोठें सैन्य तुर्कांच्या मदतीला पाठवितां येऊं नये म्हणून बाल्कन प्रदेशाच्या कांठाकांठावर दोस्त सरकार जोरजोरानें लढत राहाणार यांत संदेह नाहीं. तेव्हां डिसेंबर–जानेवारीमध्यें युद्धाच्या वार्ता वाचतांना इजिप्त, बगदाद व इराण यांच्याप्रमाणें बाल्कन प्रदेशाच्या कांठाकडेहि वाचकांनीं लक्ष पोचविणें जरूर आहे.

# दुसऱ्या वर्षाचा डिसेंबर–जानेवारी महिना

## महायुद्धाच्या दुसऱ्या वर्षाचा डिसेंबर महिना

डिसेंबर महिन्यांत महत्त्वाची लढाई कोठेंच झाली नाहीं. सैन्याच्या हालचाली करण्यांत हा महिना गेला; आणि पुढील महिनाहि बऱ्याच अंशीं तशाच स्वरूपाचा जाईल असा अंदाज आहे. युद्धाच्या गंजिफाच्या डावांची गलत चालली आहे, आणि पानांची वांटणी होऊन घेण्यादेण्याचा हिशोब होऊन पुढील डाव सुरू होण्यास थोडा अवकाश आहे. पुढील डावांत रंग कोणाचा भरेल याचें दिग्दर्शन करणाऱ्या कांहीं महत्त्वाच्या गोष्टी डिसेंबर महिन्यांत घडल्या आहेत, आणि तेवढ्या नमूद करण्याचें या लेखांत योजिलें आहे.

## इटलीचें धोरण

डिसेंबर महिन्यांत सर्व्हियांतून माऊंटनिग्रोमध्यें गेलेल्या सर्व्हियन सैन्याचा पाठलाग ऑस्ट्रियन सैन्यानें बऱ्याच नेटानें केला, पण माऊटनिग्रोमधील उच पर्वत आणि डोंगराच्या आश्रयानें गनिमी काव्यानें लढण्याची माऊटनिग्रोची शिताफी यामुळे ऑस्ट्रियास यावें तेवढें यश आलें नाहीं. जानेवारी महिन्यात ऑस्ट्रियन सैन्याचें पाऊल पुढें पडलें हें खरें, पण इटलीची मदत माऊटनिग्रोस व सर्व्हियन सैन्यास पोचूं लागली असल्यामुळे सर्व्हियाप्रमाणें माऊटनिग्रोचा लहानसा टापू पादाक्रांत होईल किंवा कसें याविषयीं ऑस्ट्रो–जर्मनास शका येऊ लागली आहे. स्थानभ्रष्ट झालेल्या सर्व्हियन सैन्यापैकीं काहीं भाग माऊटनिग्रोमध्ये घुसला व काहीं भाग आल्बेनियामध्ये घुसला. आल्बेनियामध्ये गेलेल्या सर्व्हियन सैन्याचा पाठलाग बल्गेरियन सैन्यानें चालविला असून उत्तर आल्बेनियाचा बराच भाग डिसेंबरअखेर बल्गेरियानें व्यापला आहे. आल्बेनियाचें मुख्य बदर जे ड्युराजो शहर तेथें इटलियन सैन्य उतरलें असून ड्युराजोपासून पंचवीस तीस मैलांवर बल्गेरियन सैन्य ठाणें देऊन बसलें आहे. इटाली व ऑस्ट्रिया यामधील युद्ध डिसेंबर महिन्यात थडावलें असून ऑस्ट्रियावर हल्ला करण्याचें इटालियन सैन्यानें सांप्रत तहकूब केल्यासारखे दिसत आहे. महायुद्धात सामील झाल्यापासून इटली ऑस्ट्रियावर एकसारखे हल्ले चढवीत होता; सर्व्हियास पर्यायानें मदत पोचावी म्हणून आक्टोबर

व नोव्हेंबर या दोन महिन्यांत इटलीनें आपल्याकडून ऑस्ट्रियावर तुटून पडण्याची पराकाष्ठा केली; पण १९१४ सालच्या आक्टोबर–नोव्हेंबर महिन्यांत बेल्जममध्यें यिप्रेस गांवच्या आसपास इंग्रजी सेनेपुढें जर्मनांची जी स्थिति झाली तीच स्थिति गार्जिया गांवासभोंवती ऑस्ट्रियन सैन्यापुढें इटलीची झाली. यिप्रेस गांवाप्रमाणें गार्जिया गांवहि इटलियन तोफखान्यांनीं जमीनदोस्त केला, पण महिना दोन महिने निकरानें लढून अखेरीस डिसेंबर महिन्यांत गार्जिया गांव घेण्याचा नाद इटलीला सोडून द्यावा लागला. आस्ट्रियन खंदकांवर रोज हल्ले करून आपल्या सैन्याची वाजवीहून फाजील खराबी करून घेण्यापेक्षां माऊंटनिग्रोस व उत्तर आल्बेनियास मदत करून तेथील अवशिष्ट सर्व्हियन सैन्य जिवंत राखणें व कार्यक्षम करणें लष्करी धोरणाच्या दृष्टीनें अधिक श्रेयस्कर होय. इटली इतक्या दिवस स्वतःच्या एकट्याच्या हिंमतीनें लढत होता, आणि आपण एकटे आस्ट्रियास पुरून उरूं अशी धमक इटलीस वाटत होती; पण नोव्हेंबर अखेरच्या अनुभवानें इटली अधिक शहाणा झाला व स्वतःच्या मनगटावर विसंबून न रहातां सर्व सयुक्त राष्ट्राच्या धोरणानें चालण्याचा त्यानें निश्चय केला. सर्व्हियन युद्धाच्या प्रारंभीं बाल्कन प्रदेशांत स्वतःचें सैन्य पाठविण्याचें इटलीनें नाकारलें; पण सर्व्हिया स्थानभ्रष्ट झाल्यामुळें इटलीची चूक इटलीच्या तेव्हांच ध्यानात आली. माऊंटनिग्रो व आल्बेनिया या दोन्ही देशांचे किनारे आस्ट्रियाच्या ताब्यांत जाण्याची वेळ जवळ येण्याबरोबर इटली जागा झाला; आणि सर्व्हियास मदत पोंचविण्याकरितां जरी नव्हे तरी स्वतःच्या आड्रियाटिक समुद्रावर आस्ट्रियाचें फाजील प्रस्थ माजू नये म्हणून बाल्कन प्रदेशांतील संयुक्तांच्या सुरांत आपलाहि सूर मिळविण्याचें डिसेंबर प्रारंभापासून इटालीनें कबूल केलें. बाल्कन प्रदेशात संयुक्त राष्ट्रांना सांप्रत जरी अपयश आलें असलें तरी तेथील त्यांचें पुढील धोरण डिसेंबरनंतर बेसूर रहाणार नाही ही त्यांतल्या त्यांत संतोषाची गोष्ट होय. येत्या वसत काळांत संयुक्त राष्ट्रांचें सैन्य जोरानें उठेपर्यंत स्वतःच्या सैन्याची दुसरी तयारी इटली करीत राहाणार आणि त्याबरोबरच स्वतःच्या सरहद्दीवर आणि माऊंटनिग्रो व आल्बेनिया येथें आस्ट्रियास व बल्गेरियास अडवून धरून इटली त्रास देणार असा रंग दिसत आहे. इटलीनें बेसूर ओरडण्याचें सोडून दिल्यानें त्याच्या स्वतःच्या शक्तीची योग्य जोपासना वसंत काळपर्यंत आपोआप होऊन माऊंटनिग्रोचें व आल्बेनियाचें संरक्षण करण्याचें

पुण्य इटलीस मिळेल आणि यशस्वी व ताजातवाना झालेला इटली वसंतकाळीं इंग्लंड, फ्रान्स व रशिया यांच्या सेना जर्मनीची ओढाताण करीत असतां आस्ट्रियावर पुन्हां जोरानें तुटून पडेल.

## सॅलोनिका व डार्डानेलिस

डिसेंबर प्रारंभाला बल्गेरियन सैन्यानें सर्व्हियाचा मॅसिडोनिया प्रांत व्यापून मोनॅस्टिर शहर ताब्यांत घेतलें, त्यावेळीं मोनॅस्टिर शहराच्या पूर्वेस वर्दा नदीच्या कांठीं फ्रेंच सैन्याचा तळ होता. आपल्या पश्चिमेच्या बगलेवरहि बल्गेरियन सैन्य आलेलें पाहून उत्तरेकडील आपला पसारा फ्रेंचांनीं आवरून धरला. गिव्गेली येथें ग्रीसची सरहद्द सोडून वर्दा नदीच्या कांठानें पन्नास पाऊणशें मैल फ्रेंच सैन्य उत्तरेस घुसलें होतें. बल्गेरियन सैन्याशीं दोन हात करून सर्व्हियाच्या मदतीला जाण्याच्या फ्रेंचांचा इरादा होता; पण सर्व्हियाप्रमाणें मॅसिडोनिया प्रांतहि डोंगराळ असल्यामुळें आणि बल्गेरियन सैन्याची तयारी अंदाजाहून अधिक असल्यामुळे फ्रेंचांचें पाऊल पडावें तितके जलद पडलें नाहीं. यावेळीं इंग्रजहि फ्रेंचांच्या मदतीला धावून गेले, पण नोव्हेंबर अखेरीसच सर्व्हियन सैन्यास स्वदेशास मुकावें लागल्यामुळे फ्रेंचांचा व इंग्रजांचा खटाटोप वायां गेला. सर्व्हियन युद्धांत नीशवर जोराचा हल्ला चढवून आणि मॅसिडोनियामध्यें घुसून फ्रेंच सैन्य व सर्व्हियन सैन्य यांच्यामध्यें स्वतःच्या सैन्याचा बांध घालण्यांत बल्गेरियन सैन्यानें धाडशी चलाखी दाखविली; व त्यामुळे फ्रेंचांचें कांहीं चाललें नाहीं. फ्रेंच व इंग्रज सैन्य आस्ते आस्ते वर सरकूं लागलें तों वरातीमागून घोडें अशी त्यांची स्थिति झाली. फ्रेंच सैन्य सॅलोनिकांत उतरलें त्याचवेळीं कांहीं लष्करी तज्ज्ञाचें मत असें पडलें कीं, हा सर्व उद्योग वृथा होणार तेव्हां सरकारनें सॅलोनिकांत सैन्य पाठविण्याच्या भानगडींत पडूं नये. डार्डानेलिसचा जसा उद्योग वृथा गेला, तसा सॅलोनिकाचाहि झाल्यावांचून राहणार नाहीं; इतकेंच नव्हे, तर 'कीलोत्पाटीव वानरः' अशी फजिती होईल. अशा प्रकारची टीका होत असतांहि सॅलोनिकाची स्वारी उभारण्यांत आली. ग्रीसची मदत मिळेल या आशेवर ही उभारणी झाली, पण ग्रीसची मदत मिळत नाहीं असें ठरल्यानंतरहि सॅलोनिकाच्या स्वारींत नेट कां दाखविण्यांत आला? या स्वारीच्या उभारणीबरोबरच तिच्या संहारणीचा हुकूम कां सोडण्यांत आला नाहीं ? अंदाज चुकल्याबरोर धोरणहि बदलणें अधिक शहाणपणाचें नाहीं काय ? ग्रीस मिळत नाहीं असें समजण्याबरोबर

फ्रेंच सैन्यानें सॅलोनिका बंदर कां सोडलें नाहीं ? ग्रीस जरी मिळाला नाहीं तरी पुढें चाल करून जाण्यांत अधिक फायदा संयुक्त राष्ट्रांना दिसत होता. तो फायदा कोणचा ? ग्रीस ज्या दिवशीं मिळाला नाहीं त्या दिवशीं सर्व्हिया बुडाला असें निश्चित ठरल्यावर मग फ्रेंच सैन्याला लोभ कोणचा शिल्लक राहिला ? ग्रीस जरी इंग्रजांना मिळाला नाहीं तरी निदान जर्मनीला तरी ग्रीसनें मिळूं नये येवढया-करितां मॅसिडोनियांतील कांहीं भाग व्यापून बसणें जरूर होतें; शिवाय दुसरें असें कीं, हा मॅसिडोनियाचा भाग व्यापतांना जर एखाद्या लढाईंत बल्गेरियाचा खरपूस पराभव करतां आला असता तर कदाचित् सर्व्हियन युद्धाचें पारडे फिरलें असतें. प्रत्यक्ष लढाईंत जय मिळाल्यानंतर लष्करी धोरणाच्या व डावपेचांच्या गोष्टी आपोआप मागें पडतात. पहिलवानाला पाडलें म्हणजे झालें; मग पेंच सशास्त्र नसला तरी चालेल. फ्रेंच सैनिकांचें मत असें पडलें कीं, बल्गेरियन लोकांची व आमची गांठ पडली म्हणजे आह्मी बल्गेरियाला खात्रीनें लोळवूं. बल्गेरिया म्हणजे मागासलेल्या शेतकऱ्यांचा कालचा देश ! तेथें लढवय्ये ते कितीसे असणार व शस्त्रास्त्रे तरी त्यांच्यापाशीं कितीशी असणार ? अशा प्रकारच्या आत्मनिष्ठेनें प्रेरित होऊन फ्रेंच सेना बल्गेरियावर चाल करून गेली; पण बल्गेरिया जितका मऊ सापडेलसें वाटलें होतें तितका मऊ सांपडला नाहीं आणि अखेरीस बल्गेरियामध्ये न घुसता मॅसिडोनियामध्येच राहून सर्व्हिया स्थानभ्रष्ट झाल्याची दुःखकारक बातमी फ्रेंचाना ऐकावी लागली. यावेळींहि इंग्रजांची बरीच कुमक फ्रेंचांना जाऊन पोचली, तेव्हां वर्दा नदीकांठचा मॅसिडोनियाचा बराच भाग व्यापून हिंवाळ्यांत मॅसिडो-नियात लक्ष देऊन बसण्याचा फ्रेंचानीं घाट घातला. उत्तरेस बरेंच वर गेलेलें सैन्य थोडे मागें घेतले आणि योग्य डोंगर पाहून त्याची मजबुती आरंभिली. ग्रीसची सरहद्द सोडून मॅसिडोनियांत ज्या गिव्गेली गांवावरून शिरावें लागतें त्या गिव्गेलीच्या पूर्वेस पधरावेंस मैलावर डोरेन नांवाचें सरोवर आहे. तें सरोवर आपल्या उजव्या बगलेस ठेवून इंग्रज सेना बल्गेरियाकडे तोंड करून तळ देऊन बसली होती. मॅसिडोनियाच्या या भागातच आपणांस सर्व हिंवाळा कंठावा लागेल अशा विवचनेंत हिंवाळ्याच्या तळाचा बंदोबस्त सुरू करण्यांत आला होता. इत-क्यांत डिसेंबरच्या पहिल्या आठवडयांत इंग्रजी तळावर बल्गेरियन सैन्यानें डोरेन सरोवराच्या उत्तरेकडून जोराचा हल्ला करण्यास सुरवात केली. इंग्रजानीं बल्गेरियाला

चांगला हात दाखविला, पण अधिक मजबुतीची जागा पकडणें इष्ट वाटल्यावरून इंग्रज ७–८ मैल मागें हटले. वर्दा नदीकांठचा मॅसिडोनियांत जाणारा हमरस्ता सोडून पूर्वेस ७–८ मैलांवर तळ देण्याचा विचार इंग्रज करतात तों त्यांच्या असें दृष्टीस पडलें कीं, आपला पाठलाग करून येणारें बल्गेरियन सैन्य आपल्यापेक्षा ५–७ पटीनें अधिक आहे ! जागा धरून बसावें, तर तग लागण्याचा बिलकूल संभव नाहीं; इतकेंच नव्हे, तर स्वतः वेढलें जाऊन फ्रेंचांच्या पिछाडीचा मार्गहि बल्गेरियाच्या हातीं जाणार. इंग्रज स्वतः वेढले गेलेले आणि मॅसिडोनियांतून ग्रीसमध्यें परत येण्यालाहि फ्रेंचांना मार्ग नाहीं अशी फटफजिती होणार, हें इंग्रजांना तेव्हांच दिसून आलें. इंग्रजी स्वभागांतील धिम्मेपणा आणि इंग्रजी सैनिकांचें शौर्य यांच्या परीक्षेची ती वेळ होती. इंग्रजी सेनापतींनीं शांतपणें विचार करून असे ठरविलें कीं, फ्रेंच सैन्य उत्तरेहून ग्रीसमध्यें परत जाईपर्यंत त्यांच्या पिछाडीच्या मार्गाचें आपण रक्षण करावयाचें. फ्रेंचांना तसें कळविण्यांत आलें. फ्रेंच सैन्य व्यवस्थेनें मागें परतूं लागलें. इंग्रजांनीं ७–८ तोफा व इतर अवजड सामान यांचा नाश जागच्या जागीं करून फ्रेंचांच्या पिछाडीकडे जाणारे रस्ते आडवून धरले. दोन तीन कंपूंनीं तर एक पूल एकदोन दिवस इतक्या निकरानें पकडून ठेवला कीं त्या कंपूपैकीं शेवटचा पुरुष त्या पुलावर पडला, पण बल्गेरियाला दोन दिवस त्या कंपूने वाट दिली नाहीं. इंग्रजी सेनेपैकीं कांहीं कंपूनीं असें विलक्षण शौर्य गाजविल्यामुळें इंग्रजी सेनेस व फ्रेंच सेनेस सर्व सामानसुमान, अन्नसामग्री, गुरेंढोरें, मेंढयाबकरीं बरोबर घेऊन मॅसिडोनियांतून व्यवस्थितपणें ग्रीसमध्ये परत येणें सुलभ झालें. डिसेंबरच्या तिसऱ्या आठवड्यांत सर्व सेना सॅलोनिका बंदरांत सुरक्षितपणें येऊन पोंचली. याच सुमारास डार्डानेलिस व सुलवाबे येथील आपली सेनाहि इंग्रजांनीं काढून घेतली. डार्डानेलिसचें तोंड तेवढें जिब्राल्टरप्रमाणें इंग्रजांनीं आपल्या ताब्यांत ठेविलें असून बाकी जवळ जवळ एक लाख सैन्य सर्व सामानसुमानासह मोठ्या शिताफीनें इंग्रजांनीं काढून घेतलें ! तुर्कांना नव्या तोफा व नवा दारूगोळा पोंचला होता, आणि इंग्रजी सेनेचा पक्का चकाचूर करूं अशा घमेंडीनें त्यांनीं इंग्रजी सेनेवर तोफांचा भडिमार सुरू केला होता. बर्लिन ते कॉन्स्टांटिनोपल आगगाडी सुरू झाल्यानंतर डार्डानेलिसच्या टापूंत येवढी मोठी सेना गुंतवून ठेविणें इष्ट नाहीं असें इंग्रजांनीं पूर्वीच ठरविलें होतें. त्या ठरावास

अनुसरून हें सैन्य डार्डानेलिसमधून काढून घेण्यांत आलें. इंग्रज आपली भूमि सोडून निघून जात आहेत हें तुर्कांना समजलें देखील नाहीं ! आदल्यादिवशी तुर्कांशीं नेहमींप्रमाणें लढून एका रात्रींत इतक्या गुपचुपपणें तळ रिकामा करण्यांत आला कीं, वेडेपीर तुर्क दुसऱ्या दिवशीं स्वतःच्या ओसाड जमिनीवर कांहीं काळ तोफांचा भडिमार करीत होते. डार्डानेलिसच्या मोहिमेंत इंग्रजांना जरी अपयश आलें तरी सैन्य किनाऱ्यावर उतरतांना व काढून घेतांना जी विलक्षण टापटीप इंग्रजांनीं दाखविली त्यामुळें इंग्रजी लष्कराच्या व्यवस्थितपणाच्या नांवलौकिकांत भर पडल्यावांचून राहणार नाहीं.

## ग्रीस व रोमानिया

डार्डानेलिसमधून काढलेल्या सैन्याचा बराच भाग सॅलोनिका येथें आला असावा व बाकी सैन्य इजिप्तकडे गेलें असावें. तेव्हां जानेवारी प्रारंभाला दीड लाख इंग्रज व फ्रेंच सैन्य सॅलोनिका पकडून बसलें असलें पाहिजे यांत संशय नाहीं. या सैन्यास रोज नवी कुमक पोंचत असून सर्व्हियाचेहि पांच दहा हजार जवान या सैन्यास मिळाले आहेत. सर्व्हियाचा वृद्ध राजा पिटर माऊंटनिग्रोमधून इटलींत जाऊन तेथून सॅलोनिका येथें आला असून या ग्रीशन बंदरांत सर्व्हियाच्या सरकारची पुन्हां प्राणप्रतिष्ठा करण्यांत आली आहे. ऑस्ट्रो-जर्मन वकिलातींना व इतर लोकांना सॅलोनिकाच्या टापूंतून हांकून दिलें असून सॅलोनिकाच्या टापू सभोंवर्ती चर खणून तेथील सैन्याच्या तळाचा किल्ल्याप्रमाणें बदोबस्त करण्यांत आला आहे. थोडक्यांत बोलावयाचें म्हणजे सॅलोनिकाच्या टापूंत फ्रेंच सत्ता प्रस्थापित झाली असून ग्रीशन सत्ता नष्ट झाली आहे. फ्रेंचांच्या या कृत्याबद्दल ग्रीशन सरकारनें तक्रार केली असून, जर्मनीहि उत्तरेकडून आम्ही सॅलोनिकावर चाल करून येऊं तेव्हां तुमच्या प्रदेशांतून जाण्यास आमचें सैन्य कमी करणार नाहीं असें म्हणू लागला आहे. ग्रीसच्या सरहद्दीवर गिव्गेली येथें ऑस्ट्रो-जर्मन व बल्गेरियन सैन्याचा मोठा तळ पडला असून तो टापू चर वगैरे खणून जर्मनीनेंहि बदोबस्ताचा बनविला आहे. दक्षिणेस सॅलोनिकाच्या टापूंत फ्रेंचांचा तळ व उत्तरेस गिव्गेली-डोरन टापूंत जर्मनीचा तळ, आणि या दोन तळांत तीस चाळीस मैलांचेंच काय तें अंतर. या दोन जबरदस्तांच्या टक्करींत ग्रीस पडूं इच्छित नाहीं. बल्गेरिया ऑस्ट्रिया किंवा जर्मनी यांनीं पाहिजे तर आपल्या तळांतून उठून सॅलोनिकावर

हल्ला करावा, किंवा सॅलोनिकांतून उठून पाहिजे तर फ्रेंचांनीं जर्मनांवर चाल करून जावें, ग्रीस कांहीं कोणाच्याच वतीनें हातांत शस्त्र धरणार नाहीं, असें जाहीर करण्यांत आलें आहे. ग्रीसचें येवढेच म्हणणें आहे कीं, टक्कर होऊन लढाईचा निकाल लागल्यानंतर ग्रीशन सरकारच्या किंवा ग्रीशन प्रजाजनांच्या मालमत्तेचें किंवा उद्योगधंद्याचे जें नुकसान झालें असेल तें भरपूर द्रव्यद्वारा मिळेल येवढीच काय ती खबरदारी ग्रीसचें सैन्य घेईल; आणि ती खबरदारी बिनचूकपणें घेतां यावी म्हणून ग्रीसनें आपलें सैन्य सज्ज करून ठेविलें आहे. ग्रीसनें दुसरी एक अशी अट घातली आहे कीं, सॅलोनिका व गिव्गेली या दोन तळामधील टापूबाहेर टक्करीकरतां आलेल्या हल्ल्यानीं जातां कामा नये. म्हणजे चाळीस पन्नास मैल रुंद व पन्नास-साठ मैल लांब असा आखाडा ग्रीसनें आंखून दिला आहे; या रिंगणा-सभोंवतीं स्वतःचें सैन्य ठेवून टक्करीचा तमाशा पहात ग्रीशन सेना बसणार आहे व खेळ संपण्याबरोबर उत्पन्नाची पेटी तेवढी खर्चवेचांकरितां स्वतःच्या ताब्यांत ठेवण्याचा ग्रीसचा हेतु आहे. दोन्ही जबरदस्तांना दुरून वंदन करून द्रव्यदृष्ट्या स्वतःचा फायदा करून घेण्याचें ग्रीसच्या राजाचें हे धोरण यापुढें बदलेल असा रंग दिसत नाहीं. ग्रीसच्या तक्रारीची यादी लांबेल पण दोघानाहि सलाम करून शेजाऱ्याच्या भांडणात स्वतः गबर होण्याचा ग्रीसचा लोभ सुटणार नाहीं. ग्रीस इज्जत गमावणार पण पैसा कमावणार! ग्रीसच्या मतलबाच्या दृष्टीनें हे ठीक झाले खरें, पण सॅलोनिका येथे तळ देऊन बसून फ्रेंच तरी काय करणार? फ्रेंचाचा व इंग्रजांचा सॅलोनिका येथें दोन लाखांहून अधिक मोठा जमाव झाला,-समजा--तीन लाख इंग्रज व फ्रेंच जुळले, तरी त्यात जर्मनीचें काय नुकसान झालें? आयते तीन लाख जवान सॅलोनिकामध्यें अडकून पडले, जर्मनीचें गोमटेच झालें. त्याच्या वर हल्ला करून जर्मनीचा कोणचा फायदा? आपण अशी कल्पना करू कीं, जर्मनीनें मोठें सैन्य आणून सॅलोनिकांतून इंग्रजांना व फ्रेंचांना हांकून दिलें; जर्मनीनें जर तशीच मोठी तयारी केली तर जर्मनीशीं निकरानें लढत लढत डार्डा-नेलिसप्रमाणें जहाजांत बसून सॅलोनिकांतून इंग्रज व फ्रेंच निघून जातील! जर्मनीला काय मिळालें? सॅलोनिका बंदर घेऊन का थोडेंच चाटावयाचें आहे? भूमध्य समुद्रांत जर जर्मनांचें मोठें आरमार असतें तर गोष्ट निराळी होती. सॅलोनिका उत्तमांतलें बंदर, आरमाराला विश्रांतिस्थान म्हणून त्या बंदराचा चांगला उपयोग.

पण ज्यांच्यापाशीं आरमार नाहीं त्याला त्याचें काय ? आरमारी चण्याशिवाय सॅलोनिकाचे दांत बांधून घेण्यास कोणचा जर्मन राजी होणार ? पूर्व–भूमध्य समुद्रांत जर्मनीच्या व ऑस्ट्रियाच्या पाणबुड्या बोटी मात्र सांप्रत रानटीपणानें व निर्दयपणानें चांचेगिरी करीत आहेत. दुसऱ्याचें दूध चोरून पिण्याच्या किंवा नीच-पणानें गखेंत लवंडण्याच्या दुष्ट कृत्याला बळकट दातांची बिलकूल जरुरी नाहीं. पाणबुड्या बोटींना विश्रांति व कुमक मिळण्यास शेंकडो मैल लांबीचा तुर्कस्तानाचा व बल्गेरियाचा किनारा पूर्व–भूमध्य समुद्रांत आहे. अर्थात् आरमारी दृष्टीनें किंवा पाणबुड्याच्या चांचेगिरीच्या दृष्टीनें सॅलोनिकाची अपेक्षा ऑस्ट्रो–जर्मनांना नाहीं. तसली इच्छा नसली तरी दोन तीन लाख शत्रूचें लष्कर बल्गेरियाच्या सरहद्दीपासून तीसचाळीस मलांवर राहूं देणें इष्ट होईल काय ? या लष्कराचा नायनाट करतां आला तर जर्मनीनें कां करू नये ? सॅलोनिका बंदर घेण्याकरितां जरी नाहीं तरी फ्रेंच लष्करचा नायनाट करण्याकरितां जर्मनीनें सॅलोनिकावर चाल नको का करावयाला ? या दृष्टीनीं जरी विचार केला तरी सॅलोनिकावर जर्मनी चाल करून येईल असा तर्क निघत नाहीं. पहिलें कारण असें, अँग्लो–फ्रेंच सैन्याचा नायनाट सॅलोनिकात होणें शक्य नाहीं. बाजू तशीच आंगलट येत चालली आहे, असें पाहा-तांच समुद्रांत ते निघून जाईल. बरें, गेलें तर गेलें निघून, पण त्याना सॅलोनिकांतून हांकून लावले येवढ्या विजयाकरितां तरी जर्मन सैन्यानें सॅलोनिकावर हल्ला कां करू नये ? आज दीड दोन लाख इंग्रज व फ्रेंच सॅलोनिका येथे आहेत; उद्यां दोन लाखाचे तीन लाख होतील; शिवाय भूमध्य समुद्र म्हणजे इग्रजाच्या व फ्रेंचांच्या घरचें परसूं, तेव्हां सॅलोनिकांतून फ्रेंचांना हाकून देण्यास कमीत कमी पांच सहा लाख सैन्य तरी जर्मनी, ऑस्ट्रिया व बल्गेरिया यानीं आणलें पाहिजे. शिवाय हजारों तोफा आणल्या पाहिजेत. एवढी मोठी तयारी सॅलोनिकाच्या बाजूला करणें आणि ती केवळ सॅलोनिकांतून फ्रेंचांना पिटाळून लावण्याची बढाई मारतां यावी म्हणून, ही गोष्ट लष्करी धोरणाच्या दृष्टीनें कोणताहि चांगला जर्मन सेनापति कबूल करणार नाहीं. बरें, फ्रेंचांना पिटाळून द्यावयाचा उद्योग आरंभिलाच तर नुसत्या खटाटोपाला भिऊन फ्रेंच थोडेच सॅलोनिकांतून निघून जाणार आहेत ! फ्रेंच निकरानें लढतील; आणि बाजू तशीच आंगलट आल्यानतर नाइलाज म्हणून फ्रेंच सॅलोनिकातून पाय बाहेर काढतील; म्हणजे सॅलोनिका सभोवारच्या फ्रेंचांच्या चरांना

पांच सात लाख सैन्यानें वेढून दीड दोन लाख जवान जेव्हां बळी पडतील तेव्हां जर्मनी सॅलोनिकांत शिरूं शकेल. पांच सात लाख सैन्य सॅलोनिकाच्या जवळ आणावयाचें; लाख दोन लाख त्यापैकीं मरावयाला द्यावयाचें आणि फायदा काय, तर पांच पंचवीस हजार इंग्रज व फ्रेंच सैन्य मारून बाकीच्या दोन लाख फ्रेंचांना जहाजांत बसून जाऊं द्यावयाचें ! हा हिशेब आंतबट्टयाचा आहे हें कोणीहि सांगेल. तोटा तर खराच पण नुकसानी सोसूनहि काळजी दूर करणें जरूर नाहीं काय ? फ्रेंच केव्हां स्वारी करतील याचा नियम नाहीं. अशा धाकधुगींत रहाण्यापेक्षां पांच सात लाखांच्या जमवाजमवीची व लाख दीड लाखांच्या प्राणहानीची नुकसानी सोसून सॅलोनिकाचे संबंधानें एकदांचें निष्काळजी होणें उष्ट नाहीं काय ? अशा रीतीने संकटाचें निवारण करणें म्हणजे मूर्खपणाचा मार्ग होय. मोठी यातायात करून दीड लाख जवान मरायला देऊन ज्या संकटाचें निवारण व्हावयाचें तें संकट तरी कोणच्या स्वरूपाचें ? आज दीड लाख, तर उद्यां दोन लाख इंग्रज व फ्रेंच गिव्‌गेली येथील बल्गेरियन तळावर स्वारी करतील हेच कायतें. गिव्‌गेलीचा तळ डोंगराळ मुलुखाचा आहे व त्याच्या पिछाडीचा शेकडों मैलांचा प्रदेश डोंगराळ आहे. असल्या तळाचे संरक्षण चाळीस पन्नास हजार सैन्यानें सहज होणारें आहे. मशिनगन्स, तोफा, ह्यांची सरळ हातानें पेरणी जर या मुलुखात केली आणि चरांच्या चक्रव्यूहाच्या जाळ्यानें हा मुलुख जर व्यापून टाकिला, तर तीन लाख फ्रेंच सैन्यास अडकवून धरण्यास एक लाख आस्ट्रो–जर्मन व बल्गेरियन सैन्य निःसंशय पुरेसें आहे. म्हणजे जें संकट पन्नास हजारापासून एक लाखापर्यंत सैन्य स्वतःच्या सरहद्दींत उभे केल्यानें सहज टळणारें आहे तें संकट टाळण्याकरितां पांच सात लाख सैन्य सॅलोनिजवळ नेऊन दीड दोन लाखांची आहुति देण्याचा मूर्खपणा जर्मन सेनानायक कसे करतील ? एवंच, कोणच्याहि दृष्टीनें विचार केला तरी आस्ट्रो–जर्मनांची व बगेरियाची सॅलोनिकावर स्वारी होईल असा तर्क निघत नाहीं, मग हे दीड दोन लाख फ्रेंच जरी सॅलोनिका येथे माशा मारीत बसणार कीं काय ? सर्व मॅसिडोनिया, बल्गेरियाच्या ताब्यांत गेल्यानंतर सॅलोनिका पकडून बसण्यांत कोणचा पुरुषार्थ ? पोकळ इज्जतीच्या नादीं लागून सॅलोनिकांत दीड दोन लाख सैन्य अडकवून ठेविल्यानें फ्रान्समधील व इजिप्तमधील रणभूमीचें नुकसान होत नाहीं काय ? सॅलोनिकांत स्वस्थ बसणें म्हणजे जर्मनांना आयतें

पीठ दळून देण्यासारखें आहे. जर्मनांनीं सॅलोनिकावर हल्ला केला तर फ्रेंचांच्या भाकरी त्यांना आयत्या भाजून दिल्यासारखें होईल, आणि फ्रेंचांनीं जर आतां बल्गेरियावर हल्ला चढविला तर जर्मनांच्यापुढें आयतें ताट वाढून ठेवल्यासारखें होईल. जर्मन हल्ला करण्याचा वेडेपणा करतात कीं काय, त्याची वाट पहात फ्रेंच सैन्य सॅलोनिकामध्यें बसलें आहे असें म्हणावें तर, तेंहि जुळत नाहीं. कारण, फ्रेंच किंवा जर्मन कोणी कोणालाच वेडे समजत नाहीं. मग फ्रेंच सैन्य सॅलोनिकामध्यें तळ देऊन कां बसलें आहे ? ज्या लष्करी धोरणानें इटलीचें सैन्य अल्बेनियांत उतरत आहे, व माऊंटनिग्रोस मदत करीत आहे तेंच लष्करी धोरण डोळ्यांपुढें ठेवून फ्रेंच सैन्य सॅलोनिकामध्यें बसलें आहे. फ्रान्सच्या रणभूमीमध्यें फ्रेंच व इंग्रज सैन्याची तयारी सांप्रत इतक्या पूर्णत्वास पोंचली आहे कीं, कोणत्याहिवेळीं जर्मन तटबंदीवर हल्ला करून ते जर्मनीस मागें हटविल्याशिवाय राहाणार नाहीं; पण निकराचें युद्ध सुरू करण्यास फ्रान्स व इंग्लंड रशियाच्या तयारीची वाट पहात आहेत. रशियाची तयारी येत्या वसंत काळांत पूर्णत्वास जाईल, असा पूर्वीचा अंदाज होता. पण वसंतकाळची वाट न पहातां हिंवाळ्यांतच जर्मनीशीं दोन हात करण्याचें रशियानें योजलें असून त्याप्रमाणें डिसेंबर अखेरीस ब्युकोव्हिना प्रांतात ग्यालिशिया मध्यें व ग्यालिशियाच्या उत्तरेस प्रिपेट नदीपर्यंत आस्ट्रो-जर्मन सैन्याशीं रशिया निकरानें लढूं लागला आहे. सर्व्हियाच्या युद्धांत ग्वाल्हीं दक्षिणेस आस्ट्रो-जर्मन सैन्य गुंतलेलें असल्यामुळें ब्युकोव्हिनांत व ग्यालिशियात आपण मुसंडीसरसें शिरूं अशी उमेद रशियास वाटत आहे. सर्व्हियन युद्ध सुरू झाल्यापासून नव्या सैन्याची तयारी करण्यास रशियानें जिवापाड मेहनत केली आहे; आणि सर्व्हिया स्थानभ्रष्ट झाल्यानें रशिया नखशिखांत त्वेषानें हलूं लागला आहे. अशा स्थितींत रशियाचें अपरंपार बल वसंतकाळची वाट न पहाता हिंवाळ्यांतच जर ग्यालिशियामध्यें आस्ट्रो-जर्मनांशीं झुंजूं लागलें तर त्यांत नवल तें कोणतें ? आपला त्वेष आवरून धरून अधिक सावधगिरीनें तयारी करून नंतर वसंतकाळीं पुन्हां दंड थोपटावा, आणि सर्व्हियास मदत करण्याच्या दृष्टीनें नव्हे तर एकंदरीनें जर्मनीचे नाजुक मर्मस्थान शोधून काढून त्या मर्मस्थानावर हल्ला करून जर्मनीचा पराभव करण्याच्या हेतूनें घाव मारावा असें म्हणणारा रशियांत एक पक्ष आहे. त्या पक्षास सांप्रतच्या त्वेषात्वेषानें व घाईघाईनें केलेल्या हालचाली पसंत नाहींत. पेट्रोग्राडवर चाल करून

जाणाऱ्या सेनापति हिंडेनबर्ग यांच्या सैन्यास थोपवून धरण्यांत ज्यांनी यश मिळविलें ते प्रख्यात रशियन सेनापति जनरल रुस्की यांनीं नुकताच आपल्या कामाचा राजीनामा डिसेंबरांत दिला आहे. त्यावरून रशियांतील सथपक्षाचे ते पुरस्कर्ते असावेत असें वाटतें. कसेंहि असो. रशिया संतापानें लाल झाला आहे, एवढी गोष्ट खरी; आणि सर्व्हियाच्या नाशाचा सूड उगविण्याची त्यानें भरभक्कम तयारी केली आहे हीहि गोष्ट खरी. डिसेंबरअखेरीस ग्यालिशियांत सुरू केलेल्या मोहिमेंत रशियास जर सुदैवानें यश आलें, तर फ्रान्समध्येंहि फ्रेंच व इंग्रज जर्मनीस चांगली तंबी देतील यांत संशय नाहीं. ग्यालिशियांत रशिया घुसला असतांना आणि फ्रान्स व बेल्जममध्ये फ्रेंचांचें रद्दे खात जर्मनी मागें हटत असतांना सॅलोनिका येथील फ्रेंच सैन्यास, अल्बेनियांतील इटालियन सैन्यास, व माऊटनिग्रोमधील सर्व्हियन सैन्यास फार विलक्षण महत्त्व येणारें आहे. ग्यालिशियामध्ये जर एखाददुसरा चांगला जय रशियास मिळाला आणि आस्ट्रो-जर्मन सैन्याची रोमानियाच्या डोळ्यादेखत थोडावेळ तरी फटफजिती झाली तर रोमानिया आपलें बल रशियाच्या पारड्यांत टाकण्यास अजूनहि तयार होईल. रोमानियामध्यें तशी इच्छा उत्पन्न झाल्यावर ती दृढ होण्यास बल्गेरियाच्या पिछाडीवर व बगलेवर तुटून पडण्यास फ्रेंच, इंग्रज, इटालियन व सर्व्हियन सज्ज आहेत, अशी रोमानियाच्या मनाची खात्री पटली पाहिजे. अशी खात्री पटून रोमानिया जर सामील झाला तर बाल्कन प्रदेशांतील जयापजयाचें पारडें तेव्हांच पालटेल. रशियास जय मिळून तो जर ग्यालिशियात घुसला तर बाल्कन प्रदेशांतील सर्व आस्ट्रो-जर्मन सैन्य रशियाकडे वेधलें जाईल, आणि तुर्कांच्या मदतीशिवाय दुसऱ्या कोणाचीहि मदत बल्गेरियास रहाणार नाही. वरून रोमानिया, खालून फ्रेंच व इंग्रज आणि पश्चिमेकडून इटालियन्स व सर्व्हियन्स अशी एकच गर्दी उसळल्यावर बल्गेरियाची होळी होऊन त्या होळींत तुर्कहि होरपळून निघण्यास कितीसा वेळ लागेल? या व्यूहाचा पाया ग्यालिशियांतील रशियाची चढाई असून त्या चढाईच्या यशाबरोबर रोमानियाच्या मैत्रीची इमारत उठली जावयाची आहे. या मैत्रीत किंतु उत्पन्न होऊं नये म्हणून सॅलोनिका बंदरांत फ्रेंचांच्या मोठ्या सैन्याचा तळ पडणें जरूर आहे. ब्यूकोव्हिना, ग्यालिशिया व प्रिपेट नदीचा दक्षिण भाग येथे जर रशियाला जय मिळूं लागले तर फ्रेंचहि बल्गेरियावर जोरजोराचे हल्ले करतील, आणि जानेवारीत जर रशियाची तयारी डळमळीत ठरली तर सॅलोनिका-

मधील फ्रेंच सैन्यहि आपलें बिऱ्हाड उचलून फ्रान्समधील रणभूमीकडे पुन्हां परत जाईल हें सांगणें नकोच.

## इजिप्त व इराण

जानेवारी प्रारंभाला सुरू असलेल्या ग्यालिशियन मोहिमेंत रशियास यश मिळून जर रोमानिया रशियाच्या तर्फें महायुद्धांत पडला तर इजिप्त व इराण या बाजूची तुर्कांची गडबड आपोआपच फोल होईल. कारण आस्ट्रो–जर्मनांच्या भरपूर पाठबळाशिवाय नुसत्या तुर्कांच्याकडून इजिप्त व इराण येथील रणभूमींत विशेषसा पराक्रम दाखविला जाणें शक्य नाहीं. बाल्कन प्रदेशांत बल्गेरियाला मदत करितां करितां तुर्कांना पुरेवाट होईल. अर्थात् इजिप्त व इराण येथील तुर्कांच्या चळवळी आपोआप गळून पडतील. पण ग्यालिशियन मोहिमेंत जर रशियाचें विशेषसें चाललें नाहीं तर इजिप्तमधील व इराणमधील तुर्कांच्या चळवळींत जानेवारी फेब्रुवारींत फार जोम दिसेल हें उघड आहे. अशा वेळींहि सॅलोनिका येथील इंग्रज व फ्रेंच यांच्या सैन्याचा तळ तुर्कांच्या विरुद्ध चांगला उपयोगी पडेल. सुवेज कॅनॉलला लागून असलेल्या तुर्कांच्या सीरिया प्रांतांत इजिप्तवर स्वारी करण्याकरितां तुर्कांचें मोठे सैन्य जमा होत आहे. या स्वारीची मोठी तयारी होऊन तुर्की सैन्य जर सुवेज कॅनॉलच्या रोखानें हालू लागलें तर सुवेज कॅनॉल म्हणजे दुसरें यिप्रेस असें तुर्कांच्या अनुभवास येईल, हे सांगणें नलगे. सुवेज कॅनॉलवर तुर्क लोक जर आपली डोकीं फोडून घेऊं लागले आणि तेथें तुर्कांच्या एकवटलेल्या बलाचे जर शतशः तुकडे तुकडे होऊं लागले तर तुर्कांच्या तशा त्या धापा टाकण्याच्या वेळीं तुर्कांच्या एशियामायनर किंवा पॅलेस्टाईच्या किनाऱ्यावर एकदम मोठें सैन्य उतरून इजिप्तच्या सरहद्दीवरील तुर्की सैन्याच्या पिछाडीचा विध्वंस करणें फार इष्ट आहे. सॅलोनिकामध्यें लाख दोन लाख सैन्याचा बनविलेला गड्डा गुलदस्त या नात्यानें तशा समयी एकदम मोठें यश संपादन करील यांत संशय नाहीं; म्हणजे जर बल्गेरियावर स्वारी करवयाची नाहीं असें ठरलें, तर सॅलोनिका येथील सैन्य तुर्कांचा एशियामायनरमधील किनारा झोडून काढण्यास चांगलें उपयोगी पडेल. अशा दृष्टीनें विचार केला असतां, सर्व्हियन युद्ध संपलें तरी किंवा रशियाच्या ग्यालिशियांतील विजयाच्या संजीवनीनें त्या युद्धाचें पुनरुज्जीवन होण्याची आशा निष्फळ ठरली तरी सॅलोनिका येथील फ्रेंचांचा तळ लष्करी धोरणाच्या दृष्टीनें

निष्कारण होऊं शकत नाहीं, हें वाचकांच्या ध्यानांत येईल. डिसेंबर महिन्यांत इजिप्तच्या रणभूमींत दोन तीन किरकोळ गोष्टींशिवाय कांहीं महत्त्वाचें घडून आलेलें नाहीं. इजिप्तच्या पश्चिम सरहद्दीवर माथेफिरू अरब जातीनें लहानसें बंड केलें. हिंदुस्तानच्या वायव्य सरहद्दीवरील किरकोळ गडबडीसारखाच हा प्रकार होता. कैरो येथून सैन्य पाठवून देऊन या बंडाचा बंदोबस्त लगेच करण्यांत आला. दुसरी किरकोळ गोष्ट म्हणजे पूर्व-भूमध्य समुद्रांत इजिप्त किनाऱ्याच्या आसपास आस्ट्रो-जर्मनांच्या पाणबुडयांनीं सुरू केलेली चांचेगिरी होय. इंग्लंडच्या सभोंवती एकदां जर्मन पाणबुडयांनीं जशी जोराची चांचेगिरी केली होती तसल्याच स्वरूपाची ही चांचेगिरी आहे. या चांचेगिरीमुळें रोजचें जरी एकाद दुसरें जहाज भूमध्य समुद्रांत निर्दयतेनें बुडविण्यांत येत असलें तरी, लष्करी धोरणाच्या दृष्टीनें त्या चांचेगिरीस किरकोळ सदरांतच ढकललें पाहिजे. इंग्लंडच्या सभोंवारच्या चांचेगिरींत जर्मनीस जसें यश आलें नाहीं त्याचप्रमाणें भूमध्य समुद्रांतील चांचेगिरीचाहि इंग्लंडच्या किंवा फ्रान्सच्या लष्करी धोरणावर तादृश्य परिणाम होणें शक्य नाहीं. भूमध्य समुद्रांत इंग्लंड व इटली यांचें आरमारी सामर्थ्य अतुल आहे. तेव्हां आणखी एकदोन महिन्यापलिकडे या पाणबुडयांची टूरटूर भूमध्य समुद्रांतहि ऐकूं येणार नाहीं. तारीख ३० डिसेंबर रोजीं या पाणबुडयांनी इंग्लंडांतून हिंदुस्तानकडे येणारी पर्शिया नांवाची मोठी डाक बोट बुडविली, व तीनचारशें निरुपद्रवी व निरपराधी प्रवाशांना निर्दयपणानें व पशुतुल्य कठोर अंतःकरणानें जलसमाधी दिली. निरुपद्रवी लोकांच्या या एक तऱ्हेच्या अमानुष कत्तलीमुळें इंग्लंडांतील व हिंदुस्थानांतील लोकमत फार क्षुब्ध झालें आहे, व लवकरच तुर्की किनाऱ्यावरील या पाणबोटींची आश्रयस्थानें शोधून काढण्यांत येऊन त्यांचा मुळासकट नाश करण्यांत येईल असा भरंवसा वाटत आहे. आतां एवढी गोष्ट खरी कीं, बर्लिनपासून कॉन्स्टॅंटिनोपलपर्यंत आगगाडी सर्रास सुरू झाली असल्यामुळें आणि कॉन्स्टांटिनोपलपासून सुवेज कॅनॉलच्या पूर्वेस तांबडया समुद्राच्या निम्या भागापर्यंत तुर्कांची ही आगगाडी चालू असल्यामुळें पांच सातशें मैलांच्या तुर्की किनाऱ्यावर आस्ट्रो-जर्मन पाणबुडया बोटींना वारंवार नवी नवी आश्रयस्थानें मिळण्याचा संभव आहे. अर्थात् इंग्लंडच्या आसपासच्या चांचेगिरीचा बंदोबस्त जितक्या सुलभ रीतीनें झाला तितक्या सुलभ रीतीनें इजिप्तच्या आसपासच्या चांचेगिरीचा

बंदोबस्त होईल अशी अपेक्षा करणें चुकीचें होय. पर्शिया आगबोटीसारख्या दुर्दैवाच्या कहाण्या भूमध्य समुद्रांत नव्हे तर तांबडया समुद्रांतहि ऐकण्यास वाचकांनीं आपलें मन घट्ट केलें पाहिजे. तांबडया समुद्रांतील तुर्की बंदरांतून इंग्रजी कॉन्सलांना तेथील निरनिराळ्या परगण्यांच्या संस्थानिकांकडून डिसेंबर महिन्यांत रजा देण्यात आली आहे. अर्थात सुवेज कॅनॉलला लागून असलेल्या तांबडया समुद्राच्या तुर्की किनाऱ्यावर सैन्य उतरवून तेथील तुर्की आगगाडी कबजांत घेऊन सुवेजच्या रणभूमींतील तुर्की सैन्याच्या डाव्या बगलेस इंग्रज शह देतील अशी भीति तुर्कांना वाटत असली पाहिजे. या भीतीचा बंदोबस्त करण्याकरितां तांबडया समुद्रांतील माऱ्याच्या जागा तुर्की लष्करानें डिसेंबरांतच व्यापल्या असल्या पाहिजेत, तथापि तेवढयाने सुवेजच्या रणभूमींतील तुर्की लष्कराची डावी बगल बिनघोर होऊं शकत नाहीं. पाणबुडया बोटीचे भाग आगगाडीवर घालून बर्लिन–कॉन्टांटिनोपल–रेल्वेने एशियामायनरमध्यें आणून तेथून तुर्की आगगाडीने तांबडया समुद्रावरील तुर्की आगगाडीच्या एखाद्या बंदरांत ते भाग जोडून तांबडया समुद्रात पाणबुड्या बोटींचा व त्याबरोबरच समुद्रांतील हमरस्त्यावर पेरावयाच्या सुरुंगांचा सुळसुळाट केल्यावांचून तुर्क कसे राहातील ? तांबडया समुद्रातहि असला हा निदर्य अमानुषतेचा उपद्व्याप करण्यास तुर्कांच्या व जर्मनाच्या अंतःकरणांना बिलकुल दिक्कत वाटणार नाहीं, हें पर्शिया आगबोटीच्या उदाहरणावरून सिद्ध झालें आहे. तेव्हां तांबडया समुद्रास पाणबुडयांचा व सुरुगांचा स्पर्शहि होऊं नये म्हणून ‘ मूले कुठारः ’ या न्यायाने तांबडया समुद्राकडे वळणारी तुर्कांची आगगाडी सुवेजच्या दक्षिणेस थोडक्या अंतरावरच इंग्रजी सैन्य जानेवारी फेब्रुवारींत मोडून टाकण्याचा प्रयत्न करील हे उघड आहे. डिसेंबर महिन्यांत इजिप्तच्या रणभूमीच्या आसपास जशी गडबड दृष्टीस पडली तशाच तऱ्हेचा गोंधळ डिसेंबरमध्ये इराणांतहि दृष्टीस पडला. इराणांत तुर्क–जर्मन वकिलांनीं अमदान, इस्पाहान, येज व करमान वगैरे जिल्ह्यात म्हणजे दक्षिण इराणच्या सर्व टापूंत इराणी दरोडेखोरांना हाताशीं घेऊन व इराणी सैन्य फितवून बंडे केलीं. इराणची राजधानी तेहरान शहरच्या परगण्यांत आहे. तो परगणा व अफगाणिस्थानच्या सरहद्दीवरील परगणा येवढा टापू शिवाय करून बाकी सर्व प्रात म्हणजे बगदाद जवळच्या तुर्की सरहद्दीपासून ते बलुचिस्तानच्या सरहद्दीपर्यंत सर्व इराण तुर्को–जर्मन बंडाळीनें डिसेंबरच्या पहिल्या दुसऱ्या

आठवडयांत व्यापून टाकिला. तेहरान शहरावर चाल करून जाऊन इराणचे शहाला ताब्यांत घेऊन इराण सरकारलाहि महायुद्धांत तुर्को–जर्मनांच्या वतीनें सामील करून घेण्याचा या बंडखोरांचा इरादा होता. पण रशियाचें मोठें सैन्य तेहरान येथें येऊन पोंचल्यामुळें तो बेत सुदैवानें फसला. डिसेंबरच्या तिसऱ्या चवथ्या आठवडयांत रशियन सैन्य दक्षिणेकडे उतरलें व अमदान परगण्यांत रशियानें बंडखोरांचा मोठा पराभव केला. जानेवारी महिन्यांत दक्षिण इराणांतील सर्व बंडखोरांचा रशिया समाचार घेईल व रशियन सैन्य इराणी आखाताचा किनारा पाहील असा अंदाज प्रसिद्ध झाला आहे. इराणी आखातांत जर इंग्रजांचें व रशियाचें सैन्य एकमेकांस भेटलें तर बगदादवरील इंग्रजांच्या मोहिमेत पुन्हां जोम दिसेल. नोव्हेंबर अखेरीस बगदादच्या जवळजवळ गेलेलें इंग्रज सैन्य सुमारें शंभर मैल मागें परतलें, आणि बसरा व बगदाद यांमधील निम्या अंतरावर कुतुल–आमाराच्या मजबुत ठाण्यांत तळ देऊन बसलें. बगदादच्या आसपास इंग्रजी सेनेवर मिळविलेल्या विजयामुळें शेफारलेलें तुर्की सैन्य सर्व डिसेंबर महिना कुतुल–आमाराच्या ठाण्यावर एकसारखे हल्ले करीत होतें. हे सर्व हल्ले हिंदी सेनेनें मागें परतविले व तुर्की लष्कराची मोठी हानि केली. इराणांत रशियच्या सैन्यास जय मिळत असल्यामुळें आणि हिंदुस्थानांतून कुमक बसरा येथें जात असल्यामुळें जानेवारींत बगदादपर्यंत तुर्कांना मागें हटावें लागेल असा भरंवसा वाटत आहे,

# दुसऱ्या वर्षाचा जानेवारी-फेब्रुवारी महिना

डिसेंबर महिन्याप्रमाणें जानेवारी महिन्यांतहि युरोप खंडांतील महायुद्धाचा बाजार मंदीचा गेला. थंडीच्या मोसमांत सर्व्हियन युद्धास प्रारंभ झाला व नोव्हेंबर अखेरीसच सर्व्हियन युद्ध सपलें. फेब्रुवारी अखेरीस युरोपांतील थंडीचे दिवस संपून वसंतकाळास सुरुवात होईल, व त्यावेळीं युरोपांतील सर्व रणभूमींना नवीं पानें फुटतील. गेल्या सालच्या वसंतकाळापेक्षां यंदाचे वसंतकाळीं म्हणजे मार्च, एप्रिल, मे आणि जून ह्या चार महिन्यांत युरोप खंडांत निकराच्या लढाया होतील. वसंतकाळांतील या दगलीस सुरुवात होण्यापूर्वी तह झाल्यास पहावें म्हणून अमेरिकेचे प्रेसिडेंट विल्सन यांनीं कर्नल हाऊस या नांवाचे आपल्या विश्वासाचे मुत्सद्दी डिसेंबर अखेरीस युरोपकडे रवाना केले. कर्नल हाऊस यांची स्वारी जानेवारीचे पहिल्या आठवड्यांत लंडन शहरीं गेली व तेथें इंग्लंडच्या व फ्रान्सच्या मुत्सद्यांची भेट घेऊन त्यांनीं कांहीं दिवस फ्रान्समध्ये घालविले. तेथून जर्मनीची राजधानी बर्लिन येथे जाऊन आस्ट्रो-जर्मन मुत्सद्यांशीं कर्नल हाऊस याचें बोलणें चालणें झालें. जानेवारी अखेरीस स्वित्झर्लंडमध्यें थोडे दिवस घालवून मध्यस्थी करणाऱ्या या अमेरिकन गृहस्थानें इटालियन सरकारशीं कानगोष्टी केल्या. कर्नल हाऊस यांचा हा दौरा तहाच्या वाटाघाटीच्या दृष्टीनें बराच महत्त्वाचा आहे. पूर्वी रोमच्या पोपमहाराजानें तहाची वाटाघाट सुरू केली होती, पण 'अव्यापारेषु व्यापार' करणारे हे कोण अशाच धर्तीच्या टीकेनें त्यांच्या उद्योगाची संभावना करण्यांत आली. हॉलंडच्या सरकारनें एकदां असें जाहीर केलें होतें की, लहानसान तटस्थ राष्ट्रांनीं मोठ्या धेंडांच्या टकरींत पडून तहाची लुडबूड करण्यापासून शांतता पुन्हां प्रस्थापित होण्यांत कांहींच फायदा न होतां उलट अपायच होण्याचा संभव असतो. अमेरिकन सरकारची गणना असल्या लहानसान राष्ट्रांत नाहीं. अमेरिकेच्या सहानुभूतीची किंमत इंग्लंडला काय किंवा जर्मनीला काय, दोघांनाहि आज सारखीच आहे. आतां ही गोष्ट खरी कीं, प्रत्यक्ष युद्धात कोणच्या ना कोणच्या तरी बाजूनें सामील होऊन विरुद्ध पक्षास एकदम धाक दाखविण्याचें सामर्थ्य अमेरिकेच्या अंगीं नाहीं. असें जरी असलें तरी पैसा, अन्नसामुग्री व दारूगोळा या तीन बाबीं-

करतां युरोपखंडास आज अमेरिकेच्या तोंडाकडे पहावें लागत आहे. अमेरिकेला जर वाटलें कीं, इंग्लंडचा पक्ष खोट्या दुरभिमानानें लढाई चालवूं पहात आहे, तर अमेरिकेंतून इंग्लडच्या पक्षाकडे जात असलेला दारूगोळा व अन्नसामग्री एकदम बंद पडेल; आणि अमेरिकेच्या या असल्या सहाय्याशिवाय अखेरीस जय मिळविणें इंग्लंडचे पक्षास दुरापास्त आहे. दारूगोळयासंबधानें इंग्लंडप्रमाणें जर्मनी अमेरिकेवर विशेष अवलबून नाहीं हें खरें, पण हालंड–स्वीडनसारख्या लहान-सान तटस्थ राष्ट्रांमधून अमेरिकेचा बराच माल जर्मनींत झिरपत जातो. या झिरपण्याची पूर्ण बदी करण्याचे उद्योग इंग्लंडनें जारीने सुरू केले आहेत; आणि अमेरिकेची सहानुभूति जर जर्मनीस मिळाली नाहीं तर, आणखी दोन तीन वर्षे लढाई चालण्याचा प्रसंग जर्मन राष्ट्रास विशेप भयप्रद वाटलाच पाहिजे. म्हणजे अमेरिकेचा दर्जाच सांप्रत अशा तऱ्हेचा आहे कीं, अमेरिकेच्या राजपुरुपांशीं बोलतांना घमेंड एका बाजूला ठेवून, होतां होईल तों व्यवस्थित व सयुक्तिक बोलणें बोलत रहाणें दोन्ही पक्षाना जरूर आहे. कर्नल हाऊस यांची तहाची वाटाघाट धुडकावून लावण्याची सोय कोणालाच नाहीं. इंग्लंडात काय, फ्रान्समध्यें काय, किंवा जर्मनीमध्यें काय, अशा तऱ्हेची वाटाघाट चालली असतांना जानेवारी महिन्यांत कोणीच धुडकावणीचे शब्द वापरले नाहींत. आम्ही एकएकटे तह करणार नाहीं, केला तर सर्वांनीं मिळून करू, अशा धर्तीचे उद्गार रशियामध्येहि यावेळीं निघाले. आमचें असें असें आणि इतकें इतके झालें पाहिजे तरच तहाची बात, नाहींतर कोण करतो ? असली पूर्वीची बेपर्वाई जानेवारी महिन्यांत कोठेहि दृष्टीस पडली नाहीं. मग तह होण्याचे दिवस जवळ आले आहेत काय ? फेब्रवारी–मार्च महिन्यांत तह होईल काय ? कर्नल हाऊस यांची मध्यस्थी यशस्वी होईल काय ? जर्मनी किंवा इंग्लंड यांपैकीं कोणाचाहि पक्ष आज आपण होऊन तह करण्यास पुढें आलेला नाहीं. दोन्ही पक्षांस वाटत आहे कीं, अखेरीस आपला जय होईल. १९१६ सालच्या प्रारंभाला कोणचाच पक्ष दमलेला दिसत नाहीं. अशा स्थितींत तह तरी कसा व्हावा ? कोणीच जर दमलेला नाहीं तर, प्रेसिडेंट विल्सन सारख्यांनीं तरी या तहाच्या वाटाघाटींत कां पडावें ? हार जाणें हें दोन्ही पक्षाना कबूल नाहीं, आणि पराभवाच्या दृष्टीनें विचार केला असतां, तह होण्यास अनुकूल काळ आलेला नाहीं असेंच म्हणावें लागतें. दमलेले किंवा पराभूत झालेले कोणी

नसले तरी लढाईचा वीट आलेले सगळेच आहेत. लढणारे, न लढणारे, तटस्थ राष्ट्रांतले, लढाईच्या गप्पा सांगणारे, गप्पा ऐकणारे, सगळ्यांनाच आपापल्या परीनें लढाई पुरेशी झाली आहे. पण 'कंटाळा' किंवा 'आलस्य' असल्या रिपूला हार जाऊन कोणचाच मुत्सद्दी 'महायुद्धा'सारख्या महत्कार्याचा वेग थांबवीत नसतो. प्रेसिडेंट विल्सन यांनीं जर्मनीनें वार्सा शहर घेतलें त्यावेळीं मध्यस्थी करण्याचें नाकारलें, पण जर्मनीनें सर्व्हिया घेऊन डिसेंबर महिन्यांत बर्लिनची आगगाडी कान्स्टांटिनोपलपर्यंत धावूं लागली त्या वेळीं मध्यस्थी करण्याची स्फूर्ति प्रेसिडेंट विल्सन यांना झाली. हा भेद जर आपण लक्षांत घेतला तर, तह होण्यास सांप्रतचा काल कितपत अनुकूल आहे हें ध्यानांत येईल. जर्मनीने बेल्जम घेतलें काय, पोलंड घेतलें काय, किंवा रशियाचें कोरलंड घेतलें काय, त्यायोगानें तह करण्याची प्रवृत्ति जर्मनींत उत्पन्न होणारी नव्हती. जर्मनीनें तुर्की साम्राज्यावर आपली छाप बसवावी कां रशियाच्या पक्षानें आपली छाप बसवावी, हा मुख्य तंटा. बेल्जम घेतल्यानें हा तंटा कसचा मिटणार ? पोलंड किंवा कोरलंड घेतल्यानें मुख्य तंट्याची परिसमाप्ति कसची होणार ? पण बल्गेरिया जर्मनीला सामील झाल्यानें सर्व्हिया स्थानभ्रष्ट होऊन जर्मनी व तुर्कस्थान एकजीव झाले. ज्या आदिकारणा-करितां जर्मनीनें युद्ध सुरू केलें, ती मूळ गोष्ट सिद्ध झाली. ही मूळ गोष्ट सिद्ध झाल्यावर कदाचित् या मुळालाहि धक्का लागेल या भीतीनें जर्मनी, बेल्जम, पोलंड व कोरलंड हे देश सोडून देण्यास कां तयार होणार नाहीं ? बरें जर्मनीनें हे जिंकलेले प्रांत परत दिले, तर तुर्की साम्राज्यावर जर्मनीची सावली पडली म्हणून दोन वर्षांपूर्वीइतके वाईट वाटण्याचें दिवस आतां उरले आहेत काय ? दोन वर्षांपूर्वी तुर्कांच्या व जर्मनांच्या संलग्नतेची जी भीति इंग्लडला वाटत होती, ती भीति वाटण्याचे दिवस आतां राहिले नाहींत. महायुद्धापूर्वी इंग्लंड नुसतें आरमारी राष्ट्र होतें, लष्करी राष्ट्र नव्हतें. पण जानेवारी महिन्यांत सक्तीच्या लष्कराचा कायदा पास करून इंग्लड लष्करीच राष्ट्र बनलें आहे. जर्मनी ज्याप्रमाणें लष्करी राष्ट्र आहे त्याप्रमाणें इंग्लडहि आतां लष्करीच राष्ट्र आहे. इंग्लंड स्वतः लष्करी राष्ट्र बनलें आहे, तेव्हां इंग्लंडच्या सगतीनें इजिप्त आणि हिंदुस्तान हीं लवकरच लष्करी राष्ट्रें बनल्यावांचून राहाणें शक्य नाहीं. जर्मनीची सावली तुर्की साम्राज्यावर पडली तर त्यांत बागुलबोवा कोणचा ? जर्मनी

तुर्कांचें लष्करी राष्ट्र बनवील आणि हें लष्करी राष्ट्र इजिप्तला व हिंदुस्थानला नडेल हाच ना बागुलबोवा ? जर्मनी तेवढें लष्करी राष्ट्र आणि इंग्लंड बिनलष्करी राष्ट्र असा भेद असतांना वरील बागुलबुवा खराखुरा होता; पण इंग्लंड लष्करी राष्ट्र बनल्याबरोबर वरील भेद नाहींसा झाला; अर्थात् त्या भेदानें उत्पन्न केलेला बागुलबोवाहि मरण पावला. जर्मनीनें जर तुर्कांचें लष्करी राष्ट्र बनवलें तर इंग्रज हिंदुस्थानचें लष्करी राष्ट्र बनवतील, आणि मग इंग्रजांचा पक्ष बिनतोड होईल. जानेवारी महिन्यांत इंग्लंडांत सक्तीच्या लष्कराचा कायदा पास झाल्यानें तुर्की साम्राज्याकड पाहाण्याची पूर्वीची एतिहासिक दृष्टि बदलून गेली आहे; आणि स्वसामर्थ्याविषयीं इंग्लंडला सांप्रत पूर्ण भरंवसा वाटत असून जर्मनांच्या व तुर्कांच्या संलग्नतेविषयीं बेफिकीर राहण्याइतक्या नव्या शक्तीचा संचार इंग्रजी साम्राज्यांत झाला आहे. अशावेळीं महायुद्धाच्यापूर्वीप्रमाणें बेल्जमसारख्या चिमुकल्या राष्ट्रांना जर तहानें स्वातंत्र्य मिळालें तर तुर्की साम्राज्यावर पडलेली जर्मनीची छायाहि काढून टाकण्याकरितां, सक्तीच्या लष्करी कायद्यानें फोल ठरविलेल्या पूर्वीच्या भीतीच्या नाशाकरितां, आणखी दोन वर्षें महायुद्ध इंग्लड चालू ठेवील हें विशेषसें सयुक्तिक दिसत नाहीं. अशा तऱ्हेच्या विचारसरणीनें प्रेरित होऊन अमेरिकेचे प्रेसिडेट विल्सन यांनीं जानेवारी महिन्यांत तहाची मध्यस्थी केली असावी. ही मध्यस्थी कितपत फलद्रूप होते हें फेब्रुवारी-मार्च महिन्यांत दिसून येईल.

## रशियाचा जोर

जानेवारी महिन्यांत रशियानें ऑस्ट्रियाच्या ब्युकोव्हिना प्रांतावर फार जोराचे हल्ले केले. रशिया ब्युकोव्हिना प्रांतांत जोर करतो आहे असें पाहून उत्तरेस टार्नोपोलच्या आसपास आस्ट्रो-जर्मनानीं रशियाची फळी फोडण्याचा प्रयत्न केला, पण त्यांत जर्मनीस यश आलें नाहीं. कारण टार्नोपोलच्या उत्तरेस स्ट्रीर नदीवर प्रिपेट नदीच्या दलदलीपर्यंत रशियानें जर्मनीवर हल्ला करून जर्मनीस थोडेसें मागें हटविलें. म्हणजे डिसेंबरच्या अखेरीस व जानेवारीच्या प्रारंभीं ब्युकोव्हिनाची राजधानी झर्नोव्हिट्झ शहर त्यावर रशियानें प्रचंड हल्ले करण्यास सुरुवात केली. त्याचा परिणाम रोमानियाच्या सरहद्दीपासून तों उत्तरेस तहत प्रिपेट नदीपर्यंत सर्व रणभूमीवर होऊन जानेवारी महिन्यांत आस्ट्रो-जर्मन व रशियन सैन्य यांच्यामध्यें चांगल्या जोराच्या लढाया झाल्या. या लढयांत कोणाचाच म्हणण्यासारखा पराजय झाला नाहीं. फेब्रुवारीच्या प्रारंभीं ब्युकोव्हिना प्रांत, नीस्टर नदी,

ग्यालिशिया प्रांत येथें पुन्हां धुमश्चक्री सुरू झाली असून फेब्रुवारी मार्च महिन्यांत युरोपांतील हीच प्रधान रणभूमि होऊन बसेल असा अन्दाज आहे. इंग्लंड व फ्रान्स यांनीं पश्चिम रणभूमींत जर्मनीवर हल्ले करण्यास सुरवात करण्यापूर्वी रशियानें आगाऊच जोर केला हें लष्करी धोरणाच्या दृष्टीनें चुकीचें झालें. गेल्या सालीं जी चूक झाली तीच चूक यंदाहि रशिया करीत आहे. गेल्यासालीं जानेवारी फेब्रुवारी व मार्च या तीन महिन्यांत रशियानें ग्यालिशियावर जोराचे हल्ले करून कार्पेथियन पर्वत गांठला; आणि हिंवाळ्यांतील या जोराच्या स्वारीमुळें रशिया थकल्यानंतर जर्मनीनें रशियास मागें रेटण्यास सुरवात केली. तोच प्रकार यंदाहि होतो आहे काय ? रशियानें कार्पेथियन पर्वत गेल्यासालीं गांठला त्याच सुमारास म्हणजे फेब्रुवारी मार्च महिन्यांत इंग्लंड व फ्रान्स यांनीं नौचापेली व शांपेन प्रांतांत जर्मनीवर हल्ले करून पाहिले. त्या हल्ल्यांनीं असा निकाल दिला आहे कीं, दारूगोळ्याचा भरपूर पुरवठा नसल्यामुळें १९१५ सालीं जर्मनीची फळी इंग्लंड फ्रान्सच्या हातून फुटली जाणार नाहीं. इंग्लड फ्रान्सच्या भयांतून फेब्रुवारी मार्च महिन्यांत १९१५ सालीं जर्मनी मुक्त झाला. आणि पुढे एप्रिल महिनाभर रशियास कार्पेथियन पर्वतावर डोकें आपटून घेण्यास पूर्ण मोकळीक देऊन मे महिन्यापासून आपल्या खऱ्या स्वारीस जर्मनीनें सुरवात केली. जानेवारी, फेब्रुवारी, मार्च व एप्रिल हे चार महिने आस्ट्रो–जर्मन्स स्वसंरक्षण करण्यापलिकडे दुसरें तिसरें कांहींच करीत नाहींत, किंबहुना शत्रूला थोडेसे अंगावरहि येऊं देतात आणि नतर चार महिन्यांच्या गुप्त तयारीनें कोठे तरी व्यंग शोधून काढून एकदम कोसळून पडतात; असा गेल्या सालचा अनुभव आहे. गेल्यासालीं वसंतकाळांत रशियानें कार्पेथियन पर्वत गांठून उन्हाळ्यात म्हणजे मे–जून महिन्यांत हंगेरिया घेऊन महायुद्धाची परिसमाप्ति करावी असें रशियाचें लष्करी धोरण होतें. या धोरणास पश्चिम रणभूमींत वसंतकाळच्या सुरवातीस ॲंग्लो–फ्रेंचांनी मदत करावी असें ठरलें होतें. ॲंग्लो–फ्रेंचांची मदत दारूगोळयाच्या अभावीं निरुपयोगी ठरली, आणि कार्पेथियन पर्वत काबीज करण्यांत रशियाची शक्ति संपून जाऊन जर्मनीच्या उलट टोल्याच्या वेळीं रशिया बलहीन झाला. गेल्या वसंतकाळच्या प्रारंभीं रशियाकडे मुख्य चढाईचें काम होतें, तर यंदा तें काम ॲंग्लो–फ्रेंच्या-च्याकडे आलें आहे. पश्चिम रणभूमींत फ्रेंचांची व इंग्रजांची सेना गेल्या सालपेक्षां

संख्येनें फार मोठी झाली असून दारूगोळयाचाहि पुरवठा प्रचंड चढाईस पुरून उरण्या इतका आहे. तेव्हां वसंतकाळीं जर्मनीशी कुस्ती करून रणांगणावर जर्मनीची रग जिरविण्याचें काम यंदा ॲंग्लो–फ्रेंचांकडे आलें आहे. ॲंग्लो–फ्रेंचांची व आस्ट्रो–जर्मनांची ही वसंतकाळची कुस्ती सुरू झाली असतां आपल्या दोस्तांना मदत करण्याचें काम तेवढें रशियाकडे आहे. या दृष्टीनें विचार केला असतां जानेवारींतच ग्यालिशियाची रणभूमि जागृत करण्यांत रशियानें थोडी घाई केली असें म्हणावें लागतें. अगावर बाजू न येऊं देतां मे–जून अखेरीस एकसारखे हल्ले करण्याचें सामर्थ्य रशियास प्राप्त झालें असल्यास जानेवारींतील युद्ध वांया जाणार नाहीं, पण गेल्या सालच्या अनुभवानें मन थोडेसें साशंक होतें. पश्चिम रणभूमींत फेब्रुवारी मार्च आपणावर स्वारी होणार हें जर्मनी ओळखून असून या स्वारीस अडथळे करण्याचें काम जानेवारींत जर्मननें सुरू केलें आहे. सेनापति फील्ड मार्शल जाफ्रे यांचे बेत सुरळीतपणें सिद्धीस जाऊं नयेत म्हणून न्यूपोर्ट, यिप्रेस, सोमनदी, व ऐन नदी येथें जर्मनीनें ॲंग्लो–फ्रेंचांवर हल्ले केले व एक दोन ठिकाणीं किरकोळ खेडीं काबीज केलीं. वसतकाळापूर्वी किंवा वसतकाळच्या प्रारंभीं कॅले घेण्याचा जर्मनीचा बेत आहे असें कांहींचें म्हणणें आहे. पण या म्हणण्यांत विशेपसा तथ्यांश दिसत नाहीं; कारण दारूगोळा, तोफा व सैन्य या तीनहि बाबतींत ॲंग्लो–फ्रेंचांचें पाऊल रोज पुढें पडत आहे, या गोष्टीकडे जर्मनीचें कसें दुर्लक्ष होईल ? कॅले व पारीस घेऊन महायुद्धाची परिसमाप्ति आपल्या वतीनें करण्याची जर्मनीची महत्त्वाकांक्षा १९१४ सालींच मार्ननदीच्या व यिप्रे-सच्या लढायांत रसातळाला गेली आणि तेव्हांपासून रशियाचा पराभव करून तुर्कांशीं सलग्न होऊन महायुद्धाची समाप्ति आपल्या वतीनें करण्याचा मार्ग जर्मनीनें आंखलेला आहे, आणि १९१५ सालीं हा मार्ग आक्रमीत असतां आस्ट्रो–जर्मनांना बरेंच यशहि मिळालें आहे. तेव्हां १९१६ सालीं हा पूर्वीचा यशाचा मार्ग त्यांनीं कां सोडून द्यावा ? १९१६ सालापूर्वी ते तुर्कांशीं संलग्न झाले आहेत; इतकेंच नव्हे तर इजिप्त व इराण या दोन देशाना तुर्कांकडून त्यांनीं चांगला शहहि देवविला आहे. अशा स्थितींत रशियाच्या लष्कराचा विध्वंस करून महायुद्धाची परिसमाप्ति करण्याचें आपलें लष्करी धोरण जर्मनी बदलून टाकील हे युक्तिजुक्तीस धरून होत नाहीं. अगावर चाल करून येणाऱ्या ॲंग्लो–फ्रेंच सैन्याच्या लाटा थोपवून धरावयाच्या आणि

त्या लाटांचा आवेश नष्ट झाल्यानंतर रशियाच्या कमकुवत जागीं सर्व बळ एकवटून तुटून पडावयाचें, असेंच लष्करी धोरण यंदाच्या वसंत काळाकरितां व उन्हाळयाकरितां जर्मनीनें आंखून ठेविलेलें असलें पाहिजे. तेव्हां अँग्लो-फ्रेंचांची जंगी चढाई सुरू झाल्यावर रशियानें आस्ट्रो जर्मनांवर हल्ला करावयास पाहिजे होता. मग जानेवारींतच अकालीं हल्ला रशियानें कां केला ? दोस्तांच्या लष्करी धोरणाला सोडून रशियन लष्कर असें कसें वागलें ? ब्युकोव्हिनावर जानेवारींत झालेला रशियाचा हल्ला लष्करी धोरणाच्या दृष्टीनें विसंगत झाला आहे. बेसूर गायन त्रासदायक होतें हें रशियास कां समजलें नाहीं ? या प्रश्नाचें उत्तर असें आहे कीं, ब्यूकोव्हिनांत व ग्यालिशियांत रशियानें जानेवारींत जी कुस्तीची उभारणी केली आहे तिच्या बुडाशीं लष्करी धोरणाचे डावपेंच नसून राजकीय कारणें आहेत. नोव्हेंबरांत व डिसेंबरांत सर्व्हियाचें युद्ध चालू असतां आपल्या हातून कांहींच झालें नाहीं तर आपली इज्जत जाते, म्हणून जानेवारींत रशियानें युद्ध अकालीं सुरू केलें. माऊंटनिग्रो व आल्बेनिया यांवरील ऑस्ट्रियन स्वारीस आळा बसावा, सॅलिनोका येथील अँग्लो-फ्रेंचांच्या तयारीला प्रोत्साहन मिळावें, आल्बेनियांत इटलीनें उतरून बल्गेरियावर स्वारी करण्यास राजी व्हावें, आणि रोमानियानें स्वतःस मिळावें, निदान जर्मनीची तरी बाजू उचलूं नये, अशा प्रकारचीं बाल्कन युद्धांतील लष्करी धोरणाला धरून असणारीं कांहीं कारणें रशियाच्या ह्या लढाईचा उलगडा करण्याकरितां पुढें आणतां येण्यासारखीं आहेत. या बाल्कन युद्धाचा लष्करी धोरणानें विचार केला असतांहि रशियाची चढाई अकालींच ठरते. सर्व्हिया स्थानभ्रष्ट होण्यापूर्वी ही चढाई व्हावयास पाहिजे होती. सर्व्हिया स्थानभ्रष्ट होऊन माऊंटनिग्रोच्या व आल्बेनियाच्या डोंगराळ प्रदेशांत ऑस्ट्रियाच्या तोफा घुसल्यानंतर रशियानें चढाई सुरू केली; अर्थात् वरातीमागून घोडें अशी स्थिति झाली. जानेवारी महिन्यांत रशियाची चढाई थोपवून धरून ऑस्ट्रियानें सर्व माऊंटनिग्रो पादाक्रांत केला; आणि आल्बेनियाचें डुराझो बंदरहि लढविण्याचें इटलीनें नाकारून सर्व आल्बेनियाहि आस्ट्रियाच्या व बल्गेरियाच्या ताब्यांत गेल्यासारखा झाला. माऊंटनिग्रोची व आल्बेनियाचीं आड्रियाटिक समुद्रांतील बंदरें आस्ट्रियाच्या ताब्यांत गेल्यामुळें आड्रियाटिक समुद्रांत इटलीच्या आरमाराला जें भय उत्पन्न झालें आहे, व त्या बाजूचें आस्ट्रियन सैन्य रिकामे झाल्यानन्तर जवळच्या जवळ इटलीवर तुटून पडतें कीं काय अशी भीति वाटू

लागली आहे. अर्थात् बाल्कन रणभूमि पुन्हां जागृत करण्याच्या कामीं इटलीचा बिलकूल उपयोग होण्यासारखा नाहीं, हें उघड आहे. रशियन चढाई फेब्रुवारी महिन्यांत कितपत यशस्वी होते हें पाहून रोमानियानें रशियास सामील होण्याइतकें यश रशियास न मिळाल्यास मार्च महिन्यांत सॅलिनोका येथील अँग्लो–फ्रेंच सैन्य सॅलिनोका बंदर सोडून इतर ठिकाणीं जाईल, हें सांगणें नकोच.

## तुर्कांची रणभूमि

जानेवारी महिन्यांत रशियानें तुर्कांच्या काकेशियस प्रांतांत तुर्की फौजेवर मोठा विजय मिळविला. अर्झरूमच्या उत्तरेस तुर्की फौजेचा पराभव करून खुद्द अर्झरूमला जानेवारी अखेरीस रशियाच्या सेनेनें वेढा दिल्यासारखें केलें असून लवकरच त्या बाजूच्या तुर्की फौजेचा पुरा नायनाट होईल असा अन्दाज आहे. अर्झरूमच्या दक्षिण पूर्वेस व्हॅन सरोवराच्या टापूतील रशियन सैन्याची सरशी झाली आहे. या दोन ठिकाणीं तुर्की फौजेचा पराभव झाल्यामुळें व्हॅन सरोवराला लागून असलेल्या इराणी परगण्यांत रशियाचें वर्चस्व अबाधितपणें स्थापित झालें आहे. डिसेंबर महिन्यांत तुर्कांनीं, जर्मनानी व इराणी बडव्योरानीं सर्व इराणभर बरीच गडबड केली होती. उत्तर इराणांत काजव्हिन व तेहरान येथें असलेल्या रशियन सैन्यानें डिसेंबरांतच या गडबडीचा बंदोबस्त केला होता. जानेवारींत बलुचिस्तानला लागून असलेल्या इराणच्या कर्मनशा प्रांतांतहि रशियाचें थोडेसे सैन्य उतरलें असून तेथीलहि बंडाळीचा रशिया लवकरच समाचार घेईल असा अन्दाज आहे. उत्तर इराणांतील बडाळी रशियास लवकर मोडतां येते, पण दक्षिण इराणांतहि शांतता राखणें रशियाच्या शक्तीबाहेरचें आहे. तेव्हां दक्षिण इराण शांत होण्यास आणखी एक दोन महिने सहज लागतील. इराणात तुर्कांना व जर्मनांना इतकें तरी फावलें, याचें कारण नोव्हेंबर अखेरीस जनरल टाऊनशेड यांच्या हाताखालील इंग्रजी सेनेला बगदाद जवळ पीछेहाट करावी लागली हे होय. बगदाद जवळून शिताफीनें पीछेहाट करीत करीत जनरल टाऊनशेड हे डिसेंबर अखेरीस तैग्रीस नदीवर कुतुल आमाराच्या भक्कम जागेत तळ देऊन बसले. कुतुल आमाराचे तटबंदीवर हल्ला न करतां तुर्कांनीं कुतुल आमाराची पिछाडी एकदम गांठली आणि कुतुल आमाराच्या दक्षिण पूर्वेस चाळीस पन्नास मैलांवर असलेल्या शेकसाधी गांवात आपलें बरेंच मोठें सैन्य ठेवून तुर्कांनीं कुतुल आमारा व बसरा यांचा संबंध तोडला. तुर्की सैन्य कुतुल आमाराचे

तटबंदीस वेढा देत असतां जनरल टाऊनशेंड तेथेंच किल्ला पकडून बसले, याचें कारण ती जागा लष्करी धोरणाचे दृष्टीनें फार महत्वाची आहे. नाहींतर ते केव्हांच निसटले असते, व अजूनहि निसटणें बिलकूल संकटाचें नाहीं. तुर्कांच्या वेढयांत अशा रीतीनें जनरल टाऊनशेंड सांपडले असतां त्यांना मदत पोंचविण्या-करतां आणि तुर्कांना बगदादपर्यंत मागें पिटाळून लावण्यावरितां जानेवारीच्या प्रारभीं बसरा येथून दुसरें नवें मोठें सैन्य जनरल येमर याजबरोबर पाठविण्यांत आलें. जानेवारीचे सात आठ तारखेस या कुमकेच्या सैन्याची शेकसाधी येथें लढाई होऊन तुर्कांना पांच सात मैल मागें हटावें लागलें. कुतुल आमाराकडे जाण्याकरितां इंग्रजी सेनेनें चांगली कंबर बांधली, पण आकस्मिक एक आठवडाभर पाऊस पडून तैग्रीस नदीला महापूर आल्यामुळे जानेवारी अखेरपर्यंत जनरल येमर यांनी आपल्या सैन्याच्या हालचाली बन्द ठेवाव्या लागल्या. फेब्रुवारीचे प्रारभीं युफ्रैतीस तैग्रीस नद्यांच्या कांठची हवा स्वच्छ झाली असून जनरल टाऊनशेंड यांना लवकरच कुमक जाऊन पोचेल असा अन्दाज आहे. आतां येवढी गोष्ट मात्र खरी कीं, कुमक पोंचविण्याचें हें काम जानेवारी प्रारंभाला जितकें सोपें वाटलें होतें तितकेंच सोपे फेब्रुवारी प्रारंभाला वाटेनासें झालें आहे. कारण कुतुल आमाराच्या सभोंवतीं जर्मन सेनापतीच्या देखरेखीखालीं युरोपांतल्यासारखे चराचे चक्रव्यूह रचून ठेवले आहेत. आणि तुर्कहि जमिनींत पुरून घेऊन जर्मनांप्रमाणें लढण्यास शिकले आहेत. शिवाय जानेवारी महिन्यांत डार्डानेलिसच्या सामुद्र-धुनीच्या बाजूचे सर्व इंग्रजी व फ्रेंच सैन्य काढून घेण्यांत आल्यामुळे कान्स्टाटिनोपल येथून बगदादकडे किंवा सुवेझ कॅनालकडे मोठी कुमक पाठविण्यास सवड झाली आहे. सुवेज कॅनॉलवर हल्ला करण्यास हवापाण्याच्या दृष्टीनें फेब्रुवारीसारखा दुसरा अनुकूल महिना नाहीं. तेव्हां कान्स्टाटिनोपलचें सैन्य या हंगामाचे वेळीं सुवेजकडे वळणें साहजिक आहे. तथापि एक महिनाभर आपल्या जाळयांत सांपडलेल्या जनरल टाऊनशेंडच्या सैन्यास खाऊन टाकून युफ्रैतीस–तैग्रीस नद्यावर तुर्की फौजेची फत्ते करून बगदादच्या पायावर उभें राहून सर्व इराणला ग्रासण्याचा लोभ कान्स्टांटिनोपलच्या सेनेस कदाचित् इराणी आखाताकडेहि ओढून आणण्याचा संभव आहे. तुर्कांचा अधिक रोख इराणकडे आहे कां इजिप्तकडे आहे हें फेब्रुवारी महिन्यांत दृष्टोत्पत्तीस येईल.

# दुसऱ्या वर्षांचा फेब्रुवारी-मार्च महिना

हिंवाळ्यांत थंडीमुळें युद्धास आलेला थंडपणा फेब्रुवारी महिन्यांत नाहींसा होऊन वसंतकाळच्या सुरुवातीलाच युद्धास रंग चढण्यासहि पुन्हां प्रारंभ झाला. बर्फाबरोबर तहाच्या गोष्टीहि विरघळून गेल्या, आणि रणभूमीवर कोणच्याना कोणच्या तरी पक्षाचा पक्का पराभव झाल्याखेरीज तह होण्याची चिन्हें नष्ट झालीं. फेब्रुवारी महिन्यांत पार्लमेंट सभेमध्यें दोन सभासदांनी अशी सूचना आणिली होती कीं मध्यस्थाच्या तडजोडीनें तह होण्यास सांप्रतची वेळ अनुकूल असल्यामुळे इंग्रज सरकारनें तहाच्या वाटाघाटीकडे लक्ष पोंचवावें. या सूचनेचा जोराचा निषेध मुख्य प्रधान मि. आस्क्विथ यांनी केला, आणि असें जाहीर केलें कीं, बेल्जम सर्व्हियासारख्या लहानसान राष्ट्रांना पूर्ण स्वातंत्र्य मिळून लष्करी जबरदस्तीनें दुर्बलांच्या हक्काची पायमल्ली करण्याची जर्मनीला लागलेली खोड रणभूमीवर मोडली जाईल तों तहाच्या गोष्टी बोलण्यास किंवा ऐकण्यास इंग्लंडांत कोणीहि तयार होणार नाहीं. रशियाच्या ड्यूमा सभेंतहि, रशियाच्या नव्या मुख्य प्रधानानें वरील प्रकारचे उद्गार काढले. जर्मन राष्ट्रास जिंकण्याचा आमचा हेतु नाहीं, किंवा जर्मनीच्या लोकांना परक्यांच्या गुलामगिरीत जखडून ठेवण्याचीहि आमची इच्छा नाहीं, तर जर्मनीच्या सत्तेखालीं रशियाच्या ताब्यांतील कोणच्याहि लोकांना दिवस कंठण्याची पाळीहि येऊं नये एवढ्याच करितां आम्ही लढत आहों असें रशियानें जाहीर केलें आहे. तेव्हां आतां वसंतकाळच्या म्हणजे मे-जून अखेर-पर्यंतच्या लढाया लढल्या जाईतों तहाच्या वाटाघाटीकडे मागें वळून पहाण्याचें कारण नाहीं.

## अर्झरूम व तुर्की युद्ध

फेब्रुवारीच्या पहिल्या पंधरवड्यांत एक व दुसऱ्या पंधरवड्यांत एक अशा दोन महत्त्वाच्या लढाया झाल्या. पहिली अर्झरूमची लढाई व दुसरी व्हर्डूनची लढाई. व्हरडूनची लढाई फ्रान्समध्यें पॅरीस शहराच्या ईशान्येस सुमारें १२५ मैलां-वर तारीख २० फेब्रुवारीला सुरू होऊन मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यांत त्या लढाईचा भयानकपणा यत्किंचित्‌हि कमी झाला नव्हता. व्हर्डूनच्या लढाईचें

वर्णन वाचकांपुढें मांडून लष्करी धोरणानें त्या लढाईच्या उत्पत्तीची व परिणामांची चर्चा करण्यापूर्वी अर्झरूमच्या लढाईकडे लक्ष पुरविलें पाहिजे. अर्झरूमच्या लढाईस जानेवारीअखेर सुरुवात होऊन फेब्रुवारीच्या पहिल्या पंधरवडयात अर्झरूमचें मजबूत ठाणें रशियाच्या हातीं पडलें आणि त्या बाजूच्या तुर्की सैन्याचा पक्का पराभव झाला. अर्झरूमचें ठाणें काळा समुद्र व इराणची वायव्य सरहद्द यांमधील तुर्की टापूचें केंद्रस्थान होय. काळा समुद्र व व्हॅन सरोवर यांमधील डोंगराळ प्रदेशात अर्झरूमचा किल्ला असून या किल्ल्याच्या उत्तरेस रशियाच्या रोखानें शेंपन्नास मैल उच उंच डोंगरांच्या इतक्या रांगा आहेत कीं, अर्झरूमचें ठाणें स्वाभाविक मजबुतीच्या दृष्टीनें अभेद्यच समजलें जातें. अर्झरूमच्या ठाण्यांत बसलेल्या तुर्की फौजेची दृष्टि उत्तरेस रशियाच्या काकेशियस प्रांतावर पडते व पश्चिमेस इराणच्या वायव्य कोपऱ्यावर पडते. इराणचा वायव्य कोपरा रशियास फार महत्त्वाचा आहे. रशियन सत्तेचा प्रवाह काकेशियस प्रांतांतून निघून इराणची राजधानी जे तेहरान शहर तेथपर्यंत अव्याहत वाहात जाण्यास इराणच्या वायव्य प्रांतावर कोणाचीहि पापी दृष्ट पडतां कामा नये. हा वायव्य प्रांत जर रशियाच्या एकटयाच्याच दृष्टिपथांत राहिला नाहीं तर तेहरानचे राजधानींत रशियास मान राहणार नाहीं, व रशिया इराणच्या दृष्टीने कमकुवत ठरेल. इराणच्या राजधानीकडे पाहिलें तर असें लक्षांत येईल कीं, मोठया रशियन सैन्यास तेहरानवर चाल करून जाण्यास दोनच मार्ग आहेत. एक काकेशियस प्रांतांतील रशियन सैन्यानें इराणच्या वायव्य दिशेनें इराणांत शिरून काजवीन शहरापर्यंत आगगाडीनें जावें आणि तेथून तेहरान शहर गांठावें; दुसरा मार्ग म्हणजे कास्पियन समुद्र व अफगाणिस्तान यामधील रशियन आगगाडीने तेहरानच्या ईशान्येस सैन्य उतरून तेथून तेहरानवर चाल करून जावें. या दोन मार्गांपैकीं ईशान्येच्या मार्गापेक्षा वायव्येचा मार्गच रशियास अधिक महत्त्वाचा आहे. ईशान्येचा मार्ग म्हणजे कास्पियन समुद्राच्या पूर्वेकडील मुलखातील मार्ग एकतऱ्हेनें धोक्याचा आहे. कारण या मार्गाच्या आगगाडया शेंकडो मैल मुसलमान वस्तीतून जात असून रशियांतील मुख्य लष्करी केंद्रापासून या आगगाडया फार दूरवर आहेत. १९१५ सालच्या पीछेहाटीनें मध्य रशियातील मुसलमानी वस्तीत रशियाची इज्जत साहजिकपणें कमी झालेली आणि इंग्रजी आरमारावर व फौजेवर तुर्कांना मिळालेल्या विजयामुळे सर्व मुसलमानांना भलतींसलतींच स्वप्नें

ढूं लागलेली! अशावेळीं ईशान्येच्या मार्गानें इराणास–निदान इराणच्या राजधानीस–आपण आपल्या पंजांत धरून ठेवू असें रशियानें म्हणणें धोक्याचें होय. हे संकट ओळखून रशियानें तुर्की युद्धाच्या प्रारंभापासून इराणचा वायव्य प्रांत तुर्कांच्या संसर्गदोषासहि पात्र न होईल असें करण्याची तजवीज आरंभिली. प्रारंभींच्या सारकामिस येथील विजयानंतर रशियानें आझेरूमचें ठाणें घेण्याचा व व्हॅन सरोवरासभोंवारचा टापू कबजांत घेण्याचा प्रयत्न केला, पण युरोपांतील युद्धाकडे अधिक लक्ष पोंचवावें लागल्यामुळें या प्रयत्नांत रशियास यश आलें नाहीं; आणि हिंवाळयाच्या प्रारंभीं व्हॅन सरोवराच्या पूर्वेस इराणी मुलखांत तुर्कांचा धुडगूस अधिक वाढला. रशियाच्या पिछेहाटीमुळे इराणांत तुर्कांचें व जर्मनांचें प्रस्थ माजेल, इराणी सरकार तुर्कांना सामील होईल आणि नंतर महायुद्धाचा वणवा मध्यरशिया, बुखारा, अफगाणिस्तान, बलुचिस्तान या सर्व मुसलमानी प्रदेशांना व्यापून जाईल असें दुष्ट भविष्य जर्मनीनें वर्तविलें होतें. हे भविष्य युक्तिजुक्तीस सोडून नाहीं, तर पराजयाच्या पोटीं असल्या अमंगल गोष्टी जन्मास यावयाच्याच, हे रशिया ओळखून होता. गेल्या सालच्या पीच्छेहाटीच्या अखेरीस रशियाचे मुख्य सेनापति ग्रँड ड्यूक निकोलस याच्याकडचा लष्करी अधिकार ज्यावेळीं रशियाचे बादशहा झारसाहेब यांनीं आपल्या हातीं घेतला त्यावेळीं ग्रँड ड्यूक निकोलस यांना काकेशियस पर्वताचे सेनापति नेमून तुर्कांवर पाठविण्यात आलें. एवढा मोठा मनुष्य या बाजूला का नेमला? काकेशियस पर्वताचा अधिकार हाणजे एकप्रकारची हद्दपारीच होती काय? पीच्छेहाटीमुळे ग्रँड ड्यूक निकोलस यांचा नांवलौकिक कमी झालेला व झारसाहेबांना स्वतः सेनापति व्हावें लागलें ही गोष्ट खरी आहे. पण ग्रँड ड्यूक निकोलस यांची मानखंडना कोठें तरी कांहींतरी दर्जा देऊन झाकून काढावी लागली हें मात्र खरें नव्हे. युरोपांतील युद्धाच्या खालोखाल रशियाला दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे इराण व मध्यरशिया येथील मुसलमानांवर युरोपांतील पराजयाचा कांहीं एक परिणाम होऊ न देणें ही होय. जर्मनीचा पराजय करणें किंवा जर्मनीपुढें मागें न हटणें हें मुख्य काम ग्रँड ड्यूक निकोलस यांना साधलें नाहीं तरी दुसऱ्या बाबतींत निदान यश मिळवून आपला नांवलौकिक पुन्हां प्रस्थापित करण्याची संधि त्यांना मिळावी म्हणून काकेशियस पर्वताची जागा देण्यांत आली. नोव्हेंबर डिसेंबरात

काकेशियस पर्वतात ग्रँड ड्यूक निकोलस यांनीं सभोंवतालची सर्व परिस्थिति निरीक्षण केली; आणि पाहिलें कीं, तुर्कांची चोहोंकडे सरशी होत असून इराणांत मुसलमानांची तब्येत वरीच बिघडली आहे. गॅलिपोली मधून इंग्रजांचें व फ्रेंचाचें सैन्य काढून घेण्यांत आलें, आणि बगदादजवळ गेलेले जनरल टाऊनशेंड डिसेंबरांत मागे परत फिरून जानेवारी प्रारंभापासून तुर्कांच्या वेढयात कुतुलआमाराचें ठाणें पकडून राहिले. तुर्को–जर्मनांची इज्जत इराणात वाढली. इराणात चोहोंकडे बंड होऊन जर्मनीनें दिलेल्या लांचेच्या जोरावर बंडवाले इराणी सरकारासहि आपल्यास सामील करून घेतात की काय अशी भीति उत्पन्न झाली. जर्मनीच्या खटपटयाचा बुजबुजाट सर्व इराणभर झाला; आणि कांहीं लष्करी खटपटे अफ-गाणिस्तानातहि येऊन दाखल झाले. या सर्व स्थितीचा प्रतिकार कसा करावयाचा ? रोगाची बाह्य चिन्हें कोणचीं व मुख्य स्थान कोणचें ? वरवरचे उपाय तावडतोब करण्यात आले. इराणची राजधानी तेहरान शहर रशियन सैन्यानें गाठलें. दक्षिणेस हमदान, कर्मनशहा, कुम वगैरे ठिकाणांतून बंडखोरांना रशियानें पिटाळून लावलें आणि पूर्व इराणात व बलुचिस्तानच्या पलीकडे इंग्रजांनीं फौज पाठवून बंडखोरांचे बेत हाणून टाकले. अफगाणिस्तानचे अमीर मैत्रीचे वचनानें इंग्रजांच्या पक्षाचे पूर्णपणे झाले असून बलुचिस्तानचे सरदारहि पक्के राजनिष्ठ आहेत. कलकत्त्याहून बलुचिस्तानपर्यंत जितकें अंतर त्याच्या दुप्पट अंतरावर पश्चिमेस असलेल्या तुर्कस्तानातून जर्मनीचे खटपटे दारूगोळा, हत्यारें व तोफा कसे आणून देणार ? जर्मनीच्या खटपटयाच्या थापांना अफगाणिस्थानचे किंवा बलुचिस्तानचे लोक फसतील अशातला मुळींच प्रकार नाहीं. तथापि जर्मन खटपटयांची खटपट चालूच आहे व चालू राहणारहि. जेथें जेथें रोगाचीं चिन्हें दिसतात तेथें तत्काळ उपाय करण्यात येत आहे. पण हे सर्व वरवरचे उपाय झाले. जर्मनीस खटपट करण्यास वळ तरी का मिळावें ? जर्मनीच्या थापांना भुलून लोकांनीं बंड करण्यास का प्रवृत्त व्हावें ? या मानसिक रोगाचें उगमस्थान कोणचें ? रशियाची पिछेहाट, टाऊनशेंडची पिछेहाट व ग्यालिपोलिचा त्याग या तीन कारणांनीं मुसलमानांचें रक्त बिघडलें आहे, आणि हा रक्तातील दोष नाहींसा करण्यास तुर्कांवर मोठा जय मिळाल्याशिवाय गत्यंतर नाहीं असें ग्रँड ड्यूक निकोलस याच्या तावडतोब ध्यानांत आलें. काकेशियस प्रांतातील

रशियन सेनापतींनीं धिमेपणानें तुर्कांची खोड मोडण्याचा उद्योग आरंभिला. तुर्कांचा अर्झरूम प्रांत तुर्की राजधानीपासून फार अंतरावर पूर्वेस इराणच्या सरहद्दीवर असून तेथें दारूगोळा व सैन्य पोंचविण्याचे दोन मार्ग आहेत. त्यापैकीं पहिला सोपा व दुसरा अवघड किंवा लष्करी दृष्टया निरुपयोगी. काळया समुद्रांत ट्रेबीझाँडचे किल्लयाजवळ सामानसुमान व लोक उतरून तेथील अर्झरूमच्या टापूत त्यांना रवाना करून देणें हा पहिला मार्ग झाला. आणि दुसरा मार्ग म्हणजे अर्झरूमच्या दक्षिणेस चार पांचशें मैलावर बगदाद रेल्वेच्या आलेल्या फाटयाच्या स्टेशनांतून सामानसुमान रवाना करणें हा होय. पण या चार पांचशें मैलांत चांगले रस्ते नाहींत. मुलूख डोंगराळ तेव्हां मोठया लष्कराला किंवा अवघड सामानाला या प्रांतांत सुखसंचार करतां येणें शक्य नाहीं. काळया समुद्राची अशी स्थिति आहे कीं, त्यावर तुर्कांचें जरी वर्चस्व नसलें तरी रशियाचीहि पूर्ण हुकमत चालत नाहीं. तेव्हां ग्रँड डयूक निकोलस यांनीं अशी युक्ति केली कीं, काळया समुद्राच्या पश्चिम भागांत रशियाचें मुख्य आरमार पाठवून तुर्की जर्मन आरमारांतील गोबेन, ब्रासला वगैरे लढाऊ जहाजांना डिसेंबर जानेवारी महिन्यांत एकसारखें गुंतवून ठेवलें व कांहीं प्रसंगीं थोडीशी दुखापत करून दुरुस्ती करतां बंदरांत पडून रहाणें भाग पाडलें. काळया समुद्राच्या पश्चिम भागांत असल्या आरमारी चकमकी चालू असतां पूर्व भागांत ट्रेबीझाँडच्या आसपासच्या किनाऱ्याजवळ म्हणजे ज्या किनाऱ्यापासून सामानसुमानाचा पुरवठा होऊं शकतो त्या किनाऱ्याजवळ तुर्कांचे सचवे होडया व तिरकटी जहाजें बुडविण्याचा सपाटा चालविला. काळया समुद्राच्या दक्षिण किनाऱ्यानें तुर्कांची मोठया शिडांची तारवें ट्रेबीझाँडकडे सामानसुमान घेऊन जाऊं शकतात. या तारवांचा संहार करून अर्झरूमवरील मोठया स्वारीची तयारी ग्रँडडयूक निकोलस यांनीं केली. सदर तारवांचा संहार म्हणजे मोठया स्वारीची तयारी होय हे तुर्कांच्या लक्षांत कसें आलें नाहीं? अर्झरूमच्या टापूवर मोठी स्वारी होईल असा अदाज तुर्कांनीं कां बांधला नाहीं? तुर्क गाफील राहिले याचें कारण थंडीच्या मोसमामुळें रशिया येवढी मोठी स्वारी अर्झरूमवर करण्यास धजेल असें त्यास वाटलें नाहीं हे होय. कॉकेशियस पर्वत व अर्झरूमच्या आसपासचे डोंगर हे हिवाळयांत बर्फानें आच्छादलेले असतात. कांहीं ठिकाणीं गुडघाभर व कमरेपर्यंत तर कांहीं ठिकाणीं छाती इतकें बर्फ पडतें. शिवाय सोसाटयाचे वारे चालून धुळीच्या वादळाप्रमाणें कापसासारख्या

विरळ स्थितींत असलेल्या बर्फाची वावटळ या डोंगराच्या डोक्यावरून त्या डोंगराच्या डोक्यावर आणि या दरींतून त्या दरींत एकसारखी घिरट्या घालीत फिरत रहाते. बर्फाच्या सैतानाचा असा धुमाकूळ चालत असतांना कोणचे मोठें लष्कर तेथें मरायला जाणार ? पण ग्रँड ड्यूक निकोलस यांनीं या थंडीच्या पिशाच्चांना गाडण्याची एक चांगली युक्ती काढली. रशियाचा सैबेरिया प्रांत बारा महिने बर्फानें आच्छादिलेला असतो. बर्फात उठणें, बर्फात बसणें हा त्या प्रांताचा नेहमीचा जीवनक्रम. बर्फाच्या धुळीच्या वावटळी व बर्फाच्या सैतानाचे खेळ या सर्व आपली सैबेरियाच्या नेहमींच्या ओळखीच्या असल्यामुळें सैबिरियांतील लढवय्यांचें लष्कर अर्झरूमच्या स्वारीवर पाठविण्यांत आलें. त्याचा परिणाम असा झाला कीं अमकातमका डोंगर रशियास ओलांडताच यावयाचा नाहीं, अशा भिस्तीवर तुर्कांनीं रात्रीं घोरत पडावें व बर्फाची वावटळ चालू असताहि रशियन सैन्य रात्रीं अपरात्रीं त्याच्यापुढें उभें ! रशियापुढें आपलें कांहीं चालत नाहीं असें पाहून जानेवारी अखेरीस तुर्क मागें हटू लागले, आणि अर्झरूमच्या उत्तरेकडची चाळीस पन्नास मैलावरची मजबूत टाणीं एकामागून एक रशियाच्या ताब्यात जाऊ लागलीं. अखेरीस फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यांत अर्झरूमचा मुख्य किल्लाहि रशियाने घेतला आणि तुर्की सैन्य ट्रेबीझांडच्या रोखानें अर्झरूमच्या पश्चिमेस व वायव्येस चाळीस पन्नास मैल मागें हटलें. या युद्धात रशियानें १३ हजार तुर्की सैन्य कैद केलें आणि अर्झरूमच्या किल्ल्यावरील सर्व अवजड तोफा रशियाच्या हातीं लागून ग्रँड ड्यूक निकोलस याचा चोहींकडे जयजयकार झाला.

अशारीतीनें अर्झरूम येथें रशियास मिळालेला हा मोटा विजय स्थानिक दृष्ट्या फार महत्त्वाचा खरा, पण इराणच्या दृष्टीनें तो विशेष फलदायक आहे. अर्झरूमच्या टापून व व्हॅनच्या सरोवराच्या टापूत जर तुर्कांची सरशी झाली असती, तर इराणचा वायव्य कोंपरा तुर्कांनी व्यापून टाकला असता, आणि कास्पियनच्या रशियन ठाण्यावर चाल करून जाऊन तेहरान आणि काकेशियस पर्वत हीं एकमेकांपासून अलग करून सोडलीं असतीं. आता तेहरानवरील रशियाची सत्ता अबाधित झाली. तेहरानला तुर्कांपासून यापुढें त्रास व्हावयाचा तो बगदाद येथून व्हाव याचा, बगदाद येथील तुर्को—जर्मन सैन्यानें इराणांत घुसून कर्मनशहा—असदाबादपर्यंत

कर्मनशहा येथें तुर्की सैन्याचा फेब्रुवारी अखेरीस पराभव केला. अर्झरूम येथील रशियाच्या विजयामुळें इराणांतील रशियाची इज्जत आतां वाढली असून इराणातील तुर्को–जर्मनांचे बेबंदशाहीम बराच आळा पडला आहे. अर्झरूमच्या टापूतून खालीं उतरून चारशे पांचशे मैल दक्षिणेस असलेल्या बगदाद रेल्वेवर रशियन सैन्य स्वारी करील कीं काय, व त्यामुळें युफ्रेतीस तैग्रीस नदीकांठच्या इंग्रज व तुर्क यामध्ये चाललेल्या लढाईवर कांहीं परिणाम होईल कीं काय, असा याठिकाणीं एक प्रश्न उत्पन्न होतो. वसंतकाळच्या व त्यानंतरच्या युरोपांतील लढाया आटपून जाईतो म्हणजे आणखी पांच सहा महिने निदान रशिया या बाजूनें खालीं सरकणार नाहीं. आपल्या आगगाडीचा पाया सोडून रशिया आताच दोनशे मैल खालीं सरकला आहे, आणि आणखी पांचशें मैल विन आगगाडीनें डोंगरांतून खालीं सरकून स्वतःच्या आगगाडीच्या पायावर उभे राहिलेल्या तुर्की सैन्याशीं निकराची झुंज करणें धोक्याचें आहे. शिवाय अर्झरूम किल्ल्यातून मागें हटलेलें तुर्की सैन्य अद्याप जिवंत उभे आहे. या सैन्याची विल्हेवाट रशियास प्रथम लावली पाहिजे, आणि नंतर इतर ठिकाणाकडे पाहिलें पाहिजे. बगदादच्या टापूवर जर प्रत्यक्ष स्वारी रशियाची होणार नाहीं तर अर्झरूमच्या विजयाचा अप्रत्यक्ष परिणाम तरी तेथें कोणचा होणार ? इराणांत रशियाची इज्जत वाढली व तुर्को–जर्मनांची कमी झाली. ही स्थिति पालटविण्याचा जोराचा उद्योग बगदाद येथील तुर्की सैन्याकडून मार्च एप्रिल महिन्यांत करण्यांत येईल. अर्झरूम येथे तुर्कांनीं जे गमावलें तें तेथेंच त्यांना कमावतां येणें शक्य नाहीं. काळ्या समुद्रावर जर तुर्कांचें वर्चस्व स्थापित झालें तरच ती गोष्ट शक्य आहे. तेव्हां अर्झरूम येथे गमावलेलें इराणांत व विशेषतः दक्षिण इराणांत कमावण्याचा लोभ तुर्कांना सुटावा हे साहजिक आहे. बगदादचा पाया करून त्या पायावर सुरक्षितपणें उभे राहून इराणांतील तुर्की सैन्यास आणखी लाख दीड लाख सैन्याची कुमक पाठविण्याचा उद्योग तुर्कांकडून होईल असा कांहींचा अदाज आहे. सुवेजच्या कालव्यावर हल्ला करण्यास फेब्रुवारी महिना हवापाण्याच्या दृष्टीनें अनुकूल समजला जातो, पण फेब्रुवारी महिन्यांतहि त्या बाजूला तुर्कांनीं कांहीं हालचाल दाखविली नाहीं; आणि इकडे तर अर्झरूम पडून इराणांत तुर्कांची बेइज्जत झाली. तेव्हां सुवेज कालव्यावरील स्वारीचें घोंगडें तसेंच भिजत टाकून व त्या स्वारीच्या भयानें बरेंच मोठें इंग्रजी सैन्य इजिप्तांत

गुंतवून ठेवून तुर्क बगदादकडे विशेष लक्ष पोचवितील असा कांहींचा तर्क आहे. तसें झाल्यास अमदान—कर्मनशहा प्रांतांत तुर्क व रशियन यांमध्यें बऱ्याच निकराच्या लढाया होतील, आणि युफ्रेतीस तैग्रीस नद्यांच्या कांठीं कुतुल—आमाराचे टापूतहि इंग्रजांना आपल्या शौर्याची कमाल करून दाखवावी लागेल. फेब्रुवारीचे प्रारभीं तुर्कांचें वेढयांत कुतुल—आमाराचें मजबूत ठाणें पकडून बसलेल्या जनरल टाऊंडशेंड यांच्या सैन्याची जी स्थिति होती तीच स्थिति मार्च महिन्याच्या प्रारभीं कायम आहे. जनरल टाऊंडशेंड यांजपाशीं पुरेशी अन्नसामुग्री असून अन्नान्नगत होऊन ते शत्रूला शरण जातील अशांतला भाग नाहीं. शिवाय कुतुल—आमाराचें ठाणें त्यांनीं इतके मजबूत केलें आहे कीं, हल्ला करून तें ठाणें घेणें तुर्कांना शक्य नाहीं. कुतुल आमाराच्या ठाण्यांत भाजीपाला लावीत आणि ग्रामोफोनची गाणीं ऐकत जनरल टाऊनशेंड बिनधोक राहिले आहेत. बगदादपर्यंत तुर्कांना मागें रेटण्याला फेब्रुवारी महिन्यांत हवापाण्याची अनुकूलता नव्हती. शिवाय कुतुल—आमाराचें ठाणें पकडून वगण्यात बगदादवर चाल करून जाण्याचें जनरल टाऊनशेंड यांचें धोरण वेढयामध्ये आसपासच्या अरबी जातींच्या नीटसें ध्यानांत आलें नाहीं. त्यांना वाटलें इंग्रजांची तरवार बोथट झाली. यामुळे बसरा व कुतुल—आमार या प्रदेशातील इंग्रजांशीं नम्रतेनें वागणाऱ्या अरबी जाती तुर्कांच्या तंत्रानें वागू लागल्या. या रानटी अरबांना इंग्रजांच्या तरवारीची धार किती तीक्ष्ण आहे याचा अनुभव बसऱ्यापासून कुतुल—आमारापर्यंत दोन तीन ठिकाणीं फेब्रुवारींत चांगला आणून दिला. मार्च महिन्यांत नवें इंग्रजी सैन्य कुतुल—आमारास पोचेल व जनरल टाऊंडशेंड बगदादच्या रोखानें पुढे पाऊल टाकू लागतील अशी आशा आहे.

## आड्रियाटिक समुद्र व सालिनोका

बगदादच्या बाजूला तुर्कांचा मोठा जमाव जमत असल्यामुळें इजिप्तच्या बाजूला असलेलें तुर्कांचें सैन्य विशेष हालचाल दाखवीत नसून सुवेज कॅनॉलच्या संरक्षणाची इंग्रजांची तयारी आतां पूर्ण झाली आहे. सुवेज कॅनॉलवर चाल करून जाण्याकरितां तुर्क सिनाई द्वीपकल्पांत लाईट रेल्वे बांधीत असून या लाईट रेल्वेबरोबर जरी तुर्क पुढें आले तरी त्याचा फारसा उपयोग होणार नाहीं. कारण लाईट रेल्वेवर भिस्त ठेवून बिनपाण्याच्या टापूंत मोठया सैन्यास हालचाली करणें कठीण आहे. सुवेज गांवाच्या रोखानें बांधल्या जाणाऱ्या ह्या लाईट रेल्वेबरोबरच भूमध्य

समुद्राच्या किनाऱ्यानें मोठा रेल्वेचा एक फांटा सुवेज कॅनॉलच्या रोखानें जर्मनी बांधीत आहे. हा फाटा अजून इजिप्तच्या सरहद्दीपर्यंत म्हणजे कॅनॉलच्या पूर्वेच्या शभर मैलांच्या ओसाड प्रदेशाचे सरहद्दीपर्यंतहि आलेला नाहीं. इंग्रजांची जय्यत तयारी, तुर्कांच्या नव्या आगगाडीच्या गोगलगाईचें पाऊल, आणि तुर्की लढाईचें बगदादच्या बाजूस सरलेलें केंद्रस्थान, या तिन्ही गोष्टींचा विचार केला म्हणजे कालवा ओलांडून इजिप्तांत घुसण्याच्याच हेतूनें तुर्कांची इजिप्तवर स्वारी होण्याची वानवाच आहे असें म्हणावें लागतें. मग वसंतकाळांत नुसती तयारी करीत तुर्क स्वस्थ बसणार कीं काय ? स्वस्थ बसतील असेंहि म्हणतां येत नाहीं. कारण, युरोपांत एप्रिल–मे महिन्यांत मोठी धुमश्चक्री सुरू झाल्यावांचून राहणार नाहीं. त्यावेळीं सुवेझ कॅनॉल घेण्यासाठीं जरी नव्हे, तरी सुवेझ कॅनॉलकडे इंग्रजांचें लक्ष वेधण्यासाठीं आणि सॅलिनोकाचें सैन्य सॅलिनोकामधून काढून इजिप्तमध्यें न्यावयास भाग पाडण्यासाठीं इजिप्तभर जोराचा हल्ला मार्च एप्रिल महिन्यांत हवापाणी प्रतिकूल असतांहि जर्मन करवतील असा अदाज आहे. सॅलिनोका येथे बसलेल्या दोन अडीच लाख फ्रेंच–इंग्रज सैन्यास लढण्याचे काम फारसें दिसत नाहीं. जर्मनीचा किंवा बल्गेरियाचा सॅलिनोकावर हल्ला होण्याचीं चिन्हें बिलकूल नाहीत. सॅलिनोका येथील सैन्यानें बल्गेरियावर उलट हल्ला करण्यास दोन तीन गोष्टींची अनुकूलता पाहिजे. पहिली गोष्ट अशी कीं, आल्बेनिया किंवा माऊटनिग्रो येथून सर्व्हियावर हल्ला चढविला पाहिजे; पण ती गोष्ट आतां शक्य नाहीं. कारण सर्व माऊटनिग्रो आणि सर्व आल्बेनिया ऑस्ट्रियाच्या ताब्यांत गेला. आल्बेनियाच्या दक्षिण टोकाचें व्हेलोना बंदर मात्र इटलीच्या ताब्यांत असून तेथे ऑस्ट्रियाशीं निकरानें लढण्याचा इटलीचा निश्चय जाहीर झाला आहे. व्हेलोना बंदर इटलीच्या किनाऱ्यापासून चाळीस पन्नास मैलांचे अंतरावर असल्यामुळे हे बंदर जर ऑस्ट्रियाच्या ताब्यांत गेलें तर आड्रियाटिक समुद्राचें तोंड–निदान अर्धे तोंड–ऑस्ट्रियाच्या ताब्यांत गेल्यासारखे होईल. माऊटनिग्रो व आल्बेनिया हे दोनहि प्रांत ऑस्ट्रियाच्या ताब्यांत गेल्यानें क्याटेरो व डुराझो हीं दोन्ही सोईस्कर व मजबूत बंदरें ऑस्ट्रियाच्या आरमाराला आणि आस्ट्रो–जर्मनांच्या पाणबुड्या बोटींना सुरक्षित विश्रांतिस्थानें झालीं आहेत. ट्रिस्टी, क्याटेरो, व डुराझो अशीं तीन सुरक्षित बंदरें–एक उत्तरेला, एक मध्यावर व एक दक्षिणेला अशा तीन केंद्रस्थानीं–ऑस्ट्रियाला मिळालीं आहेत आणि या तीन ठिकाणांपैकीं पाहिजे त्या ठिकाणीं आपली सर्व आरमारी शक्ति

शत्रूस न कळतां एकवटून सर्व आड्रियाटिक समुद्रभर पसरलेल्या इटालियन आरमाराच्या तुकड्यांवर हल्ला करून जय संपादन करतां येणें ऑस्ट्रियास आतां शक्य झालें आहे. शिवाय मेडिटेरेनियनमध्ये संचार करणाऱ्या आस्ट्रो–जर्मन पाणबुड्या बोटींनाहि आल्बेनियाचा किनारा अधिक उपयोगी पडणारा आहे. या दृष्टीनें विचार केला असतां माऊटनिग्रो व आल्बेनिया आस्ट्रियाच्या ताब्यांत गेल्यानें आड्रियाटिक समुद्रात इटलीचें आरमार संख्येनें व बलानें आस्ट्रियाहून अधिक योग्यतेचें असलें तरी चोरट्या हल्ल्याच्या सोयी आस्ट्रियास अधिक प्राप्त झाल्यामुळे इटलीची स्थिति विघ्नमय झाली असें म्हणावें लागतें. अशा स्थितींत माऊटनिग्रो व आल्बेनिया येथून सर्व्हियावर इटली हल्ला चढवील ही आशा उरली नाहींच; तर उलट माऊटनिग्रो–आल्बेनियातील सर्व काम संपल्यावर आस्ट्रियाच्या सर्व जंगी तोफा इटलीच्या बाजूला एकवटतात कीं काय अशी भीति उत्पन्न झाली आहे. तेव्हा सॅलिनोका येथील सैन्य इटलीच्या सैन्याशीं संगनमत करून बल्गेरियावर चाल करील असा तर्क निघत नाहीं. पहिलें कारण अनुकूल नसलें तरी दुसरें किंवा तिसरें कारण तरी अनुकूल आहे काय तें पाहू या. रोमानिया जर रशियाला मिळाला तर सॅलिनोकाचें सैन्य उत्तरेस चाल करून जाईल. रोमानियाच्या मनाची स्थिति प्रशियास अनुकूल आहे. पण रोमानियाची राजधानी आणि रोमानियाचा पश्चिम भाग वरून ऑस्ट्रिया व खालून बल्गेरिया या दोन जबड्यात सांपडलेला असल्यामुळे रशियास खात्रीनें जय मिळणार असें स्वच्छ दिसल्याशिवाय रोमानिया रशियास मिळणार नाहीं. अर्थात हे दुसरें कारण, तिसऱ्या कारणावर म्हणजे रशियाच्या जयावर अवलंबून आहे. ब्युकोव्हिना व ग्यालिशिया या दोन प्रांतांवर जानेवारी फेब्रुवारी महिन्यात रशियानें जोराचे हल्ले केले. पण फ्रान्समधील चराच्या चक्रव्यूहाप्रमाणे मजबूत चक्रव्यूह ब्युकोव्हिना व ग्यालिशियामध्येहि आस्ट्रो–जर्मनांनी निर्माण केले आहेत असें रशियाच्या अनुभवास आलें. फेब्रुवारी–मार्च महिन्यात बर्फ वितळून नदीनाल्यांना महापूर येऊन रशियन रणभूमीजवळील सर्व दलदलीचीं रानें पाण्यानें भरून जातात. तेव्हां एप्रिल–मे महिन्यापर्यंत रशियाच्या बाजूची रणभूमि भयानक स्वरूप धारण करील असें वाटत नाहीं. एप्रिल–मे महिन्यांत सर्व रशियाचीं रणभूमि जागी होऊन रशियास जय मिळण्यास प्रारंभ झाल्यावर रोमानिया रशियास मिळेल आणि नंतर सॅलिनोकाचे लष्करास उत्तरेस

मोहिमेवर जाण्याची संधि मिळेल, तोंपर्यंत उत्तरेच्या मोहिमेची तयारी करीतच या सैन्यास सॅलिनोका येथें बसलें पाहिजे. मध्यंतरी फ्रान्स किंवा इजिप्त येथें जरुरी लागल्यास मदतीकरितां सॅलिनोकाचें सैन्य नेण्यांत येईल हें सांगावयास नकोच.

## व्हरडूनची लढाई


जानेवारी–फेब्रुवारी महिन्यांत रोमानियाच्या मनावर आपली छाप पडावी म्हणून रशियानें ब्युकोव्हिना व ग्यालिशिया प्रातांत आस्ट्रो–जर्मनावर भडिमार करण्याची आपल्याकडून शिकस्त केली आणि महिना दीड महिन्याच्या अखेरीस रशियास असें आढळून आलें कीं, फ्रान्सच्या रणभूमीसारखे चरांचे चक्रव्यूह त्या टापूतहि आस्टो–जर्मनांनीं निर्माण केले आहेत. रशियाच्या या अनुभवाचा अर्थ काय ? हिंवाळ्यांत दोन तीन महिने दारूगोळा जमवून ठेवल्यानंतरहि असा अनुभव रशियास कां यावा ? चरांचे चक्रव्यूह फोडून पिछाडीस शिरण्यास जितक्या तोफांची व दारूगोळ्यांची तयारी असावी लागते तितक्या तोफांची व दारूगोळ्यांची तयारी रशियाची झालेली नाहीं; अर्थात् एप्रिल–मे महिन्याच्या सुमारास रशिया आस्ट्रो–जर्मनांवर हल्ले करून त्यांना जोरानें मागें रेटील असा अंदाज बांधता येत नाहीं. रशिया जर जर्मनीला मागे रेटू शकणार नाहीं तर जर्मनी रशियावर उलट हल्ले करील काय ? हिंवाळ्याच्या अखेरीस ज्या ज्या ठिकाणीं रशियाची झुंज थांबली त्या त्या ठिकाणी एप्रिल–मेच्या सुमारास जर्मनी झुन्ज सुरू करील अशी अटकळ आहे. जर्मनीच्या या झुन्जेच्या वेळीं गेल्या सालाप्रमाणें .रशियास पिछेहाट करण्याची वेळ येऊ नये म्हणून एप्रिल–मेच्या सुमारास इंग्लड व फ्रान्स जर्मनीवर तुटून पडल्यावांचून रहावयाचे नाहींत. गेले सात आठ महिने अत्यंत स्वार्थत्याग करून कष्ट सोसून सर्व राष्ट्राला राबावयास लावून दारूगोळ्याचे एवढे पर्वतच्या पर्वत निर्माण केले आहेत कीं, एप्रिल–मे महिन्यांत इंग्रज फ्रेंचांपुढें जर्मनीला एकसारखें मागे हटावें लागेल. अशी सर्वांची समजूत झालेली आहे. इंग्लंड–फ्रान्सच्या तयारीवर रशिया विसंबून राहिला आहे आणि त्याला अशी खात्री वाटत आहे कीं, आपल्या अंगावर जरी जर्मनी कोसळून पडला तरी पहिला धक्का एकदां सोसल्यावर जर्मनीस फ्रान्सकडून अशी तंबी मिळेल कीं आपणांस उलट चढाई करण्यास कांहींच हरकत येणार नाहीं. जर्मनीला आशा वाटत आहे कीं एप्रिल–मेच्या सुमारास रशियावर तुटून पडून कोठेंतरी भोसका पडला आणि पिछेहाटीचें

रशियाला भय स्पष्टपणें दिसू लागलें तर एप्रिल–मे महिन्यांतच रशिया तहाच्या गोष्टी बोलूं लागेल. अन्नपाणी, पैसाअडका, व कच्चा माल या संबंधानें आस्ट्रो–जर्मनांची अतस्थ स्थिति पार बिघडलेली आहे आणि आहे या स्थितींत लढाई देत राहून जर १९१६ साल संपूं लागलें तर १९१७ सालच्या प्रारंभाला आस्ट्रो–जर्मन लोकांमध्यें पुढें लढण्यास अंतस्थ त्राण उरणार नाहीं. दोन चार महिन्यांत जर तह झाला तर तो जर्मनीला जरूर पाहिजे आहे. जर्मनीचें घर आंतून फार पोखरलें गेलें आहे. बाहेरचा डोलारा उभा आहे तोपर्यंत प्रत्येकजणाला त्याचें भय वाटेल आणि या भीतीचा बागुलबोवा कायम आहे तोंपर्यंत कसा बसा तह करून एकदा टाकला म्हणजे आपण सुटलों असें जर्मनींतील मुत्सद्यांना वाटत आहे. तह करावयाचा खरा; पण कसा बसा तह करावयास इंग्लंड कोठें तयार आहे? जर्मनीचा पराभव करून जर्मनीला फ्रान्समधून हांकून लावलें असें रणांगणावर सिध्द होईतो अलबत्या गलबत्या तहानें फ्रान्सचें कसें समाधान होणार? इंग्लड व फ्रान्स ही जोडी तयार नाहीं, मग रशिया तरी बरोबरीच्या तहाला कशी संमति देईल? इंग्लंड व फ्रान्स येथील चाणाक्ष मुत्सद्यांनीं जर्मनीचा अंतस्थ क्षयरोग ओळखला आहे, आणि त्यांची बालंबाल खात्री आहे कीं, रणांगणावर जरी जर्मनीचा सेनाशकट मोडतां आला नाही तरी आहे इतकें सभाळून बसून वर्ष दोन वर्षे जर सक्तीनें जर्मनीचा कोंडमारा केला तर जर्मनीचा डोलारा आपोआप कोसळून पडलाच पाहिजे. हें मरण जर्मनीहि ओळखून आहे आणि म्हणूनच दोन चार महिन्यात जर जुळून आला तर पहावें म्हणून जर्मनी धडपड करीत आहे. आणखी पांच वर्षे लढावें लागलें तरी बेहत्तर असा फ्रान्सचा दम आहे; आणि फ्रान्सच्या दमाच्या दुप्पट लांब इंग्लंडचा दम आहे; अशी साक्ष इतिहासानें पटविली आहे. १९१५ सालच्या पीच्छेहाटीची पुनरावृत्ति १९१६ सालीं निघणार असा बाऊ रशियापुढें उभा राहिल्यास रशिया कदाचित् दमांत कमी भरेल; पण हा बाऊ कसा उभा रहावयाचा? एखाद दुसऱ्या ठिकाणीं भोसका पाडून एकदोन महिने पीच्छेहाट झाल्यावर रशियाला फ्रान्स व इंग्लंड यांच्या रणभूमीची विशेषशी आशा वाटली नाहीं तरच वर्षभराच्या पीच्छेहाटीची भीति रशियास वाटणार आहे. रशियावर हल्ला करून एकदोन ठिकाणीं भोसके पाडण्यापूर्वी त्या भोसक्याचे मार्फत तहाचें गाठोडें हातास लागावें म्हणून, १९१६ सालीं फ्रान्सच्या हातून

आपणास चांगला मार देववणार नाहीं, असें रशियाच्या निदर्शनास आणून देणें जर्मनीस जरूर आहे. वरील विचारसरणीस अनुसरून जर्मनीनें जानेवारी अखेरीस व फेब्रुवारीचे प्रारंभीं इसर कॅनाल, यिप्रेस, लेन्स, सोमनदी वगैरे ठिकाणीं इंग्रजांवर व फ्रेंचांवर जोराचे हल्ले केले. कोठें शभर यार्ड, कोठें दोनशें यार्ड, कोठें पाव मैल, कोठें अर्धा मैल अशी जागा जर्मनीस मिळाली. पण हे असले जय किंवा अपजय म्हणजे नेहमींचेंच फुटाणें भाजणें होय अशी स्थिति फ्रान्समध्यें अलीकडे झालेली आहे. दोन तीन आठवडे असले फुटाणें भाजल्यावर पॅरिसच्या ईशान्येस सव्वाशें मैलावर असलेल्या व्हरडून किल्ल्याच्या सभोंवारच्या टेकड्यांवर तारीख १० फेब्रुवारीपासून निकराचे हल्ले करण्यास जर्मनीनें सुरुवात केली. हजार बाराशें तोफा दहा पांच मैलांच्या तोंडावर गोळा करण्यांत आल्या आणि एक आठडाभर व्हरडूनच्या उत्तरेकडील म्यूज नदीच्या कांठच्या टेंकड्यांनीं ' न भूतो न भविष्यति असलें युध्द पाहिलें ! त्या टापूतील सर्व लहान मोठ्या वृक्षांचें भस्म झालें; खडकांची रांगोळी झाली; टेकड्या सपाट झाल्या; नदी नाले मातीनें भरून आले; आणि मैदानांची खोरी झालीं ! पृथ्वीच उलथी पालथी झाली ! ! इतकेंच नव्हे तर फ्रेंचांच्या उलट तोफांचा भडिमार ज्यावेळीं सुरू झाला त्यावेळीं दोहोंबाजूची आग एका ठिकाणीं मिळून आकाशाला भिडणारे आगीचे लोळ आकाशांतहि न मावल्यामुळें सर्व रणभूमीवर दाटले आहेत कीं काय असें वाटलें. एक आठवडाभर अशी अद्भूत लढाई करून जर्मनी अवघे तीन मैल पुढे सरकला आणि व्हरडूनच्या किल्ल्याच्या उत्तरेस चार मैलावर असलेली बाराशे फुट उंचीची ड्युनमानची टेकडी जर्मनीच्या हातीं अखेरः गेली. फेब्रुवारीचे शेवटचे दोन दिवस ही उद्भूत लढाई जरा थडावली, पण मार्चच्या पहिल्या आठवड्यात तिला पुन्हां भरतें आलें आहे. व्हरडूनचा किल्ला सोडण्याची पाळी आल्यास जर्मनीच्या हातीं कांहीं लागू नये असा बदोबस्त करण्यांत आला आहे. आणखी दहा बारा दिवस जर्मनीनें आपलें सैन्य निर्दयपणानें जर रणदेवतेला बळी दिलें तर व्हरडून जर्मनी घेऊं शकेल; पण व्हरडून घेतल्यानें भोसका पडून फळी फुटते अशांतला भाग मुळींच नसून व्हरडूनच्या पुढें नवीन चरांचे चक्रव्यूह तयार करण्यांत आले आहेत असें मार्चच्या प्रारंभीं सिध्द झालें आहे. अर्वाचीन तोफांच्या भडिमारापुढें किल्ल्याची मातबरी विशेषशी नाहीं, आणि चरांच्या चक्रव्यूहाला जर भोसका पाडावयाचा असला तर

तो पहिल्या पांच सात दिवसांतच पडत असतो असा गेल्या दीड वर्षाचा अनुभव आहे. व्हरडून जरी जर्मनीनें घेतलें तरी फ्रेंचांची फळी फुटत नाहीं. फ्रेंचांची फळी फोडण्याच्या हेतूने जर जर्मनीनें एवढा अट्टाहास केला असेल तर व्हरडून घेतलें तरी व्हरडूनची लढाई जर्मनीच्या आंगलट आली असाच शेरा इतिहासकारांचा पडेल. पण फळी फोडण्याशिवाय इतर हेतूनें म्हणजे स्वतःचीहि फळी फुटण्यासारखी नाहीं असें सिध्द करण्याच्या हेतूनें जर हा व्हरडूनच्या भूमीला विलक्षण ताप दिला असेल तर लष्करी धोरणाच्या दृष्टीनें फ्रान्सच्या बाजूला जरी नाहीं तरी रशियाच्या बाजूला तरी त्यांना कांहींना कांही मोबदला मिळण्याचा संभव आहे. जर्मनीचा हेतु कोणचा होता हें एप्रिल मे महिन्यांत उघडकीस येईतो व्हरडूनच्या लढाईचा चांगलासा उलगडा होणें शक्य नाहीं.

## व्हर्डूनचें रणक्षेत्र



# दुसऱ्या वर्षाचा मार्च-एप्रिल महिना

फेब्रुवारी महिन्याच्या वीस तारखेचे सुमारास सुरू झालेली व्हर्डूनची लढाई सर्व मार्च महिनाभर कमी जास्ती जोराने चालूच होती; आणि एप्रिल महिन्याच्या प्रारंभीं आणखी कांहीं दिवस ही लढाई तशीच चालू राहणार, अशीं चिन्हे दिसत होतीं. एप्रिल प्रारंभालाहि व्हर्डून जर्मनांच्याहि हातीं लागलें नव्हतें, पण व्हर्डून घेतल्याशिवाय ही लढाई बंद पाडण्याचा जर्मनांचा मानस नाहीं असें स्वच्छ दिसूं लागलें होतें. एप्रिल महिन्याच्या पंधरा वीस तारखेपर्यंत रशियाकडची व इटली-कडची रणभूमि दलदलीची राहील. मार्च प्रारंभाला बर्फ वितळण्याला सुरवात होऊन मार्च अखेरीस सर्व नदीनाले आणि खोलगट जमिनी पाण्यानें भरून गेल्यामुळें ठिकठिकाणीं अतोनात चिखल झालेला आहे; आणि त्यामुळे रशिया व इटली ह्यांच्या सैन्याच्या प्रगतीस हवापाण्याची अनुकूलता नाहीं. ही अनुकूलता प्राप्त होण्यास आणखीं दोन तीन आठवड्यांचा अवकाश आहे. ह्या अवकाशाचा फायदा घेऊन एप्रिलच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यांत व्हर्डून घेण्याकरितां आपल्या बलाची शिकस्त जर्मनीनें केली पाहिजे. त्यानतर जर्मनीला रशिया व ऑस्ट्रियाला इटली स्वस्थ बसू देणार नाहीं. ह्या दोन तीन आठवड्यांत जर्मनी व्हर्डून घेईल काय ? वाजवीहून फाजील लोक जर रणांगणाला जर्मनीनें बळी दिले तर जर्मनी व्हर्डून घेऊं शकेल, नाहीं असें नाहीं; पण गेल्या सहा आठवड्यांचा व्हर्डूनच्या लढाईचा रागरंग जर पाहिला तर आणखी दोन तीन आठवडे व्हर्डूनचें संरक्षण करण्यास फ्रेंच सेना असमर्थ आहे असेंहि कोणास म्हणतां यावयाचें नाहीं. दोन दोन तीन तीन महिने लढून टेकड्यांच्या टेकड्या उध्वस्त करून मनुष्याच्या रक्ताचे पूर नदीनाल्यांना आणून व्हर्डून घेण्यांत जर्मनीला तरी काय मिळणार ? उलटपक्षीं जर्मनीच्या तोफांच्या गोळ्याचा कल्पनातीत पाऊस रणभूमीवर पडत असतांना आपल्या सैन्याची विशेष खराबी करून घेऊन व्हर्डूनचें संरक्षण करण्यांत तरी फ्रान्सला फायदा कोणचा ? लष्करी धोरणाच्या दृष्टीनें विचार केला असतां दोन महिन्यांनंतर व्हर्डून घेण्यांत जर्मनीलाहि विशेष फायदा नाहीं. इतकेंच नव्हे तर वाजवीहून फाजील दिवस एकाच जागीं अतोनात रक्त ओतून संपादिलेला विजय

एक प्रकारें घातकच होणार आहे. जेवढी सेना जर्मनीनें व्हर्डूनपुढें आतांपर्यंत बळी दिली व ह्यापुढें बळी द्यावी लागेल तेवढ्या सेनेनें योग्य काळीं व योग्य स्थळीं ह्याहून दसपट अधिक कार्य केलें असतें. स्थळ व काळ योग्य आहे कीं नाहीं हें आठदहा दिवसांच्या झटापटींत दिसून येतें. पहिल्या दहा दिवसांच्या भयंकर लढाईनंतर फ्रेंचांची फळी फोडण्यास व्हर्डूनचें स्थळ अयोग्य आहे असें दिसून आल्यावर मग एवढा अट्टहास कां ? यिप्रेसच्या आसपास जर्मनी असाच १९१४ सालीं एक महिना लढला; १९१५ सालीं वार्साचे आसपास जर्मनी अशाच निकरानें एक महिना लढला; आतां व्हर्डूनचे आसपास दीड महिना झाला तरी जर्मनीच्या हल्ल्यांचा जोर कायम आहे. फ्रेंच लोकांनीं मार्च अखेर प्रसिद्ध केलें आहे कीं, जर्मनीनें आणखी कितीहि जोराचे हल्ले केले तरी यिप्रेसप्रमाणें व्हर्डूनलाहि जर्मन सैनिकांचे पाय लागणार नाहींत. एप्रिलच्या पहिल्या दोन तीन आठवड्यात व्हर्डून जर्मनीच्या हातास लागो किंवा फ्रेंचांच्या हातांत राहो, एवढी मात्र गोष्ट खरी कीं, रशियन व इटालियन रणभूमि एकदोन आठवड्यांनीं पुन्हां जाज्वल्य स्वरूप धारण करतील, आणि पश्चिम रणभूमि म्हणजे फ्रान्सची रणभूमि पुन्हां निद्रावस्थेस जाईल. एप्रिल महिन्यांत खुद्द व्हर्डूनचें शहर जरी जर्मनीनें घेतलें नाहीं तरी एप्रिल अखेर व पुढें दोन तीन महिने फ्रेंच्याच्या रणभूमीला निद्रावस्था आपोआप प्राप्त होण्याइतका विराट स्वरूपाचा धिंगाणा व्हर्डूनच्या सभोंवर घातल्याचें श्रेय जर्मनीला मिळणार आहे. पश्चिम रणभूमींत स्वित्झर्लंडच्या सरहद्दीपासून तों बेल्जमच्या समुद्र किनाऱ्यापर्यंत एकसारखी चरांची रांग तयार झाली आहे. स्वित्झर्लंडच्या सरहद्दीपासून जी चरांची रांग पश्चिमेपासून पूर्वेकडे जावयास निघाली आहे ती उत्तरेकडे किंचित् झुकती होऊन पारिस शहराच्या उत्तरेस पन्नास मैलांवरून जाऊन सोमनदी ओलांडल्यावर उत्तर वाहिनी होते आणि यिप्रेसच्या आसपास वायव्य वाहिनी होऊन समुद्राला मिळते. स्वित्झर्लंडच्या सरहद्दीपासून तों सोमनदीपर्यंत ही रेषा जवळ जवळ सरळ रेषा असल्यासारखीच आहे. व्हर्डूनच्या दक्षिणेस व व्हर्डूनच्या उत्तरेस दहा पंधरा मैलांवर मात्र त्या रेषेस मुरड पडली आहे. व्हर्डूनच्या दक्षिणेस सेंट मिचेल येथें ही रेषा उत्तर वाहिनी होऊन व्हर्डूनच्या उत्तरेस दहाबारा मैलांवर जाऊन नतर वायव्याभिमुख होऊन म्यूज नदी ओलांडून दक्षिणेकडे वळण घेऊन पुन्हां मूळ रेषेस मिळावयास जाते. व्हर्डूनच्या उत्तरेस आंत गेलेल्या या त्रिकोणास फ्रेंचांची पाचर असें म्हणतात. ह्या त्रिकोणाचा कांहीं

भाग म्यूज नदीच्या पूर्वेस आहे व कांहीं भाग पश्चिमेस आहे. या पाचारेंतील म्यूज नदीच्या दोन्ही कांठाला लहान मोठया टेकडयांचें जाळें पसरलें असून व्हर्डूनचा किल्ला या डोंगराळ प्रदेशाच्या केंद्रस्थानीं आहे. म्यूज नदी कांठचा हा टेकडाळ प्रदेश लष्करी धोरणाच्या दृष्टीनें व डावपेंचांच्या दृष्टीनें फार महत्वाचा आहे. फ्रान्सच्या ईशान्येकडून म्हणजे जर्मनीच्या मध्यांतून मोठें सैन्य पारिस शहरावर जर चाल करून येऊं लागलें तर म्यूज नदीच्या या टेकडया व व्हर्डूनचा किल्ला ओलांडणें त्याला भाग आहे. या टेकडया व हा किल्ला घेतल्यानंतर फ्रान्सच्या ईशान्य कोंपऱ्यांतील डोंगराळ प्रदेश संपतो; आणि नंतर सपाट मैदानास प्रारंभ होतो. म्हणूनच व्हर्डूनच्या किल्ल्यास पारिसच्या मैदानाचा दरवाजा असें म्हणण्याची वहिवाट आहे; पण चरांच्या चक्रव्यूहाच्या युक्तीनें पारिसच्या मैदानाचा दरवाजा या नात्यानें महत्व व्हर्डूनला उरलेलें नाहीं. व्हर्डून घेतल्यानें पारिसचा रस्ता खुला होतो अशांतला भाग मुळीच नाहीं. व्हर्डून घ्यावयाला दोन महिने लागले तर व्हर्डूनच्या रस्त्यानें पारिसला पोचावयाला जवळ जवळ बारा महिने लागतील, आणि त्यावेळीं जर्मन सेना इतकी निर्बल होईल कीं, जर्मन सेना पारिसजवळ पोचली असें म्हणण्याऐवजीं फ्रेंचांनीं बर्लिन गाठलें असें त्यावेळीं म्हणावें लागेल. चरांच्या चक्रव्यूहामुळें आतां अमका भाग दरवाजा, अमका भाग बाहेरची भिंत, अमका भाग आंतील भिंत, असली भापाच उरलेली नाहीं. जर्मन जर कधींकाळीं व्हर्डून मार्गानें पारिसला पोंचले तर त्यांना चराच्या रांगा फोडून मागील चर तयार होण्यापूर्वी आंत घुसून पोचावें लागेल. फळी फोडणें हाच काय तो त्या चक्रव्यूहावर इलाज आहे आणि पहिल्या पांच दहा दिवसांच्या धमकी-सरशी फळी जर फुटली नाहीं तर पांच दहा मैल चक्रव्यूह घेतल्यानें पुढील मैदानाचा दरवाजा उघडतो असें मुळींच नाहीं. चक्रव्यूहांनीं केलेली ही क्रान्ति जर्मनांना पूर्णपणें माहीत असतां पारिसच्या मैदानाचा दरवाजा उघडावा म्हणून ते दीड महिना लढत आहेत असें कसें म्हणावें ? पारिसवर चाल करून जाण्यासाटीं जर ही व्हर्डूनची लढाई नव्हे तर ती कशासाटीं आहे ? व्हर्डूनच्या आसपासच्या म्यूज नदीच्या कांठच्या टेकडया घेऊन मग मैदानावर उतरण्यापेक्षा ऐन नदी ओलांडून मार्न नदीच्या मैदानावर म्हणजे पारिसच्या मैदानावर उतरण्यास कोणची हरकत आहे ? खुद्द पारिस सहराच्या उत्तरेस चाळीस-पन्नास मैलांवर जर्मनीच्या

चरांची रांग आहे. तोफखान्याच्या माराखालीं आस्तेआस्ते वाट पाडीत थोडें पुढें सरकत जर पारिस गांठावयाचें तर या चाळीस मैलांच्या ठिकाणीच कां तोफांचा भडिमार दीड महिन्यापूर्वी सुरू केला नाहीं ? पारिस गांठण्याकरितां सोईची जागा तीच. मध्ये टेकडया वगैरे नाहींत, सपाट मैदान आहे. कधीं पाव मैल, कधीं अर्धा मैल, असें करीत करीत जर जर्मन्स पुढें सरकले असते तर एव्हांना जर्मन्स पारिसच्या उत्तरेस वीस पंचवीस मैलांवर पोंचले असते; इतकेच नव्हे तर आणखी दोन तीन महिन्यांनीं जर्मन तोफखान्याच्या गोळयांनीं पारिस शहर पाहिलें असतें. पारिस गांठण्याचा हा सरळ व व्यवस्थित मार्ग. त्यांनीं आज व्हर्डूनची लढाई अशा तऱ्हेनें चालविली आहे कीं, फ्रेंचांना सांगावयाचें कीं, तुम्ही आपल्या तोफा आणा आम्ही आमच्या आणतो, तुमचे लढवय्ये येऊं देत आमचे येऊं देत, आणि पांच पंचवीस मैलाच्या आखाडयात सांगूनसवरून कुस्ती करूं, व कोण किती मागें हटतो ते पाहू या. ही असली व्हर्डून येथील कुस्ती पारिस शहर गांठण्याकरितां आहे असें कसें ह्मणावें ? अशारीतीनें सांगूनसवरून निव्वळ लढालढीनेंच मनगटाच्या शक्तीची पारख पाहून पारिस गांठण्याचा जर जर्मनीचा हेतु असता तर पारिसच्या उत्तरेस चाळीस पन्नास मैलावर या कुस्तीस प्रारंभ व्हावयास पाहिजे होता. पारिसच्या ईशान्येस सव्वाशे मैलावरच्या दूर अंतरावर डोंगराळ प्रदेशांत व्हर्डून सारख्या विशेष बंदोबस्ताच्या जागीं ही कुस्ती कां ? चाळीस पन्नास मैलांवरची जवळची जागा कां सोडली ? सपाट मैदानाचा जवळचा आखाडा सोडून लांब दूरवरचा डोंगराळ प्रदेशांतील आखाडा कां निवडण्यांत आला ? अवचित हल्ला करून फ्रेंच गैरसावध असतांना फळी फोडण्याचा हेतु होता असें म्हणावें तर पहिल्या आठवडयांतील दगलीपुरतें हें कारण मान्य करण्यास हरकत नाहीं. पण एक आठवडा गेल्यावर, फ्रेंच सावध आहेत असें समजल्यावर, अवचित हल्ल्यानें पुन्हा व्हर्डूनच्या सभोंवती व्यवस्थेशीर लढालढी महिना दोन महिने कां ? पारिस घेण्याकरितां म्हणून म्हणावें तर द्राविडी प्राणायामाचा दोष लागतो. सांगूनसवरून लढालढी करून पारिस गांठण्याचा ज्याचा हेतु त्यानें जर सपाट मैदानाचा जवळचा मार्ग स्वीकारला नाहीं तर त्याच्या पदरांत मूर्खपणा येत नाहीं काय ? व्हर्डूनची सात आठ आठवडयांची लढालढी पारिस गांठण्याकरितां नव्हे हे सिद्ध झालें. मग ही कुस्ती कां ? कांहींचें म्हणणें असें पडतें, कीं, वसंत काळांत जर्मनीवर चाल करून जाण्यासाठीं फ्रान्सनें व इंग्लंडनें केलेली प्रचंड तयारी फोल आहे, आणि जर्मनीचा

पराभव फ्रान्सच्या हातून १९१६ सालीं होऊं शकणार नाहीं, हें सर्वांना दाखविण्याकरितां व्हर्डूनच्या टापूंत जर्मनीनें ही निकराची झुंज सुरू केली आहे. लष्करी धोरणाच्या दृष्टीनें विचार केला असतां व्हर्डूनच्या लढाईचा उलगडा वरील कारणानें व्हावा तितका होत नाहीं. वसंतकाळीं फ्रान्स जर्मनीवर चाल करून जाईल आणि जर्मनीचा पराभव होऊन जर्मनीला स्वदेशांत मागे हटावें लागेल, अशी अटकळ दोस्त राष्ट्रांनी व अमेरिकेसारख्या तटस्थ देशांनीं कित्येक दिवस सकारण बांधलेली आहे. जर्मनीला वाटतें कीं या अटकळीमुळे बेल्जम, सर्व्हियासारखी चिमुकलीं राष्ट्रें दोस्त सरकारच्या मैत्रींतून फुटून बाहेर पडत नाहींत आणि प्रचंड पिच्छेहाटीनंतरहि रशिया तह करण्यास उत्सुक होत नाहीं. फ्रान्स व इग्लंड याचें नवें बळ व नवी करामत १९१५ सालच्या विजयाचीं फळें जर्मनीच्या पदरांत पाडू देत नाहींत. या नव्या बलाच्या व नव्या करामतीच्या डोक्यांत कोठें तरी कुऱ्हाड घातली म्हणजे आपलें कार्य साधलें, अशी जर्मनीची समजूत दिसते. जर्मनी तहाला उत्सुक झाला आहे; उपासमारीचा चिमटा जर्मनीच्या पोटाला बसू लागला आहे; तेव्हा कोठेंतरी फ्रान्सच्या डोक्यावर कुऱ्हाड घालून फ्रान्सच्या नव्या बळाच्या व नव्या करामतीच्या प्रतापावर विसंबून राहून तह करण्यास तुम्ही विन्मुख होऊ नका असें जर्मनीनें रशियास, बेल्जमास व सर्व्हियास बजावण्याचा उद्योग करणें अव्यवसियतपणाचें नव्हे. व्हर्डूनच्या लढाईच्या बुडाशीं एवढाच हेतु आहे काय? समजा, आणखी एक दोन आठवड्यात जर्मनीनें व्हर्डून घेतलें. काय निष्पन्न झालें? व्हर्डून घेतलें म्हणजे जर्मनीनें काय मिळविलें? वीस पंचवीस मैलाच्या पट्ट्यावर दहाबारा मैल आंत जर्मन शिरला इतकेंच. सागून सवरून जर कुस्ती झाली तर जर्मनी फ्रेंचांना सात आठ आठवड्यांत आठ दहा मैल मागे हटवू शकतो इतकेंच. अर्थात जर्मनी जर सावध असला तर फ्रेंचाच्या वसंतकाळच्या प्रचंड चढाईचे वेळींहि फ्रेंचाचें पाऊल विशेष पुढें पडणार नाहीं हे खरें; पण व्हर्डूनच्या युद्धापासून असलें अनुमान काढण्याबरोबरच दुसरें एक अनुमान निघू शकतें कीं व्हर्डूनच्या प्रचंड झुंजींत मनुष्यबळाचें अतोनात नुकसान झालें असून १९१५ सालाप्रमाणें रशियास गांजण्यास जर्मनी आतां असमर्थ झाला आहे. जर्मनी म्हणणार तोफखान्याच्या बळावर आम्ही कुस्ती जिंकली आणि खरें मनुष्यबळाचें नुकसान फ्रान्सचें झालें. फ्रान्स म्हणणार आमचा तोफखाना जर्मनीच्या तोफखान्याच्या बरोबरीचा असून डोंगराळ प्रदेशांतील आमचे चरांचे चक्रव्यूह विशेष बंदोबस्ताचे होते, तेव्हां जर्मनी पुढे सरकला तर बाजवीहून फाजील

किंमत देऊन, म्हणजे लाखों सैनिकांना बळी देऊन, स्वताचें मनगट कमकुवत करून घेऊन जर्मनी पुढें सरकला. तेव्हां १९१५ सालाप्रमाणें १९१६ सालीं रशियानें जर्मनीची भीति बाळगण्याचें कारणच उरलें नाहीं. रशियाला तहाला उन्मुख करण्याकरितां फ्रान्सच्या तयारीच्या डोक्यावर जर्मनीनें कुऱ्हाडीचा घाव घातला; हा तर्क वरील कोटिक्रमानें अयोग्य ठरतो. जर्मनीनें हा घाव घालतांना त्याच्या बाहूचा जराच निसटला, असें फ्रान्सच्या, इंग्लंडच्या व रशियाच्या मनानें घेतल्यावर तहाला उन्मुख करण्याचा हेतु कोठें राहिला ! जर्मनीचें मनगट कमकुवत झालें असा कल्लोळ माजत असतांहि जर्मनीनें व्हर्डूनची लढाई तशीच चालू ठेविली आहे. रशियाला, बेल्जमला किंवा सर्व्हियाला तहाला उन्मुख करण्याच्या हेतूनें ही लढाई चालली आहे असें म्हणतां येत नाहीं. वरील राष्ट्रें तहाला उन्मुख केव्हां होतील ? १९१६ सालीं फ्रान्सची लढाई निःसत्त्व होऊन १९१५ सालाप्रमाणें जर पश्चिम रणभूमींत किंवा रशियाच्या रणभूमींत जर्मनीला मोठमोठे विजय मिळू लागले तर, म्हणजे १९१६ साली जर जर्मनीला स्वतःला अनुकूल निदान प्रतिकूल नाहीं असा तह घडवून आणावयाचा असला तर प्रथम फ्रान्सच्या जंगी तयारीचे पाय मोडले पाहिजेत, आणि नंतर इंग्लंडवर म्हणा किंवा फ्रान्सवर म्हणा, किंवा रशियावर म्हणा, १९१५ साला-सारखे विजय मिळविले पाहिजेत. १९१५ सालच्या सारखे विजय फ्रान्सवर किंवा इंग्लंडवर आपण १९१६ सालीं मिळवू शकूं असें मानण्याइतकी घमेंड जर्मनीची असेल हें संभवत नाहीं. गेल्या सालच्या विजयमदानें किंवा उपासमारीच्या त्रासानें जर्मनी मूर्खपणाचें कृत्य करील असा काहींचा तर्क आहे. विजयमद किंवा दुःखावेग बुद्धीला भ्रंश आणतात हें खरें, पण गेले आठ आठवडे खुद्द व्हर्डून येथें ज्या व्यवस्थितपणानें व धिमेपणानें जर्मनी लढत आहे त्या व्यवस्थित-पणाकडे व धिमेपणाकडे लक्ष पुरविलें असतां बुद्धिभ्रंशाचें लक्षण दृष्टीस पडत नाहीं. शिवाय शत्रूला बुद्धिभ्रंश झाला आहे, असें गृहीत धरून त्याच्या हालचालीची व डावपेचांची चिकित्सा करणें अशास्त्र होय. शत्रू अतिशय शहाणपणानें व अटोकाट धोरणानें चालत आहे अशी कल्पना करूनच त्याच्या कृत्यांचा विचार करावा लागतो. मगच त्याच्या अंतस्थ हेतूजवळ पोंचणें आपणास शक्य होतें. जर्मनी शहाणपणानें वागत आहे, मूर्खपणाचें साहस कोणचेंच करण्यास तयार नाहीं किंवा करणार नाहीं, हें गृहीत धरूनच जर्मनीच्या बुद्धिमत्तेच्या पाया-वर चिकित्सकानें आपल्या विचारसरणींची इमारत उठविली पाहिजे.

कल्पनेबाहेर प्रचंड स्वार्थत्याग करून इंग्लंडनें युद्धाची तयारी चालविली आहे; इंग्लडचें अजिंक्य आरमार जर्मनीचीं उपासमार करीत असून ह्या उपासमारीचा चिमटा दिवसानुदिवस अधिक तीव्र होत आहे; फ्रान्सनें आपलें सर्व बळ एकवटलें असून फ्रान्सच्या पाठीशी फ्रान्स, इंग्लंड व अमेरिका ह्या देशांतील जर्मनीच्या तोडीचें सर्व शास्त्रीय ज्ञान हात जोडून उभें आहे; आणि रशिया पुन्हां ताजातवाना झाला आहे. ह्या सर्व गोष्टी माहीत असून फ्रान्सच्या किंवा इंग्लंडच्या भिंतीवर स्वतःचें डोकें आपटून घेऊन महायुद्धाची परिसमाप्ति स्वतःच्या वतीनें करून घेण्यास जर्मनी प्रवृत्त होईल हें संभवतें तरी कसें ? रशियाला गेल्या सालीं फार हाल होसावे लागले. ह्या सालीं तो ताजातवाना झाला आहे खरा, पण शास्त्रीय ज्ञानाचा पाठिंबा रशियास असावा तसा नसल्यामुळें आपली विजयाची इच्छा पुरवून घेण्यास रशिया हेंच योग्य स्थान होय असें जर्मनीस वाटणें साहजिकच आहे. रशियाचा पिच्छा पुरविण्याचें सोडून देऊन जर्मनी फ्रान्सच्या मागें कां लागला ? सुसाध्य बाजूला सारून दुःसाध्याची अपेक्षा कोण करील ? फ्रान्सलाहि आह्मी आस्ते आस्ते मागें हटवूं शकतो असल्या घमेंडीच्या आनंदाकरितां भलत्या साहसास जर्मनी कसा प्रवृत्त होईल ? आपण अशी कल्पना करूं कीं, पुढील सहा महिने रशियास नुसते थोपवून धरून इंग्लंडचा आणि फ्रान्सचाच पिच्छा जर्मनीनें पुरविला तर काय होईल ? १९१६ सालचा हिवाळा सुरू होऊन लढाई थंडी पडेपर्यंत जर्मनी काय मिळवूं शकेल ? फार फार झालें तर जर्मनी क्याले व पारिस घेऊं शकेल. पण क्याले व पारीस घेण्यांत सबंध एक वर्षाचें बळ खर्च केल्यानें जर्मनीला अनुकूल थोडाच तह होणार आहे ? हें कृत्य साधण्यांत फ्रान्स व इंग्लंड ह्यांच्याहून जर्मनीचे अधिक लोक मरतील; आणि रशियास आणखी अधिकउण्या बारा महिन्यांचा विसावा मिळून रशियाचा सेनासमुद्र अवाढव्य प्रमाणानें वाढून राहील. म्हणजे लष्करच्या संख्येच्या दृष्टीनें पारिस व कॅले घेऊनहि जर्मनीची स्थिति १९१७ सालच्या प्रारंभाला अधिक वाईटहोईल. राजकीय दृष्टया स्वतःच्या व तटस्थ राष्ट्रांतील प्रजाजनांच्या मनावर परिणाम करण्याच्या बाजूनें जर्मनीचा मोठा फायदा होईल हें खरें; पण रशियाला बारा महिने मोकळा सोडल्यानें तुर्कस्थान, बाल्कन प्रदेश व रोमानिया येथील राजकीय परिस्थितीवर अनिष्ट परिणाम होतील. म्हणजे कॅले किंवा पारिस घेतल्यानें होणारा फायदा तुर्कस्थानच्या बाजूला गमवावा लागेल. शिवाय कॅले किंवा पारिस गेल्यामुळें फ्रान्समधील किंवा इंग्लडमधील लोकमत तहाला अनुकूल न होतां

चिडून जाऊन जर्मनीसभोंवारचा समुद्रांतील वेढा फारच घट्ट आवळण्यास जर प्रवृत्त झालें तर जर्मन प्रजाजनांची उपासमार जर्मन मुत्सद्यांना व सेनानायकांना त्राहिभगवान करून सोडणार नाहीं काय ? फ्रान्स इंग्लंड किंवा रशिया ह्या तिघापैकीं कोणावर तरी मोठा विजय येत्या चारसहा महिन्यांत मिळविण्याची खटपट जर्मनीनें करणें योग्य आहे. पण पारिस घेतल्यानें तह होईल असेंहि म्हणतां येत नाहीं; कॅले घेतल्यानें तह होईल असेंहि म्हणतां येत नाहीं. १९१५ सालच्या सारखी रशियाची पिछेहाट पुन्हां १९१६ सालीं केल्यानें तरी तह होईल काय ? आपण अशी कल्पना करूं कीं रशिया कितीहि ताजातवाना झाला असला तरी जर्मनीनें जर आपलें सर्व बल १९१५ सालाप्रमाणें रशियाच्या बाजूला एकवटलें तर रशियाची पुन्हां पिछेहाट होईल. पण रशियाची पिछेहाट झाल्यानें जर्मनीला अनुकूल असा तह होईल काय ? रशिया म्हणेल माझा मुलुख फार विस्तीर्ण आहे. शेपन्नास मैल मागें हटल्यानें माझें फारसें नुकसान होणार नसून पुन्हां पुढील सालीं मी दंड थोपटण्यास कमी करणार नाहीं. म्हणजे रशियाची पिछेहाट १९१६ सालीं झाल्यानेंहि अनुकूल तहाचें फल जर्मनीच्या पदरांत पडेल अशांतला भाग नाहीं. नवी तयारी, नवी करामत, व नवें सैन्य ह्याच्याशीं १९१७ सालीं किंवा १९१८ सालीं जर्मनीला पुन्हां झुन्जावें लागेल; आणि अखेरीस ज्या पक्षाचें सैन्य झिजून झिजून अगोदर नष्ट होईल, त्या पक्षाचा पराभव झाला असें ठरेल. म्हणजे ह्या झिजवणीच्या पद्धतीनें विचार केला असतां १९१६ प्रमाणें १९१७ व १९१८ सालींहि झुन्जत राहण्याचा प्रसंग दोन्ही पक्षांवर येण्याचा संभव आहे. ही झुंज आणखी दोन तीन वर्षें चालणार अशी कल्पना करून दोनहि पक्ष त्या धोरणानें सैन्याची व दारूगोळ्याची तयारी करीत राहणार हे उघड आहे. खुद्द लढण्यासंबंधानेंहि कोणच्या स्वारींत कोणाचें सैन्य अधिक झिजेल ह्याचा विचार करूनच दोन्ही पक्षांचे सेनानायक आपापलें लष्करी धोरण ठरविणार हेंहि उघड आहे. लष्करी धोरण ठरविण्यांत इंग्लंड, फ्रान्स व रशिया ह्यांच्या पक्षानें झिजविण्याचा व झिजले जाण्याचा क्रम पाहून वागलें म्हणजे भागण्यासारें आहे; पण जर्मनीचें तेवढयावर भागत नाहीं. आपण शत्रूला अधिक उगाळावें व स्वतः कमी उगाळविलें जावें एवढेच लष्करी धोरण जर्मनीला पुरेसें होत नाहीं. समुद्रावरील पूर्ण सत्ता इंग्लंडच्या हातीं असल्यामुळें खाण्यापिण्याच्या जिनसांच्या

किंवा लष्करी जिनसांच्या दुष्काळानें इंग्लंड, फ्रान्स किंवा रशिया ह्यांपैकीं कोणा-लाहि तह करण्यास भाग पडण्याचा संभव नाही; पण जर्मनीची स्थिति तशी नाहीं. जसजसा महायुद्धाचा काळ लांबेल तसतशी जर्मनीची उपासमार अधिक तीव्र होईल. म्हणजे जर्मनीला आपलें लष्करी धोरण ठरवितांना झिजण्याच्या व झिजवि-ण्याच्या क्रमाबरोबरच उपासमारींतून निसटण्याचे लहान मोठे दरवाजे उघडण्याच्या क्रमावरहि लक्ष पुरविलें पाहिजे. कॅले घेतल्यानें, पारिस घेतल्यानें किंवा रशियाची पीच्छेहाट केल्यामुळे तह होणार नाहीं. ह्याचा अर्थ असा कीं, झिजण्याच्या व झिजविण्याच्या दृष्टीनें या तिन्ही गोष्टी समबल म्हणजे सारख्या योग्यतेच्या आहेत. ह्या तिन्ही गोष्टीपैकीं कोणच्याहि गोष्टीची जर्मनीनें निवड केली तरी झिजेचा प्रश्न एकच स्वरूपाचा आहे. पण उपासमारीच्या दृष्टीनें विचार केला असता, तिन्ही गोष्टी भिन्न स्वरूपाच्या होतात. समजा, १९१६ सालीं जर्मनीनें कॅले किंवा पारिस गांठलें, तर १९१७–१९१८ सालीं हा विजय जर्मनीच्या धान्याच्या साठयात एकहि कण अधिक घालू शकणार नाहीं. आतां आपण अशी कल्पना करूं कीं, जर्मनीनें पारिस किंवा कॅले ह्याचा नाद न धरतां रशियाची पिछेहाट करून काळासमुद्र गांठला आणि ओडेसा बंदर व क्रिमियाचें द्वीपकल्प येथें जर्मन सैन्याचा तळ १९१६ सालच्या अखेरीस पडला तर काय स्थिति होईल ? नीपर, नीस्तर व प्रीपेट ह्या नद्यांकांठचा सुपीक प्रदेश जर्मनीच्या ताब्यांत जाऊन मुबलक धान्य जर्मनीला मिळेल; काळ्या समुद्रावरील रशियाचें आरमारी वर्चस्व नष्ट होऊन तुर्कस्थानच्या मागचा रशियाचा भुगा नाहीसा होईल; आणि रोमानिया बल्गेरियाप्रमाणें जर्मनीच्या पचनीं पडून ईजिप्त व इराण ह्या दोन्ही दिशांनीं इंग्लंडला सतावण्यास तुर्कस्थान समर्थ होईल. काळ्या समुद्राचा ताबा जर जर्मनीला घेतां आला तरच झिजेच्या किंवा उपासमारीच्या दृष्टीनें तीन चार वर्षे लढण्यास जर्मनी समर्थ होऊन महायुद्धाच्या पेंचांतून जर्मनी निदान समबल म्हण-वून घेऊन तरी पार पडूं शकेल. काळ्या समुद्राचा ताबा ऊर्फ क्रिमियन द्विपकल्प हें जर्मनीच्या धोरणाचें ध्येय असलें पाहिजे, असें वरील विवेचनावरून सिद्ध होतें. अर्थात् रशियावरच मोहीम एप्रिल अखेर किंवा मे प्रारंभासून जर्मनीनें केली पाहिजे असें अनुमान निघतें. रिगाच्या बाजूला पेट्रोगाडच्या रोखानें ह्या मोहिमेस बाल्टिक समुद्रांतील आरमाराच्या हालचालीसह प्रारंभ होऊन दक्षिणेस काळया समुद्रावर क्रिमियाचें द्विपकल्प घेण्यांत या मोहिमेचें पर्यवसान करण्यास जर्मनी

१९१६ सालीं म्हणजे पुढील चारसहा महिन्यांत शक्य तेवढी धडपड करील असा रंग आहे. मग व्हर्डूनची लढाई कशासाठीं ? क्रिमियाचें द्विपकल्प घेतल्यानें प्रत्यक्ष जरी नाहीं तरी, महायुद्धाची अप्रत्यक्ष परिसमाप्ति होते. अशा लष्करी धोरणानें रशियावर जर्मनीची मोहीम सुरू झाल्यावर फ्रान्स व इंग्लंड थोडेच गप्प बसतील ? १९१५ सालाप्रमाणें १९१६ सालीं जर रशियाची पुन्हां पिछेहाट सुरू झाली तर, त्या पिछेहाटीमुळे रशिया जरी दमांत उखडला गेला नाहीं तरी जर्मनी पुढे कांहीं वर्षे युद्ध चालविण्यास अन्नपाण्याच्या दृष्टीनें समर्थ होणार असल्यामुळे रशियाच्या पिछेहाटीची पुनरावृत्ति म्हणजे महायुद्धाची जरी प्रत्यक्ष नाहीं तरी अप्रत्यक्ष परिसमाप्तिच होय. अशी परिसमाप्ति जर्मनीस कोण करू देणार ? जर्मनीची फौज रशियाच्या बाजूकडे पूर्णपणें वळली आहे असें अनुभवास येतांच इंग्लड व फ्रान्स जिवावर उदार होऊन जर्मनीवर तुटून पडल्यावाचून कसे राहतील ? असली फ्रान्सची व इंग्लडची चढाई सुरू झाल्यास त्याना थोपवून कसें धरावें ? गेला दीड महिना व्हर्डून येथें जी लढाई चालली आहे ती लढाई रशियावरील हल्ल्याच्या वेळीं फ्रान्स व इंग्लड ह्याना थोपवून धरण्यास अडचण पडूं नये म्हणून चालली आहे असें म्हणणें भाग पडतें. फ्रान्सच्या तयारीचे पाय लुले केल्याशिवाय रशियावर जर्मनीस स्वारी करता येत नाहीं. फ्रान्सचें सैन्य मारून फ्रान्सची तयारी कमकुवत करण्याकरिता ऱ्हाईनवर जर्मनीनें हल्ला केला आहे काय ? नुसतें सैन्य मारून परपक्षास झिजविण्याचा जर डाव जर्मनी खेळत असला तर स्वतः हल्ले करण्यात जर्मनीस कांहीं फायदा नाहीं. फ्रान्सचे हल्ले होईपर्यंत बंदोबस्ताचे जागीं बसून हल्ल्याच्या वेळीं फ्रान्सला झिजविणें अधिक सोईचें नाहीं काय ? फ्रान्सला झिजविण्याकरिता हा हल्ला नव्हे, फ्रान्सला कुस्तींत आपण मागे हटवतों हें जगाच्या निदर्शनास आणण्याकरितां हा हल्ला नव्हे, विजयोन्मदाचाहि हा हल्ला नव्हे, पारिस किंवा कॅले घेण्याच्या उद्योगांतीलहि हा हल्ला नव्हे, फ्रान्सला थोपवून धरतां यावें म्हणून हा हल्ला आहे ! थोपवून धरतां यावें म्हणजे काय ? थोपवून धरतां यावें म्हणजे फ्रान्सचें सैन्य बरेंच गेल्यामुळे फ्रान्स कमकुवत होऊन हल्ला करण्याचें सोडून देईल अशी नुकसानी फ्रान्सची करणें असाहि अर्थ नव्हे. रशियावर जर विजय मिळवायाचा तर जर्मन सैन्याचें मुख्य वजन रशियाच्याच बाजूला झुकविलें पाहिजे हें उघड आहे. अर्थात् फ्रान्सच्या बाजूला हलकेच सैन्य राहणार. आपल्या समोरचें

सैन्य हलकें झालें आहे, असें पाहिल्यावर फ्रान्स व इंग्लंड थोडेच गप्प बसणार आहेत ? निकराचे हल्ले करून जर्मनीचा धुव्वा उडवून येतील. फ्रान्स व इंग्लंड ह्यांच्यासमोर हलकें सैन्य ठेवून आपल्या आंगलट बाजू विशेष येऊं न देतां रशियाचा पिच्छा पुरविण्यास यथेच्छ फुरसत मिळविणें हें लष्करी धोरण जर्मनीनें पश्चिम रणभूमींत स्वीकारलें आहे. आतां आपण अशी कल्पना करूं कीं, जर्मनी रशियावर तुटून पडला आहे. आस्ट्रो–जर्मनांचें मुख्य बल रशियाच्या बाजूला गुंतलें आहे, आणि पश्चिम रणभूमींत जर्मनी हलका झाल्यामुळे फ्रान्स व इंग्लड निकराची चढाई जर्मनीवर करीत आहेत. या निकराच्या चढाईत फ्रान्स व इग्लंडला कांहीं ठिकाणीं यश आलें व कांहीं ठिकाणी यश आलें नाही; अशीहि दुसरी कल्पना आपण करूं. कोणत्या ठिकाणचें यश स्थानिक स्वरूपाचें असतें व कोणच्या ठिकाणचें यश मर्मस्थानाला जाऊन भिडतें हें यानंतर पहाणें जरूर आहे. स्वित्झर्लंडच्या सरहद्दी-पासून बेल्जमच्या समुद्र किनाऱ्यापर्यंत पसरलेल्या चरांची रेषा एकदां नकाशांत पहा आणि या रेषेमध्यें जर्मनीचीं मर्मस्थानें कोणची आहेत तें पहा. तीन चारशे मैल लांबीच्या या रेषेचे सामान्यतः चार भाग करतां येतात. स्वित्झर्लंडच्या सरहद्दीपासून व्हिम्सपर्यंत पहिला भाग. व्हिम्सपासून सोम नदीपर्यंत म्हणजे रेषा उत्तर वाहिनी होईपर्यंत दुसरा भाग. रेषेचा उत्तर वाहिनी भाग म्हणजे सोमनदीपासून लिलेपर्यंतचा भाग, हा तिसरा भाग होय. आणि बेल्जममधील रेषा हा चवथा भाग होय. ह्या चार भागांपैकीं दुसऱ्या आणि तिसऱ्या भागांचा काटकोन झालेला आहे–आणि सोमनदीच्याजवळ ह्या काटकोनाचा भाग पाचरेसारखा फ्रान्सच्या बाजूस घुसला आहे. आतां आपण अशी कल्पना करूं कीं, बेल्जमच्या सरहद्दींत म्हणजे चवथ्या भागांत इंग्रजांना मोटा जय मिळाला आणि इंग्रजी सेना बेल्जममध्यें घुसली तर काय परिणाम होईल ? दुसरा आणि तिसरा भाग जर्मनीला फार आंत आखडून घ्यावा लागेल. कारण त्यांच्या पिछाडीवर इग्रज बेल्जममधून चाल करून येऊं शकतील, म्हणजे चवथा भाग बेल्जममधील भाग अशा स्वरूपाचा होता कीं, तो कोसळतांना दुसरा आणि तिसरा भाग बरोबर घेऊन कोसळू लागेल. अर्थात् हा चवथा भाग म्हणजे मर्मस्थानाला जाऊन भिडणारा होय. या चवथ्या भागाचें संरक्षण जर्मनीनें योजून ठेविलें आहे. ईसर कॅनालपर्यंत जर्मनी पुढे आलेला असून ईसर कॅनाल ओलांडून जाणें जर्मनीस दुरापास्त झालेलें आहे. ईसर कॅनालानें जर्म-

नीस अडथळा केला त्याप्रमाणें इंग्लंडासहि उलटपक्षी चढाईच्या वेळीं ईसर कॅनाल अडथळाच होऊन बसणारा आहे. यिप्रेसची पाचर मात्र जर्मनीस नडणारी आहे; पण यिप्रेसभोवती गेले अकरा महिने एकसारखी लढाई चालू असल्यामुळे जर्मनीची फळी फोडण्यास यिप्रेसचा फारसा उपयोग इंग्रजांना होणार नाहीं. ही चवथ्या भागाची कथा झाली. आतां आपण तिसऱ्या भागाकडे पाहू. सोम नदीपासून लिलेपर्यंतच्या भागांत जर जर्मनांची पिछेहाट झाली तर त्याचा काय परिणाम ? स्थानिक फायद्याशिवाय व स्थानिक तोट्याशिवाय दुसरा कांहीच परिणाम होणार नाहीं, थोडथोडी रेषा मागे हटेल इतकेंच. ही रेषा मागे हटल्यानें बेल्जमवर किंवा ईशान्य फ्रान्सवर कांहींच परिणाम होणार नाहीं. ह्या तिसऱ्या भागाचें जेवढें महत्व तेवढें महत्त्व दुसऱ्या भागाचें म्हणजे ऱ्हीम्सपासून सोम नदीपर्यंतच्या भागाचें आहे. खरे पाहू गेले असता, हा दुसरा आणि तिसरा भाग प्रसंगानुरोधानें सैन्य फाजील पुढे सरकल्यामुळे उत्पन्न झालेला काटकोन आहे. हा काटकोन नष्ट होऊन जर ऱ्हीम्सपासून लिलेपर्यंत सरळ रेषा झाली तर फ्रान्सला थोपवून धरण्याच्या दृष्टीनें जर्मनीचें नुकसान न होता.कल्याणच होणार आहे. म्हणजे दुसऱ्या व तिसऱ्या भागात जर्मनीची जर पिछेहाट झाली तर जर्मनीला तें सोईचें होऊन रशिया कडचा आवेश कमी करण्याची जरुरी वाटणार नाहीं. दुसरा व तिसरा भाग मिळून होणारा त्रिकोण जर्मनीनें फ्रान्सच्या पुढें असा धरला आहे कीं, फ्रान्सनें आवेशानें त्यावर तुटून पडून स्वतःस झिजवून घेऊन पुढे सरकण्याची आपली हाव खुशाल भागवून घ्यावी. फ्रान्सपुढें जर्मनीनें हा बळीच ठेवला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. व्हर्डूनची लढाई सुरू होण्यापूर्वी सोमनदीच्या दक्षिणेस जर्मनीला अवचित जय मिळून जर्मनी कांहीं महिने आंत घुसला, पण त्या जयाचा उपयोग जर्मनीनें कांहीं करून घेतला नाहीं. धोरणानें त्याज्य ठरविलेल्या जागेत तो जय अवचित मिळाला. दुसरा व तिसरा भाग त्याज्य असला तरी फ्रान्सला बरेंचसे झिजविल्याशिवाय या भागात जर्मनी मागे हटणार नाहीं, आणि ऱ्हीम्सपासून लिलेपर्यंत सर्व भाग चरांच्या चक्रव्यूहांनीं व्यापून टाकलेला असला पाहिजे हें सांगणें नकोच. चवथ्या भागाप्रमाणें पहिला भागहि महत्त्वाचा आहे, म्हणजे मर्मस्थानाला भिडणारा आहे. या भागांत फ्रान्सला जर जय मिळाला तर फ्रान्स जर्मनीच्या मुलखांत एकदम उतरेल, आणि पश्चिम रणभूमींतील युद्धास निराळेच स्वरूप

प्राप्त होईल. फ्रान्सला थोपवून धरण्याकरितां येथें जर्मनी फ्रान्सशीं निकरानें लढेल. या पहिल्या भागांत व्हर्डूनची पाचर फारच महत्त्वाची आहे. व्हर्डूनची लढाई सुरू होण्यापूर्वी व्हर्डूनच्या उत्तरेकडे व पूर्वेकडे दहा पधरा मैलांचा टेकडाळ मुलुख फ्रान्सनें हस्तगत केला होता. म्यूज नदीच्या कांठच्या या टेकड्या व किल्ले पुढे चाल करून जाण्यास उत्तम पाया बनले होते. या पायावर उभा राहून पहिल्या धडकीसरशी जर फ्रान्स दहा वीस मैल आंत घुसला असता तर काय झालें असतें ? एका घावानें पहिला व दुसरा भाग कोसळून पडला असता आणि दुसऱ्या बरोबर तिसरा भागहि विलयास जाऊन फ्रान्समधून स्वदेशास जाणें जर्मनीस भाग पडलें असतें. व्हर्डूनची पाचर फ्रान्सच्या मे महिन्यांतील चढाईस अत्यत उपयोगी पडणारी होती. व्हर्डूनच्या सभोंवती पांच सात मैलांचा प्रदेश घेऊन खुद्द व्हर्डून घेण्याकरितां जर्मनीनें जो एकसारखा उद्योग चालविला आहे त्यांतलें इंगित झालें तरी हेंच होय. फ्रान्सला मर्मस्थानीं चढाई करतां आली असती. ती आतां व्हर्डूनच्या जवळ जवळ जर्मनी आल्यानें करतां येणार नाहीं. एप्रिलच्या दुसऱ्या तिसऱ्या आठवड्यात जर जर्मनीला व्हर्डून घेतां आलें तर फ्रान्सच्या चढाई सबधानें जर्मनी एका दृष्टीनें निर्धास्त होईल यांत सशय नाहीं. व्हर्डूनची लढाई पॅरिससाठीं नाहीं, कॅलेसाठीं नाहीं, किंवा कुस्तींत फ्रान्सला मागे हटविण्याच्या दिमाखासाठीं नाहीं, तर रशियावर स्वारी करतांना फ्रान्सच्या चढाईसबधानें निर्धास्त रहतां यावें म्हणून आहे.

सहा आठवड्यापूर्वी व्हर्डूनची लढाई सुरू झाली. त्याचे अगोदर यिप्रेस, लाबासी, सोमनदी, र्‍हीम्स वगैरे ठिकाणीं जर्मनांनीं फ्रेंच कितपत सावध आहेत याची चाचणी घेतली होती. व्हर्डूनच्या उत्तरेस दहाबारा मैलावर एकदम हल्ला करून पहिल्या आठवड्यात बीमाट, ऑर्निस वगैरे ठिकाणें जर्मनांनीं प्रथम घेऊन तीन मैलाचा मुलूख काबीज केला. पुन्हां पांच सात दिवस विसांवा घेऊन ब्रास, ड्यूनोमॉट व व्हॉक्स या खेड्यापर्यंत आपलें पाऊल पुढे टाकलें. ड्यूनोमॉटची टेकडी सोमनदीच्या काठच्या टेकड्यात सर्वात उच्च असल्यामुळे त्या टेकडीवरील किल्ला घेण्याचा जर्मनीनें अवचित हल्ला करून प्रयत्न केला. या प्रयत्नांत त्यांना अर्धवट यश आलें. ड्यूनोमॉटचा किल्ला त्यांच्या हातीं गेला खरा, पण ड्यूनोमॉटचें खेडे व किल्ल्यासभोंवारची जागा फ्रेंचांच्या हाती राहून तुंबळ युद्ध होऊन ड्यूनो-मॉटच्या किल्ल्यांत शिरलेले जर्मन फ्रेंचाच्या हातीं पडतील अशी आशा उत्पन्न

झाली. मार्च महिन्याच्या प्रारंभाला डयूनोमाँटच्या सभोंवतींची लढाई जोरानें चालू होती; आणि डयूनोमाँटची टेकडी जर्मनांच्या पूर्णपणें कबजांत जाण्यास मार्चचा पहिला आठवडा निघून जावा लागला. डयूनोमाँट येथें लढून व्हर्डूनचें सरक्षण ज्या शौर्यानें व चिकाटीनें फ्रेंचांनीं केलें, त्या चिकाटीबद्दल इंग्लंड रशिया वगैरे सर्व देशांतील वीरांनीं फ्रेंचांला शाबास म्हटलें ! थेट उत्तरेकडून चाल करून येत असतां फ्रेंच लोक अतिशय निकरानें लढत आहेत असें पाहून मार्चच्या दुसऱ्या आठवडयापासून व्हर्डूनवर समोरून हल्ला न करितां व्हर्डूनच्या दोन बगलांनीं बळसा देऊन व्हर्डून गांठण्याचा उद्योग जर्मनांनी आरंभिला. व्हर्डूनच्या दक्षिण पूर्वेचे फ्रेसनिस किल्लयावर हल्ला करून तेथून व्हर्डूनच्या उजव्या बगलेस वळसा देण्यास सुरवात केली त्याचप्रमाणें म्यूज नदीच्या पूर्वेच्या बाजूला फॉर्जेस आणि रेनेव्हेलो हीं खेडीं घेऊन म्यूज नदीच्या कांठच्या क्यूमिसच्या जंगलांत जर्मनांनीं प्रवेश केला. मार्चच्या दुसऱ्या व तिसऱ्या आठवडयांत म्यालांकोर्ट, बेथिंगकोर्ट व क्यूमिस या पट्टयावर जर्मनांना थोपवून धरण्याचा फ्रेंचांनीं आटोकाट प्रयत्न केला आणि या कामीं फ्रेंचांना आठ दहा दिवस चांगलें यशहि आलें; पण मार्चच्या चवथ्या आठवडयात म्यालांकोर्ट व बेथिंग कोर्ट व क्यूमिस हा पट्टा जर्मनांच्या ताब्यांत जाऊन एप्रिलचे प्रारंभाला म्यालांकोर्टच्या दक्षिणेस दोन तीन मैलावर असलेल्या टेकडया काबीज करण्याचा उद्योग जर्मनानीं आरंभिला. एप्रिलचे प्रारंभाला व्हर्डूनच्या उत्तरेच्या व्हॉक्स किल्लयावरहि जर्मनांनीं पुन्हां लक्ष ठेविलें असून व्हॉक्सचें गांव जर्मनांनीं आपल्या ताब्यांत घेतलें आहे. व्हर्डूनच्या उजव्या बगलेस, समोर, व डाव्या बगलेस तिन्ही ठिकाणीं पंचवीस तीस मैलांच्या पट्टयावर जर्मनांनीं एकदम सारखे हल्ले सुरू केले आहेत. तथापि फ्रेंचांना पूर्ण भरंवसा वाटत आहे कीं, यिप्रेसप्रमाणें तोफांच्या माऱ्याखालीं जरी व्हर्डून गांव व व्हर्डूनचा किल्ला पूर्ण जमीनदोस्त झाला तरी व्हर्डूनच्या भूमीवर जर्मन सेनेचा तळ पडणार नाहीं.

व्हर्डूनची ही अशी लढाई चालू असतांना मार्च महिन्यांत रशिया व इटली स्वस्थ बसले नव्हते. ड्विन्स व व्हिलना यांच्या दरम्यान जर्मनांवर रशियन फौजेनें जोराचे हल्ले केले. या हल्लयांत प्रथम रशियाला यश मिळालें, पण पुढें जर्मनांचा अडथळा विशेष जोराचा दिसून आल्यामुळें आणि हवापाण्याची स्थिति अनुकूल न राहिल्यामुळें रशियाचे हल्ले मार्च अखेरीस कमजोराचे होऊं लागले. मार्च

प्रारंभाला ब्यूकोव्हिना प्रांतांत नीस्टर नदी ओलांडण्याचा रशियानें जोराचा प्रयत्न केला आणि मार्च महिन्यांत झर्नोव्हिस शहर घेतल्याशिवाय रशिया रहात नाहीं अशी आशा सर्व ठिकाणीं उत्पन्न झाली; पण मार्च अखेरीस त्या बाजूचीहि रणभूमि पुन्हां निद्रावस्थेस जाऊन दक्षिण बाजूच्या रशियाच्या सेनेचे मुख्य अधिपति जनरल इव्हेनॉफ यांना आपला अधिकार दुसऱ्याकडे देऊन घरीं स्वस्थ बसणें इष्ट वाटलें. जनरल इव्हेनॉफ हे फार कसलेले व नांवाजलेले आहेत आणि गेल्या डिसेंबरपासून ब्युकोव्हिना प्रांत पुन्हां काबीज करण्याची कामगिरी त्यांना सांगण्यांत आली होती. ब्युकोव्हिया प्रांत जर रशियास पुन्हां काबीज करतां आला असता तर रोमानिया एव्हांना रशियास मिळाला असता आणि सॅलिनोका येथे जमलेल्या फ्रेंचांनीं व इंग्रजानीं बल्गेरियावर स्वारी करून सर्व्हियाला पारतंत्र्यांतून मुक्त करण्याचा उद्योग आरंभिला असता. पण ब्युकोव्हिना घेण्याच्या कामांत जनरल इव्हेनॉफ यांना अपयश आलें; आणि रणभूमि सोडून त्यांना घरीं बसावें लागलें. गेल्या तीन चार महिन्यात ब्युकोव्हिनाच्या मोहिमेंत रशियास अपयश आल्यामुळें रोमानिया लढाईत पडण्याचा फारसा रंग दिसत नाहीं. उत्तर, पूर्व व दक्षिण या तिन्ही बाजूनीं रोमानिया असा वेढला गेला आहे कीं, ऑस्ट्रिया व बल्गेरिया याच्या जबड्यांतच रोमानियाचा निम्याहून अधिक भाग सांपडलेला दिसतो. रशिया जर ब्युकोव्हिनामध्ये घुसला नाहीं आणि मुबलक रशियन सैन्याचा पाठिंबा रोमानियाच्या दृष्टीस पडला नाहीं तर रोमानिया रशियाच्या वतीनें युद्धांत सामील होण्याचीं चिन्ह आता दिसत नसल्यामुळें सॅलिनोका येथील ॲंग्लो–फ्रेंच सैन्य लवकरच फ्रान्सकडे रवाना होईल असें वाटतें. जे बल्गेरियन सैन्य युरोपातल्या इतर रणभूमीत उपयोगी पडावयाचें नाहीं तसल्या बल्गेरियन सैन्याला गुंतवून ठेवण्याकरितां दोन तीन लाख ॲंग्लो–फ्रेंचांनी सॅलिनोका येथे अडकून पडणें म्हणजे पश्चिम रणभूमींतच जर्मनांना बल्गेरियाची मदत आपणहून बल्गेरियाची इच्छा नसतां करवून देण्यासारखें आहे. तेव्हां रशियावर जर्मनीची मोहीम सुरू झाल्यावर ॲंग्लो–फ्रेंचांच्या उलट चढाईचे वेळीं सॅलिनोका येथील सैन्य फ्रान्सकडे नेण्यांत येईल हें सांगणें नकोच. अर्झरूमच्या बाजूला रशियाचें पाऊल पुढे पडत असून तुर्कांच्या ट्रिबिझांद किल्ल्यावर व बंदरावर रशिया चाल करून जात आहे. ट्रिबिझांदच्या बाजूला अर्झरूमपेक्षां तुर्कीसेना अधिक नेटानें लढत आहे, शिवाय काळ्या समुद्रांत जर्मन पाणबुड्यांचा सुळसुळाट सुरू झाला असून त्यांनीं निर्दय-

पणानें दवाखान्याचें जहाज बुडविलें असून लष्करी जहाज बुडविलें म्हणून बेशरम-पणानें जाहीर केलें आहे. भूमध्य समुद्रांत पाणबुड्या बोटींचा संचार मार्च महिन्यांत विशेषसा दृष्टीस पडला नाहीं. भूमध्य समुद्रातील जर्मन पाणबुट्या बोटी दार्दानेलिसच्या मार्गानें काळ्या समुद्रात गेल्या आहेत; आणि त्यामुळे काळ्या समुद्रावरील रशियाच्या हालचालीस बराचसा त्रास पोचत आहे. तथापि एप्रिल महिन्याच्या अखेरीस रशिया ट्रिबिझाद घेईल अशी आशा वाटत आहे. भूमध्य समुद्रांतील पाणबुड्याची चांचेगिरी जरी मार्च महिन्यांत मदावली तरी इग्लड-सभोवार रोज दोन तीन बळी घेण्याचा ह्या पाणबुड्यांनीं मार्च महिन्यांत सपाटा लाविला आहे. शिवाय झेपेलिन विमानांनीहि इग्लडवर मार्च महिन्यांत दोन तीन हल्ले करून निरुपद्रवी प्रजाजनाचें निष्कारण बरेंच नुकसान केलें. असल्या चिमट्यामुळे इग्लड देश बिलकूल डगमगला नसून इग्लडचे मुख्य प्रधान मि. आस्क्विथ यांनीं मार्च अखेरीस पारिस व रोम येथें दोस्त सरकाराच्या सेनापतींच्या व मुत्सद्याच्या सभा भरवून तहासवधानें वाटाघाट करून अखेर यश येईतों लढण्याचा निश्चय सर्वांकडून करवून घेतला ! आपत्काळीं इग्लडचा धिमेपणा जितका स्पष्टपणें दृष्टीस पडतो तितका दुसऱ्या कोणच्याहि वेळीं दृष्टीस पडत नाहीं. मे जून महिन्यांत प्रचड रणसग्राम सुरू करण्याची सर्व तयारी इग्लडने आता केली असून फ्रान्स व इटली यांनाहि इग्लडनें चांगला धीर दिला आहे. व्हर्डूनची लढाई चालली असतांना मार्च महिन्यात इग्रजी फौज गप्प बसली नव्हती तर यथाशक्ति जर्मनीवर उलट हल्ले करीत होती, इतकेंच नव्हे तर व्हर्डूनच्या संरक्षणाकरितां सोम नदीच्या आसपासचें फ्रेंच सैन्य ज्यावेळेस व्हर्डूनकडे न्यावें लागलें त्यावेळेस सोम नदीपर्यंत आरासच्या टापूचा कबजा इंग्रजांनी आपल्या हातीं घेतला ! उन्हाळ्यांत सुवेजच्या कालव्यावर तुर्कांचा हल्ला होण्याची फारशी भीति नसल्यामुळे फ्रान्समधील जगी चढाईच्या वेळीं इजिप्तचीहि कुमक पश्चिम रणभूमीत होण्याचा संभव आहे. इजिप्तमधील सैन्याचा कांहीं भाग मात्र बसऱ्या-कडे पाठविला जाईल. कारण कुतुल आमारा येथें जनरल टॉऊनशेड यांना तुर्कांनीं दिलेला वेढा उठविण्याच्या कामास मार्च अखेर अपयश आलें असून या अपयशाचीं कारणें शोधून काढण्याकरितां एक कमिशन नेमण्यांत आलें आहे. तेव्हां या कमिशननें सूचना केल्यास इजिप्तमधील बरीचशी युद्धसामुग्री बसऱ्याकडे रवाना होण्याचा संभव आहे.

# दुसऱ्या वर्षाचा एप्रिल-मे महिना

एप्रिल प्रारंभाला व्हर्डूनच्या लढाईची जी स्थिति होती जवळ जवळ तीच स्थिति मे महिन्याच्या प्रारंभालाहि कायम राहिली. म्यूज नदीच्या पश्चिमेला अव्हवकोट येथें आणि पूर्वेस व्हॉवसच्या जवळ जर्मनांचें पाऊल थोडेसें पुढें पडलें. सबंध महिन्यांत मैल दोन मैल जर्मन्स पुढें सरकले. म्हणजे विशेष पुढें आले असें मुळींच नाहीं. म्यूज नदीच्या पश्चिमेला अव्हवकोटच्या दक्षिणेस आलेल्या तीन चार मैल लांबी रुंदीच्या टापूंतील टेकड्या हस्तगत करण्यासाठी जर्मनांनीं आपल्याकडून होईल तितकी पराकाष्ठा केली, पण फ्रेंचांच्या शौर्यापुढें आणि नवीन तऱ्हेच्या फ्रेंच तोफांपुढें जर्मनाचें कांहीं चाललें नाहीं! व्हर्डूनच्या लढाईला मे प्रारंभीं सव्वा दोन महिने होऊन गेले असून आतां ही व्हर्डूनची लढाई सपली असें सेनानायकांचें मत जाहीर करण्यांत आलें आहे. दोन चार दिवसांनीं चार पांच दिवसांनीं जर्मनीच्या तोफा व्हर्डूनच्या आसपासच्या किल्ल्यावर व टेकड्यावर भडिमार करीत राहतील; पण त्यांत आतां राम उरला नाहीं. दोन अडीच महिने निकरानें लढून जर्मनीच्या हातून व्हर्डून घेववलें नाहीं. अर्थात् जर्मनीचा ह्याबाबतींत पराभव झाला. यिप्रेस येथें जसा पराभव झाला तसाच व्हर्डून येथें झाला. यिप्रेसची लढाई महिना सव्वा महिना चालली आणि व्हर्डूनची लढाई दोन अडीच महिने चालली; यिप्रेसपेक्षां दुपटीने जर्मनीचा पराभव झाला. व्हर्डूनचा किल्ला घेऊन तेथून सव्वाशे दीडशें मैल दूर असलेल्या पारीस शहराकडे चाल करून जाण्याचा जर्मनीचा उद्देश होता असें जर म्हटलें आणि त्या उद्देशाच्या दृष्टीनें जर्मनीच्या पराभवाची जर आपण किंमत ठरवूं लागलो तर व्हर्डूनचा उद्योग जर्मनीच्या आंटलट पुरा आला असें म्हटल्यावांचून गत्यंतर नाहीं; पण लष्करी धोरणाच्या दृष्टीनें विचार केला असतां पारीस घेण्यासाठीं व्हर्डूनच्या लढाईस सुरवात करण्यांत आली हें म्हणणें युक्तिजुक्तीस धरून दिसत नाहीं. किंबहुना व्हर्डूनच्या टापूंतून फ्रेंचांची जर्मनीवर स्वारी होईल, अशी भीति वाटून त्या स्वारीची गति कुंठीत करण्याकरितां जर्मनीनें व्हर्डूनवर हल्ला चढविला, असें म्हणणें अधिक सयुक्तिक होईल. ह्यासंबंधीची साधकबाधक चर्चा गेल्या अंकीं आम्ही वाचकांपुढें मांडलीच आहे. दुसऱ्या दृष्टीनें म्हणजे फ्रेंचांच्या

स्वारीचे पाय आगाऊ मोडण्याच्या दृष्टीनें जर्मनीला काय मिळाले ? जर्मनीनें व्हर्डूनच्या आसपासच्या बऱ्याच टेकड्या घेतल्या; खुद्द व्हर्डूनचा किल्ला वस्तीच्या व मोठा सांठा ठेवण्याच्या दृष्टीनें निरुपयोगी केला; आणि पारीसवरून व्हर्डूनकडे जाणारी आगगाडी पांचसात मैलावरून कां होईना जर्मन लोकांच्या माऱ्यांत राहील इतक्या दक्षिणेस बेथिनकोटपासून जर्मन सैन्य खालीं उतरलें; पुढें चाल करून जाणाऱ्या फ्रेंचांच्या तयारीचें केंद्रस्थान व्हर्डून ह्या सालीं होऊ शकत नाहीं. इतक्या पुरतें जर्मनीचें कार्य साधलें पण पारीसवरील हल्ल्याकरितां स्वतःच्या तयारीचें केंद्रस्थान व्हर्डून करण्याचा जर्मनीचा हेतु असल्यास तो मात्र सपशेल फसला. शिवाय जर्मनीने जें कांहीं थोडेसें मिळविलें तें मिळविलें असेंहि म्हणतां येत नाहीं; कारण फ्रेंचांच्या स्वारीचे पाय मोडण्याइतक्या टेकड्या व्हर्डूनच्या आसपास मिळवितांना जर्मनीनें इतके लोक गमविले कीं, व्हर्डूनच्या उत्तरेस ह्याहून कमी नुसकसानीनें फ्रेंचांची स्वारी जर्मनीस थोपवून धरतां आली असती. एवढी मात्र गोष्ट खरी कीं, व्हर्डूनच्या लढाईमुळें फ्रान्स व बेल्जम येथील अँग्लो-फ्रेंच सैन्याच्या रचनेंत बराच फेरबदल झाला आहे. इंग्रजांच्या हवाली रणभूमीचा पूर्वींहून अधिक बराच भाग करण्यात आला. हा अधिक भाग इंग्रजांना व्यापावा लागल्यामुळें जर्मनावर तुटून पडण्याची इंग्रजांची शक्ति कमी झाली. इतर ठिकाणचें सैन्य व्हर्डून येथें फ्रेंचाना आणावें लागलें, इतर ठिकाणचा दारूगोळाहि व्हर्डून येथें आणावा लागला. अर्थात् जर्मनीवर हल्ला करण्याकरितां केलेली तयारी विसकटली गेली. आणखी दोन चार महिने अँग्लो-फ्रेंचांचा जोराचा हल्ला जर्मनीवर होईल असा रंग दिसत नाहीं. दोन चार महिने हल्ला नाहीं म्हणजे पुढें थंडीचे दिवस जवळ येत जातात. व्हर्डूनच्या लढाईनें पारिस गांठण्यास जर्मनी असमर्थ ठरला; पण १९१६ सालीं पश्चिम रणभूमींत जर्मनी उलथापालथा होण्याचीं चिन्हेंहि अस्तास गेलीं. १९१६ सालीं अँग्लो-फ्रेंच सैन्य जर्मनीवर यथाशक्ति हल्ले करील हें खरें; पण पश्चिम रणभूमींत जर्मनीची पूर्ण पिछेहाट होऊन महायुद्धाची परिसमाप्ति होण्याची आशा नष्ट झाली. १९१६ सालीं नाहीं तरी १९१७ सालच्या वसंत काळीं तरी अँग्लो-फ्रेंचांचा हात जर्मनीच्या मानेवर चढल्यावांचून राहणार नाहीं. १९१७ सालच्या वसंत काळांत जर्मनीची पिछेहाट होऊं लागल्यावर पांच सात महिन्यांनीं जर्मनी तहाची भिक्षा मागूं लागेल, ह्या हिशोबानें महायुद्ध तीन

साडेतीन वर्षांच्या अखेरीस संपणार, आणि १९१६ सालच्या अखेर पर्यंत तरी मोठासा विजय दोस्त सरकारच्या पदरांत पडणार नाहीं. १९१६ अखेर अर्धवट आंगलट आलेली बाजू १९१७ सालीं कशी फिरवावयाची आणि जर्मन सैन्याचा चक्काचूर रणभूमीवर कसा करावयाचा ? रशियानें आपलें सैन्य आणखी एक वर्षभर हल्लींच्या प्रमाणेंच वाढविलें असतां रशियाच्या रणभूमीचें कार्य भागणारें आहे; पण रशिया कितीहि वाढला तरी जर्मनीला उलथून पाडण्याचें सामर्थ्य ह्या महायुद्धांत रशियाच्या अंगीं उत्पन्न होईल असें कोणास वाटत नाहीं. रशियानें आपल्या बाजूला जर्मनीला चांगला खेचून धरला आणि कांहीं ठिकाणीं जर्मनीची पिछेहाट केली म्हणजे पुष्कळ केलें. तेवढयावर ॲंग्लो-फ्रेंच संतुष्ट आहेत. जर्मनीला चीत करण्याचा विडा ॲंग्लो-फ्रेंचांनीं उचलला आहे. १९१६ सालींच जर्मनीला चीत मारण्याचा डाव खेळला जाणार होता; पण व्हर्डूनच्या लढाईमुळे अधिक तयारीची जरुरी स्पष्ट दिसू लागली आहे. अधिक तयारी म्हणजे अधिक लोक पाहिजेत. हें अधिक सैन्य कोठून आणावयाचें ? नव्या सैन्याची भरती करण्याची फ्रान्सची ताकत संपुष्टांत येऊं लागली आहे, तेव्हां नव्या अधिक सैन्याचा पुरवठा करण्याचा बोजा इंग्लंडवर येऊन पडला आहे.

## इंग्लंडचा दीर्घोद्योग

गेल्यावर्षी रशियाच्या पिछेहाटीस सुरुवात होऊन हिंवाळयाच्या बर्फानें लढाईस मंदी आल्यावर गेले पांच सहा महिने इंग्लंड, फ्रान्स, रशिया व इटली यांनीं युद्धाची जी तयारी केली तिजकडे पाहून सर्वांना असें वाटलें कीं, चालू सालच्या मे-जून महिन्यांत जर्मनी चारीमुंडे चीत होईल; पण मार्च-एप्रिल महिन्यांत ज्या गोष्टी घडून आल्या त्यांनीं असें प्रस्थापित केलें कीं, जर्मनीस शरण आणण्यास अजून एक वर्षाच्या तयारीची जरुरी आहे. मार्च-एप्रिल महिन्यांत जर्मनी व्हर्डूनच्या बाजूला गुंतला असतांना रशियाने ऑस्ट्रो-जर्मनांवर बऱ्याच ठिकाणीं निकराचे हल्ले केले. या हल्ल्यानीं असें सिद्ध झालें कीं, जर्मनी जरी पश्चिम रणभूमींत फ्रेंचांवर जोराचे हल्ले करण्यांत गुंतला असला तरी देखील पूर्व रणभूमींत त्याला थोडेसेंहि मागे हटविण्याची ताकद अद्याप रशियांत आलेली नाहीं. गेल्या सालच्या पिछेहाटीमुळें पडलेला खड्डा रशियानें भरून काढला आहे; आणि आतां यापुढें जर्मनी जर गेल्या सालाप्रमाणें रशियास त्रास देऊं लागेल तर पूर्वीचे

दिवस आतां उरले नाहींत असा अनुभव जर्मनीस आणून दिल्याबांचून रशिया राहाणार नाहीं असा सर्वांस भरंवसा वाटत आहे. रशियाच्या पुनर्जन्माची ही अटकळ जर येत्या चारसहा महिन्यांत खरी ठरली तर आणखी एक वर्षाच्या तयारीनें म्हणजे १९१७ सालच्या वसंतकाळीं जर्मनीस स्वतःच्या मुलखांतून हाकून देण्यास रशिया लायक होईल यांत संशय नाहीं. रशियाच्या या चढाईच्या वेळीं जर्मनींत घुसण्यास अँग्लो-फ्रेंचांनीं काय करावें ? व्हर्डून येथील जर्मनीच्या पराभवानें येवढी गोष्ट सिद्ध झाली कीं, १९१४ किंवा १९१५ सालाप्रमाणें १९१६ सालींहि आम्ही म्हणू तेथें भोक पाडू अशी शेखी मिरविण्याचे जर्मनीचे दिवस संपले; पण त्याबरोबरच १९१६ सालीं अॅग्लो-फ्रेंच जर्मनींत घुसतील अशी वाटत असलेली आशाहि नष्ट झाली. डयूनाजीच्या पराभवानतर जर्मनीचें लष्करी तेज दोस्त सरकारच्या प्रभावाहून अधिक तीव्र असें तज्ज्ञांना वाटलें; पण हिंवाळयांतील तयारीनें दोस्त सरकारचें पारडें अधिक जड झालें असा भास झाला. व्हर्डूनच्या लढाईनें हा भास दूर केला आहे. दोन्ही पारडीं सारख्याच तोलाचीं ठरलीं गेलीं. समबल ठरल्यानतर ज्या पक्षास जिवंत झऱ्याचें पाणी नेहमीं मिळत राहाणार तो पक्ष कालांतरानें वरचढ होणार, हें उघड आहे. अन्नाच्या टचाईमुळें जर्मनीचे झरे आटत आहेत; पण इंग्लंडचे जुने झरे अधिक जोरानें वाहात आहेत इतकेंच नव्हे तर जिवत झऱ्यांच्या जाळयानीं व्यापलेल्या विस्तीर्ण प्रदेशावर इंग्लडनें अद्याप एक विहीरहि खणली नाहीं ! इंग्लडचे लोक निसर्गतः सक्तीच्या कायद्याच्या विरुद्ध असल्यामुळे इंग्लंडांत आजपावेतों असल्या विहीरींच्या जागांची नुसती टेहळणी झाली आहे. अद्याप एकहि विहीर खणण्यास सुरुवात झालेली नाहीं. सात आठ महिन्यांत इंग्लडांत असा एक पक्ष पुढें येऊं लागला आहे कीं, सक्तीच्या लष्कराचा कायदा पूर्णपणें अमलांत आणल्याशिवाय इंग्लंडचा विजय महायुद्धांत होणार नाहीं असें जाहीर करण्यास त्या पक्षानें सुरुवात केली आहे. मुख्यप्रधान मि. आस्क्विथ यांना हें मत पडलें नाहीं. पण मि. लाईड जार्ज, लॉर्ड लेन्सडाऊन, लॉर्ड किचनेर वगैरे मंडळींनीं पूर्णपणें लष्करी सक्तीचा कायदा अमलांत आला पाहिजे असा हट्ट धरला. एप्रिल प्रारंभाला हा तटा विकोपास गेला. मि. आस्क्विथ व त्यांच्या बरोबर निमे प्रधान मंडळ आणि मि. लाईड जॉर्ज व त्यांच्या-बरोबर निमे प्रधानमंडळ, ह्यांपैकीं कोणीतरी घरीं बसून इंग्लंडांतील दुहीची

टिमकी दोस्तांचीं मनें निरुत्साहानें व शत्रूचीं मतें आनंदानें भरून टाकते कीं काय अशी भीति वाटली. एप्रिल पंधरावीसच्या सुमारास ह्या दोन पक्षांमध्यें अर्धवट तडजोड झाली. पण ह्या तडजोडीनें पार्लमेंटांतील प्रधान मंडळाचें वजन न वाढतां उलट कमीच झालें. एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यांत आयर्लंडांतील बंड व कुतुल अमारा येथें तुर्कांना जनरल टाऊनशेंड ह्यांचें शरण जाणें ह्या उद्वेगजनक गोष्टी घडून आल्या. एप्रिल महिन्याच्या प्रारंभापासूनच आयर्लंडांत थोडीशी गडबड होती. पण एप्रिलच्या तिसऱ्या व चवथ्या आठवड्यांत डब्लिन आदिकरून चारपांच ठिकाणीं बंडाचीं निशाणें उघडपणें उभारण्यांत आलीं. ह्या बंडखोरांचे पुढारी सर रॉजर केसमेंट ह्यांना जर्मनींतून एका जर्मन पाणबुड्या बोटीनें आयर्लंडच्या किनाऱ्यावर उतरविलें, आणि दारूगोळ्यांनीं भरलेलें एक जर्मन जहाज आयर्लंडच्या किनाऱ्यावर आलें. सदर जहाज इंग्रजी आरमारानें समुद्रांत बडविलें व बंडखोरांचे पुढारी सर रॉजर केसमेंट ह्यांना कैद केले. पण मे प्रारंभापर्यंत आयर्लंडांतील बंडाची ज्वाला शमली नाहीं. मे प्रारंभाला हें बंड संपुष्टांत आलें. लष्करी दृष्टीनें विचार करतां हें बंड अत्यंत क्षुल्लक होय; पण राजकीय दृष्टीनें विचार करणारांना हें बंड तितके क्षुल्लक दिसत नाहीं. अशा महायुद्धाच्याप्रसंगीं आयर्लंडांत बंड व्हावें ही गोष्ट इंग्लंडच्या राज्यकारभारांतील औदार्याचा भाग अमेरिकेसारख्या राष्ट्राच्या दृष्टीनें बराच हिणकस ठरविणारा आहे, ह्यांत संशय नाहीं. शिवाय फ्रान्स व रशियासारख्या दोस्तानांहि असें वाटेल कीं आपल्या मित्राच्या अस्तनींत अग्नि आहे, तेव्हां कोणत्या वेळीं काय होईल कोण जाणें ! खुद्द इंग्लंड-च्याहि मनाला ह्या बंडामुळें उदासीनता आल्यावांचून राहणार नाहीं. कारण आयर्लंडचा हा तंटा आजकालचा नसून शेदोनशें वर्षें चालत आलेला आहे. आयर्लंडच्या तंट्यांतील अत्यंत दुःखद प्रसंगांच्या आठवणींचें छत ह्या बंडामुळें सर्व इंग्लंडवर पसरल्यावांचून रहाणार नाहीं. मार्च एप्रिल महिन्यांत जर्मनीनें रोज तीन चार बोटी बुडविण्याचा सपाटा चालविला. जर्मनीच्या विमानांनीं पांच सात वेळां इंग्लंडवर हल्ले केले; आणि जर्मनीच्या आरमारानें इंग्लंडवर आरमारी पहाऱ्यास चुकवून खुद्द इंग्लंडच्या किनाऱ्यावर तास अर्धा तास तोफा डागल्या ! पाणबुड्यांची चांचेगिरी, विमानांचे हल्ले, आरमारांची चढाई, आयर्लंडांतील बंड व जनरल टाऊनशेंड ह्यांची शरणचिठ्ठी, ह्या सर्व गोष्टी

युरोपांतील रणभूमीवर वावरणाऱ्या लष्करी उलाढालीच्या दृष्टीनें अत्यंत फिक्या ठरतात. महायुद्धाची परिसमाप्ति युरोपांत पश्चिम रणभूमींत किंवा पूर्व रणभूमींतच व्हावयाची आहे. इतर ठिकाणचे जयापजय हे नुसते पोषक अर्थात् गौण होत. मार्च–एप्रिल महिन्यांत वरील तऱ्हेच्या अपजयांनीं व त्रासदायक गोष्टींनीं इंग्लंडास जरी घेरलें तरी मुख्य मुद्यावर म्हणजे युरोपांतील रणभूमीवर इंग्लंडनें आपली दृष्टि अचल ठेवली; आणि 'जबजब कूटा तबतब मीठा' ह्या न्यायानें लढाईची तयारी अधिक जोरानें करण्याचा इंग्लडनें निश्चय केला. मे प्रारंभाला सक्तीच्या लष्करी कायद्यासंबंधानें इंग्लंडांतील मतभेद नष्ट झाला, आणि मुख्य प्रधान मि. आस्क्विथ ह्यांनीं सक्तीच्या लष्कराचें तत्त्व अंशतः कबूल न करतां सर्वांगासह पूर्णपणें स्वीकारलें ! आयर्लंडच्या बंडानें, टाऊनशेडच्या शरणचिठीनें, आणि जर्मन पाणबुड्या बोटी, जर्मन आरमार व विमानें ह्यांनीं दिलेल्या त्रासानें इंग्लडवर एक प्रकारचे उपकारच केले. इंग्लंडांतील सर्व झऱ्यांना मे जून महिन्यांत आतां पंप लागणार; आणि १९१६ सालीं नाहीं तरी १९१७ सालीं तरी इंग्लडच्या सैन्याच्या प्रचंड ओघामुळें जर्मनीची पिछेहाट होणार.

## रशियाची रणभूमि

व्हर्डूनची लढाई चालली असतांना रशिया स्वस्थ बसलेला नव्हता. दोन दिशांनीं रशियानें आस्ट्रो–जर्मनांवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. उत्तरेस रिगा, डिंवक्स व व्हिलना ह्या पट्टयांत जर्मनांचे कांहीं खंदक रशियाने घेतले; व जर्मनीनें उलट केलेले सर्व हल्ले मागे परतविले. त्याचप्रमाणें दक्षिणेस ग्यालिशियामध्यें रशियाने बरेच हल्ले आस्ट्रियावर केले. हे हल्ले जानेवारी महिन्यापासून सुरू आहेत; पण आस्ट्रियाची फळी रशियाला फोडतां आली नाहीं. आस्ट्रियानेंहि रशियावर बरेच उलट हल्ले केले, पण त्यांत आस्ट्रियाचें अत्यंत नुकसान होऊन आस्ट्रियास दोन पावले मागेंच हटावें लागलें. गेल्या दोन तीन महिन्यांत आस्ट्रो–जर्मनांच्या व रशियाच्या ज्या झटापटी झाल्या त्या विशेषतः उत्तरेस डिंवक्सच्या टापूत व दक्षिणेस ग्याशिशियाच्या टापूतच झाल्या, ही ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. त्यावरून असें अनुमान निघतें कीं, उत्तरेस डिंवक्स व दक्षिणेस ग्यालिशिया हीं दोन रशियन फौजेचीं केंद्रस्थानें आहेत. रशियाच्या रणभूमीचे सामान्यतः चार भाग करितां येतात. पहिला भाग रिगा, डिंवक्स व व्हिलना हा होय. हा उत्तरेचा भाग पेट्रोग्राड-

वर करावयाच्या मोहिमेचा पाया समजला जातो. दुसरा भाग म्हणजे व्हिलना, मिन्स्क व प्रिपेट नद्यांवरील जंक्शन स्टेशन्स पिन्स्क हा होय. राजकीय दृष्टया व लष्करी दृष्टया हा दुसरा भाग पहिल्या व तिसऱ्या भागास पोषक अर्थात् गौण स्वरूपाचा आहे. मास्कोवरील स्वारी पेट्रोग्राडवरील स्वारीपेक्षां अधिक दुर्घट. कारण अंतर जास्ती, पाठीमागें आगगाडीचा पाठिंबा कमी, दोन्ही बगला शत्रूच्या हल्ल्यास उघडया, आणि समुद्रावरील आरमाराचें साहाय्य निरुपयोगीं. पेट्रोग्राड-वरील मोहीम मास्कोवरील मोहीमेपेक्षां कमी दुर्घट. रिगाच्या आखातांतून व बाल्टिक समुद्रांतून आरमारी मदत पूर्णपणें मिळण्याचा संभव. सैन्याच्या हालचाली समुद्रांतून म्हणजे जलमार्गानें करण्याइतकी ही आरमारी मदत जरी भरपूर झाली नाहीं तरी मोहिमेच्या डाव्या बगलेला समुद्रांतून रशियन आरमाराचा त्रास सोसण्याचा बिलकूल संभव नाहीं. समुद्रांतून डाव्या बगलेनें व मिन्स्कच्या दलदलींतून उजव्या बगलेनें ड्विक्स येथे केंद्रीभूत झालेल्या रशियन सैन्यास वळसा देतां येण्याचा संभव आहे. शिवाय पेट्रोग्राडवरील मोहिमेचा जर्मनीस मोह पडण्याचें दुसरें असें एक कारण आहे कीं ड्विक्सपासून पेट्रोग्राडपर्यंतचा मुलूख राजकीय दृष्टया फार महत्त्वाचा आहे. राजधानी जवळच्या ह्या मुलखात रशियातील राज्यकर्त्या पुरुषाच्या खाजगी इस्टेटी असून धनधान्यानें व निरनिराळ्या उद्योगधंद्यानीं हा मुलूख फुललेला आहे. अर्थात् ह्या मुलखात पांचपन्नास मैल जरी रशियाची पिछेहाट झाली तरी रशियांतील राज्यकर्त्यावर त्या पिच्छेहाटीचा विशेष परिणाम झाल्या वाचून राहणार नाहीं. मास्कोच्या बाजूची तशी स्थिति नाहीं. मास्कोच्या रोखानें शेंदीडशे मैल पुढे जरी जर्मनी यंदा गेला तरी ' आंगण झाडलें गेलें ' असेंच रशियास वाटेल; आणि १९१७ सालच्या रशियाच्या तयारींत यत्किं-चित्हि कमीपणा दिसून येणार नाहीं. ह्या विवेचनावरून असें स्पष्ट दिसून येतें कीं पूर्व रणभूमींतील दुसरा भाग म्हणजे मिन्स्क–पिन्स्क हा भाग रशियाच्या दृष्टीनें गौण आहे. अर्थात ह्या भागांत रशियाचें मोठेसें सैन्य नाहीं. रशियावर जर्मनीची मोठी मोहीम जर जून जुलई–महिन्यांत सुरू व्हावयाची असली तर ती व्हिलनाच्या दक्षिणेकडील टापूंत सुरू होऊन ड्विक्स येथील रशियन फौजेची डावी बगल मागें रेटत नेण्याचा उद्योग जर्मनीकडून करण्यांत येईल व त्याचवेळीं बाल्टिक समुद्रात व रिगाच्या आखातांत जर्मन आरमाराची मोठी हालचाल होईल, असा तज्ज्ञांचा तर्क आहे. ह्या मोहिमेस अनुकूल काल म्हणजे जून जुलई महिना होय. एप्रिल मे

महिन्यांत रशियांतील बर्फ वितळतें आणि मिन्स्कचा टापू आणि प्रिपेट नदीच्या उत्तरेकडील व दक्षिणेकडील दलदलीचीं रानें कर्दमाने भरून जातात. लष्करी हालचालीस हा दुसरा टापू व प्रिपेट नदीच्या दक्षिणेकडील ग्यालिशियापर्यंतचा तिसरा टापू योग्य होण्यास आणखी कांहीं आठवडयांची आवश्यकता आहे; पूर्व रणभूमीचा तिसरा भाग म्हणजे प्रिपेट नदीच्या दक्षिणेकडील पिन्स्क–सार्नी–रोव्हेनो हा टापू होय. कीव्हवर चाल करून जाण्याच्या मोहिमेचा हा पाया आहे. ह्यापैकीं सार्नीपासून रोव्हनोपर्यंतचा मुलूख उंचवटयावरच असून दलदलीची भीति ह्या मुलखाला विशेषशी नाहीं. सार्नी–रोव्हनो प्रांतांत पुढें सरकून ग्यालिशियांतील रशियन फौजेस उत्तरेकडून वळसा देण्याचा प्रयत्न जर्मनीनें मार्च–एप्रिल महिन्यांत केला; पण रशियाच्या सावधगिरीमुळें जर्मनीस यश आलें नाहीं. प्रिपेट नदीच्या दक्षिणेकडून वळसा घेऊन प्रथम पिन्स्क नंतर सार्नी–रोव्हनो अशी पिछेहाट होऊन ग्यालिशियांतील रशियन फौजेच्या पायास उत्तरेकडून तंबी बसेल. खुद्द ग्यालिशियांत ड्विंक्सप्रमाणें रशियन फौजेचें मुख्य ठाणें असल्यामुळें पश्चिम रणभूमींत जर्मनी गुंतला असतांना रशियानें आस्ट्रियावर बरेच निकराचे हल्ले केले, पण त्या हल्लयांत यावें तसें यश आलें नाहीं. उद्यां खुद्द रशियावर आस्ट्रो–जर्मनांची मोहीम सुरू झाल्यावर ड्विंक्स व ग्यालिशिया येथील रशियन फौज आस्ट्रो–जर्मनांवर उलट हल्ले करण्यास कमी करणार नाहीं. त्या उद्योगांत रशिया विजयी होईल असें मार्च एप्रिलमधील झटापटीवरून दिसत नाहीं; तथापि खुद्द ड्विंस्कच्या प्रांतांत व दक्षिणेस ग्यालिशियामध्यें रशियाच्या मुख्य ठाण्यावर तोंडास तोंड देऊन जर जर्मनीनें हल्ले केले तर यिप्रेसची किंवा व्हर्डूनची आठवण रशियाच्या शौर्यामुळें व तयारीमुळें जर्मनीस पूर्व रणभूमींतहि झाल्यावांचून राहणार नाहीं. काय भीति आहे ती मिन्स्क व पिन्स्क ह्या टापूंची. लष्करी तयारीच्या दृष्टीनें हे टापू मागासलेले. येथेंच जर जर्मनीनें अवचित सेना गोळा केली आणि बगलांना वळसे देण्याच्या लष्करी हालचालींना एकदम जर विलक्षण गति दिली तर रशियाची थोडीशी धांदल उडण्याचा संभव आहे; पण वसंतकाळचें रशियाचें नवें सैन्य ह्या मागासलेल्या टापूंतील पांच पन्नास मैलांच्या म्हणजे एका दृष्टीनें निरुपयोगी अशा पिछेहाटीच्या क्षुल्लक संकटापासून अधिक मोठें संकट रशियावर ओढू देणार नाहीं अशी सर्वांस खात्री वाटत आहे. मे–जून महिन्यांत ड्विंक्स किंवा ग्यालिशिया

प्रांतांतील तोंडातोंडीं लढायाप्रमाणें मिन्स्क व पिन्स्क प्रांतांतील वळशाच्या हालचालीकडे लक्ष पोंचविणें जरूर आहे.

## जनरल टाऊन शेंड

एप्रिल महिन्यांत रशियाच्या रणभूमींत ज्याप्रमाणें विशेष महत्त्वाची गोष्ट घडून आली नाहीं त्याप्रमाणेंच इटलीचे रणभूमींतहि महत्त्वाचें असें कांहींच घडलें नाहीं. रोमानिया, ग्रीस व सॅलिनोका येथीलहि परिस्थिति मे प्रारंभाला पूर्वीप्रमाणेंच कायम होती. इजिप्तच्या बाजूला सुवेज कॅनालचे पूर्वेस काटियाचे टापूंत सुवेज कॅनाल-पासून वीस पंचवीस मैलांवर असलेलें काटियाचें खेडें तुर्कांनीं आपल्या ताब्यांत घेतलें; पण लगेच काटियाच्या टापूचा इंग्रजांनीं चांगला बंदोबस्त करून तुर्कांची विनी सुवेज कॅनालच्या इतक्या जवळ आली तरी लष्करी दृष्ट्या निरर्थक करून सोडिली. एप्रिल महिन्यांत तुर्की युद्धांत विशेष महत्त्वाच्या गोष्टी आर्मीनिया प्रांतांत आणि युफ्रैतिस व तैग्रीस नदीच्या कांठीं घडून आल्या. अर्झरूम घेतल्यानंतर रशियन सैन्यानें पश्चिमेस ट्रिबिझांडच्या बंदरावर हल्ला केला; आणि एप्रिलच्या दुसरे आठवड्यांत ट्रिबिझांडचें बंदर रशियानें सर केलें. ट्रिबिझांडचें बंदर आणि अर्झरूमचा किल्ला हीं महत्त्वाचीं ठाणीं रशियाच्या ताब्यांत गेल्यामुळें आर्मीनियांत रशियाचें पाऊल आतां पक्कें झालें असें म्हणण्यास हरकत नाहीं. आर्मीनियांत रशिया असा स्थायिक झाल्यामुळें काकेशियस प्रांतांतून इराणांत तेहरान व हमदान प्रांतांत उतरलेल्या सैन्याची उजवी बगल आतां पूर्ण सुरक्षित झाली. व्हॅन सरोवराच्या टापूतून तुर्की सैन्य इराणांत घुसेल व दक्षिणेस हमदान प्रांतांत उतरलेल्या रशियन सैन्याच्या पिछाडीस त्रास देईल अशांतली भीति आतां उरलेली नाहीं. रशियानें तेहरान व हमदान प्रांतांतून बगदादच्या टापूंत यावें आणि इंग्रजांनीं बसरा व कुर्णा घेऊन कुतुल आमारा मार्गे टाकून बगदाद शहर घेऊन रशियन सैन्याशीं सलग्न व्हावें असा डाव डिसेंबर—जानेवारीपासून खेळण्यास सुरुवात झाली. बगदाद—हमदानच्या टापूंत रशियन व इंग्रज सेना एक झाली असती तर इराण व तुर्कस्थान यांच्यामध्यें कायमचा बांध पडला असता. जर्मनी व तुर्कस्थान आगगाडीनें सलग्न झाल्यानंतर इराणांत घुसून तेथें तुर्की—जर्मन सत्ता स्थापून बलुचिस्थान, अफगाणिस्थान, आणि बुखारा, समरकंद या मुसलमानी प्रदेशांत युद्धाची ज्वाला पेटून तेथून हिंदुस्थानाला त्रास द्यावयाचा, असा घाट जर्मन सेनापति जनरल गोल्टझ

यांनीं घातला. रशियानें आर्मीनिया प्रांत घेऊन इराणांत तेहरान व हमदान प्रांतांत शिरून जनरल गोल्टझ यांच्या हिंदुस्थानावरील स्वारीचे अर्धे पाय मोडून टाकले. एक पायानें आपण लगडे झालों आहों असें पाहून जनरल गोल्टझ यांना अत्यंत वाईट वाटलें; आणि त्या विषादाचे भरांत आठ दहा दिवस ताप येऊन ते मृत्युमुखीं पडले. या मृत्युमुळे हिंदुस्थानावरील स्वारीचा बेत पूर्ण ढासळून जावयास पाहिजे होता; पण तुर्कांवर जसें हें दुर्दैव ओढवलें तसें इंग्रजांवरहि दुसरें एक दुर्दैव ओढवल्यामुळें हिंदुस्थानावरील स्वारीची टुरटूर आणखी चारसहा महिने कायम राहील असा रंग दिसत आहे. हें दुसरें दुर्दैव म्हणजे जनरल टाऊन शेंड हे दहा हजार सैन्यानिशीं कुतुल–आमारा येथें एप्रिल अखेरीस तुर्कांच्या स्वाधीन झाले, हे होय. १४३ दिवस तुर्कांनीं कुतूल–आमारास वेढा दिला होता. अन्नसामुग्री संपल्यामुळे नाईलाज होऊन दुर्दैवापुढे जनरल टाऊन शेंड यांना हार जावें लागलें. गेल्या डिसेंबरात बगदादच्याजवळ आठ दहा मैलापर्यंत चाल करून जाण्यांत व तेथून कुतुल–आमारापर्यंत मागे परतण्यांत जनरल टाऊनशेंड यांनीं फार शिताफी दाखविली; व हरएक प्रसंगीं ते मोठ्या शौर्यानें लढले. वेढ्यांतून त्यांना सोडविण्याकरिता जनरल लेक यांच्या सैन्यानेंहि पराकाष्ठा केली; पण युफ्रैटीस व तैग्रीस नद्याना वारंवार महापूर येऊन स्थानिक देवतांच्या रुष्टतेपुढे जनरल लेक यांचें काहीं न चालून तुर्कांना शरण जाण्याचें दुर्दैव जनरल टाऊन शेंड यांजवर ओढवलें. तुर्कांशीं लढत असताना असलें दुर्दैव कोणाहि युरोपियन राष्ट्रावर गेल्या शेंदोनशे वर्षांत ओढवलेलें नाहीं, तेव्हां कुतुल–आमारा येथील विजयाने तुर्क शेफारून जातील हे सांगणें नकोच. दक्षिण इराण व युफ्रैटीस–तैग्रीस कांठचा अरबस्तान ह्या प्रदेशावर कुतुल–आमाराच्या पराजयाचा फारच विलक्षण परिणाम होईल. तेथील अरबी व इराणी जातींत इंग्रजांची इज्जत नष्ट होऊन तुर्को–जर्मनांची पूजा अडाणी अरबी व इराणी लोक करू लागतील. इराणी आखाताच्या सभोंवतालचा टापू इतक्या दिवस इंग्रजांना अनुकूल होता, तो आतां प्रतिकूल होईल. या पालटलेल्या राजकीय परिस्थितीकडे लक्ष देऊन कुतुल–आमाराच्या टापूंतून मागें सरकत सरकत बसरा कुर्णाच्या टापूंत बंदोबस्तानें राहून कुर्णा येथून बगदादकडे जाण्याची हाव न धरतां कुर्णा येथून उत्तरेस हमदानकडे जाण्याची हांव धरणें जनरल लेक यांना भाग पडेल. कुतुल–आमाराचा दुर्दैवाचा प्रसंग जर ओढवला

नसता तर इंग्रजांची व रशियनांची गांठ बगदाद येथें पडली असती. जनरल टाऊन शेंड यांच्या दुर्दैवानें बगदाद व कुतुल–आमारा यांचा नाद सोडून देणें भाग पडलें. आतां कुर्णा व हमदान हे टापू संलग्न करण्याचा प्रयत्न करण्यांत येईल. शेफार-लेल्या इराणी व अरबी जातींच्या सहाय्यानें तुर्कांचें सैन्य रशियन व इंग्रज यांची साखळी न जुळण्याकरितां जिवापाड उद्योग करील हें खरें; पण इराणांतील रशियाचें वाढतें सैन्य व मेसापोटेमियामध्यें जनरल लेक यांना रोज मिळत असलेली कुमक यांकडे लक्ष दिलें असतां इराणांत रशियाशीं संलग्न होण्यास एक दोन महिन्यांहून अधिक दिवस इंग्रजांना लागणार नाहींत, असेंच ह्मणावें लागतें.

---

# दुसऱ्या वर्षाचा मे–जून महिना

राजकीय उलाढालीच्या दृष्टीनें, लष्करी धोरणाच्या आविष्करणाच्या दृष्टीनें, आणि रणांगणावरील खुद्द लढण्याच्या दृष्टीनें मे महिना फार महत्त्वाचा गेला. इंग्लंडांत सक्तीच्या लष्कराचा कायदा पास होऊन त्यास बादशहाची संमति मिळाली. या कायद्यासंबंधानें इंग्लंडच्या प्रधान–मंडळांत दुही होती. मुख्य प्रधान मि. आस्क्विथ, लॉर्ड किचनेर, मि. बाल्फर, चेंबर्लेन आदिकरून बरेच पुढारी या कायद्यास असावे तितके अनुकूल नव्हते; मि. लाईड जॉर्ज, लॉर्ड कर्झन वगैरे मुत्सद्दी या कायद्याचे पुरस्कर्ते होते. प्रधान–मंडळांतील दुही अधिकाधिक फाटत जाऊन मि. आस्क्विथ आपल्या जागेचा राजीनामा देतात कीं काय, व मि. लाईड जॉर्ज मुख्य प्रधान होतात कीं काय, अशी हि भीति एके काळीं वाटत होती महायुद्धात यश मिळविण्याच्या दृष्टीनें मि. आस्क्विथ यांच्यापेक्षां मि. लाईड जॉर्ज अधिक कार्यक्षम आहेत, यांत शंका नाहीं. कोणचीहि गोष्ट ते अर्धवट करीत नाहींत. आपल्या मताप्रमाणें तावडतोब वागूं लागतात, आणि त्यांचा आवेश इतरांना उत्साहपूर्ण करून सोडतो. मि. आस्क्विथ अधिक धिमे आहेत; बऱ्या-वाईटाची चाड त्यांना विशेष आहे; आणि त्यामुळें ते पुण्यशील समजले जाऊन सर्वांच्या विश्वासास पात्र झाले आहेत. मि. लाईड जॉर्ज व लॉर्ड कर्झन यांची जोमाची तडफ महायुद्धास निराळे वळण देण्यास जरी अत्यंत जरुरीची असली तरी वेगाच्या धावण्यानें केव्हां दिशाभूल होईल याचा नियम नाहीं, अशी भीति त्यांजविषयीं वाटते. अशा प्रसंगीं मि. आस्क्विथ व मि. लाईड जॉर्ज हे विभक्त न होतां एकत्र राहिले ही संतोषाची गोष्ट आहे. लष्करी सक्तीच्या कायद्यासंबंधानें पार्लमेंट सभेंत वादविवाद चालला असतांना असें स्वच्छ रीतीनें सांगण्यांत आलें कीं, जर नवें मोठें सैन्य इंग्लडनें उभारलें नाहीं तर या युद्धांत इंग्लंडच्या कपाळीं अपयश कायमच आहे असें समजावें! पार्लमेंटांतील या जाहीर उद्गारांपूर्वी महायुद्धाची कथा या थराला येऊन पोंचली आहे असें कोणासहि वाटलें नव्हतें. उशीरा कां होईना, इंग्लंडनें आपलें दुखणें वेशीवर टांगलें ही संतोषाची गोष्ट आहे. असें करण्यास मि. आस्क्विथ इतक्या दिवस तयार नव्हते. याचें कारण

इतकेंच कीं, सक्तीचा लष्करी कायदा इंग्लंडांतील सामान्य लोक गोडीगुलाबीनें स्वीकारणार नाहींत अशी त्यांस भीति वाटत होती. इंग्लंड म्हणजे सांगून सवरून दुकानदारांचें राष्ट्र. लढवय्यांच्या कायद्यांचें जड जूं स्वतःच्या मानेवर घेण्यास इंग्लंडला बरें वाटणार नाहीं. ह्या भीतीनें लष्करी सक्तीचा कायदा अमलांत आणण्यास मि. आस्क्विथसारखे मुत्सद्दी कच करीत होते; पण कुतुल–आमारा येथील जनरल टाऊनशेंड यांच्या शरणचिठ्ठीनें आणि आयर्लंडांतील बंडानें इंग्लंडचें लोकमत एकदम पालटलें. तराजू हातांत धरण्यांत दाखविण्याच्या कौशल्याहून अधिक कौशल्य रणभूमीवर बंदुकीचा नेम धरण्यांत आम्ही दाखवूं असा निश्चय इंग्लंडनें केला आणि मे महिन्यापासून इंग्लंड लढवय्यांचें राष्ट्र झालें. इंग्लंडच्या किंबहुना सर्व युरोपखंडाच्या इतिहासांत ही फार महत्त्वाची गोष्ट झाली. मि. आस्क्विथसारखे उदार मताचे अभिमानी जोंपर्यंत इंग्लडचे नेते आहेत तोंपर्यंत राजकीय स्वातंत्र्याच्या दृष्टीनें इंग्लंडची व त्या बरोबर युरोपखंडाची विशेष हानि या कायद्यानें होणार नाहीं हें खरें; पण व्यक्ति निघून जातात आणि कायदे मागें रहातात, तेव्हां हें महायुद्ध प्रवृत्त करणाऱ्या अरेरावी महत्वाकांक्षेनें इंग्लंडलाहि आपला लष्करी पोषाख पेहरावयास भाग पाडून स्वतःच्या सत्तेचा फैलाव केला यांत शंका नाहीं. जर्मनीच्या रोगानें इंग्लंडला ग्रासलें आणि तेवढ्यापुरतें जर्मनीचें नाक वर झालें; पण या पुढील इतिहासाच्या नवीन स्वरूपासंबंधीच्या गोष्टी होत. जर्मनीच्या लशीनें इंग्लंडनें स्वतःस टोचून घेतल्यामुळें इंग्लंडचें रक्त बिघडण्याचा जरी संभव असला तरी जर्मन प्लेग मागें हटविण्याकरितां हा उपाय आहे हें विसरतां कामा नये. महायुद्धाचे स्वरूपावर या सक्तीच्या लष्करी कायद्याचा कोणता परिणाम होणार ? जर्मन प्लेगापासून हा कायदा इंग्लंडचें व दोस्त सरकारचें कसें संरक्षण करणार ? या कायद्यास आपली संमति देतांना बादशहा पंचम जॉज यानीं सक्तीनें प्रजाजनांस लष्करांत ओढण्यापूर्वी इंग्लंडनें आपखुषीनें त्रेपन्न चोपन्न लाख सैन्य उभारलें असें जाहीर केलें. आपखुषीनें पन्नास लाखांहून जर अधिक लोक इंग्लंडच्या सैन्यांत स्वतःची भरती करून घेतात तर पुढील पांच सहा महिन्यांत सक्तीच्या कायद्यामुळें आणखी वीस पंचवीस लाख सैन्याची भरती इंग्लंडास सहज करतां येईल, हें उघड आहे. म्हणजे १९१७ सालच्या वसंत काळांत समरभूमीवर हल्लींच्यापेक्षां इंग्लंडचें सैन्य पंचवीस तीस लाखांनीं अधिक दृष्टीस पडेल ह्यांत संशय

नाहीं. आजची महायुद्धाची स्थिति अशी आहे कीं, हें पंचवीस तीस लाख सैन्य जर पुढील सालीं समरांगणावर उभें राहिलें नाहीं तर जर्मनीची पिछेहाट होणें शक्य नाहीं. १९१७ सालीं व १९१८ सालीं जर जर्मनीची पिछेहाट करतां येणें शक्य दिसलें नाहीं तर मुत्सद्यांनीं लढाई तरी पुढें कां चालू ठेवावी? दोन वर्षांत महायुद्ध न संपतां तिसऱ्या किंवा चवथ्या वर्षी संपेल असल्या नुसत्या लांबटीच्या फुशारकीकरितां कोण लढणार? तिसऱ्या वर्षी लढून जर अधिक फायदा नाहीं, चवथ्या वर्षी लढून जर्मनी मागें एक पाऊलहि सरकत नाहीं, तर आजच कां लढाई थांबवूं नये? युरोपांतील सशक्त तरुणांचा सर्रास संहार घडवून आणणें हा शत्रूचा किंवा दोस्त सरकारांचा कोणाचाच हेतु नाहीं. सांप्रतच्या सारख्या आक्राळ विक्राळ महायुद्धाला दीर्घायुष्य प्राप्त झालें असतां लष्करी हत्यारांचा भूभार हलका होतो आणि पृथ्वीला लष्करी दडपणापासून सोडविण्याकरितां महायुद्धांना बऱ्याच वर्षांचें आयुष्य द्यावें लागतें, ही गोष्ट खरी आहे; पण ही लष्करी रोगावरील औषधाच्या योजनेची दृष्टि होय; मुत्सद्यांची दृष्टि नव्हे. १९१७ किंवा १९१८ सालीं जर्मनीचा पराभव होऊन जर्मनी स्वराज्यांत रेटला जाण्याचा संभव जर मुत्सद्यांना दिसला नाहीं तर इंग्रज, रशियन व फ्रेंच मुत्सद्दी आजच लढाई थांबविण्यास तयार होतील. लष्करी कायद्याच्या वादविवादाच्या वेळीं असें स्पष्टपणें सांगण्यांत आलें कीं, रोज पंधरा हजाराप्रमाणें नवें सैन्य जर आणखी कांहीं महिने मिळालें नाहीं तर चिन्ह ठीक नाहीं. जर्मन मागे हटला नाहीं तर पुढें येत नाहीं ना? १९१७ सालीं पुढें येणार नाहीं ना? १९१८ सालीं पुढें येणार नाहीं ना? जर पुढें येणार नाहीं, आपखुषीच्या सैन्याच्या जोरावर जर जर्मनीला थोपवून धरतां येत असलें, तर हा सक्तीचा लष्करी कायदा कशाला? आणखी वर्ष दोन वर्षांनीं जर्मनीला आपोआप लढण्याचा वीट नाहीं का येणार? अन्नसामुग्रीच्या टंचाईमुळें जर्मनीची त्रेधा उडून जाऊन भुकेनें जर्मनी नाहीं का मरणार? कंटाळ्यासंबंधानें विचार करतां आज असें म्हणावें लागतें कीं, विजयी झालेल्या जर्मनीला, दुसऱ्याच्या घरांत शिरून चरांत लोळत पडलेल्या जर्मनीला फ्रान्सच्यापेक्षां अगोदर कंटाळा कां यावा? शिवाय जर्मनी तुर्काशीं संलग्न झालेला आहे. स्वतःला कंटाळा आला तर तुर्की चेल्यांना मृत्यूच्या पुढें उभें करून विसावा घेण्यास कोणची हरकत? तेव्हां आळसाच्या पायीं जर्मनी

आहारी येईल ही आशा नको. आतां भुकेच्या व्यथेचा विचार करूं. जर्मनींत सांप्रत अन्नाची टंचाई फार आहे व त्यामुळें तह झाल्यास पहावें असा उद्योग जर्मन मुत्सद्यांनीं आरंभिला आहे, ही गोष्ट खरी. पोटाला चिमटा बसल्यामुळें जर जर्मनी आज तहाच्या गोष्टी काढूं लागला आहे तर आणखी एक वर्षानें पोटाचा चिमटा चांगला तीव्र होऊन तहाच्या बोलण्यांतील जर्मनीची ऐट कशावरून नष्ट होणार नाहीं ? दोन वर्षांनीं भुकेनें कासावीस होऊन दातीं तृण धरून जर्मनी तहाची याचना कशावरून करणार नाहीं ? आरमाराच्या सामर्थ्यामुळें जर्मनीची परदेशची रसद बंद पाडून जर जर्मनीची उपासमार इंग्लंडला करतां येते तर सक्तीच्या लष्कराचें लोढणें इंग्लंडनें आपल्या गळ्यांत कां बांधून घेतलें ? जर्मनीची सांप्रत उपासमार होत आहे हें खरें; पण १९१७ सालीं ही उपासमार होईल हें खरें नाहीं. कारण पोलंड, बेल्जम, कोरलंड, सर्व्हिया, रोमानिया व तुर्की साम्राज्य येथील चालू सालच्या नव्या पिकापैकीं कांहीं भाग येत्या सप्टबर–ऑक्टोबर नंतर जर्मनीस मिळण्यास बिलकूल अडथळा उरलेला नाहीं, आणि हा पुरवठा एवढा मोठा आहे कीं, जर्मनीच्या उपासमारीमुळे महायुद्धाची परिसमाप्ति होईल अशी आशा मुत्सद्यांनीं बाळगणें युक्तिजुक्तीस धरून होणार नाहीं. जर्मनी कटाळणार नाहीं किंवा खायला न मिळल्यामुळें खालीं बसणार नाहीं या दोन्ही गोष्टी जरी खऱ्या असल्या तरी जर्मनीचें पुढे सरकणें बद पडलें आहे, हें तर खोटे नाहीं ना ? होय. जर्मनी पुढें सरकत नाहीं व दोस्त सरकार त्याला मागें हटवीत नाहींत, हें खरें आहे. कोणी पुढे येत नाहीं व कोणी मागे जात नाहीं, अशा स्थितींत बरोबरीच्या नात्यानें कां कुस्ती सुटू नये ? बरोबरीच्या नात्यानें कुस्ती सोडण्यास जर्मनी तयार आहे; पण बरोबरीचें नातें म्हणजे काय ? बरोबरी झाली या शब्दाचा अर्थ जर्मनी असा करितो कीं, आतां यापुढें कोणाच्याहि हातून कोणाचाहि परभव होणार नाहीं, एवढाच; पण आतांपर्यंत झालेला विजय वायां जाणें शक्य नाहीं. आतांपर्यंत जर्मनीनें जेवढा मुलूख घेतला तो जर जर्मनीपासून दोस्त सरकारांना हिसकावून परत घेतां येत नाहीं आणि दोस्त सरकारचा अधिक मुलूख जर जर्मनीला आक्रमितां येत नाहीं तर बरोबरीच्या नात्यावर भिस्त ठेवून, जर्मनीनें जें घेतलें तें तहामध्यें जर्मनीस देऊन टाकावें आणि जर्मनीस जें घेतां आलें नाहीं तें जर्मनीस देऊं नये, असें जर्मनीचें म्हणणें आहे. आजचा युरोप खंडाचा नकाशा पहा, कोणाचा किती

मुलुख कोणी घेतला आहे हें लक्षांत आणा आणि मग त्याची वाटाघाट करा असें जर्मनीच्या मुख्य प्रधानानें वारंवार बोलून दाखविलें आहे. जर्मनीनें बेल्जम घेतलें आहे; फ्रान्सचा उत्तर भाग व्यापला आहे; पोलंड व कोरलंड प्रांत काबीज केले आहेत; सर्व्हिया, माऊंट निग्रो व आल्बेनिया येथें आस्ट्रो जर्मनांची सत्ता प्रस्थापित झाली आहे; इतकेंच नव्हे, तर बल्गेरियाला बगलेंत मारून तुर्कांशीं आस्ट्रो-जर्मन संलग्न होऊन तुर्कांचा विजय ग्यालिपोली व कुतुल-आमारा येथें इंग्रजी आरमारावर व इंग्रजी लष्करावर झालेला आहे. उलटपक्षीं जर्मनीच्या वसाहती इंग्रजांनीं घेतल्या असून काकेशियस पर्वताच्या बाजूचे आर्मेनियांतील अर्झरूम व ट्रिबिझांड हे प्रांत तुर्कांपासून रशियानें घेतले आहेत. या सिद्ध गोष्टी आहेत. जर आज दोघांची बरोबरी मानली तर सिद्ध झालेल्या गोष्टींत तरी काय म्हणून फेरफार करावयाचा? लढाईतील जयाच्या किंवा अपजयाच्या बलावर हा फेरफार करावयाचा नसून एकमेकांच्या सोईसाठीं देवघेवीच्या तत्त्वावर वरील सिद्ध गोष्टींत फेरफार करावयास हरकत नाहीं, असें जर्मनीचें म्हणणें आहे. जर्मनांना फ्रान्सचा मुलूख नको आहे, अँटवर्पशिवाय करून बेल्जमच्या मुलखाची त्यांना अपेक्षा नाहीं; व कोरलंड पैकींहि कांहीं भाग सोडून देण्यास तो तयार आहे. युरोपच्या माजघरांतील हा भाग आम्हीं जिंकलेला आहे; आणि आम्हा पासून हा भाग परत घेण्याचें सामर्थ्य तुमच्या अंगीं नाहीं; असें जर्मन म्हणतात. आम्ही जो हा माजघरांतील मुलूख परत द्यावयास तयार आहोंत तो आमच्या वसाहतींच्या ओसाड बखळीहून अधिक किंमतीचा आहे. तेव्हां बेल्जम, उत्तर फ्रान्स व कोरलंडपैकीं कांहीं भाग यांच्या मोबदला आमच्या वसाहती सोडून शिवाय कांगो आदिकरून कोणच्या वसाहती अधिक देतां तें सांगा अशी जर्मनांची इच्छा आहे. जर्मनीच्या सावलीखालील स्वतंत्रता पोलंडास मिळेल आणि सर्व्हियाची वाटेल ती वाट आस्ट्रिया लावील. तुर्कस्थान तर रणांगणावरच आतां पूर्ण स्वतंत्र झालें आहे. तुर्की साम्राज्यावर रशियाचे कोठेंहि व कसलेहि हक्क उरणार नाहींत, तुर्कांच्या व्यवस्थेंत हातपाय घुसवण्याचा अधिकार फ्रान्सनें सांगतां कामा नये; आणि तुर्कांनीं आरबस्थानांत, आरबी समुद्रावर किंवा तांबडया समुद्रावर कोठेंहि लष्करी आगगाडी व लष्करी किल्ले किंवा आरमारी ठाणीं बांधून आरबी समुद्रावरील इंग्रजांच्या एकछत्री सत्तेंत व्यत्यय आणण्याचा कसलाहि प्रयत्न केला तरी इंग्रजांनीं

बोलतां कामा नये. बरोबरीच्या नात्यानें तहाची कल्पना जर्मनीनें वरीलप्रमाणें जगापुढें मांडली आहे. बरोबरीनें कुस्ती सोडावयाची म्हणजे ती ही अशी! आतां-पर्यंत गिळंकृत केलें तें केलें; पुढें गिळंकृत करावयाच्या संबंधानें मात्र दोन्ही पक्षांची बरोबरी! वरील तऱ्हेचा तह फ्रान्स व इटली यांना जरी आजच विशेष जाचक नसला तरी इग्लंड व रशिया यांची असल्या तहानें फार नुकसानी होणार आहे. रशियाला कांहीं मुलूख सोडावा लागतो. भूमध्य समुद्राकडच्या इस्तंबूलच्या मार्गावर राजकीय सत्ता स्थापन करण्याच्या आपल्या शेकडों वर्षांच्या हावेस कायमची तिलांजली द्यावी लागते, सर्व्हियाच्या उत्कर्षानें ऑस्ट्रियाची सत्ता मर्यादित करण्याचा उद्योग सोडावा लागतो, आणि युरोपखंडांतील महत्त्वाकांक्षा अशारीतीनें छिन्नभिन्न झाल्यावर इराणच्या मार्गानें आरबी समुद्रावर जर्मनीच्या सल्ल्यानें उतरून स्वतःच्या दोस्ताच्या म्हणजे इंग्रज सरकारच्या आरबी समुद्राच्या राखून ठेवलेल्या कुरणांत चरण्याचें पातक करावें लागतें! वरील प्रकारच्या तऱ्हेनें रशियाइतकी प्रत्यक्ष हानि इंग्रजांची नाहीं. इंग्रजांच्या मुलखापैकीं टीचभरहि मुलूख कमी होत नाहीं; पण तुर्की साम्राज्याला जर्मनीच्या बरोबरीचें महत्त्व व स्वातंत्र्य प्राप्त होऊन जर्मनांचा पाठिंबा तुर्कांस मिळाल्यामुळे पूर्वीप्रमाणें पूर्व भूमध्य समुद्र, तांबडा समुद्र, व आरबी समुद्र निर्जीव निद्रावस्थेत यापुढे रहाणें शक्य नाहीं. जर्मनांनीं पछाडलेल्या तुर्की पिशाच्चांची बाधा वरील तिन्ही समुद्रांत इंग्रजांना पावलोंपावलीं व क्षणोक्षणीं होणार. इजिप्तसंबंधानें व हिंदुस्तानसंबंधाने इंग्रजांना स्वस्थ झोंप लागणें असल्या तहानें शक्य होणार नाहीं. तुर्कांना आरमारी दृष्ट्या व लष्करी दृष्ट्या सामर्थ्यवान करून इजिप्तच्या व हिंदुस्तानच्या इंग्रजी वाटेवर तुर्कांचें सराटे जर्मनी पसरूं पहात आहे आणि इंग्रजांपुढील इजिप्तच्या व हिंदुस्तानच्या पंचपक्वान्नांच्या ताटांत माती टाकण्यास वरील प्रकारच्या तहानें जर्मनी तुर्कांना पुढें ढकलीत आहे. अशा स्थितीत बरोबरीच्या नात्याचा जो अर्थ जर्मनी करीत आहे तो अर्थ इंग्लंड कोठून कबूल करणार? हा असला तह म्हणजे अपयश स्वतःच्या गळयात बांधून घेणें होय; जर्मनीच्या गळयांत यशाची माळ घालणें होय; आणि इजिप्त व हिंदुस्थान या देशांच्याखालीं सुरुंग खणावयास तुर्कांना परवानगी देऊन तेथील आपल्या सत्तेस ओहोटी लागल्याचें कबूल करणे होय! जर १९१७ किंवा १९१८ सालीं प्रत्यक्ष रणभूमीवर जर्मनीची पिछेहाट दोस्त सरकारांना करतां आली नाहीं तर वरील

प्रकारच्या तहाचें अपयश पदरीं बांधल्यावांचून गत्यंतर नाहीं. इंग्लंडांत सक्तीच्या लष्कराचा कायदा नको म्हणणाऱ्यांना मि. लाईड जॉर्ज यांनीं असें चक्क बजावलें कीं, सक्तीचें नवीन लष्कर उभारून जर जर्मनीचा पराभव तुम्ही केला नाही तर असलें अपयश तुमच्या कपाळीं विधात्यानें कायमचें लिहिलें आहे असें समजा. सक्तीच्या लष्करामुळे वीस–पचवीस लाख इंग्रजांचें अधिक सैन्य पुढील सालीं रणांगणावर उतरेल; आणि जर्मनीस चांगला झोडपून काढून जर्मनीनें घेतलेले मुलूख त्याजपासून हिसकावून घेऊन खऱ्या बरोबरीच्या नात्यानें किंवा वरचढ पक्ष म्हणून जर्मनीशीं तहाच्या गोष्टी बोलण्यास ठीक पडेल. इंग्रजांच्या सक्तीच्या लष्कराचा कायदा दोस्त सरकारांना अखेरीस यश संपादन करून देणार आणि रशियाच्या मुख्य प्रधानांनीं नुकतेंच म्हटल्याप्रमाणें महायुद्धाचें आयुष्य यापुढे जर्मनीनें कितीहि वाढविलें तरी महायद्धाच्या अखेरच्या निकालांत जर्मनीस बिलकूल फेरफार करतां येणार नाहीं.

## इटलीचें युद्ध

इंग्लंडनें पसार केलेल्या सक्तीच्या लष्कराच्या कायद्याचा परिणाम कोणचा होणार ह्याचें विवेचन येथपर्यंत झालें. १९१७ सालीं किंवा १९१८ सालीं लष्करी दृष्ट्या जर्मनीचा पराभव झाल्यावांचून राहणार नाहीं हें ह्या विवेचनावरून सिद्ध झालें. हा पराभव जर्मनीला कसा टाळतां येईल ? आतांपर्यंत मिळविलेल्या यशांचा थोडासा तरी भाग पदरीं ठेवून महायुद्धाची परिसमाप्ति जर्मनीस कोणच्या रीतीनें करता येईल ? जर्मनीस जर थोडी आशा असली तर ती चालू सालीं. चालू सालीं जर जर्मनीनें गेल्या सालप्रमाणें मोठे जय संपादन केले तर कदाचित् १७।१८ साली बरोबरी होण्याचा संभव आहे. हे मोठे जय जर्मनीनें कोठे संपादन करावयाचे ? कॅले किंवा पारिस ह्या बाजूला संपादन करावयाचे काय ? गेल्या दीड पावणे दोन वर्षांचा महायुद्धाचा इतिहास जर पाहिला तर फ्रान्सच्या रणभूमींत तशी हाव धरणें अयोग्य होय असेंच म्हणावें लागतें. जर्मनीनें जर तशी महत्त्वाकांक्षा धरली आणि पुढील दोन चार महिन्यांत कॅले किंवा पारिस प्रत्यक्ष घेतलें तर फ्रान्स व इंग्लंड ह्यांच्या तयारीसंबंधाच्या बातम्या सपशेल खोट्या होत्या असें म्हणावें लागेल. फ्रेंचांच्या नव्या मोठ्या तोफांची करामत, फ्रेंचांचें धाडस व शौर्य आणि लाखों नवी फौज उभारण्याची इंग्रजांची नवी हातोटी ह्या सर्व गोष्टी केवळ शब्दमय

ठरणें शक्य नाहीं. व्हर्डूनच्या सभोंवार गेले साडेतीन चार महिने जी भयंकर लढाई चालली आहे तिजवरून काय सिद्ध होतें ? तीन चार महिन्यांत सात आठ मैलांहून अधिक पुढें जर्मनीचें पाऊल पडलें नाहीं; आणि हे सात आठ मैल तरी जर्मनीनें कसे घेतले ? फ्रेंचाच्या नव्या तोफेहून जर्मनीची तोफ अधिक किंमतीची म्हणून नव्हे; तर एका विवक्षित जागीं शत्रूहून सख्येनें अधिक तोफा एकदम आणून त्या तोफांच्या माऱ्याखालीं मैल दोन मैल लांबीरुदीचें रान भाजून काढून उलथें पालथें करून, आगीचा लोळ सारखा फिरता ठेवून, कसायाप्रमाणें निष्ठुर वृत्तीनें स्वतःच्या सैन्याची कत्तल होऊ देऊन, मग मैल, अर्धा मैल, पाव मैल, कांहीं यार्ड, कांहीं फूट, किंवा कांहीं इंच जमीन संपादन करावयाची ! ह्या पद्धतीनें ह्या चार महिन्यांत ७ मैल जर्मनी व्हर्डूनच्या टापूत पुढे सरकला. मे महिन्यांत व्हर्डूनची लढाई एप्रिल प्रमाणेंच निकरानें चालली होती. म्यूज नदीच्या केव्हां उजव्या बाजूला तर केव्हां डाव्या बाजूला अशा रीतीनें जर्मनाचें एकसारखे हल्ले सर्व मे महिनाभर होत होते. मेच्या तिसऱ्या व चवथ्या आठवड्यांत तर ह्या लढाईस रंग चढला. जर्मन बेपरवाईनें लढूं लागले आणि मॉर्ट होमी टेकडी बऱ्याच अशानें जर्मनीच्या ताब्यांत गेले व म्यूजच्या डाव्या कांठचे क्यूमिअरचें खेडे जर्मनानीं घेऊन म्यूजच्या कांठाकांठानें मैल दीड मैल खालीं उतरून काटेनकोर्ट गांवाला जर्मनांनीं शह दिला. म्यूजच्या उजव्या बाजूलाहि व्हॉक्सचा किल्ला व व्हॉक्सचें खेडे जर्मनांनीं घेऊन व्हर्डूनच्या गांवाच्या रोखानें अर्धा पाऊण मैल जर्मन पुढे सरकले. ही लढाई अशाच निकरानें चालली असताना इंग्रजांची कुमक फ्रेंचांना मिळू नये म्हणून सोमनदीपासून यिप्रेसपर्यंत इंग्रजावर जर्मनीचे हल्ले होतच होते. मे अखेरीस यिप्रेसच्या दक्षिणेस अर्धा पाऊण मैल जर्मन पुढे सरकलेहि. आपण अशी कल्पना करू कीं, जून महिन्यांत निकरानें लढून जर्मनीनें यिप्रेस व व्हर्डून हीं दोन्हीं ठाणीं घेतल्यानें जर्मनीचें कोणचें लष्करी धोरण यशाच्या मार्गाला लागणार ? कॅले किंवा पारिस घेण्याचें धोरण यशस्वी होण्यास आरंभ झाला असें म्हणता येईल काय ? चार चार पांच पांच महिने लढून जर एक ठाणें मिळालें तर धोरण यशाच्या मार्गाला लागलें असें न म्हणतां तें धोरण सोडून देण्याची इशारत रणदेवतेनें दिली असेंच म्हटलें पाहिजे. एक ठाणें घेण्यास चार पांच महिने लागणें

व लाखो सैन्याची खराबी होणें हें सुचिन्ह नव्हे; दुश्चिन्ह होय ! आपण अशी कल्पना करूं कीं, आणखी चार पांच महिने म्हणजे यंदाच्या सालच्या लढण्याचा मोसम जर्मनी फ्रान्सच्या मागे असाच हात धुवून लागला; काय परिणाम होईल ? व्हर्डून घेऊन पुढें सात आठ मैल जाईल इतकेंच. १९१७ सालीं युधानंतर बडगा देखण्याची वेळ आली म्हणजे कसें ? १९१६ सालीं जर रशियास मोकळें सोडलें तर १९१७ सालच्या वसंत काळीं रशियाची दीड वर्षाची तयारी उरावर बसेल त्याची वाट काय ? महिन्याला एक मैल मिळविण्यास जर १९१६ साल जर्मनीनें खर्च केलें तर जर्मनीच्या पराभवास यदाच प्रत्यक्ष आरंभ झाला असें म्हणावें लागेल. यदाची रशियाची तयारी स्वसंरक्षण करण्यापुरती आहे; आणि यदाची फ्रान्सची व इंग्लंडची तयारी, जर्मनी इतर ठिकाणीं गुन्तला असतां, जर्मनीवर चढाई करून जाण्याच्या जोमाची आहे. जर्मनीनें आपलें मुख्य बळ जर यदा ॲंग्लो–फ्रेंचांच्या बाजूवर झुकविलें तर थोडयाशा मैलांची जमीन सोडून जर्मन सेनेची खूब खराबी करून जर्मनीला थोपवून धरण्याची शक्ति आज ॲंग्लो–फ्रेंचाच्याच मनगटांत आहे. हिंवाळयापर्यंत जर जर्मनी फ्रान्सच्याच मागे लागला तर या शक्तीस उतरती कळा न येऊन उलट हिंवाळयानंतर म्हणजें १९१७ सालच्या वसंतकाळीं इंग्लंडची वीस पंचवीस लाखांची नवीन सेना रणांगणावर येऊन जर्मनीनें सर्व बल फ्रान्सच्या बाजूला ठेवलें तरी, जर्मनीला मागे हटविण्याची शक्ति ॲंग्लो–फ्रेंचांना प्राप्त होईल. त्याच सुमारास दीड दोन वर्षाच्या विसाव्यानें ताजातवाना झालेला रशिया जर जर्मनीच्या अंगावर तुटून पडला तर जर्मनीची दुर्दशा होण्यास कितीसा वेळ लागेल ? अशा दृष्टीनें विचार केला असतां व्हर्डून व यिप्रेस या दोन ठाण्यांच्या लोखंडावर जर्मनीनें एकसारखे घणाचे घाव मारीत बसणें म्हणजे स्वतःच्या धोरणास पुष्टि न देतां दोस्त सरकारांच्या लष्करी डावाला मदत करण्यासारखे आहे. मे महिन्यापर्यंतची व्हर्डूनची लढाई जर्मनीच्या लष्करी धोरणाच्या दृष्टीनें अयोग्य नव्हती; जर्मनी रशियाच्या बाजूला गुन्तला असतां, ॲंग्लो–फ्रेंचांची जी चढाई होईल, त्या चढाईचे पाय प्रारंभींच अंशतः तरी मोडून ठेवणें इष्ट होतें; व त्या दृष्टीनें एप्रिल अखेरपर्यंतचें फ्रान्सच्या रणभूमीतील जर्मनीचें धोरण उलगडतां येत होतें. रशियाची तयारी अर्धी कच्ची असताना मे महिन्यापासून रशियावर चढाई करून रशियाच्या पिछेहाटीस पुन्हां सुरुवात करून

घेण्याची खटपट जर्मनीनें करावयास नको होती काय ? मे महिना येऊन गेला, जूनला प्रारंभ झाला, तरी रशियाची बाजू थंडच्या थंड ! बर्फ वितळून उन्हाळयास सुरुवात झाली तरी रशियाच्या बाजूची लढाई गारठलेलीच ! रिगा प्रांतावर जर्मनांची स्वारी होणार, बाल्टिक समुद्रांत जर्मनीचें मोठें आरमार जाऊन रिगाच्या उपसागरांत प्रथम शिरून नंतर फिनलडच्या आखातांत जाऊन समुद्रावरून व जमिनीवरून रशियाच्या राजधानीला शह देण्यांत येणार, अशा अफवा कितीदां तरी पसरविण्यांत आल्या. खुद्द कैसर साहेबांनीं हिंडेनबुर्गची गांठ घेतली आणि पाठ थोपटून बजावलें कीं, जर्मनीच्या वीरश्रेष्ठा, गेल्या सालाहूनहि अधिक मोठी करामत करून दाखविण्याचे दिवस जवळ आले म्हणून समज. सर्व जगाला वाटलें कीं, महायुद्धांतील जमिनीवरचे व पाण्यावरचे चमत्कार पेट्रोग्राडवरील मोहिमेत आतां दृष्टीस पडणार. रशियानें आपलें सर्व सैन्य रिगा–ड्विंक्स टापूंत एकवटून आस्ट्रियावर हल्ले करण्याचें सोडून दिलें, आणि पेट्रोग्राडच्या संरक्षणाची तयारी जारीनें चालविली. इंग्रजांनीं आपल्या सबमरिन्स रशियाच्या मदतीकरतां बाल्टिक समुद्रांत पाठविल्या. उत्तरेस सैन्याचा मुख्य बोजा ठेवून रशियानें ग्यालिशियन बाजू म्हणजे, दक्षिण बाजू हलकी केली. मतलब हा कीं, दुर्दैवानं गेल्या सालाप्रमाणें जर पिछेहाटीचाच प्रसग आला तर तो पेट्रोग्राडच्या बाजूला न यावा. कारण पेट्रोग्राडच्या बाजूला तसला प्रसंग म्हणजे महायुद्धाची परिसमाप्तीच ! पिछेहाट झालीच तरी आपल्या बाजूला महायुद्धाची परिसमाप्ति होऊं द्यावयाची नाहीं, आणि ॲंग्लो–फ्रेंचांना जर्मनीची खोड मोडण्यास वर्ष दोन वर्षांची पुरी फुरसत द्यावयाची, या लष्करी धोरणानें रशियाच्या सैन्याच्या हालचाली चालल्या. उत्तरेस रशिया सबल असतांना रशियाशीं निकरानें लढून पेट्रोग्राड गांठून महायुद्धाची परिसमाप्ति जर्मनी करून घेणार, कीं पेट्रोग्राडच्या मोहिमेत डोकें फोडून घेऊन यंदाच्या सालचा आपल्या हातांतील हुकूम जर्मनी वाया दवडणार, यासंबंधानें लष्करी तज्ज्ञाचे तर्ककुतर्क सुरू झाले. कोणी म्हणत पेट्रोग्राड गांठण्याचा जर्मनीचा मोह अनिवार्य आहे; तेव्हां मे महिन्यापासून जून–जुलै दोन महिने जर्मनी पेट्रोग्राडच्या मोहिमेचा उद्योग करील; आणि या दोनतीन महिन्यांत यश आलें तर चालू सालअखेरपर्यंत पेट्रोग्राडचीच मोहीम सुरू राहील; कोणी म्हणत दक्षिणेस ग्यालिशियामध्येच रशियाच्या पिछेहाटीस सुरुवात करण्याचा जर्मनी उद्योग करील;

आणि पिछेहाटीच्या त्रासानें रशियानें उत्तरेचें सैन्य दक्षिणेस आणल्यावर पेट्रोग्राडच्या मोहिमेस प्रारंभ होईल. तज्ज्ञांनीं अशा प्रकारचीं अनुमानें बांधलीं; पण मे महिन्याने त्या अनुमानांना दुजोरा दिला नाहीं. मे महिना उगवला व मावळला; रशियाची व जर्मनीची झुंज कोठेंच सुरू झाली नाहीं. आर्मेनियांत रशिया तुर्काशीं मात्र लढतांना दृष्टीस पडला. कुतुल–आमारा येथे जनरल टाऊनशेड याची शरणचिठी झाल्यावर बगदादच्या बाजूचें तुर्की सैन्य आर्मेनियाकडे वळलें आणि कॉन्स्टॉटिनोपल येथून कांहीं आस्ट्रो–जर्मन सेनेची त्यांना मदत पोंचून अर्झरूमच्या दक्षिण प्रांतात रशियन सैन्यावर हल्ले करण्यास मेअखेर तुर्कांनीं सुरुवात केली. हे हल्ले मागे परतविण्यांत व एखाददुसरें खेडें सोडून मागे हटण्यांत रशिया मेअखेर गुंतलेला दिसला. युरोपखंडांत सबंध मे महिना सामसुमीचा गेला. बाल्टिक समुद्रांत जर्मन आरमाराच्या हालचाली दृष्टीस पडाव्या तर तसेंहि झालें नाहीं; उलट उत्तर समुद्रात इंग्रजाच्याच बाजूला तारीख ३१ मे रोजीं गेल्या दीड–दोन वर्षांतील सर्वांत मोठी आरमारी लढाई झाली. त्या दिवशीं जर्मन आरमारानें इंग्रजी आरमाराचा डोळा चुकवून इंग्लंडच्या पूर्व किनाऱ्यावर हल्ला करण्याच्या इराद्यानें डेन्मार्कच्या उत्तर टोंकाजवळ समुद्रात आत दूरवर जाण्याचें धाडस केलें; पण इंग्रजी आरमार सावध असल्यामुळे लगेच आरमारी लढाई जुंपली. या लढाईंत सत्तावीस हजार टनांच्या 'क्वीन मेरी' जहाजाशिवाय चौदापधरा हजार टनांचीं तीन इंग्रजी लढाऊ जहाजे बुडालीं; एक दोन मोठीं जहाजें नादुरुस्त झालीं; तीन चार डिस्ट्रॉयर्स म्हणजे धाकटी जहाजें बुडालीं, आणि चार पांच धाकट्या जहाजाचा पत्ता नाहींसा झाला. एकंदरीनें लाख–सव्वा लाख टनांचें नुकसान झालें ! जर्मनांचें एक पचवीस हजार टनाचें ड्रेडनॉट बुडालें; दोन नादुरुस्त झालीं व चार पांच धाकटी जहाजे बुडालीं. टनांच्या हिशेबानें दोन्ही पक्षाचें सारखे नुकसान झालें असें इंग्रजी आरमारखात्याच्या रिपोर्टावरून दिसतें. जर्मन आरमारखात्यानें असें प्रसिद्ध केलें आहे कीं या आरमारी लढाईंत जर्मनीचें एक मोठे व तीन हलकीं जहाजें काय तीं बुडालीं. इंग्रजी आरमारखात्याचा रिपोर्ट अधिक विश्वसनीय आहे हें येथे सांगणें नकोच. कसेंहि असो, आपल्या विचारसरणींत कोणाचें अधिक नुकसान झालें हा मुख्य मुद्दा नसून ही आरमारी लढाई रशियाच्या बाल्टिक समुद्रांत न होतां इंग्रजांच्या बाजूला उत्तर समुद्रांत झाली ही महत्त्वाची गोष्ट आहे. आरमाराच्या दृष्टीनें जर्मनी इंग्रजांच्यापुढें फार कमकुवत होय.

जर्मन आरमारानें नेहमीं लपून राहावयाचें, जर्मन आरमाराला विजय मिळविण्याची जर कोणची जागा असली तर ती बाल्टिक समुद्र होय. बाल्टिक समुद्रांत रशियाच्या आरमाराला त्रास न देतां उलट मे अखेर इंग्रजी आरमाराशींच दोन हात करण्याचें साहस जर्मन आरमारानें कां करावें? जमिनीवर रशियाशीं न लढतां यिप्रेस व व्हर्डून ह्या बाजूलाच अँग्लो–फ्रेंचांवर जर्मनीचे निकराचे हल्ले कां व्हावेत? इंग्लंडला व फ्रान्सला मेटाकुटीस आणून पश्चिम रणभूमींतच महायुद्धाची परिसमाप्ति दोन चार महिन्यांत करून घेण्याचा जर्मनीचा हेतु आहे असें म्हणावें तर ते युक्तियुक्तीस धरून होत नाहीं. मग हें जर्मनीनें आरंभिलें तरी काय? जर्मन आरमाराच्या व जर्मन सैन्याच्या हालचालींत सुसंगतपणा न दिसून हताश वेडप्याप्रमाणें कोठेतरी कांहीं तरी जिवावर उदार होऊन करावयाचें अशी जर्मनीची स्थिति झाली आहे काय? मे महिन्यांत आणखी किरकोळ एक दोन गोष्टी घडून आल्या. त्याहि प्रथमदर्शनी वरील मोठया गोष्टींप्रमाणेंच जरा चमत्कारिक दिसतात. एप्रिल महिन्यांत जर्मन पाणबुड्याचें कार्यक्षेत्र इंग्लंडच्या सभोंवार होतें. मे महिन्याच्या तिसऱ्या व चवथ्या आठवड्यांत जर्मन पाणबुड्यांनीं इंग्लडच्या सभोंवती अगदीं थोडया बोटी बुडविल्या; पण भूमध्य समुद्रांत इटलीच्या बाजूला विशेष चळवळ दाखविली. त्याच सुमारास सालिनोकाच्या ईशान्येस बल्गेरियन सैन्यानें ग्रीस सरहद्द ओलांडून रुपेलचा किल्ला, डेमिरहिसार स्टेशन व स्ट्यूमा नदीचा पूल, ह्या जागा ग्रीस सरकारच्या संमतीनेंच व्यापल्या व सलिनोका येथील अँग्लो–फ्रेंच सैन्याच्या उजव्या बगलेस शह देण्याचा उद्योग आरंभिला. मे महिन्यांतच ही असली उचल करण्याची बुद्धि बल्गेरियाला कां झाली? नसत्या उपद्व्यापाप्रमाणें दिसणाऱ्या ह्या सर्व लहान थोर गोष्टी इटालियन युद्धाकडे पाहिलें असता चांगल्या सुसंगत व एका मोठया लष्करी धोरणानें प्रेरित झालेल्या दिसू लागतात. एप्रिलअखेर इटलीच्या डोक्यावर पाचर मारल्यासारखा दिसणारा आस्ट्रियाचा तिरोल प्रांत आस्ट्रियन सैन्यानें बराच गजबजून गेला; आणि मे महिन्याच्या १३–१४ तारखेच्या सुमारास आस्ट्रियन सैन्यानें गार्डी सरोवरापासून सुगाना नदीच्या खोऱ्यापर्यंत इटालियन फौजेवर जोराचे हल्ले करण्यास सुरवात केली. तारीख १३ मेच्या सुमाराला सुरू झालेली ही लढाई जूनच्या पहिल्या आठवडयांतहि जोरानें लढली जाऊन इटालियन युद्धास विलक्षण महत्त्व प्राप्त झालें.

व्हर्डूनच्या लढाईप्रमाणें येथेंहि टेकडयांच्या टेकडया आस्ट्रियन तोफखान्यानें पार उडवून दिल्या ! आस्ट्रियानें आपला सर्व तोफखाना व सर्व फौज इटलीच्या बाजूला आणली असून जून जुलई महिन्यांत इटालीला महायुद्धांतील लोणचें बनविण्याचा आस्ट्रियाचा हेतु जून प्रारंभींच स्पष्ट झाला आहे. मे महिन्याच्या पूर्वी आस्ट्रियाच्या तिरोल प्रांतांत इटालियन सैन्य आठ दहा मैल आंत घुसलें होतें; व सेव्हेरेटो व ट्रेंटो ह्या गांवांना इटालियन सैन्यानें शह दिला होता. जून प्रारंभाला आस्ट्रियानें इटालियनांना स्वतःच्या हद्दींतून बाहेर पिटाळून लावलें; इतकेंच नव्हे तर पोसिना, आसा व सुगणा ह्या नद्यांच्या खोऱ्यांतून आस्ट्रियन सैन्य इटलीच्या प्रांतांत आठ दहा मैल आंत घुसलें आहे. आल्प्स पर्वताचा सर्वांत उच्च भाग आस्ट्रियानें आतां ओलांडला असून ॲसिरेरो व ॲसिआगो हीं गांवें आस्ट्रियानें घेतलीं आहेत; आणि जूनच्या पहिल्या दुसऱ्या आठवडयांत डोंगराळ प्रदेश मागें टाकून आस्ट्रिया व्हेनिसच्या वायव्य मैदानावर उतरेल असा रंग दिसत आहे. तिरोलच्या पूर्व सरहद्दीवरील डोंगराळ प्रदेशांतील इटलीची फळी आस्ट्रियानें फोडली असून, व्हेनिसचा प्रांत उघडा पडण्याची पाळी आली आहे. जून महिन्यांत आस्ट्रिया मैदानावर जर उतरला तर पधरा मैलांवरच व्हिसेझाचें जंक्शन स्टेशन लागतें व तेथून आणखी पंधरा मैल पुढें गेलें म्हणजे इटलीच्या ईशान्य कोपऱ्याकडे जाणाऱ्या आगगाडयांचे सर्व रस्ते आस्ट्रियाच्या ताब्यांत जाऊन व्हेनिस बंदरहि आस्ट्रियाच्या हातीं जातें. आपण अशी कल्पना करूं कीं, मे महिन्याप्रमाणें जून महिन्यांतहि इटलीची पिछेहाट झाली आणि आस्ट्रियानें व्हेनिस बंदर गांठलें तर काय स्थिति होईल ? इटलीचा ईशान्य कोपरा इटलीपासून अलग होईल आणि इटलीचें मुख्य सर्व सैन्य ह्या कोपऱ्यांत वेढलें जाऊन आस्ते आस्ते आस्ट्रियाला बळी पडेल. इटलीच्या ईशान्य कोपऱ्यासभोंवती आस्ट्रियानें हा यमपाशच टाकलेला आहे; आणि हा यमपाश दृष्टीस पडूं लागल्यानंतर ॲंग्लो-फ्रेंच सैन्य इटलीच्या मदतीस धाऊन जाऊं नये म्हणून व्हर्डूनच्या व यिप्रेसच्या लढाया जून प्रारंभीहि जर्मनी जोराजोरानें लढत आहे. सॅलिनोकाच्या सैन्याची मदत इटलीला होऊं नये म्हणून बल्गेरियानें चळवळ सुरू केली आहे, आणि इटलीच्या आसपास पाणबुडयांचा संचार विशेष जोराचा झाला आहे. इटलीच्या दुर्दैवानें जून महिन्यांत जर ऑस्ट्रिया व्हेनिसच्या आसपास गेला तर इटलीच्या ईशान्य कोपऱ्यांत कुमक

समुद्रांतून आरमाराच्या मार्फतच पोंचवावी लागेल; आणि त्यावेळीं आड्रियाटिक समुद्रांत इंग्रजांचें आरमार कितीतरी अधिक वाढवावें लागेल. आड्रियाटिक समुद्राकडे अधिक लढाऊ जहाजें पाठवितांना इंग्रजांचें मन कचरावें म्हणून उत्तर समुद्रांतून जर्मन आरमार साहसानें बाहेर पडूं लागलें आहे, हें सूज्ञ वाचकांस सांगणें नकोच. रशियाकडे दुर्लक्ष करून इटलीचा समाचार घेऊन महायुद्धाची परिसमाप्ति निदान इटलीपुरती करण्याचा आस्ट्रो-जर्मनांचा हेतु जून प्रारंभीच स्पष्ट दिसूं लागला आहे. इटलीला वेळेवर मदत पाठवून व्हर्डूनप्रमाणें इटलीच्या बाजूलाहि आस्ट्रियास निराश होऊन बसण्याची पाळी अँग्लो-फ्रेंच सेनापति जूनच्या तिसऱ्या चवथ्या आठवड्यांत आणल्यावांचून राहणार नाहींत हें उघड आहे. तेव्हां व्हर्डूनप्रमाणें जून महिन्यांत इटालियन युद्धाकडेहि विशेष लक्ष पोहोंचवावें अशी सूचना आहे.

---

# दुसऱ्या वर्षाचा जून-जुलई महिना

मे महिन्यांत फ्रान्सची रणभूमि आणि इटलीची रणभूमि या जागृत होत्या तर जून महिन्यामध्येंच या दोन रणभूमींच्या बरोबर रशियाचीहि रणभूमि जागृत झाली. व्हर्डून येथील लढाईला व इटलीच्या युद्धाला विशेष चढ मिळाल्यामुळें रशियाला आस्ट्रियावर हल्ले करणें भाग पडलें. रशियाच्या ह्या हालचालीमुळे फ्रान्स व इटली या दोन्ही ठिकाणच्या युद्धास या जून महिन्यांत निराळें वळण प्राप्त झालें; इतकेंच नव्हे तर जूनचे अखेरीस व जुलैच्या प्रारंभीं इंग्रज व फ्रेंच ह्यांची जंगी चढाई सुरू झाल्यामुळे सर्व युरोपखंड लढाईच्या आगीनें पेटलें! लष्करी धोरणांतील ह्या फेरबदलाचा विचार करण्यापूर्वी मे अखेरीस व जूनच्या प्रारंभीं घडून आलेल्या दोन आकस्मिक पण महत्त्वाच्या गोष्टींचा विचार करणें जरूर आहे. जटलंडच्या किनाऱ्याजवळील आरमारी युद्ध व लॉर्ड किचनेर यांचा शोचनीय मृत्यु या त्या दोन गोष्टी होत. लॉर्ड किचनेर मे तारीख ५ ला, स्कॉटलंडच्या उत्तर किनाऱ्यावरून निघून 'हमशायर' नांवाच्या लढाऊ बोटींत बसून रशियाकडेस जावयास निघाले. रशियाच्या सरकारास व लष्करी अम्मलदारास महत्त्वाचा सल्ला देण्याकरतां ते जात होते. किनारा सोडून १०।२० मैल समुद्रात आंत आगबोट गेल्यावर सुरुंगाला लागून म्हणा, किंवा जर्मन पाणबुडीचा टार्पेडो लागल्यामुळे म्हणा, लॉर्ड किचनेर व त्यांच्या हाताखालचें त्याचें लष्करी मंडळ आगबोट फुटून मरण पावले! लॉर्ड किचनेर याच्या या आकस्मिक व शोचनीय मृत्यूमुळे सर्व इंग्रजी साम्राज्यावर दुःखाचें आवरण पसरून राहिलें! महायुद्धास ज्यावेळीं प्रारंभ झाला त्यावेळी लॉर्ड किचनेर इजिप्तकडे जावयास निघाले होते; पण महायुद्धाच्या लष्करी धोरणाचें जड "जू" मानेवर घेण्यास ह्याच्यासारखा धुरीण कोणीहि नाहीं असें सर्वांचें एकमत झाल्यानें मि. आस्क्विथ यांच्या प्रधान-मंडळानें ह्याना एकदम युद्धखात्याच्या प्रधानाची जागा दिली; आणि गेलीं दोन वर्षे त्यांनीं जी इंग्लंडची सेवा केली त्याकडे पाहिलें असतां एखाद्या मोठ्या पराभवानें इंग्लंडचें जे मोठें नुकसान झालें नसतें ते नुकसान त्यांच्या आकस्मिक मृत्यूमुळें झालें असें म्हणावें लागतें! लॉर्ड किचनेर यांच्या अंगीं असा कोणता मोठा गुण होता कीं

त्यामुळें त्यांच्या मृत्यूमुळें इंग्लडच्या अंतःकरणास एवढा मोठा धक्का बसावा? गेल्या दोन वर्षांत लष्करी धोरण ठरवितांना त्यांनीं असें कोणतें मोठे चातुर्य दाखविलें कीं, त्यामुळें त्यांच्या मृत्यूनें आकाशांतील कुऱ्हाड पडल्यासारखे आबाल-वृद्धांस वाटावें? पश्चिम रणभूमींत जें लष्करी धोरण इंग्लड व फ्रान्स यांनीं स्वीकारलें त्यांतील यशापयशाचा मुख्य वाटा फ्रेंच सेनापति जनरल जॉफ्रे यांजकडे आहे, मग लॉर्ड किचनेर यांच्या मृत्यूबद्दल हाहाकार कां? डार्डानेलीसची स्वारी व मेसापोटोमियामधील स्वारी ह्या स्वाऱ्या एकट्या इंग्रजी सेनापतींनीं चालविलेल्या; पण त्या दोन्ही स्वाऱ्यांत विशेष यश आलें नाहीं. अर्थात् महायुद्धातील यशस्वी लष्करी धोरणाचा पुरस्कर्ता ह्या नात्यानें लॉर्ड किचनेर यांच्याबद्दल जग हळहळत नाहीं. जर्मनीचे सेनापति हिंडेनबुर्ग किंवा मॅकेनसन यांच्यासारखे यश दोस्त सरकारांच्या सेनापतींच्या वाट्यास अद्यापपर्यंत आलेलें नाहीं; तेव्हां यशस्वी लष्करी धोरणाचे पुरस्कर्ते असें म्हणून घेण्याचा मान लॉर्ड किचनेर यांना कोठून मिळणार? सेनापति हिंडेनबुर्ग किंवा सेनापति मॅकेनसन यांच्यासारखे यश एका बाजूला राहो, पण फ्रेंच सेनापति जनरल जॉफ्रे यांच्या इतपतहि यशाचा वाटा इंग्रजी सेनापतींना या महायुद्धात अद्याप मिळालेला नाहीं. अंगावर बाजू घेतली असतांना सावधपणें सैन्याची जुळवाजुळव करून जर्मन सेनासमुद्राच्या पुढे पुढे येणाऱ्या लाटांना मागे परतवून थोपवून धरण्याचें श्रेय जनरल जॉफ्रे यांनीं संपादिलें आहे. लॉर्ड किचनेर यांच्या वांट्याला तसलेंहि यश आलेलें नाहीं; किंबहुना अलीकडे अलीकडे लॉर्ड किचनेर यांच्या लष्करी धोरणावर बरीच प्रतिकूल टीका होऊं लागली होती. इतकें असूनहि इंग्रजी युद्धाचा एक आधारस्तंभ ढासळला असा हाहाकार सर्व दुनियेमध्यें त्यांच्या मृत्यूमुळे झाला! लॉर्ड किचनेर यांचा मृत्यु आकस्मिक झाला म्हणून हे दुःख नव्हे; लॉर्ड किचनेर हे रशियाला सल्ला देण्याकरितां निघाले असतां समुद्रात बुडून मेले म्हणून हें दुःख नव्हे; लॉर्ड किचनेर यांनीं यशस्वी धोरण आंखून दिलें म्हणून हे दुःख नव्हे; इंग्लडच्या लष्करी धोरणाचीं सर्व सूत्रें अलीकडे फ्रेंच सेनापति जनरल जॉफ्रे यांच्या हातांत गेलेलीं आहेत आणि लष्करच्या दृष्टीनें इंग्लड हा फ्रान्सचाच एक भाग होऊन बसला आहे. रणांगणावर जर कोणाचें लष्करी धोरण दोस्त सरकारांचे पदरांत यश टाकील तर तें जनरल जॉफ्रे यांचें होय, अशी सर्वांची दृढ समजूत झालेली आहे. मग लॉर्ड

किचनेर यांच्या मृत्युमुळें दुःखाचा डोंगर इंग्लंडवर कोसळला, असें सर्वांना कां वाटावें ? ह्या दुःखाचें कारण असें आहे कीं सेनापति जॉफ्रे यांचें लष्करी धोरण जरी दोस्त सरकारांना यशाचा मार्ग दाखविणारें असलें तरी तें धोरण अमलांत आणण्याचें साधन फ्रान्सपाशीं नाहीं. फ्रान्सचें लष्करी सामर्थ्य तो पल्ला गांठण्यास समर्थ नाहीं; फ्रेंच सेनापतीची बुद्धि तीव्र खरी, पण या बुद्धीनें यशाच्या उड्या कोणाच्या जिवावर मारावयाच्या ? ई. स. १९१७ सालीं जर्मनीला आम्ही चिरडूं असें कोणाची सेना देखून फ्रेंचांनीं वदावयाचें ? हा दम फ्रान्समध्यें कसा उत्पन्न होतो ? आज आम्ही जिवापाड लढलों तर उद्यां आमच्या मागून येणारे यश संपादन करतील असा विश्वास ज्यावेळीं फ्रेंच सेनापतींना वाटतो त्यावेळीं त्यांच्या मागे कोण उभें आहेसें त्यांना दिसतें ? इंग्रजी सेना त्यांना दिसते. १९१७ सालीं तयार होणाऱ्या नव्या लष्करावर विसंबून राहून फ्रेंच लोक व्हर्डून सभोंवती आज जिवावर उदार होऊन लढत आहेत. जनरल जॉफ्रे यांचें लष्करी धोरण जर दोस्त सरकारांच्या लष्करी नावेच्या सुकाणूच्या जागीं असलें तर त्या नावेच्या फळ्या इंग्रजी लष्कराच्या बनविल्या जावयाच्या आहेत, हे विसरतां कामा नये. महायुद्धां-तील अखेरचें यश कोणाच्याहि बुद्धीनें दोस्त सरकारांच्या पदरांत पडो; पण जे हात तें यशाचें फळ आपल्या मनगटांतील शक्तीच्या जोरावर तोडतील ते हात इंग्रजी सेनेचे हात याविषयीं संशय नाहीं. फ्रान्सची सेना फार मोटी; पण ती दोन वर्षें सारखी लढत आहे, आणि इंग्रजी सेनेला आतां कोठें ज्वानी प्राप्त होऊं लागली असून ई. स. १९१७ सालीं ती भरज्वानींत यावयाची आहे. नव्या दमाची ही सेना जर आपण आज दृष्टिआड केली आणि महायुद्धाच्या रणभूमीचें अवलोकन केले तर निरुत्साहानें मन व्यापून गेल्याशिवाय राहणार नाहीं. पुढील आशेला कारण नवी इंग्रजी सेना आहे. महायुद्धाच्या सांप्रतच्या स्थितींत इंग्रजांच्या नव्या लष्करास प्राप्त झालेलें महत्त्व जर पूर्णपणें लक्षांत आलें नाहीं तर लॉर्ड किचनेर यांच्या शोचनीय मृत्यूनें केवढी मोटी हानि झाली हें बरोबर समजणार नाहीं. होय, इ. स. १९१७ सालच्या यशाला मुख्य कारण इंग्रजी सेना व्हावयाची आहे हें खरें; पण लॉर्ड किचनेर मृत्युमुखीं पडले म्हणून १९१७ सालीं इंग्रजी सेना संख्येनें किंवा लायकीनें थोडीच खालच्या पायरीची व्हावयाची आहे ?

सैन्याची भरती होईल. १०।२० लाख नवें सैन्य १९१७ सालीं फ्रान्सच्या रण-भूमीवर उतरेल; आणि जर्मनीला मागें हटावें लागेल. सक्तीच्या लष्करी कायद्याचा हा सहज प्रभाव आहे; मग लॉर्ड किचनेर यांच्या मृत्यूबद्दल इतकी हळहळ कां ? याचें कारण असें कीं सक्तीचा लष्करी कायदा जरी इंग्लंडनें पास केला असला तरी त्याच्या अंमलबजावणीची संवय अद्याप इंग्लंडला लागलेली नाहीं. हा कायदा इंग्लंडांत नवा आहे; इतकेंच नव्हे तर इंग्लंडच्या अंतःकरणाची मूळची रचनाच ह्या कायद्याच्या विरुद्ध आहे. प्रसंग येऊन ठेपला आहे तेव्हां तोंड वेडेंवाकडें करून कां होईना पण तें औषध वेळच्या वेळीं पथ्य संभाळून इंग्लंड घेईल काय ? अशी शंका फ्रान्स व रशिया यांच्या मनांत उद्भवली असतां ते लॉर्ड किचनेर यांच्याकडे पहात आणि शंकेचें निरसन करीत कीं, इंग्रजी सेनेचे मुख्य म्होरके जोंपर्यंत लॉर्ड किचनेर आहेत तोंपर्यंत सेनेच्या तयारी संबंधानें शंका कुशंका काढण्याचें कारणच नाहीं. सेना जय्यत तयार करण्याची हमी लॉर्ड किचनेर ह्यांनीं घेतली होती. त्यांची ही जामीनकी त्यांच्या पूर्व चरित्रामुळें रशिया, फ्रान्स व इटली या तिन्ही देशांना पटली होती. पूर्व चरित्रानें इंग्लंडांतील जनसमूहाला ज्यानें आपल्या मुठींत धरून ठेवलें होतें व परदेशच्या सेनापतींना व मुत्सद्यांना इंग्लंडच्या कर्तृत्वाची खूण पटविली होती, असल्या थोर विभूतीच्या पदवीला लॉर्ड किचनेर चढलेले होते. ज्याची जामीनकी सर्व युरोप खंडाला पटेल अशा लष्करी पुण्याईचा सेनापति लॉर्ड किचनेर यांच्या मागें इंग्लंडांत उरलेला नाहीं. महायुद्धाची अशी कांहीं नाजूक स्थिति होत चालली आहे कीं, भलत्याच ठिकाणीं भलताच थकवा येऊन युद्ध आटपा म्हणून इंग्लंडला गळ केव्हां पडेल ह्याचा नियम नाहीं. असा गळ पडला असतांना भावी सेनेचें आश्वासन उपयोगी पडत नाहीं, पुढील करामतीचा अंदाज कामी येत नाहीं; आणि उद्या तपश्चर्या करून कालांतरानें दाखवावयाचे चमत्कार कोणासहि आज नमस्कार करावयास लावीत नाहीं. अशा वेळीं भावी पुण्याईच्या माणसापेक्षा पूर्व पुण्याईचींच माणसें जामीन म्हणून पुढें यावीं लागतात. त्याशिवाय इष्ट मित्रांना धीर निघत नाहीं; भांबावलेली बुद्धि स्थिरता पावत नाहीं; आणि भिऊं लागलेलें मन पुन्हां ताजेतवानें बनत नाहीं. दोस्त सरकारांत पुन्हां नवा दम उत्पन्न करणें हें महायुद्धांत इंग्लंडचें मुख्य काम आहे. इंग्लंडचा पैसा व इंग्लंडचें नवें लष्कर या दोन मृत्युंजय मात्रांच्या जोरावर थक-

लेल्या हातापायांत इंग्लंड नवा जीव घालीत आहे. इंग्लडच्या लोकांपाशीं या मात्रा जरी असल्या तरी ज्या वैद्यावर युरोपखंडाचा विश्वास नाहीं असल्याच वैद्याच्या हातीं जर त्या मात्रा पडल्या तर आपल्या पोतडींत त्या मात्रा तशाच्च राखून ठेवून दुःखीकष्टी मनानें तहाच्या गोष्टी बोलण्यास इग्लडची संमति मिळण्याचा सभव आहे. फ्रान्स, इटली किंवा रशिया ह्यापैकीं कोणीहि १९१६ सालीं विशेष थकला तर इग्लडच्या मात्रेवर विसंबून राहून १९१७।१८ सालापर्यंत लॉर्ड किचनेर याच्या मृत्यूमुळे युरोपखडाचा दम निघणार नाहीं. नव्या सैन्याच्या तयारीबद्दल युरोपखडास हे जामीन होते आणि त्यांच्या मागे त्यांच्या लायक जामीन इग्लड-पाशी नसल्यामुळे कधीहि भरून न येणारे नुकसान लॉर्ड किचनेर यांच्या मृत्यूमुळे झालें आहे. शिवाय लॉर्ड किचनेर यांचा आकस्मिक मृत्यु अशा वेळीं घडून आला कीं, इग्लडच्या त्रस्त मनाला ह्या मृत्यूमुळे अत्यत खेद झाला ! जटलडची आरमारी लढाई या मृत्यूपूर्वी ४।५ दिवसच झाली होती आणि त्यामुळे इग्लडचें मन स्वस्थ नव्हतें. जटलटच्या लढाईंत इग्रजी आरमाराला जय मिळाला खरा; पण इग्लडचें मन अस्वस्थ झालें. इग्लडची ३।४ मोठीं जहाजे व ८।१० धाकटीं जहाजें या लढाईंत बुडाल्यामुळे इग्लडच्या दर्यावर्दी लष्करांतील नामांकित लोकांची प्राणहानि झाली. ह्या प्राणहानीमुळे इग्लडचें अतःकरण अतस्थ दुःखानें आतल्या-आत चुरडले जात होतें. अशा स्थितींत इग्लडचें मन जर खरोखर खबीर नसतें तर लॉर्ड किचनेर यांच्या आकस्मिक मृत्यूला परमेश्वरी कोपाचें स्वरूप दिले गेले असतें, आणि पुढील तयारीस मनाच्या दुर्बलतेमुळे थोडा बहुत अडथळा झाला असता. परमेश्वरी कोपाचा तो समय नसून परीक्षेचा तो समय होता आणि बिलकुल न डगमगतां इग्लड त्या परीक्षेतून पार पडलें, ही संतोषाची गोष्ट होय.

जटलडच्या लढाईंत मिळालेला आरमारी विजय इग्लंडला उल्हसित न करितां त्रस्त करणारा कां झाला ह्याचीं कारणें अनेक आहेत. पहिलें कारण असे कीं जर्मन आरमार नामशेष करण्याची सधि आली असतां जर्मन उंदरांना आपल्या बिळात पुन्हां पळून जातां आलें. पराभूत होऊन पळून गेले तर त्याबद्दल इतकें वाईट कां वाटावें ? नफ्यांत तोटा झाला म्हणन मन इतकें त्रस्त कां

इंग्रजांच्या इतकें नुकसान स्वतःच्या आरमाराचें करून घेऊन त्यांना पळून जावें लागलें, ही गोष्ट स्वतःचें अंतःकरण प्रफुल्लित करणारी कां समजली जाऊं नये ? इग्लंडचें आरमार व जर्मनीचें आरमार यांच्यामध्ये ही लढाई न होतां जर फ्रान्सचें आरमार व जर्मनीचें आरमार यांच्यामध्यें ही लढाई झाली असती आणि या लढाईत इंग्रजी आरमाराला जेवढा जय मिळाला तेवढा जय जर फ्रान्सचे आरमाराला मिळाला असता तर फ्रान्समध्ये चोहोंकडे आनंदाचे महोत्सव झाले असते; सर्व पारीस शहर प्रफुल्लीत चेहऱ्यांनीं फुलून गेलें असतें; आणि एकमेकांच्या अभिनंदनपर संदेशांनीं फ्रान्समध्यें एकच धुमाकूळ माजला असता. जो विजय फ्रान्सला महोत्सवाचा वाटला असता तो विजय इंग्लंडला त्रासदायक वाटला, ह्याचें कारण काय ? जर्मनीनें ह्यावेळीं आपणासच विजय मिळाला असा पुकारा करून आनदोत्सवाचें नाटक अथपासून इतिपर्यंत यथासांग केलें, अर्थात् तें नाटक होतें; त्यांत तथ्यांश नव्हता. जर्मन आरमाराला इंग्लडच्या इतकें नुकसान सोसून जळून जावें लागलें; हा पराभव झाकण्याकरितां तो नाटकी आनंद होता. पण इग्लंडचा विजय आनंदाच्या लहरींनीं कां वाढला नाहीं ? चोहोंकडे आनदी आनद व्हावयाच्या वेळीं इंग्लंड त्रस्त कां दिसत होतें ? हे कोडें उलगडण्याकरितां आरमारी लढायांच्या पूर्व इतिहासाकडे थोडें पाहिलें पाहिजे. जटलडची आरमाराची लढाई शभर वर्षांपूर्वीच्या ट्राफलगारच्या लढाईनंतर फार महत्वाची समजली जाते. आरमारी लढायांचा असा एक सिद्धात आहे कीं एकदां का आरमारी लढाई जुंपली, कीं एक पक्ष समूळ नाहींसा झाल्याशिवाय ती लढाई थांबतच नाहीं. जमिनीवरील लढाईत जय मिळाला तरी बऱ्याच प्रसंगीं त्या जयाला फळे येऊ शकत नाहींत. आरमारी लढायांचें तसें नाहीं. जय मिळाला कीं फळ पदरांत पडलें. आरमारी लढायांना अर्धवटपणा खपत नाहीं. झुंज पक्की जुंपल्यानंतर फळानें मनांत आणलें तरी त्यास पळून जातां येत नाहीं, दिरगाई या लढाईला माहीत नाहीं. ट्राफलगारच्या लढाईत फ्रेंचांनीं इग्रजी आरमाराचें कांहीं कमी नुकसान केलें नाहीं. पण इग्लंडच्या त्या विजयानें सर्व समुद्र एकदम व्यापून टाकला आणि पृथ्वीवरच्या सर्व समुद्रांचें सामर्थ्य एकदम इंग्लंडच्या हातांत आणून दिलें. ‘ खाईन तर तुपाशीं नाहींतर उपाशी ’ अशी स्थिति आरमारी लढायांची असते, असें तेव्हांपासून समजलें जात आहे. रूसो जपानी युद्धामध्यें सुशिमाच्या

आरमारी लढाईनें ह्याच सिद्धांतास बळकटी आणली. ट्राफलगारानें इंग्लंडचें जें कार्य केलें तेंच कार्य सुशिमानें जपानचें केलें. चिनी व जपानी समुद्रांत जपानचें वर्चस्व एका लढाईनें प्रस्थापित झालें. आरमारी लढाया जमिनीवरील लढायांप्रमाणें धरसोडीच्या होत नसून एकदम निकाल लावणाऱ्या होत असल्यामुळें ज्याचें आरमार सर्वांत मोठें त्याच्यापुढें समुद्रांत ब्र काढण्याची छाती होणें शक्य नाहीं. पण जटलंडच्या लढाईने आरमारी लढायांच्या या निर्णयात्मक स्वरूपाला थोडासा बट्टा आणला; आणि जय मिळूनहि इंग्लंडचें मन तितकें उल्हसित झालें नाहीं. कारण रूढ समजुतींत फरक पडला. ५।६ तास लढाई पक्की जुंपली. जुंपल्यानंतर जर्मन आरमाराला निसटून जातां आलें ही गोष्ट इंग्लंडच्या आरमारी मनाला डवचत आहे. निर्णय लागल्यावरच लढाई संपावयास पाहिजे होती, ती तशी संपली नाहीं. अर्थात् आरमारी सिद्धांतावरील श्रद्धा सशयित झाली, आणि हर्षाच्या जागीं विचार आला. जर्मन आरमाराला कसें निसटून जातां आलें, दहा दहा–पधरा पधरा मैलां-वर अचूक गोळे मारणाऱ्या इंग्रजांच्या तरत्या पोलादी किल्ल्यांच्या माऱ्यांतून जर्मन आरमारानें स्वतःस कसें सोडवून घेतलें ? प्राणनाशक मगरमिठींतून निसटून जाण्याची कोणती कला जर्मनांनीं शोधून काढली ? जटलंडच्या लढाईच्या ज्या हकीकती प्रसिद्ध झाल्या त्यांकडे पहातां दोन तीन बाबी पूर्वीच्या आरमारी लढा-यांच्या हकीकतीवरून जरा भिन्न दिसतात. पहिली बाब अशी कीं, जर्मन आरमाराला झेपलीन विमानांचें यावेळीं साहाय्य होतें. युद्ध चालू असतांना आकाशांत वर उच्च उडून झेपलीनची टेहेळणी एकसारखी सुरू होती. झेपलीनचा उपयोग झाला तो टेहेळणीच्या कामीं झाला. शत्रूच्या आरमारावर बॉंब गोळे टाकून आरमाराचें नकसान करण्याच्या कामीं झालेला नाहीं. झेपलीन विमानांना शें सव्वाशे मैल दूरवर पाहातां येतें; अर्थात् जर्मन आरमाराचे डोळे सवाशे मैल लांबीचे झाले. ज्याचा दृष्टिपथ दहा वीस मैल लांब आहे असें पूर्वीच्या स्थितींतलें आरमार निराळें आणि सव्वाशे मैल टेहळणी करणारें आरमार निराळें. डोळे सव्वाशे मैल लांबीचे झाल्यानें कसा फरक होतो तें पहा. पूर्वी दृष्टिपथात आरमारें आलीं म्हणजे लगेच तोफांच्या माऱ्यांतहि आरमार येत असे. एकदां दृष्टीस दृष्टि भिडली म्हणजे तोफांच्या गोळयांचा वर्षाव सुरू होई. तोफांचे गोळे एकमेकांवर पडले म्हणजे हस्तस्पर्श झालाच आणि तोफांच्या गोळ्या-

मार्फत होणारा हा हस्तस्पर्श प्राणनाशक होत असल्यानें 'चारी मुंडे चीत' झाल्यावांचून गत्यंतर नसे. पळून जाणारें जहाज पाठलाग करणाऱ्या तोफांच्या माऱ्यांत नेहेमीं राही आणि यामुळे शेवटचा निकाल होऊनच लढाई संपे. सव्वाशे मैल लांबीची दृष्टि झाल्यानें ही प्राणघातक मगरमिठी टाळतां येणें शक्य झाले जर्मन आरमार सव्वाशें मैलांवरून इंग्रजी आरमाराचा काफिला पाहतें आणि आपल्याला झेपणारा हा काफिला आहे असें वाटल्याशिवाय इंग्रजी आरमाराजवळ दहा पंधरा मैल जातच नाहीं. अशा स्थितींत इंग्रजी मुख्य आरमाराचा व जर्मन आरमाराचा लढण्याचा योग केव्हांहि येत नाहीं. अर्थात् प्रथम तोंड पडावयाच्या वेळीं इंग्रजी आरमार बलानें कमी दर्जाचें असलें तरच जर्मनांकडून लढाईस सुरवात व्हावयाची. विमानांच्या साह्यामुळे समानबल किंवा अधिक बल अशी स्थिति लढाईच्या प्रारंभाला इंग्रजी आरमाराला उत्तर समुद्रांत मिळणें शक्य नाहीं. ही बाब जर्मन आरमाराचा बचाव इंग्रजी आरमारापासून करीत आहे. लढाईला सुरवात झाली तर ती जर्मनीला अनुकूल अशाच परिस्थितींत व्हावयाची. आश्रयाची जागा सोडून बाहेर थोडेसें संचार करावयास जावयाचें पण अनुकूल परिस्थिति असल्याशिवाय झुंजेची सुरवातच करावयाची नाहीं. असला फायदा जमिनीवर ज्याप्रमाणें संख्येने कमी असलेल्या सैन्यास घेतां येतो, त्याप्रमाणें आरमारांना इतक्या दिवस घेतां येत नव्हता. अनुकूल प्रतिकूल परिस्थितीचें ज्ञान हस्तस्पर्श झाल्याशिवाय आरमारांना रणभूमीवर होतच नव्हतें; आणि एकदां कां हस्तस्पर्श झाला म्हणजे प्राण जाईपर्यंत लढणें भाग पडे. हस्तस्पर्श व प्राणांतिक मगरमिठी हीं एकाच वेळीं घडून, अनुकूल किंवा प्रतिकूल परिस्थिति आहे किंवा नाहीं हें समजतें न समजतें तोंच समुद्राचा तळ पाहावा लागे ! विमानांच्या साह्यानें दृष्टीपथ शंभर मैलापर्यंत लांबल्यामुळें साहसी शत्रूला मगरमिठी पडण्यापूर्वी तीन चार तास अगोदर अनुकूल किंवा प्रतिकूल परिस्थितीचें ज्ञान होतें, आणि पळून जाण्यास तीन चार तासांचा अवधी कांहीं कमी नाहीं. जमिनीवर चपळपणा, साहस, आणि नद्या डोंगरांचा आश्रय घेण्याची करामत, यांच्या योगानें संख्येनें कमी असलेल्या सेनेस अधिक संख्येच्या सेनेला बराच वेळ खेळून त्राहीत्राही करून टाकतां येतें; समुद्रावरच्या लढाईची तशी स्थिति नाहीं. अनुकूल-प्रतिकूल स्थितीचें ज्ञान मरणरूमयीं

व्हावयाचें, नद्यांचा आश्रय नाहीं, डोंगरांचा आश्रय नाहीं, झाडाझुडुपांचे आड लपण्याची सोय नाहीं. रात्रीचा काळोख काय पांघरूण घालील तें घालो, पण दहा वीस मैल लांबपर्यंत उजेड सहज लीलेने फेंकणाऱ्या विद्युच्छक्तीचें साहाय्य आरमारांना मिळत असल्यामुळे रात्रीच्या काळोखाचें पांघरूण झिरझिरीत झालें आहे. शत्रु दृष्टीस पडला कीं, निर्बलांनीं मरायलाच तयार झालें पाहिजे असें इतक्या दिवसाचें आरमारी लढायांचें स्वरूप; पण जटलंडच्या लढाईनें या स्वरूपांत फरक पाडला. विमानाच्या सहाय्याने अनुकूल प्रतिकूल परिस्थितीचें ज्ञान चार चार पांच पांच तास आगाऊ होणें शक्य झालें. अनुकूल स्थिति आहे, आपण समबल आहो किंवा अधिक बलवान आहो असें अगाऊ तीन चार तास समजलें तरच लढाईस तोंड द्यावयाचें,हा फायदा जर्मन आरमारास जटलंडच्या लढाईत मिळाला.दोन प्रहरीं तीन वाजतां आरमारी लढाईस सुरुवात झाली त्यावेळीं जर्मन आरमार इंग्रजी आरमाराहून जहाजांच्या संख्येने व तोफांच्या सामर्थ्यानें अधिक बलवान होतें. तीन वाजल्यापासून सायंकाळीं पांच सहा वाजेपर्यंत इंग्रजी आरमार अधिक बलवान असलेल्या जर्मन आरमाराशीं मोठ्या शिताफीने लढलें, व इंग्रजाचें नुकसान झालें तें याच दोन तीन तासांत. एकदां हस्तस्पर्श झाला म्हणजे प्राणांतिक अवस्था होईपर्यंत लढण्याशिवाय आरमारी युद्धात गत्यतर नाहीं, या सिद्धांताचा अनुभव तीन वाजल्यापासून सहा वाजेपर्यंत इंग्रजी आरमाराच्या तुकडीला चांगला आला; आणि इंग्रजी आरमाराला मोठी कुमक येऊन पोचण्याचा जर संभव नसता तर इंग्रजी आरमाराची तुकडी नामशेष होऊनच जटलंडची लढाई संपली असती. पण सहा सात वाजण्याच्या सुमारास मोठे आरमार इंग्रजाचे मदतीला आलें आणि लढाईचें स्वरूप पालटून इंग्रजांच्याप्रमाणेंच जर्मनांचेंहि नुकसान होऊं लागलें. या जर्मन नुकसानाची मजल जर्मन आरमाराचे सर्व प्राण हरण करण्यापर्यंत जावयास पाहिजे होती. परंतु संकटाची सूचना तीन चार तास अगोदर देणारे विमानी नेत्र जर्मनांच्या जवळ असल्यामुळे संकट टाळण्याच्या तयारीला तें एकदम लागले. जर्मनाचें मोठें आरमार पळून जाऊं लागलें; आणि पाणबुड्या बोटी, टार्पेडो बोटी व पाण्यांतील सुरुंग यांची आडकाठी इंग्रजी आरमारापुढे निर्माण करून जर्मन आरमारने आपला पळण्याचा मार्ग सुगम केला. जमिनीवर पळणाऱ्या सेनेस नदीनाल्यांचा जसा उपयोग करून घेतां येतो त्याप्रमाणें पाणबुड्या बोटींचा उपयोग समुद्रावरील

जर्मनांच्या पळपुट्या किल्ल्यांना झाला. डोंगराळ प्रदेशांचा उंच सखल भाग किंवा झाडझुडूप यांच्या सहाय्यानें ज्याप्रमाणें पाठलाग करणाऱ्यांची दिशाभूल करतां येते त्याप्रमाणें जटलंडच्या लढाईंत जर्मन टार्पेडो बोटींनीं टार्पेडोचे अडथळे निर्माण करून जर्मनांच्या पलायनास मदत केली. जटलंडच्या लढाईंत जर्मनांचें नुकसान इंग्रजांइतकें झालें; व अखेरीस पळून जाण्याचा पराभव जरी त्यांना निमूटपणें गिळावा लागला तरी टेहेळणीं संबधानें, पळून जाण्यासंबधानें, झुंजीला स्वच्छेनें सुरूवात करणें व स्वच्छेनें झुंज सोडणें या संबधानें, आणि पळून जातांना पाणबुड्या बोटी, टार्पेडो बोटी, व सुरुंग यांचा आश्रय घेण्यासंबधानें, ज्या नवीन हिकमती जटलंडच्या लढाईंत जर्मनीनें प्रथम उपयोगांत आणल्या त्या हिकमती आरमारी युद्धासंबधाच्या पूर्व समजुतींत बराच फरक करणाऱ्या आहेत. निर्बलांना ते कितीहि चपल असोत, बुद्धिमान असोत, आरमारी युद्धांत इतके दिवस थारा नव्हता; पण निर्बलानाहि थोडीशी वाव जटलंडच्या लढाईमुळें मिळाली आहे. पूर्व समजुतीतील हा फेरबदल हे इंग्लंडनें मोठ्या थाटानें विजयोत्सवाचा समारंभ न करण्याचें कारण आहे. या हिकमतीच्या जोरावर जर्मनांना पळून जातां आलें खरें; पण पळून जातां जाताच जर्मनीची अत्यंत नुकसानी झाली. या हिकमतीच्या जोरावर इंग्लंडच्या आरमारास आपण चांगला हात दाखवूं ही जर्मनीची घमेंड या लढाईनें जिरली आहे, व बाल्टिक समुद्रात जीं जहाजे कामास आलीं असतीं तीं जहाजे भलत्या महत्वाकांक्षेच्या नादीं लागून उत्तर समुद्रांत जर्मनीनें बुडवून घेतल्यामुळे बाल्टिक समुद्रात जर्मनीचें नाक कापल्यासारखे झालें आहे. जटलंडच्या लढईंत जर्मनीचें इतकें नुकसान झालें कीं नुसत्या हिकमतीच्या जोरावर उत्तर समुद्रात जर्मनी यापुढे तोंडहि दाखविणार नाही. कारण जर्मनीच्या हिकमती आतां इंग्लंडला कळून चुकल्या आहेत; आणि जर्मनीनें पुन्हां तोंड दाखविलेंच तर त्या हिकमती जर्मन पलायनास मदत न करतील अशी खबरदारी इंग्रजी आरमाराकडून घेण्यांत आल्यावांचून राहणार नाहीं.

## व्हर्डून व इटली

मे महिन्याप्रमाणे जून महिन्यांतहि व्हर्डूनची लढाई जोरजोराने चालू होती. जूनचे पहिल्या आठवड्यांत जर्मनांनीं व्हॉक्सचा किल्ला घेतला व दुसऱ्या तिसऱ्या आठवड्यांत व्हर्डूनच्या उत्तरेस दीड दोन मैलावर असलेल्यावर जोराचे हल्ले करण्यास जर्मनांनीं सुरवात केली. या टेकड्या गेल्या म्हणजे व्हर्डून गेलें हें पक्के

जाणून फ्रेंचांनीं या टेकडयांचें संरक्षण प्राणाची पर्वा न करतां अतिशय शौर्यानें केलें. जर्मनांनींहि सैन्याच्या खराबीचा हिशेब मनांत न आणतां नवें सैन्य आणून आपल्या शक्तीची पराकाष्ठा केली, पण जून अखेरपर्यंत या टेकडया जर्मनीच्या हातीं गेल्या नाहींत. ह्या टेकडयाकरितां जून महिन्यांत झालेली लढाई अत्यंत निकराची झाली; व गेल्या तीन चार महिन्यांत व्हर्डूनच्या सभोंवती झालेल्या सर्व भयंकर लढायांना या लढाईनें मागें टाकलें! व्हर्डूनमध्यें असें आहे तरी काय कीं, व्हर्डूनकरितां जर्मनीनें आपला प्राण अशारीतीनें देण्यास तयार व्हावें? व्हर्डूनच्या किल्ल्याचे बुरूज व भिंती आतां बहुतेक पडून गेल्या आहेत; आणि त्या भिंती व बुरूज जरी धडधाकट असले तरी आजकालच्या नव्या तोफांपुढे किल्ल्याच्या भिंतींना कोणीहि किंमत देत नाहीं. लष्करी दृष्टीनें या भिंती जर्मनीलाहि उपयोगी पडावयाच्या नाहींत. या निरुपयोगी ठरलेल्या व पडलेल्या भिंतीच्या आंत असलेल्या व्हर्डूनच्या लहानशा गांवाकरितां ही धडपड आहे काय? व्हर्डूनचें गांव जर्मन तोफांच्या माऱ्यांत सांपडून दोन तीन महिने होऊन गेले. तेथील घरें आतां उभीं नाहींत व तेथें वस्तीहि आतां नाहीं यापुढें जुलई महिन्यांत जर्मनीनें व्हर्डून घ्याव-याचें म्हणजे व्हर्डूनच्या उत्तरेस दोन मैलांवर असलेल्या टेकडया घेतल्यानंतर त्या टेकडयांच्या दक्षिणेस दोन मैलावर असलेली एक बोडकी टेकडी घ्यावयाची इतकेंच. ही टेकडी कशाकरितां घ्यावयाची? तर तिला व्हर्डून हे नांव आहे म्हणून. मग ही सर्व धडपड व्हर्डूनच्या नांवाकरितां आहे काय? होय. या नांवाकरितांच ही धडपड दिसते. व्हर्डून या नांवांत पूर्वेतिहास बराच सांठलेला आहे. पूर्वी व्हर्डूनच्या रणभूमीवरच जर्मनांचें किंवा फ्रेंचांचें भाग्य कित्येक प्रसगीं उदयास आलें व अस्तास गेलें, आणि आतां ज्याअर्थी पांच महिने व्हर्डूनची लढाई जोरजोरानें चालली आहे त्याअर्थी सांप्रतच्या महायुद्धामध्यें व्हर्डून पुन्हा विशेष निकाल देणारी रणभूमि ठरणार ह्यांत संशय नाहीं. लष्करी दृष्टीनें विचार करतां व्हर्डूनची इतिहासांतील किंमत आतां राहिली नाहीं हें मागील लेखांत सिद्ध करण्यांत आलेंच आहे. आपली डावी बगल अधिक बंदोबस्ताची करण्यापलिकडे व्हर्डूनच्या प्राप्तीनें जर्मनीला अधिक फायदा होऊं शकत नाहीं हे त्या विवेचनावरून वाचकांच्या ध्यानांत आलेंच असेल. आतां अशी एक अफवा प्रसिद्ध करण्यांत आली आहे

कीं, फ्रेंचांचे मुख्य सेनापति जनरल जॉफ्रे यांनीं लष्करीदृष्ट्या पूर्ण विचार करून दोन तीन महिन्यांपूर्वीच व्हर्डून सोडून देण्याचें ठरविलें होतें; पण फ्रेंच सरकारनें राजकीयदृष्ट्या विचार करून कांहीं झालें तरी व्हर्डून सोडावयाचें नाहीं असें ठरविलें व त्यामुळे व्हर्डूनच्या झुन्जेला सांप्रतचें स्वरूप प्राप्त झालें, ही अफवा खोटी आहे असें प्रसिद्ध करण्यांत आलें आहे, तरी लष्करी ध्येयापेक्षां राजकीय ध्येयाकरितां व्हर्डूनची लढाई चालली आहे असें म्हणण्यास कोणचीच हरकत येत नाहीं. अफवा खोटी आहे ह्याचा अर्थ इतकाच कीं, जनरल जॉफ्रे ह्यानीं प्रथमपासूनच लष्करी धोरणाकरितां नव्हे, तर राजकीय धोरणाकरितां व्हर्डूनचें संरक्षण करण्याची आज्ञा केली व लष्करी मंडळांत व मुत्सद्दीमंडळात फ्रान्समध्यें मतभेद नव्हता व नाहीं. हे राजकीय धोरण कोणचें ? जर्मनी काय किंवा फ्रान्स काय ह्या दोन्ही देशांतील सामान्य लोकांना युद्धाचा कंटाळा आस्ते आस्ते येऊं लागला आहे. सांप्रतचें महायुद्ध एवढ्या मोठ्या प्रचंड प्रमाणावर चाललें आहे कीं, ह्या महायुद्धाचें एक वर्ष म्हणजे पूर्वीच्या युद्धाचीं चारचार पांचपांच वर्षें होत. आतां दोन वर्षें होत आलीं. तेव्हां पूर्वीच्या युद्धाच्या मानानें आठदहा वर्षें हें युद्ध चाललें असें म्हणण्यास हरकत नाहीं. मग लोकांना कंटाळा कां येऊ नये ? कंटाळलेले लोक त्यांच्या पूर्वजांहून कर्तबगारीनें, शौर्यानें व चिकाटीनें कमी योग्यतेचे आहेत असें कोणीहि म्हणणार नाहींत. मुत्सद्दी प्रजाजनांना दोष देऊं शकत नाहींत. कारण महायुद्ध झालें तरी मनुष्यस्वभावाच्या सीमेचें अतिक्रमण महायुद्धास करितां येत नाहीं. नवी तयारी, नवा दम इंग्लंडांतच काय तो दिसत आहे. बाकी सर्व युरोपखंड कंटाळलेलेंच ! अशा स्थितींत व्हर्डून जर घेतां आलें नाहीं तर जर्मन जनसमूहाचा कंटाळा गळाठण्याच्या पथाला लागतो कीं काय अशी भीति जर्मनीला वाटणें साहजिकच नाहीं काय ? बरें, व्हर्डून जर पडलें तर फ्रान्स तरी गळाठणार नाहीं म्हणून कशावरून ? लोकमतांतील हा कंटाळा व्हर्डूनच्या लढाईची सुरवात करण्यास कारणीभूत झाला असो वा नसो, पण पहिला महिना निघून गेल्यानंतर पुढे तीनचार महिने ही लढाई जोरजोरानें चालू राहिली ह्याचें श्रेय ह्या कंटाळ्यास देणें भाग आहे. हा राजकीय हेतु साधण्याकरितां आणखीहि कित्येक आठवडे ही व्हर्डूनची लढाई चालेल. इतर ठिकाणच्या रणभूमींना महत्त्व प्राप्त होऊन जर लोकांचे डोळे दिपून गेले तरच व्हर्डून मागे पडेल. नाहीं तर

व्हर्डूनची लढाई महायुद्धाचा शेवट पाहिल्यावांचून थांबणार नाहीं असा सांप्रतचा अंदाज आहे. तेव्हां इतर रणक्षेत्रें दैदीप्यमान होई तों व्हर्डूनची झुन्ज एकसारखी चालू राहणार, हें निश्चित होय. व्हर्डूनच्या लढाईत दोन तीन महिने फ्रान्स पूर्णपणें वेधून गेला आहे असें पाहून मे महिन्यांत आस्ट्रियानें इटलीस चिरडून टाकण्याचा आपल्या जंगी उद्योगास प्रारंभ केला. मे अखेरीस व जूनच्या प्रारंभीं ह्या उद्योगास बरेंच यश आलें. टेंट्रिनोच्या आल्प्स पर्वताची सर्वांत उंच रांग ओलांडून इटलीच्या मुलखांत आठदहा मैल आंत घुसून असियागो व असिसेरो हीं ठाणीं आस्ट्रीयानें घेतलीं आणि व्हेनिसच्या मैदानापासून पांच मैलांच्या अंतरावर आस्ट्रिया येऊन ठेपला. व्हेनिसच्या मैदानावर आस्ट्रिया उतरणार व इटलीची खराबी होणार अशी भीति सर्वांना वाटली. इटली देश खडबडून जागा झाला. लढाई जितक्या जोरानें इटलीच्या तर्फे चालावयास पाहिजे, तितक्या जोरानें चालविली जात नाहीं, असा इटलियन लोकांचा समज झाला. इटालीचे पार्लमेंटसभेत मुख्य प्रधान मि. सलेंद्रा ह्यांच्या प्रधानमंडळावर कडक टीका झाली; आणि सलेंद्रा ह्यांच्या प्रधानमंडळानें राजीनामा देऊन लढाई जोरानें चालविणारें नवें प्रधानमंडळ नेमण्यांत आलें. जूनच्या दुसऱ्या तिसऱ्या आठवड्यात डोंगराळ प्रदेश सोडून मैदानावर उतरण्याचा आस्ट्रियानें शिकस्तीचा प्रयत्न केला, पण आस्ट्रिया जर मैदानावर उतरला तर इटलीची धडगत नाहीं हें पूर्णपणें ओळखून जिवापाड लढून आस्ट्रियाचे सर्व प्रयत्न इटलीच्या लष्करानें विफल केले! जूनच्या चौथ्या आठवड्यांत इटालियन युद्धाचें स्वरूप पालटलें. आस्ट्रिया कमकुवत झाला आणि इटलीचा हात पुन्हां वर चढला. जून अखेरीस व जुलईचे प्रारंभीं आसिसेरो व आसियागो हीं गावें जाळून पोळून टाकल्यावर आस्ट्रियानें सोडून दिलीं आणि आल्प्स पर्वतांच्या उंच रांगांचा आश्रय घेऊन इटलीच्या हल्ल्यापासून स्वतःचा बचाव आस्ट्रिया करूं लागला. जूनअखेरीस व जुलईच्या प्रारंभीं पूर्व, पश्चिम, उत्तर तिन्हीं सरहद्दीवर इटलीचे जोराजोराचे हल्ले सुरू झाले असून आस्ते आस्ते इटलीचें पाऊल पुढे पडत आहे.

## रशिया उठला

इटलीच्या रणभूमींत ही क्रांति कशी घडून आली? ट्रेंटिनोच्या या पहिल्या हल्ल्याच्या वेळीं तोफांच्या जिवावर आस्ट्रियानें इटलीची डोंगराळ फळी फोडली

होती. डोंगराळ फळी फोडण्याचें कठीण काम आस्ट्रियानें पार पाडलें होतें. तोफांच्या पुरवठ्यांत आस्ट्रियापेक्षां इटली दुर्बल ठरला होता. सर्व इटालियन लोक घाबरून गेले होते. अशावेळीं मोठ्या सैन्याचा झोत जर आस्ट्रियानें इटलीवर सोडला असता तर दोन तीन आठवड्यांच्या निकराच्या लढाईंत इटालियन मुख्य लष्करचा पराभव करून आस्ट्रियास व्हेनिसच्या मैदानांत घुसतां आलें असतें, आणि एकदां का आस्ट्रिया व्हेनिसच्या मैदानांत घुसला असता तर पुढे महिना दोन महिन्यांत इटली मेटाकुटीस येऊन स्वतंत्र तह करण्यास राजी झाला असता. रशियास पीछेहाटीस विपुल जागा आहे; शे दोनशें मैलाचीं पीछेहाट झाली तरी रशियाचें राज्ययंत्र न बिघडतां सुरळित चालतें. पंचवीस-तीस मैलाहून अधिक पीछेहाट इटलीस खपत नाहीं; लगेच राज्ययंत्र बिघडतें. आस्ट्रिया फळी फोडून आठदहा मैल आंत घुसल्यावर इटालियनांना आणखी पचवीसतीस मैल मागे हटविण्याकरितां आस्ट्रियानें आपले सर्व बळ कां खर्चीं घातलें नाहीं ? इटालियन फौजेची मर्दुमकी आस्ट्रियाच्या बेतांच्या आड आली ही गोष्ट तर खरीच, पण आस्ट्रियाचा बेत फसण्याचें मुख्य कारण म्हटले म्हणजे जूनच्या आठदहा तारखेला रशिया अवचित उठला आणि ब्युकोव्हिनाच्या सरहद्दीवर रशियानें आस्ट्रियाचें कवरडे इतक्या जोरानें मोडलें कीं, रशियाकडची आपली बाजू सभाळण्याकरितां जूनच्या चौथ्या आठवड्यांत आस्ट्रियास आसियागो व आसिसेरो हीं ठाणीं सोडून चीं चीं करीत मागें परतावें लागले ! जूनच्या आठदहा तारखेस रशिया इतक्या जोरानें उठेल असा अदाज आस्ट्रोजर्मनांचा बिलकूल नव्हता. सर्व्हिया देश आक्रमण करून तुर्काशीं संलग्न झाल्यानतर माऊटनिग्रोच्या व आल्बेनियाच्या युद्धांत आस्ट्रिया गुंतला असतांना रोमानियाला स्वतःच्या बाजूकडे वळवून घेण्याकरितां रशियानें दोन महिने जोरजोराचे हल्ले ब्युकोव्हिनावर केले होते. या हल्ल्यांत त्यावेळीं रशियास यश आले नाहीं. ह्या हल्ल्यांनी रशिया थकला आहे असें समजून व व्हर्डूनच्या लढाईंत फ्रान्स पुरा गुरफटला आहे असें पाहून आस्ट्रियानें ट्रेंटीनोच्या स्वारीची तयारी केली. व्हर्डूनची लढाई सुरू होऊन दोन तीन महिने झाले तरी रशियास असें वाटत होतें कीं, जर्मनी पाहिजे तेव्हां व्हर्डूनचा नाद सोडून देऊन एकदम आपल्या अंगावर वळेल, पण व्हर्डूनची लढाई जोरानें चालू असतां इटलीला ग्रासण्याचा उद्योग जेव्हां आस्ट्रियानें सुरू केला आणि त्या उद्योगांत पहिल्या धडकीनें फळी

फोडण्याचें यशहि जेव्हां आस्ट्रियास प्राप्त झालें तेव्हां दोस्त सरकारांना नक्की समजलें कीं, आस्ट्रो–जर्मनांचा रोख पेट्रोग्राड घेण्याकडे कांहीं महिने नसून इटलीला लोळवण्याकडे आहे. इटली जर लोळविला गेला तर राजकीय दृष्ट्या व लष्करी दृष्ट्या रशियाच्या स्वारीहून अधिक फलप्राप्ति आहे असें आस्ट्रो–जर्मनांनीं निश्चितपणें ठरविल्याचें दिसून आलें. लगेच रशियानें आपल्या सैन्याची रचना बदलली. उत्तर भागांत पेट्रोग्राडच्या संरक्षणाकरितां ठेवलेलें सैन्य दक्षिणेस ग्यालिशियाच्या सरहद्दीवर पाठविण्यांत आलें, आणि रशिया हालचाल करणार नाहीं अशा समजुतीनें ग्यालिशियांत बेसावध राहिलेल्या आस्ट्रो–जर्मन लष्करांवर प्रिपेट नदीच्या दक्षिणेपासून रोमानियाच्या सरहद्दीपर्यंत रशियानें एकदम चढाई सुरू केली. या चढाईंत रशियाला एवढा मोठा जय मिळाला कीं, पुन्हां ताजातवाना होण्याची रशियाची शक्ति अमर्यादित असल्याविषयींची खूण जूनच्या दुसऱ्या तिसऱ्या आठवड्यांत सर्वांना चांगली पटली. जून महिन्यांत रशियानें आस्ट्रियाच्या सैन्यापैकीं दोन अडीच लाख लोक कैद केले, तीन चारशे तोफा घेतल्या, आणि पांच–सहाशे मशिनगन्स काबीज केल्या. लेंबर्गच्या उत्तरेस असलेल्या लस, रोव्हनो व डयुबनो या किल्ल्यांच्या त्रिकुटांतील डोंगराळ प्रदेश एकदम काबीज करून कोवेल स्टेशनावर जोराची स्वारी केली, पण जूनच्या चवथ्या आठवड्यांत जर्मनी सावध होऊन स्वतः सेनापति मॅकेनसन रशियाच्या या स्वारीच्या उत्तर बगलेवर दाखल झाले. जर्मन सेनेनें स्टीर नदी ओलांडून कोवेलच्या उत्तरेकडील सार्नी जंक्शनच्या रोखानें चाल करण्यास सुरुवात केली. जर्मन सेनेच्या या हालचालीमुळे कोवेलवरील रशियाची स्वारी मदावली. जून अखेरीस व जुलईच्या प्रारभीं स्टीर नदीवर रशियाची व जर्मनीची जगी झुंज सुरू झाली असून कोवेल स्टेशन घेऊन ग्यालिशिया व पोलंड यांच्यामध्ये पाचर ठोकण्याच्या रशियाच्या बेतास बराच अडथळा उत्पन्न झाला आहे. जुलई प्रारंभाला स्टीर नदीच्या कांठीं व लेंबर्गच्या बाजूला विशेष जोर न करतां दक्षिणेस ब्युकोव्हिनामध्येंच मोठी चढाई करण्याचें रशियाचें लष्करी धोरण प्रकट होऊं लागलें आहे. जून महिन्यामध्यें ब्युकोव्हिनाची राजधानी झर्नोव्हिच शहर काबीज करून कोलोनिया शहरहि रशियानें घेतलें आणि सर्व ब्युकोव्हिना प्रांत आक्रमून जुलईच्या प्रारंभाला रशियाच्या तोफांचे

गोळे ब्युकोव्हिना व आस्ट्रियाहंगारी ह्यांमधील कार्पेथियन पर्वताच्या उतरणीवर पडूं लागले! ब्युकोव्हिना प्रांतांत आस्ट्रियाची पूर्ण पिछेहाट होऊन कार्पेथियनचा आसरा घेऊन रशियाशीं लढणें आस्ट्रियास भाग पडलें आहे. ब्युकोव्हिनाचा कार्पेथियन पर्वत ओलांडून आस्ट्रिया–हंगारींत शिरण्याचा हा प्रयत्न कोणत्या स्वरूपाचा आहे ? वर्ष सव्वा वर्षपूर्वी उत्तर कार्पेथियन ओलांडून ऑस्ट्रिया–हंगारींत घुसण्याचा भयंकर उद्योग रशियानें केला तो उद्योग स्वतःच्या हिंमतीवर कार्पेथियन पर्वत ओलांडून आस्ट्रिया–हंगारीस लोळवून महायुद्धाची परिसमाप्ति करण्याच्या इराद्याचा होता. गेल्या सालच्या पीछेहाटीनंतर तसली हिंमत रशियांत उरलेली नाहीं. जून महिन्यांत ब्युकोहिना घेऊन आस्ट्रियाचा जो जंगी पराभव रशियाने केला तो महायुद्धातील एक चमत्कारच समजला पाहिजे. तेव्हां ब्युकोव्हिनांतून पूर्व कार्पेथियन पर्वतावर रशियाचे होणारे हल्ले इटलीचें ग्रहण सोडविण्याच्या हेतूने केलेले आहेत, आस्ट्रियाला लोळविण्याच्या जंगी तयारीच्या स्फूर्तीनें केलेले नाहींत, असे मानणें भाग आहे. ह्याचा अर्थ असा कीं, इटलीचें ग्रहण सुटून जर पूर्व कार्पेथियनमध्ये व ब्युकोव्हिनामध्यें आस्ट्रिया रशियाशीं निकराने लढूं लागला तर जुलै महिन्याच्या अखेरीस कार्पेथियन पर्वतात रशिया थकण्याचा संभव आहे, आणि कार्पेथिअन पर्वतानें सव्वा वर्षपूर्वीप्रमाणें जर रशियास पुन्हां थकविलें तर प्रिपेट नदीच्या दक्षिणेस जनरल मॅकेनसन ह्याना आणि प्रिपेट नदीच्या उत्तरेस जनरल हिंडेनबुर्ग ह्याना पुन्हा फावण्याचा संभव आहे. म्हणजे इटलीचें ग्रहण सोडवितां सोडविता स्वतः रशियास ग्रहण लागावयाचे आणि संकट समयीं इटलीच्या मदतीस धावून जाण्याच्या कामीं रशियानें जो दिलदार स्वार्थत्याग दाखविला, जे शौर्य प्रकट केलें, जो विलक्षण विजय संपादिला, ती सर्व कामगिरी फुकट जाण्याची वेळ यावयाची. जर्मनीच्या भीतीतून जर रशिया मुक्त राहिला तरच आस्ट्रियावरील जंगी विजयाचें चीज होणार. नाहीं तर हात दाखवून अवलक्षण ! रशियन लष्कराची ही परिस्थिति ओळखून रशियावर जर्मनीची स्वारी होऊ नये म्हणून फ्रान्सच्या रणभूमींत सोम नदीच्या टापूत फ्रेंचाच्या सहाय्यानें इंग्रजांनीं जर्मनावर जंगी चढाई करण्यास जून अखेरीस सुरुवात केली; आणि प्रारंभीच्या धडकीला उत्तम यशहि संपादन केलें. अँग्लो–फ्रेंचांनी

१९

या लढाईंत जर्मनांपासून वीस–पचवीस खेडीं हिसकावून घेतलीं असून दहा पंधरा हजार जर्मन सैन्य कैद केलें आहे. एवंच जुलई प्रारंभाला फ्रान्सच्या रणभूमींत कोणचाचा भाग थंड पडला नसून इंग्रज, फ्रेंच व जर्मन एकमेकांशीं जोरजोरानें लढूं लागले आहेत; रशियाच्या रणभूमीच्या उत्तर भागांत सेनापति हिंडेनबुर्ग यांनीं हालचाल सुरू केली असून प्रिपेट नदीच्या दक्षिणेस सेनापति मॅकेनसन रशियावर तुटून पडत आहेत; ग्यालिशियांत आस्ट्रियाची व रशियाची चागली झुंज जुंपली असून ब्रुकोव्हिया जवळचा कार्पेथियन पर्वत पुन्हां रक्तानें माखला जात आहे; इटलीच्या सभोंवतालचा आल्प्स पर्वतहि जुलई महिन्यांत आस्ट्रो–इटालियनांच्या रक्तानें लाल झाल्यावांचून रहाणार नाहीं. सॅलिनोकाच्या बाजूलाहि बल्गेरियन्स गप्प न बसतां सॅलिनोकाला त्रास देऊ लागतील; आणि जून महिन्यांतच ट्रेबिझाड, अर्झरूम व इराणची सरहद्द या टापूंत रशियास त्रास देऊ लागलेलें तुर्की सैन्य आस्ट्रो–जर्मनांना मदत व्हावी म्हणून जिवापाड लढण्यास कमी करणार नाहीं. एकदरीनें जुलई महिना प्राणनाशाच्या व माराकुटीच्या दृष्टीनें महायुद्धाच्या काळांत अत्यंत महत्त्वाचा जाणार; आणि या मारहाणींत कोणाच्या पक्षाचें अधिक नुकसान होतें यावर महायुद्धाचें पुढील स्वरूप अवलबून राहणार हें उघड आहे.

---

# दुसऱ्या वर्षाचा जुलई-ऑगस्ट महिना

## चांगले दिवस दिसूं लागले

जुलै महिना दोस्त सरकारांना फार चांगला गेला. इतके चांगले दिवस गेल्या दोन वर्षांत एका प्रसंगाशिवाय दुसऱ्या कोणत्याहि वेळीं गेले नाहींत. पहिल्या वर्षात यिप्रेस येथें इंग्रजांनी व मार्न नदीवर फ्रेंचानीं जर्मनांचा पराभव केला, पण ते दिवसहि जुलई महिन्या इतके चांगले नव्हते. कारण, त्या दोन्ही ठिकाणी जर्मन अडले गेले इतकेंच. इंग्रजांची व फ्रेंचांची उलट चढाई सुरू होऊन जर्मन मागे रेटला गेल्याची ती उदाहरणें नव्हत. जुलई प्रारंभाला सोम नदीच्या कांठीं पंधरावीस मैलांच्या पट्ट्यावर इंग्रज व आठ दहा मैलांच्या पट्ट्यावर फ्रेंच जर्मनांवर चाल करून जाऊ लागले. या सोमनदीच्या लढाईत पहिल्या आठवड्यात इंग्रजांनी व फ्रेंचानीं जर्मनांना चांगला चोप दिला व काहीं ठिकाणीं दोन मैल, कांहीं ठिकाणीं तीन मैल, तर काहीं ठिकाणीं पांच मैलापर्यंत जर्मनांना मागे फेकून दिले ! पहिल्या आठवड्यात मिळालेला हा विजय, काबीज केलेल्या मुलखात चर वगैरे खणून दुसऱ्या आठवड्यांत दृढ करण्यांत आला. दुसऱ्या आठवड्यात जर्मनांनीं उलट हल्ले करून गेलेले मुलुख परत मिळविण्याची बरीच खटपट केली, पण इंग्रजांच्या तोफापुढे त्यांचे काहीं चाललें नाही. तिसऱ्या व चवथ्या आठवड्यात इंग्रजांनी व फ्रेंचानीं पुन्हा जर्मनांवर हल्ले चढविले व जर्मनांच्या दुसऱ्या चरातून त्यांना हुसकून लावून शौर्याची शिकस्त करून जुलई अखेर जर्मनांच्या दुसऱ्या चरांची रांग पचनीं पाडली. आगस्ट प्रारंभाला जर्मनांच्या तिसऱ्या चराच्या रांगेवर इंग्रजांचे हल्ले सुरू झाले. जर्मनांचा अशारीतीनें पराभव करून त्याना एकसारखे इंग्रजांनीं मागे हटविण्याची ही पहिलीच वेळ आहे. जून-जुलई महिन्यात रशियाच्या चढाईला चांगला जोर आला; व्हर्डूनपुढे जर्मनांनी हात टेकले; इटलीच्या रणभूमींत ट्रेंटिनो प्रातांत एशिआगो, आर्शिरेरो हीं इटालियन गावें आस्ट्रियापासून इटलीनें हिसकून घेतलीं; तुर्की युद्धात आर्मीनियाच्या रणभूमीत तुर्कींचा पुन्हां पराभव होऊन बहुतेक सर्व आर्मेनिया रशियाच्या ताब्यात गेला. अशा अनुकूल परिस्थितीवर सोमनदीवरील इंग्रजाच्या विजयाने

कळस चढविला ! इतकें चांगले दिवस इटली महायुद्धांत सामील झाला त्या महिन्यांतच काय तें यापूर्वी दृष्टीस पडले होते. रशियाने प्रिझमिसलचा किल्ला घेऊन उत्तर कार्पेथियन पर्वताचा माथा गांठून दक्षिणेस हंगेरियामध्ये उतरण्यास सुरुवात केली होती; अशा प्रसगीं त्यावेळीं इटली दोस्त सरकारांना येऊन मिळाला तो महिना जसा चांगला गेला तसाच जुलई महिनाहि चांगला गेला. रोमानिया जर दोस्त सरकारांना जुलई महिन्यांत येऊन मिळाला असता तर त्यावेळची आठवण पूर्णपणें सर्वांना झाली असती.

## इंग्रजांची चढाई

ॲंग्लो-फ्रेंचांच्या जुलईमधील चढाईला सोम नदीच्या काठीं प्रारंभ झाला. जुलईमधील लढाईला सोम नदीची लढाई असें नांव पडलें असून आगस्ट महिन्यांत ही चढाई संप्रतचें रणक्षेत्र सोडून सात-आठ मैलांहून अधिक पुढे जाणार नाहीं असा अदाज आहे. सोम नदीच्या काठीं चढाई सुरू करण्यांत लष्करी धोरण कोणचें ? बेल्जममधून व उत्तर फ्रान्समधून जर्मनांना हाकलून दिलें पाहिजे. यिप्रेस येथे व बेल्जममध्ये गेले तीन चार महिने बराच मोठा सैन्याचा जमाव जर्मनांनीं करून ठेविला होता; आणि व्हर्डूनचे हल्ले चालले असतांना यिप्रेसच्या पट्ट्यावरहि जोरजोराचे हल्ले केले होते. अशा स्थितींत बेल्जममध्ये चढाई करणें इष्ट नव्हतें. म्हणजे बेल्जम ही जर्मनाची उजवी बगल होय. उजव्या बगलेस साधण्यासारखें नव्हतें तर डाव्या बगलेकडे कां बघितलें नाहीं ? डावी बगल म्हणजे व्हर्डूनचा टापू आला. व्हर्डूनच्या टापूंतच जर्मनांच्या मोठ्या तोफांचा मोठा जमाव. अर्थात् उजवी आणि डावी हे दोन्ही टापू निरर्थक ठरले. शिल्लक राहिला मध्यभाग. या मध्यभागाचा बदोबस्त जर्मनांनीं तितका चांगला ठेवलेला नव्हता. इंग्रजांची चढाई सोम नदीवर न येता बेल्जमच्या बाजूला येईल असा जर्मनांचा अदाज होता. असा अदाज त्यांनीं दोनतीन कारणांमुळे बांधिला पहिलें कारण असें कीं, मे अखेर झालेल्या जटलडच्या आरमारी लढाईत जर्मनीचें फार नुकसान झालें; व त्यामुळें बेल्जमच्या किनाऱ्यावर जर इंग्रजी आरमारानें हल्ला केला तर तेथे सैन्य उतरविण्यास जटलडच्या लढाईमुळें अधिक सुलभ झालें. या सुलभतेचा फायदा इंग्रज घेतील अशी भीति वाटून बेल्जमचा किनारा विशेष सुसंरक्षित करण्याचा उद्योग जर्मनीनें जून महिन्यांतच चालविला. शिवाय बेल्जमवरच पहिली धाड येईल असें जर्मनांना

वाटण्याचें दुसरें कारणहि होतें. तें कारण हे कीं, मध्यावर म्हणजे सोम नदीच्या टापू त हल्ला करून जय मिळविण्यांत तत्काळ विशेष फायदा नाहीं. यिप्रेसपासून व्हर्डूनपर्यंत जर सरळ रेषा काढिली तर यिप्रेस सोम नदी व व्हर्डून मिळून सांप्रतचें बनलेलें तोंड व ती सरळ रेषा या सर्वांची मिळून एक धनुष्याकृति उत्पन्न होते. या धनुष्याची दोरी म्हणजे यिप्रेस—व्हर्डूनची सरळ रेषा होय. ह्या धनुष्याच्या कांबीच्या मध्यावर सोम नदी येते. आतां सोम नदीच्या टापूपासून जर जर्मनांना मागे रेटत नेलें तर धनुष्याच्या कांबीची जागा सोडून दोरीच्या जागीं सरळ रेषेंत जर्मन जातील; आणि दोरीच्या जागीं जर्मन गेले असतां थोडक्या लोकांनीं व कमी तोफांनीं त्यांना आपलें तोंड सहज सभाळतां येईल. म्हणजे लष्करी डावपेचांच्या दृष्टीने विचार केला असतां सोम नदीचा टापू मेहनतीच्या मानानें कमी फळ देणारा आहे. पूर्ण फळ देणारा टापू बेल्जमचा किंवा व्हर्डूनचा. मग अर्धें फळ देणाऱ्या टापूवरच इंग्रज कां संतुष्ट झाले? याचीं कारणें अनेक आहेत. बेल्जम व व्हर्डून या टापूंत जर्मनांचा बंदोबस्त विशेष; तेव्हां तेथील विजय पूर्ण फळ देणारा जरी असला तरी सुलभ नव्हे. अवघड ठिकाणीं हल्ले करून सर्व तयारी व्यर्थ घालविण्यापेक्षा दुय्यम प्रकारच्या फळावर लक्ष ठेवून विजयी हणें अधिक श्रेयस्कर होय. दुसरी गोष्ट अशी कीं, सोम नदीवरील हल्ल्याबरोबरच बेल्जमच्या चढाईची पूर्ण तयारी होईतो वाट पहात बसण्यांत अर्थ नव्हता. व्हर्डून-जवळ निकराच्या लढाया चालल्या होत्या. रशिया जोरजोरानें ब्युकोव्हिनामध्ये शिरत होता. अशावेळीं गप्प कसें बसावें? पुढील फायद्यावर लक्ष देऊन इंग्रज गप्प बसले असते, पण गप्प बसण्याच्या एकदोन महिन्यांत व्हर्डून जर पडलें असतें आणि रशिया जर थकला असता तर चढाईला अनुकूल असलेला काल निघून गेला असता. सर्व दांत बळकट करण्याची वाट पहावी तर साध्या चण्याच्या ऐवजीं लोखंडी चणे पुढे आले आहेत. तेव्हां जुलै प्रारंभाची योग्य संधि व्यर्थ न दवडतां दुय्यम फळाच्या टापूंतच इंग्रजांनीं आपल्या चढाईस सुरुवात केली, हें ठीक झालें. जुलैच्या पहिल्या आठवड्यांत सोम नदीच्या उत्तरेस थीपवलपासून कुर्लूपर्यंत इंग्रजांनीं हल्ला चढविला आणि सोम नदीच्या दक्षिणेस पेरोनीच्या रोखानें फ्रेंच पुढे जाऊ लागले. हा हल्ला सुरू करण्याचे पूर्वीं तोफांचे मोर्चावर मोर्चे बांधून इंग्रजांनीं सर्व जमीन गर्भापर्यंत भाजून काढली होती. खालची माती वर व वरची माती

खालीं अशी स्थिति होऊन चरांत जिवंत राहाणें अशक्य केलें होतें. डुनाजी नदीवरील तोफांच्या माऱ्यापेक्षां व्हर्डूनच्या तोफांचा मारा अधिक भयंकर होता, पण सोम नदीनें व्हर्डूनलाहि मागें टाकलें ! इग्रज जर्मनांच्या इतकी दारूगोळयाची व तोफांची तयारी करूं शकतात हें सोमनदीच्या लढाईनें सिद्ध केलें आहे. महायुद्धास प्रारंभ झाला त्यावेळीं कित्येक वर्षांचा साठा म्हणून इग्रजांच्या पाशीं जितक्या तोफा व जितका दारूगोळा होता त्याहून अधिक तोफा व अधिक दारूगोळा सांप्रत दर महिन्यास तयार होत असतो. आतां तोफा व दारूगोळा यासंबधानें काळजी उरलेली नाहीं. थीपवलपासून कुर्लूपर्यंतचा टापू अशा रीतीनें भागून काढल्यावर कॉटाल्मेसन, मॉटावान, हार्डेकोर्ट व कुर्लू ही गावें पहिल्या धडकीसरशीं इग्रजांनीं घेतलीं व दुसऱ्या आठवड्यात पॉझिअर्स, बेझाटीन व लांग्वेव्हाल येथपर्यंत आंत घुसून एकदर चोवीस चौरस मैलांचा मुलूख काबीज केला ! थीपवल येथे पहिल्या झटक्याला जर्मनांनीं अडथळा केला, पण जुलैअखेर पोझोअर्स, बेझांटीन व लांग्वेव्हाल या उंचाटीच्या टापूत इंग्रजी सेना पोचून तेथील ठाण्याचीहि बळकटी झाली असल्यामुळे आगस्ट महिन्यांत थीपवलला डाव्या बाजूनें वळसा पडण्यास हरकत येणार नाहीं. आणखी दोन तीन मैल इग्रज पुढे सरकले म्हणजे टेकडाळ मुलूख सरून उतरणीच्या मैदानावर इग्रज जातील. हें मैदान इग्रजांनीं गांठलें म्हणजे इग्रजी सेनेची पुढली गति जलदीची होईल काय ? हे मैदान गाठण्यास पहिल्या धडकीसारखे पुन्हां श्रम करावे लागतील हे खरें; पण मग टेकड्याचा अडथळा शिल्लक राहाणार नाहीं. टेकडयाचा अडथळा जरी शिल्लक राहिला नाहीं तरी चढाईला सुरुवात केल्यापासून पांच सात आठवड्यानीं पांच सात मैल अतरावरचें हे मैदान दिसणार ! या पाच सात आठवड्याच्या अवधीत चराच्या एकामागून एक किती एक रांगा जर्मनानीं म्हणून ठेविल्या असल्या पाहिजेत. अर्थात् उतरतें मैदान लागलें तरी चराचे अडथळे शिल्लक राहाणारच. जर्मनांना मागे हटविण्याच्या कामी जुलै महिन्यातील ही इग्रजांची चढाई कितपत चागलें यश सपादन करते हे आगस्ट महिन्यांतील लढाया ठरविणार आहेत. तेव्हां आगस्ट महिन्यात सोमनदीच्या लढायांकडे वाचकांनीं अवश्य लक्ष पुरवावें. जर्मनांना मागे हटविण्याच्या डावपेचांबरोबरच दुसरें एक मोठे कार्य इग्रजाच्या चढाईनें घडवून आणिलें आहे. तें हे कीं, जुलै महिन्यांत व्हर्डूनपुढे जर्मनाचें पाऊल बिलकूल पुढे पडलें नाहीं. इतकेंच

नव्हे तर फ्रेंचांनीं फ्ल्युरी नांवाचें खेडें जर्मनांपासून पुन्हां परत घेतलें ! इंग्रजांच्या चढाईनें फ्रेंचांना धीर आला आणि रोजच्या रोज जर्मन सेना मारून जर्मनांना झिजवून झिजवून मेटाकुटीस आणण्याच्या उद्योगाला फ्रेंच जुलै महिन्यांत पुन्हां लागले.

## रशियाला जोर

पश्चिम रणभूमींत जर्मनांना उगाळून उगाळून झिजवून झिजवून निर्बल करण्याचा उद्योग ॲंग्लो–फ्रेंच सेना उत्तम रीतीनें करीत आहे तर पूर्व रणभूमींत आस्ट्रो–जर्मनांना तडाखा देण्याचें काम रशियानें जोरजोरानें आरंभिलें आहे. महायुद्धाचे प्रारभीं इग्रजांनी दोन चार लाख सैन्य रणभूमीवर उभ केलें तर पुष्कळ झालें अशी समजूत होती. आजकाल पन्नास लाख इग्रज रणभूमीवर फिरत आहेत; आणि इग्रजी साम्राज्याच्या सामग्रीचा पूर्ण उपयोग होण्यास अलीकडे कोठें प्रारभ झाला आहे ! इग्रजी सामर्थ्याची खरी जुळवाजुळव होण्याचे दिवस अद्याप बरेच पुढे आहेत. इग्रजी आरमार जर्मनांचा कोंडमारा करीत आहे. ह्या कोंडमाऱ्यानें अन्नान्नगत होऊन तहाची भीक मागण्यास यदा जरी जर्मन तयार होणार नाहींत तरी अन्नाच्या दृष्टीनें व पैशाच्या दृष्टीनें पुढील सालीं जर्मन राष्ट्र चांगलें खालावणार असें म्हणण्यास आज हरकत नाहीं. रशियाला जरी एका बाजूला ठेवला आणि इग्लड, फ्रान्स व इटली या तिघांशीं जुलै महिन्याप्रमाणें जर जर्मनी आणखी पांचसहा महिने लढत राहिला तर सहा महिन्याच्या अखेरीस नवीन सैन्याच्या अभावामुळे जर्मनीस रणांगण सोडून जाणें भाग पडेल. जुलै महिन्याप्रमाणें शत्रूवर एकसारखे हल्ले करण्याचें काम आणखी सहा महिने इग्लड, फ्रान्स व इटली या त्रिकुटीनें जरी केले तरी पैशाचा, दारूगोळ्याचा व लढवय्यांचा तुटवडा ह्या त्रिकुटीस पडणें शक्य नाहीं. आरमारी वर्चस्वाच्या दृष्टीनें, द्रव्याच्या दृष्टीनें, तोफाच्या दृष्टीनें आणि लष्कराच्या संख्येच्या दृष्टीनेंहि इग्लड, फ्रान्स व इटली ही तीन राष्ट्रें आस्ट्रो–जर्मनांना पुरून उरणारीं आहेत. प्रारंभीं प्रारभींचें विजय जर्मनीच्या बाजूचे आहेत, पण सामर्थ्याची वाढ दोस्त सरकारांच्या बाजूची आहे. गेल्यासालच्या पीछेहाटीने निर्बल ठरून रशिया जरी स्वस्थ बसला असता तरी देखील अखेरचा विजय जर्मनीच्याच बाजूनें तर्कसिद्ध झाला नसता. पण रशिया गप्प न बसतां जून जुलै महिन्यांत चांगले तडाखे देऊं लागला आहे. तेव्हां अखेरच्या विजयासंबंधानें कोणास शका राहील ? तुर्कांकडून मनुष्यबळाची मोठी मदत जर्मनीला होईलसें दिसत नाहीं. तुर्की साम्राज्य

जर्मनीशीं आगगाडीनें संलग्न होऊन आज सात आठ महिने झाले तरी युरोपियन धर्तीचें नवें मोठें लष्कर तुर्कांना उभारतां आलें नाहीं. युफ्रेटीस तैग्रीस नद्याच्या कांठीं कुतुल आमारा घेतल्यानतर तुर्कांचें पाऊल पुढे पडलें नाहीं. बसरापासून मेसापोटेमियामध्ये आगगाडी बांधण्याचा ठराव इंग्रजांनीं केला असून या आगगाडी-बरोबरच इग्रजी सेनाहि बगदादला पोचल्यांवाचून राहणार नाहीं. इग्रजांची जगी चढाई जर्मनांवर चालली असतांना जर्मनीला मदत करण्यासाठीं तुर्कांनी सुवेज कॅनालवर हल्ला करावयास पाहिजे होता, पण दोन चार जर्मन विमानें सुवेज कॅनालची टेहेळणी करून परत गेलीं यापलीकडे सुवेजच्या रणभूमीच्या बातम्या नाहींत. आठ महिने आगगाडीचा संबध प्रस्थापित झाल्यावर, इजिप्त घेण्याकरितां नव्हे, तर केवळ इग्रजाना दुसरा वेध लागावा म्हणूनहि जर तुर्कांना सुवेज कॅनालच्या बाजूला काही गडबड करता आली नाहीं तर त्याचा अर्थ काय ? जर्मनीच्या साहाय्यानेहि नवे मोठे लष्कर निर्माण करण्याची ताकद तुर्की साम्राज्यांत नाहीं, असें म्हणणें भाग पडत नाहीं काय ? आगस्ट–सप्टेंबर महिन्यात तुर्कांचे हल्ले कदाचित् सुवेज कॅनालवर होतील, पण तुर्कांनीं तसे धाडस केल्यास त्यात त्यांचें अधिकच नुकसान होईल. कारण तांबड्या समुद्रावरील अरब सरदार तुर्कांच्या विरुद्ध उठले असून मक्का–मदिनाच्या शेरीफानीं आपल्या स्वातत्र्याचा झेंडा उभारला आहे ! अर्थात सुवेज कॅनालकरितां केलेली तयारी अरबांशी झुजतां झुजता वाया जाणार. मेसापोटेमियामधील इग्रज, ताबड्या समुद्रावरील अरब या दोन भुग्याशिवाय आणखी दोन सकटे तुर्कांवर आलेलीं आहेत. तांबडा समुद्र व इराणी आखात या जागा तुर्कांच्या मुख्य घरापासून फार लांब आहेत; पण तिसरें चवथ सकट तितक्या लांबीवरचें नाहीं. जून–जुलै महिन्यात रशियानें आस्ट्रियास जसे तडाखे दिले तसेच तडाखे जर आगस्ट–सप्टेंबर महिन्यांत रशियानें जर आस्ट्रियाला दिले आणि ब्युकोव्हिनाच्या मार्गानें हगारीमध्ये जर रशिया खरोखर घुसला तर रुमानिया रशियाला मिळाल्यावांचून राहाणार नाहीं. रुमानिया जर रशियाला मिळाला तर बल्गेरियाचा प्रत्येक इसम रुमानियाशीं लढण्यात गुतला जाईल; आणि सॅलिनोका येथे जमलेले पांच लाख इग्रज, फ्रेंच व सर्वियन यांच्याशीं परशेजारीं लढण्याचा बोजा एकट्या तुर्कांवर येऊन पडेल. म्हणजे ग्यालिशिया व ब्युकोव्हिना येथे जसजसा रशियाचा जोर अधिक होत जाईल तसतसें अधिका-धिक तुर्की सैन्य बल्गेरियाच्या बाजूला झुकविणें भाग पडेल. अशा स्थितींत सुवेज कॅनाल सारख्या दूरवर असलेल्या रणभूमीकडे नवें सैन्य तुर्क कोठून पाठविणार ? ब्युकोव्हिनातील रशियाचा जोर तुर्कांची अशारीतीने धादल उडवीत असल्यामुळें

काकेशियस पर्वताच्या बाजूला आर्मेनियांतहि तुर्कांची पीच्छेहाट होऊं लागली आहे. अर्झरूम, ट्रेबिझांड टापूंत जून महिन्यांत तुर्कांनी वर डोकें काढलें होतें, पण जुलै महिन्यांत आर्मेनियामध्यें तुर्कांचा चांगला पराभव रशियाने केला आणि अरझिनगेनचें ठाणेंहि काबीज केलें अर्झिनगेच्या पश्चिमेस साठ–सत्तर मैलावर असलेलें सिवासचें ठाणें रशियानें काबीज केलें म्हणजे आर्मेनियाचा प्रात संपून अनॉटोलियाच्या सुसपन्न प्रदेशांत रशिया घुसल्यासारखा होईल. अर्थात तुर्कांच्या हृदयाच्या ठिकाणीं दुःख पोंचेल. जून जलै महिन्यांतील रशियाचा जोर तुर्कांना पेचांत कसा आणील याचा विचार येथपर्यंत झाला. आतां आस्ट्रो–जर्मनांच्या बाजूला रशियाची चढाई कितपत यशस्वी झाली तें पाहूं या. जूनच्या दुसऱ्या आठवडयांत ग्यालिशियामध्यें व ब्युकोव्हिना-मध्ये रशियाने ज्यावेळीं आस्ट्रियावर एकदम स्वारी करण्यास आरंभ केला त्यावेळीं कांहींनीं असा तर्क बांधला होता कीं, रशिया खराखुरा उठला नसून इटलीच्या बाजूला आट्रिया विशेष गुंतला आहे असें पाहून रशियाने एका लहानशा साहसास आरंभ केला आहे इतकेच; पण जुलै महिन्यांत या भ्रमाचें निराकरण झालें. जून जुलै दोन महिने एकसारखी चढाई चालू ठेवून रशियाच्या आस्ट्रो–जर्मनांच्या साडेसात लाख सैन्याचा धुव्वा उडविला व या साडेसात लाखांपैकीं पांच लाखांना निकामी केलें! रशियाच्या या विजयाने दोस्त सरकारांना हर्षपूर्ण केलें असून आस्ट्रिया–हंगारीला भयभीत केलें आहे. रशियाचें मनुष्यबल अमर्यादित असून दारूगोळयासंबधानें व तोफा संबंधानें जपानचें पूर्ण सहाय्य रशियास आहे. जून जुलई महिन्यांतील या चढाईने दुसरी अशी एक गोष्ट शाबीत झाली आहे कीं, गेल्या सालीं रशियाची पीछेहाट जरी झाली, तरी रशियाच्या सेनशकटास बिलकूल धक्का लागला नाहीं. लष्कर कायम ठेवून रशिया मागे हटला. अर्थात दारूगोळा व कुमक यांची मदत येऊन पोंचतांच रशिया थोडया अवकाशांत पुन्हां ताजातवाना झाला. जून महिन्यांत ग्यालिशियाच्या उत्तरेस लस्क, डयूबनो व रोव्हनो या तीन किल्लयांच्या टापूंत लस्कचा किल्ला घेऊन रशिया कोव्हेल स्टेशनच्या रोखानें पुढे जाऊं लागला. जून अखेरीस व जुलैच्या प्रारंभीं जर्मनीने ह्या टापूंत थोपवून धरिलें, पण दक्षिणेस ब्युकोव्हिना प्रांतांत सर्व ब्युकोव्हिना प्रांत आक्रमून कार्पेथिअन पर्वत ओलांडण्याचा उद्योग रशियानें आरंभिला. जुलै अखेरीस या उद्योगास बरेच यश आलें असून खुद्द आस्ट्रियन सरकारनेंही हंगेरियावरील रशियाच्या स्वारीस सुरुवात झाली असें कबूल केलें आहे. रोमानिया जर आगष्ट महिन्यांत रशियास मिळाला तर या

स्वारीस विशेष रंग येईल; पण रोमानिया जर मिळाला नाहीं तर, कार्पेथिअन पर्वताच्या एक दोन घाटांनीं ही स्वारी व्हावयाची असल्यामुळें रशियास थोपवून धरणें आस्ट्रो-जर्मनांना जड जाणार नाहीं. नीस्टर नदीच्या पश्चिमेकडचा भाग व लेंबर्गचा टापू हीं काबीज करून आणखी चार पांच ठिकाणीं कार्पेथियन पर्वताला जेव्हां शह द्यावा तेव्हां हंगेरीयावरील स्वारीस खरें स्वरूप प्राप्त होणार. जुलै महिन्यांत नीस्टर नदीला महापूर आल्यामुळें आगष्टचे दोन तीन आठवडे निघून जाईतों नीस्टर नदीकांठच्या प्रदेशांत मोठया सैन्याच्या हालचाली करणें शक्य नाहीं. नीस्टर नदीला पूर आल्यानंतर लस्कच्या बाजूनें लेंबर्गवर उतरण्याचा प्रयत्न रशि· यानें केला व जुलैच्या तिसऱ्या आठवड्यांत ब्राडीचा किल्ला व गांव घेऊन बरेंच यशहि संपादन केलें. ब्राडीपासून लेंबर्गपर्यंतचा भाग बराच टेकडाळ असल्यामुळें ह्या बाजूला रशिया कांहीं काळ मंदगतीच होईल. शिवाय लेंबगवर उतरण्यापूर्वी लस्क, रोव्हनो व डयुवनो या टापूच्या उत्तरेस म्हणज लेंबगवर चाल करून येणाऱ्या मोठया सेनेच्या पिछाडीस कोव्हेल-सार्नी आगगाडीच्या टापूंत असलेल्या जर्मन सेनेचा पराभव करणें जरूर आहे. कारण रशियन सेना जर लेंबगवर दक्षिणेकडून चाल करून गेली आणि आस्ट्रियन्स मागे हटत हटत उत्तर कार्पेथियन-पर्यंत जर त्यांनीं रशियास विलोभून दूरवर नेलें आणि सेनापति हिंडेनबर्ग यांनीं डुनाजीची पुनरावृत्ति काढून कोव्हल-सार्नी प्रांतांतून रशियावर अवचित हल्ला चढविला, तर रशियन सैन्याची स्थिति सांपळयात सांपडल्यासारखी व्हावयाची. असल्या सकटाची आगाऊ·तरतूद करून ठेवण्याकरितां लेंबर्ग घेण्यापूर्वी कोव्हेल-सार्नी टापूंतून जर्मनांना हांकून लावून कोव्हेलचें जंक्शन स्टेशन स्वतःच्या कब्जांत ठेवण्याकरितां रशिया त्या टापूंत जोरजोरानें लढत आहे. आस्ट्रियाचा बचाव करण्याकरितां कोव्हेल-सार्नी टापू आपल्या हातचा दवडतां कामा नये हें पूर्णपणें जर्मनी ओळखून असून जिवाची पर्वा न करतां त्या टापूंत जर्मनी रशियाला अडथळा करीत आहे. जुलै अखेर कोव्हेलच्या जवळ दहा मैलांवर रशियाचा तळ पडला. हंगेरीयावरील रशियाच्या स्वारीस रंग येण्यास रोमानिया तरी रशियाला मिळाला पाहिजे किंवा कोव्हेल-सार्नी टापूंत जर्मनीचा पुरा मोड रशियानें केला पाहिजे. जून जुलै महिन्यातील रशियाच्य जोराकडे व वेगाकडे पाहिलें म्हणजे, वरील दोहोंपैकीं एकतरी गोष्ट आगष्ट महिन्यांत घडून येईल, असा तर्क बांधणें भाग पडतें.

**दुसरा भाग समाप्त**

विक्रीस तयार !    विक्रीस तयार !

# खाडिलकरांचा रुद्र

( लेखक:—श्री. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर )

श्री. काकासाहेब खाडिलकरांचा हा ग्रंथ म्हणजे त्यांनीं रुद्राचें आणि वैदिक वाङ्मयाचें जे भक्तिपूर्वक मनन चिंतन गेलीं सुमारें १० वर्षे चालविलें होतें त्या तपश्चर्येचें सुफल आहे. रुद्रांतील मंत्रांचें विवेचन करतांना श्री. काकासाहेबांनीं अभिनव अशी दृष्टी वापरली असून रुद्र अर्वाचीन पेहेरावात त्यांनीं वाचकांपुढे ठेवला असल्यामुळे 'खाडिलकरांचा रुद्र' हें ग्रथाचें नांव सर्वतोपरी सार्थ ठरत आहे. ह्या ग्रथांत श्री. काकासाहेबांचीं रुद्रावरील प्रवचनें दिलीं आहेत आणि नित्य-पठणासाठीं त्याचप्रमाणें नित्य अध्ययनासाठीं या ग्रथाचा उपयोग व्हावा म्हणून ह्या ग्रंथांत रुद्राचे मत्र व त्याचा अर्थ ठळक टाइपांत दिला असून मत्राचे स्वरहि दिले आहेत. मंत्रावर सविस्तर टीपाहि दिल्या आहेत.

ग्रंथाची किंमत एक रुपया आहे. ट. ह. निराळा.

**मॅनेजर—नवा काळ, गिरगाव मुंबई.**

**चित्रशाळा दुकान—पुणें व मुंबई.**

**परचुरे पुराणिक आणि मण्डळी, मुंबई ४.**

आमच्याकडे मिळणारीं पुस्तकें

# श्री. कृ. प्र. खाडिलकरांचीं नाटकें

## संगीतमाला.

बायकांचें बंड— कि. ०।१२ आणे.

सावित्री— कि. ०।१२ आणे.

मेनका— कि. ०।१२ आणे.

द्रौपदी— कि. ०।१२ आणे.

स्वयंवर— कि. ०।१२ आणे.

विद्याहरण—कि. ०।१२ आणे.

मानापमान—कि. ०।१२ आणे.

## गद्यमाला.

कीचक वध—कि. ०।१२ आणे.

कांचनगडची मोहना— कि. ०।१२ आणे.

सवाई माधवराव— यांचा मृत्यु—कि. ०।१२ आणे

भाऊबंदकी—कि. ०।१२ आणे

प्रेमध्वज—कि. ०।१२ आणे

सत्त्वपरीक्षा—कि. ०।१२ आणे

सवतीमत्सर—कि. ०।१२ आणे

श्री. य. कृ. खाडिलकरकृत कादंबऱ्या:— संसार शकट, सदानंद, आजकाल, प्रत्येकीं किंमत १॥ रुपया.

श्री. के. रा. पुरोहितकृत:—शून्यजगत्, आकाश पुष्प, प्रत्येकीं किं. २ रु.

श्री. भा. रा. धुरंधरकृत:—१० रुपयांचा चेक किंमत १॥ रुपया, गीता बोध किंमत ०।६ आणे.

पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें—'नवा काळ' ऑफीस मुंबई;

चित्रशाळा दुकान–मुंबई, व पुणें; व सर्व बुकसेलर्स.

म्यानेजर—नवा काळ, मुंबई.